घटक – १

# भारतीय तत्वज्ञानाचे स्वरुप


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषयविवेचन

- १.२.१ तत्त्वज्ञान म्हणजे काय?
- १.२.२ भारतीय तत्त्वज्ञानाचे स्वरुप
- १.२.३ भारतीय दर्शनांचे वर्गीकरण
- १.२.४ भारतीय तत्त्वज्ञानाची समान वैशिष्ठ्ये

१.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१.४ सारांश

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ पारिभाषिक शब्द

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे :

या घटकात खालील गोष्टींची आपण माहिती करुन घेणार आहोत.

* तत्त्वज्ञान म्हणजे काय हे सांगता येईल.
* तत्त्वज्ञानाच्या विविध व्याख्या करता येतील.
* भारतीय तत्त्वज्ञानाचे स्वरुप स्पष्ट करता येईल.
* भारतीय दर्शनांचे वर्गीकरण स्पष्ट करता येईल.
* भारतीय तत्त्वज्ञानाची समान वैशिष्ठ्ये सांगता येतील.

## १.१ प्रास्ताविक :

तत्त्वज्ञान विषयाची ओळख करुन घेणे हा घटकांचा उद्देश आहे. तत्त्वज्ञान या विषयाबद्दल सामान्य लोकांमध्ये काही गैरसमज आहेत. हा विषय कळण्यास अवघड आहे अशी समजूत आहे पण ही समजूत कशी चुकीची आहे हे आपणास या विषयाच्या अभ्यासाने होईल. प्रत्येक राष्ट्राला इतिहासात अनेक महापुरुष,

विचारवंत होऊन गेले.त्यांच्या विचारावरुन आपणास ''**तत्वज्ञान**'' विषयाची ओळख होईल. या महान पुरुषांनी असे काही विचार दिले की, त्या काळातील सामान्य लोकांचे जीवन बदलून गेले.

आपण तत्त्वज्ञानामध्ये अभ्यासल्या जाणाऱ्या विविध समस्यांची उत्तरे आपण शोधत जाऊ तसतसे तत्त्वज्ञान म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर आपणास मिळेल.

तत्त्वज्ञानाच्या संदर्भात तीन प्रश्न विचारता येतील. तत्त्वज्ञान हे केव्हा निर्माण झाले? कसे निर्माण झाले? ते कोणाकडून निर्माण झाले? साधारण भारतीय आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा उगम सुमारे २५०० वर्षापूर्वी झाला. जेव्हा माणूस भोवतालचे जग कसे निर्माण झाले? विश्वाच्या मूळाची अंतिम तत्त्व कोणते? मी कुठून आलो? या जगाचा नियंता, निर्माता कोण आहे? अशा विविध प्रश्नांना उत्तरे शोधू लागला. त्यातून तत्त्वज्ञानाचा जन्म झाला.

भारतीय तत्त्वज्ञान हे वेदकाळापासून अस्तित्वात होते. साधारण ख्रिस्तपूर्वी १५०० वर्षापूर्वी वेदांची रचना झाली. भारतीय तत्त्वज्ञानाची सुव्य वषृमत मांडणी साधारण इ.स.५ वे ६ वे शतकात झाली. भारतीय तत्त्वज्ञानाची वैदिक आणि अवैदिक अशा दोन भागात विभागणी केली जाते. न्याय, वैशेषिक , सांख्य, योग, पूर्वमिमांसा, उत्तर मिमांसा अशी वैदिक दर्शने आहेत तर चार्वाक , जैन, बौद्ध ह्या अवैदिक परंपरा आहेत.

भारतीय दर्शनात शंकराचार्य, भगवान बौद्ध, भगवान महावीर असे ठळक विचारवंत आहेत ज्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात मोलाची भर टाकली.

पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे उगमस्थान ङ्ग्रीसङ्ख देशात असून पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे प्राचीन- मध्ययुगीन- अर्वाचीन असे तीन कालखंड पडतात ''थेलीस'' हा पहिला पाश्चात्य विचारवंत होय ज्याने सृष्टीची निर्मिती कशी झाली? या प्रश्नाला ईश्वराने विश्व निर्माण केले या प्रश्नापेक्षा वेगळे उत्तर दिले. त्याने सृष्टीचा जन्म जलातून (पाण्यातून) झाला असे स्पष्टीकरण दिले असा त्याने त्या काळातील स्पष्टीकरणापेक्षा वेगळे स्पष्टीकरण दिल्यामुळे त्याल पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा जनक म्हटले जाते. ग्रीक विचारवंतात सॉक्रेटिस, प्लेटो असे विचारवंत आहेत प्राचीन काळापासून ते आजतागायत पाश्चात्य तत्त्वज्ञानात आत्मा, ईश्वर, सृष्टीची उत्पत्ती कशी झाली? अशा प्रश्नांना उत्तरे दिली गेली.

आपण या वर्षीच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासक्रमात काही प्रमुख भारतीय आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा परिचय करुन घेणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ तत्त्वज्ञान म्हणजे काय?

**विविध व्याख्या**

१. तत्त्वज्ञान म्हणजे समग्र अनुभवाचे ज्ञान होय. (Philosophy as of Experience as a whole)शब्द व्युत्पत्ती शास्त्रात तत्त्वज्ञान म्हणजे तत चे ज्ञान होय. तत म्हणजे जे काही अस्तित्वात आहे ते होय. एखाद्या वस्तूचे संपूर्ण ज्ञान होण्यासाठी त्या वस्तूच्या गुणाचे ज्ञान होण आवश्यक आहे. असे गुण जाणूण घेणे किंवा वस्तूचे ''सारतत्त्व'' (Essence) म्हणजे तत होय. उदा. एखाद्या पुष्पाचा आकार, गंध, रंग वगैरे गुण म्हणजे पुष्पतत्त्व होय. मुनष्याचे मनुष्यत्त्व. अशा तऱ्हेने संपूर्ण अनुभवाचे ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान होय.

२. तत्त्वज्ञान हे शास्त्राचे शास्त्र आहे. (Philosophy as Science of all Sciences.)

प्राचीन काळी जेव्हा माणूस डोंगर दऱ्यात राहत होता त्यावेळेस तो भोवतालच्या जगाविषयी माहिती घेत गेला. त्याने गोळा केलेले ज्ञान खुपच मर्यादित होते. या ज्ञानाला त्याने ''तवज्ञान'' असे नांव दिले. हळूहळू या ज्ञानाचा विस्तार एवढा होत गेला. माणसाने स्वत:च्या सोईसाठी या ज्ञानाची विभागणी केली, वेगवेगळी शास्त्रे निर्माण झाली. उदा. पदार्थ विज्ञान,रसायन शास्त्र, वनस्पती शास्त्र, जीवशास्त्र इ. माणसाच्या मनात भोवतालच्या जगाबरोबरच समाजविषयक ज्ञानाचाही समावेश होतो. या ज्ञानातून इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र अशी शास्त्रे निर्माण झाली. या सर्व शास्त्रांचा उगम तत्त्वज्ञानात आहे म्हणून तत्त्वज्ञानाला सर्व शास्त्रांची जननी (Mother of all sciences) म्हणतात.

३ तत्त्वज्ञान म्हणजे ज्ञानाबदल ज्ञानलालसा, आपुलकी बाळगणे, ज्ञानावर प्रेम करणे होय.(Philosophy as love for Wisdom.) तत्त्वज्ञ कोणाला म्हणता येईल? तत्त्वज्ञान म्हणजे शहाणा माणूस (Wise Person) होय. शहाणा माणूस ज्ञानावर प्रेम करतो. ज्ञानाचा शोध घेतो. ज्ञानाची काळजी घेतो. ज्ञान वाढीस कसे लागेल, त्याचे रक्षण कसे होईल? ते पाहतो. त्यामुळे सर्व क्षेत्रात संशोधन करणाऱ्या सर्वांना तत्त्वज्ञ म्हणून संबोधता येईल.

४ तत्त्वज्ञान म्हणजे अंतिम सत्याचा शोध घेणे होय. (Philosphy as a search for Ulitimate Reality.)

माणसाला भोवतालच्या सृष्टीबद्दल, स्वत:बद्दल कुतहूल निर्माण झाले. हे विश्व कसे निर्माण झाले? ते कोणत्या तत्त्वापासून निर्माण झाले? हे तत्त्व एक आहे की अनेक? असे असंख्य प्रश्न निर्माण झाले. काही तत्त्वज्ञानी असे उत्तर दिले की एकमेव अशा तत्त्वापासून विश्व निर्माण झाले. हे तत्त्वज्ञ एकत्त्ववादी (Monistic) म्हणून ओळखले जातात. तर काही तत्त्वज्ञानांच्या मते विश्व हे एकापेक्षा अधिक तत्त्वापासून निर्माण झाले. असे म्हणणारे तत्त्वज्ञ अनेकत्त्ववादी (Pluralistic) म्हणून ओळखले जातात. भारतीय आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानात हे विश्व कशातून (कशापासून) निर्माण झाले या प्रश्नाला दोन प्रमुख उत्तरे दिली गेली. काही तत्त्वज्ञ म्हणतात-जड द्रव्यातून विश्व निर्माण झाले. या तत्त्वज्ञानाच्या मते ''जडद्रव्य'' हे अंतिम सत्य आहे. (Matter is real.) तर काही तत्त्वज्ञानाच्या मते आत्मतत्त्वापासून (चैतन्य तत्त्वापासून) विश्व निर्माण झाले आहे. त्यांच्या मते आत्मतत्त्व हे अंतिम तत्त्व आहे. (Idea is real.) थोडक्यात जडवादी आणि आत्मतत्त्ववादी ही या प्रश्नांची दोन उत्तरे आहेत. अशा तऱ्हेने तत्त्वज्ञानात अंतिम सत्याचा शोध घेतला जातो.

५. तत्त्वज्ञान म्हणजे जीवन जगण्याचा एक मार्ग होय. (Philosophy as a way of life.) मानवी इतिहासात अनेक पाश्चात्य आणि भारतीय विचारवंत होऊन गेले. त्यांनी जगावे कसे? याबद्दल सामान्यांना मार्गदर्शन केले, विचार दिला. या विचारामुळे सामान्य लोकांचे जीवनच बदलून गेले. भगवान बौद्ध, स्वामी विवेकानंद, कार्ल मार्क्स, म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा लोकांनी एक विशिष्ट जीवनपद्धती निर्माण केली. त्यामुळे तत्त्वज्ञान म्हणजे जीवन जगण्याचा मार्ग होय. असे म्हणता येईल.

६ तत्त्वज्ञान म्हणजे सर्व काही आहे आणि / सर्व काही नाही.(Philosophy as evertyhing / or Nothing)

तत्त्वज्ञानामध्ये सर्व काही आहे याचा अर्थ सर्वच ज्ञानाचा तत्त्वज्ञानात समावेश होत असतो परंतू नंतरच्या काळात

ज्ञानाचा विस्तार झाल्याने स्वतंत्र शास्त्रे निर्माण झाली. तत्त्वज्ञानापासून एक एक विषय बाजूला होत गेले. अलीकडील काळात समाजशास्त्र, मानसशास्त्र हे विषय बाजूला झाले आहेत आणि ती स्वतंत्र शास्त्रे बनलेली आहेत.

आजच्या काळात तत्त्वज्ञानामध्ये ज्ञान मीमांसा (Epistemology) आणि सत्ताशास्त्र किंवा सद्‌वस्तू मीमांसा या (Metaphysics) दोन प्रमुख शाखांचा अभ्यास केला जातो. ज्ञानमीमांसेत ज्ञान म्हणजे काय? ज्ञानाचे स्वरुप, व रचना आपणास ज्ञान कसे प्राप्त होते अशा ज्ञानविषयक विविध प्रश्नांचा अभ्यास केला जातो.तर सद्‌वस्तू मीमांसेत अंतिम सत्य कोणते? ईश्वराचे स्वरुप, आत्मा, शरीर, आत्मा व शरीराचा संबंध अशा विविध प्रश्नांचा अभ्यास केला जातो. या दोन प्रमुख शाखाबरोबरच नीतिशास्त्र, सौंदर्य मीमांसा, तर्कशास्त्र, मूल्य सिद्धांत, सामाजिक राजकीय तत्त्वज्ञान अशा ही तत्त्वज्ञानाच्या विविध शाखा आहेत.

**१.२.२ भारतीय दर्शनांचे स्वरुप -**

भारतीय तत्त्वज्ञानाला दर्शनशास्त्र म्हणून सबोधले जाते. प्रत्येक समाजाचा जीवनाकडे पहाण्याचा दृष्टीकोण तत्त्वज्ञानातून, दर्शनातून प्रगट होत असतो.

भारतीय दर्शने एकंदर किती आहेत?

माधवाचार्यांच्या ''सर्वदर्शन संग्रह'' या प्रख्यात ग्रंथात सोळा दर्शनांचे निरुपण केलेले आहे. त्यातील महत्त्वाची नऊ दर्शने आहेत. या दर्शनांचे वैदिक (Orthodox) आणि अवैदिक (Heterodox) अशा दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते. वैदिक दर्शनानाच अस्तिक दर्शने आणि अवैदिक दर्शनांना नास्तिक दर्शने असेही म्हटले जाते. याठिकाणी ''अस्तिक'' किंवा ''नास्तिक'' या शब्दांचा अर्थ ''ईश्वराला मानणारे'' व न मानणारे एवढा मर्यादित नसून वेदांना प्रमाण मानणारी आणि वेदप्रामाण्य नाकारणारी असे हे वर्गीकरण आहे.

**वैदिक दर्शने -** १) न्याय २) वैशेषिक ३) सांख्य
४) योग ५) पूर्वमीमांसा ६) उत्तर मीमांसा (वेदान्त)

**अवैदिक दर्शने -** १) चार्वाक २) जैन ३) बौद्ध

यातील अद्वैत वेदान्त या वैदिक दर्शनांचा आणि चार्वाक, जैन, बौद्ध या अवैदिक दर्शनांचा आपण अभ्यास करणार आहोत. भारतीय तात्त्विक विचाराला वेदकाळापासून प्रारंभ झाला. वेद रचनेचा कालखंड कोणता याबाबत संशोधकात एकमत नाही. साधारणपणे ख्रिस्तपूर्व ३००० वर्षे ते ख्रिस्तपूर्व १५०० वर्षे या दरम्यानच्या कालखंडात वेदांची रचना झालेली असावी. (म्हणजे साधारणपणे ३००० ते ५००० वर्षापूर्वी वेदांची रचना झालेली असावी.)

वेदवाङमय प्राचीन मानले जाते पण त्यापेक्षाही प्राचीन असे इजिप्शियन आणि बॉबिलोनियन वाङमय आहे. वेद हा काही ग्रंथ नाही तर तो मौखिक स्वरूपात आहे. (अलीकडच्या काळात वेद ग्रंथ स्वरुपात उपलब्ध आहेत.)प्राचीन ऋषींनी, मुनींनी वेदमुक्ताचे पठण, उच्चारण केले. वेद गुरुकडून शिष्यांकडे परंपरेने गेले. वेदाची परंपरा ही ऐकण्यावर, श्रवणावर आधारित असल्याने त्यांना 'श्रुति' म्हणतात. वेदमंत्राचे पठण केले जाते.

**वेद हे चार प्रकारचे आहेत.** १) ऋग्वेद २) यजुर्वेद ३) सामवेद ४) अथर्ववेद

सर्व धर्म कल्पनांचे मूळ वेदांत आढळून येते. वेदांचे संहिता, ब्राम्हणे, आरण्यके आणि उपनिषदे असे तीन भाग आहेत. संहितेमध्ये देवदेवतांची स्तुती केलेली असते तर ब्राम्हण ग्रंथात यज्ञक्रिया का करावी, कशी करावी थोडक्यात कर्मकांडाचे विवेचन असते तर उपनिषदात वेदातील तत्त्वज्ञान आढळते. त्यामध्ये सृष्टी, ईश्वर, आत्मा, अंतिम सत्य या संदर्भात विचार मांडलेल आहेत.

**प्रस्थानत्रयी.**

उपनिषदे, ब्रम्हसूत्रे, आणि भगवद्गीता या तीन्हीतून वैदिक भारतीय दर्शनांचा उगम झालेला आहे त्यामुळे या तीन्हीना मिळून 'प्रस्थानत्रयी' असे म्हटले जाते.

१) उपनिषदे - उपनिषद् या शब्दाचे फोड उप+नि+सद् अशी करता येईल. उप म्हणजे जवळ, सद् म्हणजे बसणे. गुरुच्या जवळ निष्ठापूर्वक बसणे होय. गुरुकडून शिष्याने ज्ञान ग्रहण करावी अशी प्राचीन काळातील परंपरा होती. गुरुगृही, आश्रमात शिष्य रहात. गुरु ज्ञान देत, गुरुशिष्य यांच्यात प्रश्नोत्तरे होत, चर्चा होत. हीच उपनिषदे होत.उपनिषदे हा वेदाच्या शेवटी आलेला भाग आहे. उपनिषदे एकूण अकरा आहेत. ती पुढीलप्रमाणे -ईश, केन, कठ, मुण्डक, माण्डक्य, तैतिरिय, उतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक, प्रश्न, श्वेत श्वेतेतर.उपनिषदात आत्मा, ब्रह्म, परबह्म, यांचे स्वरुप स्पष्ट केलेले आहे. आत्मा आणि ब्रह्मण यांचे परस्पर संबंध इ. बद्दल अनेक सूक्ते (श्लोक) उपनिषदात आढळतात.

२) ब्रह्मसूत्रे - बादरायणांनी ब्रहनसूत्राची रचना केली. ब्रहन सूत्रांनाच वेदान्तसूत्रे किंवा शारिरीक सूत्रे असेही म्हणतात. बादरायणांनी ब्रहनसूत्रांच्या प्रारंभीच स्वत:च ब्रहनविषयक विचार मांडले तर दुसऱ्या अध्यायामध्ये सांख्य, वैशेषिक, बुद्ध आदि मतांचे खंडन केलेले आहे. त्यांच्या मते ब्रहन हे जगाचे आदिकारण असून त्यातून जग उत्पन्न झालेले आहे. जगाचे अस्तित्त्व, लाभही ब्रहनातच होते. असा विचार बादरायणांनी मांडलेला आहे.

३) भगवद्गीता - ''भगवद्गीता'' ही कुरुक्षेत्रावर भगवान श्रीकृष्णाने ''किंकर्तव्य मूढ'' बनलेल्या अर्जुनाला सांगितली असे मानले जाते. पण ती तेवढ्यापुरतीच मर्यादित नाही. सामान्य माणसाच्या जीवनात विशीष्ट प्रसंगी काय करावे? कसे वागावे असा संभ्रम निर्माण होतो, अशावेळेस भगवद्गीता अर्जुनाप्रमाणेच सामान्य माणसांनाही मार्गदर्शन करते.

भगवद्गीतेची रचना साधारण ख्रिस्तपूर्व सहावे शतक ते ख्रिस्तपूर्व दुसरे शतक या दरम्यान झालेली असावी.भगवद्गीतेत मोक्ष म्हणजे काय? आत्म्याचे खरे स्वरुप कोणते? ते कसे जाणून घ्यावे? जीवनाचे अंतिम ध्येय कोणते असावे? अशा विविध प्रश्नांची उत्तरे मिळतात. मोक्ष प्राप्तीसाठी असलेल्या कर्ममार्ग, भक्तिमार्ग, शक्तिमार्ग याचे विवेचन भगवद्गीतेत आढळते.

प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. स्वधर्माचे पालन केले पाहिजे. 'स्व-धर्म' श्रेष्ठ आहे असे भगवद्गीता म्हणते. कर्ममार्गाबरोबरच भगवद्गीता भक्तीचे महत्त्व विशद करते. भगवान श्रीकृष्ण म्हणतात मला माझे भक्त प्रिय आहेत. जो जो भक्त माझ्याकडे श्रद्धेने येतो, त्याचे त्याचे मी रक्षण करतो. त्याने मला काय अर्पण केले आहे, पाने, फुले, फळे, जल, धन या गोष्टी गौण ठरतात. श्रद्धा ही महत्त्वाची आहे.

भगवद्गीतेत आत्म्याचे ब्रहनाशी नाते कसे जोडावे, त्या योग मार्गाचे विवेचन आहे. आपल्या चित्तवृत्तीचा निरोध कसा करावा. स्थितप्रज्ञ कसे बनावे? याचे भगवद्गीतेत मार्गदर्शन आहे. स्थित प्रज्ञाची लक्षणे कोणती? तो कसा वागतो याबद्दल विवेचन आहे. थोडक्यात भगवद्गीता ही सामान्यजनांना मार्गदर्शक असा ग्रंथ आहे. संपूर्ण जीवनाचे तत्त्वज्ञान आहे.

### १.२.४ भारतीय तत्त्वज्ञानाची समान वैशिष्ठ्ये.

भारतीया दर्शनामध्ये वेगवेगळेपणा दिसून येतो. हा वेगवेगळेपणा दिसून येण्याची चार कारणे सांगता येतील.

१) विश्वामागील अंतिम द्रव्ये किती व कोणती आहेत?

२) श्रुतिचे प्रामाण्य मानावे काय?

३) ईश्वराचे अस्तित्त्व मानावे काय?

४) आत्मा अमर आहे काय?

विश्वनिर्मितीमागे ब्रहन हे एकमेव तत्त्व आहे असे वेदान्त मानते तर सांख्य दर्शन पुरुष आणि प्रकृती अशी दोन तत्त्वे मानतात. तर न्याय, वैशेषिक आणि जैन अशी दर्शने अनेक तत्त्वे मानतात. अद्वैतवादी एकत्त्ववादी म्हणून ओळखले जातात. सांख्य हे द्वैतवादी आहेत तर न्याय, वैशिषक, जैन हे अनेकत्त्ववादी म्हणून ओळखले जातात.

''श्रुति'' म्हणजे वेदवाक्य होय ''श्रुति'' ना प्रमाण मानणारी मीमांसक, वेदान्त, सांख्य, योग, न्याय अशी दर्शन आहेत. वेद हे अपौरुषेय आहेत. ते कुणीही निर्माण केलेले नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. तर चार्वाक, जैन, बौद्ध श्रुतींचे प्रामाण्य मानत नाहीत. ईश्वर अस्तित्त्वात आहे, तो विश्वनिर्माता आहे असे मानणारी वेदान्त, योग, न्याय, वैशेषिक दर्शने आहेत. तर चार्वाक, जैन, बौद्ध, पूर्वमीमांसा ही ईश्वर न मानणारी दर्शने आहेत. सांख्य हे ईश्वरवादी ही नाहीत आणि निरीश्वरवादीही नाहीत.जैन, न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, पूर्वमीमांसा आणि वेदान्त ही आत्मा मानणारी दर्शने आहेत. तर चार्वाक आणि बौद्ध दर्शने 'आत्मा' मानत नाहीत. 'अनात्मवाद' हे तर बौद्ध दर्शनाचे एक प्रमुख वैशिष्ठ्ये आहे.अशा तऱ्हेने भारतीय दर्शनात जरी विविधता दिसून येत असली तरी 'चावार्क' सोडून इतर सर्व दर्शनात काही समान वैशिष्ट्ये आढळतात.ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) कर्मसिद्धांत- चार्वाक सोडून सर्व भारतीय दर्शनानी भारतीय दर्शनांनी कर्मसिद्धांताचा स्वीकार केलेला आहे. कर्मसिद्धांतालाच 'कर्मविपाक' असेही नांव आहे. विपाक म्हणजे परिणाम होय. कर्मविपाक म्हणजे कर्माचे फल प्राप्त होणे होय. जगातल्या सर्व घटना, प्राण्यांनी केलेली कर्मे आणि त्यांची फले याचा परस्परसंबंध आहे असे हा सिद्धांत सांगतो.

आज आपण जगातल्या जन्म, मृत्यू, आजारपण, दुष्काळ, अपघात, भूकंप अशा विविध घटनांची कारणमीमांसा शास्त्रीय पद्धतीने करतो. पण भारतीय दर्शनांनी मात्र त्या काळी जगातल्या विविध घटनांचा अर्थ लावण्यासाठी कर्मसिद्धांत मांडलेला आहे. त्यांच्या मते सृष्टीतील प्रत्येक घटना ह्या प्राणी आणि त्यांची कर्मे यामुळे घडतात. चांगली कर्मे केली की, त्याची चांगली फळे मिळतात. वाईट, अनैतिक कर्मे केली की

त्याची वाईट फळे मिळतात. एखादा माणूस आजारी पडतो, एखादा माणूस जीवनात यशस्वी होतो याचे कारण त्याने केलेली कर्मे असतात.

जगातील सर्व घटना घडवून आणणारा कोणीतरी आहे आणि तो ईश्वर आहे. कर्म सिद्धांत असे सांगतो की, मागील जन्मातील कर्मामुळे माणसाला आजचे जीवन प्राप्त होते. जीवनातील यश, अपयश, सुख, दु:ख पूर्व कर्मामुळे प्राप्त होतो. थोडक्यात कर्मसिद्धांत सांगतो- माणसाला त्याच्या कर्माने सुख दु:ख प्राप्त होते. अशा तऱ्हेने भारतीय दर्शने सृष्टीतील घडामोडीचे स्पष्टीकरण करण्यासाठी कर्मसिद्धांताचा आधार घेतात.

२) पुनर्जन्म- चार्वाक सोडून सर्व दर्शनांनी ''पुनर्जन्म'' सिद्धांत स्विकारलेला आहे. कर्म आणि त्याची फले या जन्मापुरतीच मर्यादित असून मागील जीवनातील कर्माची फळे या जन्मात प्राप्त होतात असे म्हटले गेले आहे. पुनर्जन्म कोणास प्राप्त होतो? भारतीय तत्त्वज्ञातात जीव आणि आत्मा ह्या दोन भिन्न गोष्टी आहेत. आत्मा हा नित्य, चिरंतन स्वरुपी, अविनाशी असा आहे तर जीव विनाशी आहे. नाश पावणारा आहे. जीवाला पुनर्जन्म प्राप्त होत असतो. जीवाला कोणता जन्म प्राप्त होईल, त्याला सुख प्राप्त होईल की दु:ख हे त्या जीवाने मागील जीवनात जी कर्मे केली आहेत त्यावर अवलंबून असते.जीवाला जन्म- मरण - जन्म अशा फेऱ्यातून जावे लागते. ''पुनर्जन्म'' कल्पनेनुसार जीवाचा जन्म ह्या मागील जन्मातील कर्माचा पारिपाक (परिणाम) आहे. आपण या जीवनात जे सुख, दु:ख भोगत असतो ते मागील जीवनातील पाप-पुण्य कर्माचा परिणाम आहेत असे पुनर्जन्म मानतो. पुढील जन्मी चांगले जीवन प्राप्त व्हावे यासाठी आज पुण्य कर्मे करावयाची, पापकर्मे टाळावयाची असा आग्रह आहे. मात्र जन्म-मरण हे जीवाला प्राप्त होत असते ''आत्मा'' या सर्वापासून अलग असतो. हे जाणून घेतल्यावर जीवाची जन्म मरणाच्या फेऱ्यातून सुटका होईल. त्याला मोक्ष प्राप्त होईल. चार्वाक सोडून सर्वच दर्शनानी आत्मदर्शनासाठी मार्ग सुचविले आहेत.

३) मोक्ष- चार्वाक सोडून सर्व भारतीय दर्शनांनी मोक्ष संकल्पनेचा स्वीकार केलेला आहे. मोक्ष प्राप्त करणे हे मानवी जीवनाचे ''परम प्राप्तव्य'' आहे. ते प्राप्त करुन करुन घेणे मानवाचे ध्येय आहे असे प्रत्येक दर्शनात सांगितले आहे. मोक्ष प्राप्त स्थितीला विविध दर्शनात अवबद्ध, कै वल्य निर्वाण ब्रह्नी स्थिती असे विविध शब्द वापरले आहेत. प्रत्येक संकल्पनेत थोडा फार भेद आहे. पण मोक्षाची मूळ कल्पना एकच आहे.

**मोक्षाचे विविध अर्थ सांगता येतील -** १) मोक्ष म्हणजे ऐहिक जीवनापासून सुटका करुन घेणे. २) वैराग्यपूर्ण जीवन जगणे. ३) बंधनातून मुक्तता करुन घेणे. ४) आत्मसाक्षात्कार अनुभवणे. प्रत्येक व्यक्तीचे जीवन वासनामय असते. इच्छा, आकांक्षा, प्राप्ती, ही सामान्य माणसांची ध्येये असतात. या वासनापासून सुटका करुन घेणे म्हणजे ''मोक्ष'' प्राप्ती होय.मोक्ष कसा प्राप्त करावा, मोक्षाचे स्वरुप कसे आहे याचे वेदान्तात विविचेन आहे तर मोक्ष प्राप्तीच्या मार्गाचे विविचेन ''योग'' दर्शनात आहे. ''जैन'' आणि ''बौद्ध'' दर्शनातही मोक्षसंकल्पना आढळते. जैन तत्त्वज्ञानात ''मोक्ष परम प्राप्तव्य आहे'' असे मानलेले आहे. सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान आणि सम्यक चरित्र या मार्गानी मोक्ष प्राप्त होईल. या तिन्ही मार्गांना जैन तत्त्वज्ञानात ''रत्नत्रय'' संबोधले जाते.

बौद्ध दर्शनात चार आर्य सत्याद्वारे आत्मज्ञान प्राप्त हाईल असे म्हटलेले आहे. बौद्ध दर्शनात मोक्षाला अमतपदं (अमृतपद) असे संबोधिलेले आहे. बौद्ध दर्शनात ''निर्वाण'' ही मोक्षसंकल्पना आहे. निर्वाणाचा अर्थ शांत होणे, विझून जाणे असा आहे.

४) परस्परावलंबन- भारतीय दर्शनाचे एक वैशिष्ट्ये असे सांगता येईल की ही दर्शने एकामागून एक निर्माण झालेली नाहीत तर सर्वांची वाटचाल एकाचवेळी झालेली आहे. भारतीय भिन्न भिन्न दर्शनाच्या पंडीतामध्ये वाद-विवाद चर्चा चालत. एकाने आपली बाजू मांडावयाची, त्याच्या विरोधकाने ते मत खोडून काढायचे अशी खंडन मंडन पद्धती अवलंबिली गेली. भारतीय दर्शनाचे वैशिष्ट्ये असे की कोणत्याही दर्शनकारांनी प्रतिपक्षाचे मत विकृत स्वरुपात मांडलेले नाही.

न्याय - वैशेषिक, सांख्य - योग अशी दर्शने जोडी जोडीने आलेली आहेत. न्याय दर्शनात ज्ञान मीमांसा आढळते. तर वैशेषिकांनी सृष्टी निर्मितीचे सत्ताशास्त्र विशद केलेले आहे. मीमांसकानी शब्द प्रमाण मांडले वेदान्तानी ते स्वीकारले. सांख्यांनी पुरुष - प्रकृति यातील भेद सांगितला. पुरुषाला त्याच्या मूळ स्वरुपाचे ज्ञान होणे हे ध्येय मानले तर हे ध्येय कसे प्राप्त करावयाचे याचा मार्ग योगदर्शनाने विशद केला. थोडक्यात भारतीय दर्शने एकमेकांवर अवलंबून आहेत.

५) प्रमाण चर्चा - सर्व भारतीय दर्शनामध्ये ज्ञान म्हणजे काय? ज्ञानाची प्रमाणे कोणती? याची चर्चा आढळते. ज्ञान प्राप्तीचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे दोन मार्ग आहेत. प्रत्यक्ष ज्ञान म्हणजे इंद्रीय संवेदनाद्वारे प्राप्त होणारे ज्ञान होय. चार्वाकांनी केवळ प्रत्यक्ष ज्ञानाचाच स्वीकार केला. ज्ञान प्राप्तीचे अप्रत्यक्ष मार्ग म्हणजे अनुमान, शब्द हे आहेत. अनुमान म्हणजे प्रत्यक्ष ज्ञानावर आधारीत ज्ञान होय. प्रत्यक्षाकडून अप्रत्यक्षाकडे जाण्याची प्रक्रिया होय. अनुभवात्मक ज्ञानात स्मरणात्मक ज्ञानाचाही सामावेश होतो. यत्र यत्र धूम्रः तत्र तत्र वन्हिः ! जिथे धूर आहे तिथे अग्नी असेलच हे अनुमानाचे उदाहरण आहे. न्याय दर्शनाने आणि मीमांसकांनी 'अनुमान' प्रमाणाचा स्वीकार केलेला आहे.शब्द प्रमाण म्हणजे शब्दांनी जे प्रतीत होते, स्पष्ट होते ते ज्ञान होय. वैदिक दर्शने वेदातील दर्शनांना प्रमाण मानतात. तर बौद्ध दर्शने 'त्रिपिटक' या ग्रंथाला प्रमाण मानतात. जैन दर्शन धर्म ग्रंथांना प्रमाण मानतात. त्यांना 'आगम' असे संबोधिले जाते.

६) भारतीय दर्शनांनी ''संसार दुःखमय आहे'' असे म्हटलेले आहे. जीवनातील दुःखाचे प्रतिपादन सर्वच भारतीय दर्शनात केलेले आहे. बौद्ध दर्शनात तर 'सर्वम् दुःखम्' असे म्हटलेले आहे. असे असले भारतीय दर्शनांचा दुःखाकडे पहाण्याचा दृष्टीकोण निराशावादी नाही. उलट दुःखाची मीमांसा करणे हे भारतीय तत्त्वज्ञानाचे उद्दीष्ट आहे. सर्वच भारतीय तत्त्वज्ञानात दुःखाचे कारण अविद्या, अज्ञान असे संबोधिले गेलेले आहे. अज्ञान दूर केल्यास दुःखाचा परिहार करणे शक्य आहे. सर्वच भारतीय दर्शने या दुःखातून सुटका करुन घेण्याचा मार्ग सुचवितात. अशा तऱ्हेने भारतीय दर्शनाचा दुःखाकडे पहाण्याचा दृष्टीकोण आशावादी असा आहे.

### १.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) तत्त्वज्ञानाचा उगम केव्हा झाला?

२) तत्त्वज्ञ कोणास म्हणावे?

३) जडवाद विश्वरचनेबाबत काय म्हणतो?

४) तत्त्वज्ञानाचे कोणत्या दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते?

५) चार्वाक पुनर्जन्म कल्पना स्वीकारतात का?

ब) योग्य पर्याय निवडा.

१) तत्त्वज्ञान हे.........................शास्त्र आहे.

अ) साहित्याचे ब) शास्त्राचे क) पदार्थाचे

२) तत्त्वज्ञान म्हणजे अंतिम.........................शोध घेणे होय.

अ) सत्याचाब) सृष्टीचा क) विज्ञानाचा

३) .........................मध्ये आत्मा, शरीर संबंधाची चर्चा केली जाते.

अ) ज्ञानमीमांसा ब) सद्वस्तूमीमांसा क) नीतिशास्त्र

४) .........................हे नास्तिक दर्शन आहे.

अ) वेदान्त ब) जैन क) सांख्य

५) ब्रहसूत्रे.........................यांनी रचली.

अ) पाणिनी ब) बादरायण क) शंकराचार्य

६) .........................यांनी अनुमानांचा प्रमाण म्हणून स्वीकार केलेला आहे.

अ) न्याय ब) बौद्धक) चार्वाक

## १.४ सारांश

तत्त्वज्ञान हे अंतिम सत्याचा शोध घेते. जीव, ब्रहन, आत्मा, मोक्ष ह्या तत्त्वज्ञानातील महत्त्वपूर्ण संकल्पना आहेत. भारतीय तत्त्वज्ञानाचे वैदिक आणि अवैदिक अशा दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते. ज्ञान मीमांसा व सद्वस्तूमीमांसा ह्या तत्त्वज्ञानाच्या दोन प्रमुख शाखा आहेत. वैदिक तत्त्वज्ञानाच्या प्रस्थानश्रयी, उगमस्थाने म्हणून उपनिषदे, ब्रहनसूत्रे आणि भगवद्गीता पाहिले जाते कर्मसिद्धांत, पुनर्जन्म, मोक्ष, परस्परावलंबन आणि प्रमाणचर्चा ही भारतीय तत्त्वज्ञानाची समान वैशिष्ट्ये आहेत.

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

अ) १) इ.स. पूर्व २५०० २) ज्ञानाबद्दल आस्था बाळगतो तो तत्त्वज्ञ होय.

३) जडद्रव्यातून विश्व निर्माण झाले आहे.

४) वैदिक आणि अवैदिक

५) चार्वाक पुनर्जन्म कल्पना स्वीकारीत नाहीत.

ब) १) शास्त्राचे २) सत्याचा

३) सद्वस्तूमीमांसा ४) जैन

५) बादरायण ६) न्याय.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय.

१) तत्त्वज्ञानाच्या विविध व्याख्या सांगुन त्याचे स्वरुप स्पष्ट करा.

२) भारतीय दर्शनांची समान वैशिष्ठ्ये सांगा.

३) भारतीय दर्शनाचे वर्गीकरण - वैदिक / अवैदिक यावर टीप लिहा.

## १.७ पारिभाषिक शब्द.

जडवाद - जडद्रव्ये हे अंतिम सत्य आहे मानणारा दृष्टीकोण.

चिद्‌वाद - चिद्‌वाद (आत्मा) हे अंतिम सत्त्य मानणारा दृष्टीकोण.

एकत्त्ववाद - अंतिम तत्त्व एक आहे.

अनेकत्त्ववाद - अंतिम तत्त्व एकापेक्षा अधिक आहेत.

ज्ञानमीमांसा - ज्ञानाचे स्वरुप स्पष्ट करणारी तत्त्वज्ञानाची शाखा.

सत्ताशास्त्र - आत्मा, ईश्वर, जीव यांचा विचार करणारी शाखा.

वैदिक दर्शने - वेदाला प्रमाण मानणारी दर्शने.

अवैदिक दर्शने - वेद प्रमाण न मानणारी दर्शने.

प्रस्थानश्रमी - वैदिक दर्शने ज्यावर आधारित आहेत ते प्राचीन ग्रंथ

पुरुषार्थ - भारतीय मूल्य विषयक विचार

अनुमान - प्रत्यक्षावर आधारित प्रमाण

## १.८ अधिक वाचनसाठी पुस्तके -

सर्व घटकाच्या शेवटी पुस्तकाची यादी दिलेली आहे.

▼ ▼ ▼

घटक - २

# चार्वाक दर्शन

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषयविवेचन

२.२.१ चार्वाकांचा ज्ञानविषयक सिद्धांत

२.२.१ जडवाद

२.२.२ स्वभाववाद

२.२.३ आत्म्याचे निराकरण

२.२.४ चार्वाकांचे नीतिविषयक विचार

२.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

२.४ सारांश

२.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ पारिभाषिक शब्द

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे -

या घटकात आपण ''चावार्क'' दर्शनाची ओळख करून घेणार आहोत. या घटकांच्या अभ्यासाने ''चार्वाक'' तत्त्वज्ञानाबद्दल खालील गोष्टींची माहिती होईल.

* चार्वाक हे नास्तिक दर्शन आहे.
* चार्वाकांचा ज्ञान विषयक सिद्धांत
* चार्वाकांचा जडवाद
* चार्वाकांचे नीतिविषक विचार

## २.१ प्रास्ताविक -

भारतीय दर्शनातील ''चार्वाक'' हे एक नास्तिक दर्शन म्हणून ओळखले जाते. ''नास्तिक'' याचा ''ईश्वर न मानणे '' एवढ्यापुरता अर्थ मर्यादित नाही. तर न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, वेदान्त अशा आस्तिक दर्शनांनी ज्या ज्या गोष्टी स्वीकारलेल्या आहेत त्या चार्वाक नाकारतात. चार्वाक ईश्वर, अशरीरी, आत्मा,

परलोक, पुनर्जन्म या सर्व गोष्टी नाकारतात. अशा अर्थाने ''चार्वाक'' हे बंडखोर आहेत.''चार्वाक'' ही एक व्यक्ती नसून तो अनेक व्यक्तींचा समूह आहे. ''बृहस्पति'' हा या दर्शनाचा आद्य प्रवर्तक मानला जातो. ''चार्वाक'' या शब्दाची फोड चारु + वाक्यम् अशी करता येईल. ''चारु'' याचा अर्थ गोड. सर्वसामान्यांना गोड लागणारी, आवडणारी, पटणारी वाक्ये असा ''चार्वाक'' या शब्दाचा अर्थ आहे. ''चार्वाक'' दर्शनाला ''लोकायत'' असे आणखी एक नांव आहे. लोक + आयतम् लोक म्हणजे सर्वसामान्य लोक आणि आयतम् म्हणजे प्रमाण. सर्वसामान्य लोकांना मान्य होणारे प्रमाण होय. किंवा सर्वसामान्यात प्रसारित झालेले किंवा ह्या जगावर (इह लोकांवर) आधारित असलेले मत म्हणजे ''लोकायत'' होय. तत्त्वज्ञानात इ. स. ८ व्या शतकापासून ''चार्वाक'' हे नांव सर्रास वापरलेले दिसून येते.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ चार्वाकांचा ज्ञानविषयक सिद्धांत -

''ज्ञान'' म्हणजे आपल्या भोवतालच्या जगाविषयीची, स्वत:विषयीची माहिती होय. आपणास ज्ञान कसे प्राप्त होते? या प्रश्नाला तत्त्वज्ञानात उत्तर दिलेले आहे. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे ज्ञान प्राप्तीचे मार्ग आहेत. प्रत्यक्ष ज्ञान म्हणजे आपल्या पंच ज्ञानेंद्रियाच्या सहाय्याने होणारे ज्ञान होय. तर शब्दज्ञान, स्मरणात्मक ज्ञान, अनुभवात्मक ज्ञान असे अप्रत्यक्ष ज्ञानाचे प्रकार आहेत.चार्वाक केवळ प्रत्यक्ष ज्ञानाचा स्वीकार करतात. प्रत्यक्ष ज्ञानालाच ते प्रमाण मानतात. चार्वाक ''अनुमान'' ह्या ज्ञान प्रकाराचा स्वीकार करीत नाहीत. तसे पाहिले तर आपल्या ज्ञानाचा बराचसा भाग अनुमानाने व्यापलेला आहे. त्यामुळे केवळ प्रत्यक्ष हेच प्रमाण ही ''चार्वाकाची'' भूमिका व्यावहारिकदृष्ट्या आपल्याला परवडणारी नाही.बहुधा ही अडचण लक्षात घेऊन नंतरच्या काळात ''पुरंदर'' या चार्वाकाने ''लोक प्रसिद्ध'' अनुमान, आम्हा चार्वाकांना सुद्धा इष्ट आहे. अशी भूमिका घेतली. लोक प्रसिद्ध याचा अर्थ ह्या जगात सिद्ध करता येईल असे अनुमान होय. असे अनुमान आम्ही स्वीकारतो पण लौकिक मार्गाच्या पलीकडे जाऊन जे अनुमान करू इच्छितात त्यांचा आम्ही निषेध करतो असे त्याने म्हटलेले आहे.संस्कृतमध्ये ''लोक'' याचा अर्थ ''इंद्रीय विषय'' असा आहे आणि प्रसिद्ध म्हणजे इंद्रीयाच्या आधारे सिद्ध होणारे. चार्वाकांची ही भूमिका २० व्या शतकातील पाश्चात्य तत्त्वज्ञानातील तार्किक प्रत्यक्षतावादांशी मिळतीजुळती आहे त्यामुळे चार्वाकांचा विचार किती आधुनिक होता हे लक्षात येईल.

### २.२.१ जडवाद -

''चार्वाक'' हे जडवादी म्हणून ओळखले जातात. जडवादी भूमिका अशी आहे की हे विश्व जडद्रव्यातून निर्माण झाले आहे. चार्वाकाच्या जडवादात तीन सिद्धांताचा सामावेश होतो.

**जडतत्त्ववाद**

अंतिम सत्य हे अखेरपर्यंत टिकून रहाते ते होय जे कधीही नाश पावत नाही. चार्वाकांच्या मते जडद्रव्ये हे अंतिम सत्य आहे. पृथ्वी, जल, तेज आणि वायू अशा चार भूतांचा किंवा पदार्थाचा चार्वाकांनी स्वीकार केलेला आहे. विश्वातल्या सर्व वस्तू, प्राणी ह्यांची निर्मिती ह्या चार पदार्थापासून झालेली आहे. ही चार अंतिम द्रव्ये आपल्या ज्ञानाचा विषय आहेत. काही चार्वाकांनी ''आकाशतत्त्व'' हे पाचवे तत्त्व (पदार्थ) स्वीकारलेले आहे. पण बहुतांशी चार्वाकांनी हे तत्त्व नाकारलेले नाही कारण आकाश हे प्रत्यक्ष ग्राह्य नाही ते अनुमानग्राह्य आहे.

### २.२.२ स्वभाववाद -

पृथ्वी, जल, तेज आणि वायू या चार अंतिम द्रव्यापासून विश्वातल्या सर्व वस्तू निर्माण झालेल्या आहेत. जर सर्व वस्तू समान अशा जडद्रव्यापासून निर्माण झालेल्या आहेत तर त्या वेगवेगळ्या का आहेत?

त्यांचे गुणधर्म वेगवेगळे का आहेत? असा प्रश्न निर्माण होतो. या प्रश्नाला ईश्वर मानणारे असे उत्तर देतात की, ईश्वराने विश्व निर्माण केलेले आहे. ''ईश्वराची इच्छा'' हे विविधतेचे कारण आहे. चार्वाकांना हे मान्य नाही. ते ईश्वर नाकारतात.विश्वातल्या विविधतेचे उत्तर ते ''स्वभाववाद'' सिद्धांतातून देतात.

''स्वभाववाद'' म्हणतो जे जे घडते, जे आहे ते ते त्या प्राण्याच्या, वस्तूच्या स्व + भावामुळे घडत असते. स्व म्हणजे संबंधित वस्तू आणि भाव म्हणजे असणे. कोकिळेचा मधूर आलाप, मोराचा पिसारा, ऊस गोड लागणे हे त्या त्या पक्ष्याचे, वस्तूचे स्वभाव आहेत. त्यासाठी परमेश्वराची गरज नाही. चार्वाकाच्या ह्या मतावर काही जण आक्षेप घेतात- आपण माणसे काही हेतू मनाशी बाळगून कृती करीत असतो. काही गोष्टी आपण ठरवून करतो किंवा मनाशी ठरवून काही कृती करण्याचे टाळतो.विश्वातल्या सर्व वस्तू, घटना यामागे काही हेतू, योजना असली पाहिजे. पण हे चार्वाकांना मान्य नाही.

चार्वाक म्हणतात, जड द्रव्याच्या विशिष्ट संयोगाने ''चैतन्य'' अथवा जाणीव निर्माण होते. चैतन्य जडापासून भिन्न असले तरी ते जडाचाच विकार आहे. उदा. गूळ, पीठ या पदार्थात कैफ असणारे, नशा आणणारे गुणधर्म नसतात परंतू त्यांच्या मिश्रणातून मद्य तयार केले जाते. की ज्याच्या सेवनाने नशा येते. थोडक्यात मिश्रणाने नवीन गुणधर्म निर्माण होतात. मिश्रणाने नवीन गुणधर्म तयार होतात याचे दुसरे एक उदाहरण देता येईल. पान, चुना, कात यातील कोणतीच वस्तू लाला नसली तरी त्यापासून तयार केलेला विडा चघळला की लाल रंग निर्माण होतो.

त्याप्रमाणेच ''चैतन्य'' हा जडाचाच विकार आहे. ''भूतेभ्य: चैतन्यम्'' चैतन्य हे जडातून (भूतमात्रातून) निर्माण होते. थोडक्यात चार्वाकांच्या मते ''चैतन्य'' हे स्वतंत्र द्रव्य नव्हे. हा सिद्धांत स्वभाववाद (Naturalism) म्हणून ओळखला जातो.

### २.१.२ आत्म्याचे निराकरण

चार्वाकाच्या जडवादात आत्म्याचे निराकरण ह्या तिसऱ्या सिद्धांताचा समावेश होतो. आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्त्व चार्वाक नाकारतात. जडद्रव्याच्या संघात असा जो मानवी देह त्याच्या ठिकाणी चैतन्य हा गुणधर्म उत्पन्न होतो. हाच ''चैतन्य विशिष्ट देह म्हणजे आत्मा'' असे चार्वाक म्हणतात.

१) देहाच्या (शरीराच्या) पलीकडे आत्म्याला वेगळे असे अस्तित्त्व नाही. मी स्थूल आहे, मी गोरा आहे ही सर्व वैशिष्ठ्ये देहाला लावली जातात. हाच आत्मा होय असे चार्वाक म्हणतात.

२) या देहातून निराळा असा आत्मा (Self) ज्ञानाचा विषय होत नाही. या चार्वाकाच्या विचाराशी पाश्चात्य अनुभववादी ह्युमचे विचार मिळते जुळते आहेत. ह्युम म्हणतो- जेव्हा मी माझ्याबद्दल (स्वत्त्वबद्दल) विचार करु लागतो तेव्हा विशिष्ट जाणीवेचे, संवेदनेचे मला ज्ञान होते. थंड-गरम, उजेड-अंधार, प्रेम-उद्वेष, सुख-दु:ख या जाणीवांच्या स्वरुपात मला माझे व माझ्या भोवतालच्या परिसराचे ज्ञान होते. या संवेदनाशिवाय, जाणीवेशिवाय स्वत्त्वाची जाणीव होत नाही किंवा या जाणीवेपलीकडे असलेला ''मी'' हा संवेदन, जाणीवेने बनलेला आहे. ''मी'' म्हणजे इंद्रीय, देह किंवा देह म्हणजे आत्मा अशी भूमिका घेण्याऱ्या चार्वाकावर ''आत्मवादी'' तत्त्वज्ञानी काही आक्षेप घेतले. देहापेक्षा आत्मा स्वतंत्र असला पाहिजे असे चार्वाकांच्या विरोधकांचे म्हणणे आहे. चार्वाक विरोधकांनी काही आक्षेप घेतले ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) ''मी'' हा देहापलीकडील असला पाहिजे कारण देहात बदल होत असताना देह अनित्य आहे. एकाने अनुभवले आणि दुसऱ्याने स्मरण केले असे होत नाही. स्मरण करणारा व अनुभव घेणारा हा नित्य, एकच एक असला पाहिजे. ''देह'' नित्य नव्हे तर ''आत्मा'' हे नित्य तत्त्व आहे.

२)	सर्व इंद्रीयांचे विषय भिन्न भिन्न आहेत. उदा. चक्षु-दृश्य, कान-श्रवण, नाक-गंध, जीभ-चव, त्वचा-स्पर्श इ. या सर्व इंद्रीय संवेदनांना एकत्र करणारा कोणीतरी असला पाहिजे तो ''मी'' आत्मा होय.

३)	''मी'' हा प्रमाता अविकारी असला पाहिजे म्हणजे न बदलणारा असला पाहिजे. ''घट रक्त आहे.'' (पाण्याचा माठ तांबड्या रंगाचा आहे) यामध्ये घटाचे आणि त्याच्या वर्णाचे ज्ञान होईपर्यंत एकच एक अधिकारी ज्ञाता असला पाहिजे. देह, बुद्धी हे विकारी (बदलणारे) आहेत त्यामुळे ''आत्मा'' हे अविकारी तत्त्व म्हणून स्वीकारले पाहिजे.आत्मवाद्यांच्या या आक्षेपांना कंटाळून म्हणा किंवा किचकट वादाला कंटाळून चार्वाकांनी असे म्हटले की शरीर जिवंत असेपर्यंत एकच एक अधिकारी आत्मा आहे असे मानण्यास हरकत नाही. ''जयंत'' हा सुप्रसिद्ध नैयायिक आपल्या ''न्यायमंजरी'' ग्रंथात अशा चार्वाकांना ''सुशिक्षित चार्वाक'' म्हणून संबोधितो. देहपातानंतर (मृत्युनंतर) आत्मा शिल्लक उरतो या मताला मात्र सुशिक्षित चार्वाकांनी कडाडून विरोध केला.अशा तऱ्हेने जडतत्ववाद, स्वभाववाद आणि आत्म्याचे निराकरण या तिन्हींनी मिळून चार्वाकाचा जडवाद सिद्ध होतो.

## २.१.४ चार्वाकांचे नीतिविषयक विचार

नीतिशास्त्र म्हणजे आपला आयुष्यक्रम योग्य रीतीने कसा न्यावा हे ठरवण्याचे शास्त्र होय. नी (नय्)- नणे या श्रातूपासून ''नीति'' हा शब्द व्युत्पन्न झालेला आहे. चार्वाकांचा विचार ''आहे हेच जीवन'' असा असल्याने मृत्युनंतर आत्म्याला गति मिळेल काय ? आपणास (स्वर्गलोक का नरक) कोणता लोक प्राप्त होईल याची काळजी करू नये असे ते म्हणत.चार्वाकांचे नीतिशास्त्र ऐहिक होते. चालू जीवनाशी संबधित होते. ते पार लौकिक नव्हते. या देहाव्यतिरिक्त आत्मा, त्याच्या कर्मापासून उत्पन्न होणारे पाप पुण्य व त्यानुसार आत्म्याचे परलोक गमन ह्या सर्व गोष्टी त्यांनी नाकारलेल्या आहे. त्यांचा निषेध केलेला आहे.चार्वाकांनी प्रत्यक्ष प्रमाणांचा स्वीकार केलेला असल्याने आपोआपच ऐहिक दृष्टी स्वीकारली. चार्वाकांच्या मते अर्थ आणि काम हेच खरे पुरुषार्थ आहेत. मोक्ष अथवा पारलौकिक सुखाच्या मागे लागू नये. माणसाने या लोकीच (जगात) शक्य होईल तेवढे सुख उपभोगावे असा त्यांचा विचार होता.आपले जीवन सुख-दु:ख मिश्रित असले तरी त्यातील सुख वेचून घ्यावे, सालीवरचा तूस काढून तांदूळ घ्यावा किंवा काटा काढून मासा खावा अथवा भिक्षेकऱ्याला चुकवून सुग्रास (चांगला घास) भक्षण करावा असे चार्वाकांचे म्हणणे होते. व्यक्तीने पुढचा मागचा विचार करुन स्वत:साठी जास्तीत जास्त सुख मिळविण्याचा प्रयत्न करावा या ग्रीकांच्या एपिक्युरिअन पंथाच्या शिकवणूकीसारखेच चार्वाकांचे मत आहे.

''जीवनात जास्तीत जास्त सुख मिळवा'' ह्या चार्वाकांच्या मतावर आक्षेप घेता येईल. कोणतेही सुख उपभोगून झाल्यावर ते संपून जाते, शिल्लक काही रहात नाही हे चार्वाकांनी लक्षात घेतलेले नाही. कारण जेवढा सुखाचा अनुभव आता येत असतो तेवढेच सुख शिल्लक आहे. बाकीचे उपभोगलेले सुख नष्ट झालेले असते. थोडक्यात प्रत्येकाचा सुखाचा अनुभव असे सांगतो की सुख हे विनाशी आहे. त्याचा नाश होतो. असे नाश पावणारे सुख जीवनाचे ध्येय मानावे का? असा प्रश्न पडतो.दुसरे म्हणजे सुख ही अमूर्त संकल्पना आहे. इष्ट गोष्टीची प्राप्ती झाली की आपण सुखी बनतो. जितके सुख मिळवावे तितके असमाधान वाढत जाईल त्यामुळे असे सुख प्राप्त करणे जीवनाचे ध्येय कसे स्वीकारता येईल?

परमप्राप्तव्य म्हणजे जे आपल्याला श्रेष्ठ असे ध्येय प्राप्त करावयाचे आहे, मिळवावयाचे आहे ते चिरंतन, चिरकाळ (कायमस्वरुपी) टिकणारे असले पाहिजे. त्यामुळे पदरी पडेल तेवढे सुख प्राप्त करा ह्या म्हणण्याला अर्थ रहात नाही. जीवनात सुखाची रेलचेल झाली, भरपूर प्रमाणात सुख प्राप्त झाले तरी ''तत: किम्'' सुखानंतर काय प्राप्त करावयाचे हा प्रश्न उरतो. इत्यादी खोलात न शिरता चार्वाकांनी सांगितले जिवंत असेपर्यंत मनुष्याने अधिकाधिक सुख मिळवावे.चार्वाकांच्या सुखवादाचा बऱ्याच जणांनी विपर्यास केला. चार्वाकांनी असे सांगितले - स्वत:चे सुख पहावे, स्वार्थ पहावा, इतरांच्या सुख-दु:खाची पर्वा करू नये, पाप-पुण्याकडे

लक्ष देवू नये, उद्या काय होईल याचा विचार करू नये -

यावज्जीवं सुखं जीवेत्

ऋणं कृत्वा घृतं पिबेत ।

भस्मीभूतस्य देहस्य

पुनरागमनं कुतः ।।

(जोपर्यंत आयुष्य आहे तोपर्यंत सुखाने जगावे. कर्जे काढून तूप रोटी खावी. एकदा आपल्या देहाची राख झाली म्हणजे परत कोण येणार आहे?) प्रत्यक्षात कर्जे काढून सुखे मिळवावीत, कर्जे फेडू नयेत असे चार्वाकांनी कोठेही सांगितले नाही. त्यांनी देखील नीति अनीतिचा विचार केलेला आहे. आपले जीवन कसे व्यतीत करावे याबाबत ''सर्वदर्शन संग्रह'' या ग्रंथाबाबत चार्वाकांचे मनाबाबत श्लोक आहे.

कृषि गोरक्ष्यवाणिज्यदण्डनीत्यादिभि र्बुधः ।

दृष्टैरेव सदुपायैर्भोगाननुभवेद् भुवि ।।

चार्वाकांच्या मते शहाण्या माणसाने (बुध), शेती, गोपालन, व्यापारउदीम, शासकीय व्यवस्था या सारख्या दृष्ट असलेल्या ''सत'' उपायानी पृथ्वीवरील निरनिराळे भोग भोगावेत.चार्वाकांनी ज्या मार्गाला ''सत्'' मार्ग म्हटले आहे तो आजही सत्मार्गच आहेच. त्याकाळात कर्मकांड, पूजाअर्चा यांचे खूपच स्तोम माजले होते त्याला चार्वाकांचा विरोध होता.

ते म्हणतात-

अग्निहोत्रं त्रयो वेदास्तिदण्डं भस्मगुण्ठनम् ।

बुद्धिपौरुषहीनानां जीविकेति बृहस्पति : ।।

अग्निहोत्राचा ठाण मांडून, त्रिकाळ स्नान संध्या, भस्म लावून पौरोहित्यादि मार्गाने उपजीविका करणाऱ्याची चार्वाकांनी निंदा केली आहे. बुद्धी आणि पौरुष नसलेल लोक हा उपजीविकेचा मार्ग स्वीकारतात असे चार्वाकांनी म्हटलेले आहे.चार्वाकांनी अर्थ, नीति, अनीति, सत्, असत् हा विवेक कटाक्षाने पाळावा असे सांगितलेले आहे. फक्त त्यांच्या सत् असत्च्या कल्पना ह्या प्रत्यक्षप्रमाणावर आधारित आहे. त्यामुळे वेद रचनाकारावर ते पुढीलप्रमाणे टीका करतात.

'त्रयोवेदस्य कर्तारः

भण्डधूर्त - निशाचदः ।'

वेद रचना करणारे विदूषक, धूर्त, निशाचर असले पाहिजेत असा ते आरोप करतात.

(त्या काळी रात्री फक्त चोर हिंडत असत.)

चार्वाकांनी प्रत्यक्ष प्रमाण मानल्याने आपल्या ते अनुभवापलिकडे सत्य, सुंदर अशा गोष्टी आहेत हे मानावयास तयार नाहीत. वेदात पारमार्थिक, ह्या जगापलीकडच्या गोष्टीची चर्चा केलेली आहे त्यामुळे चार्वाक वेदरचनाकारावर टीका करतात. अशा तऱ्हेने चार्वाकांचे नीतीविषयक विचार स्पष्ट करता येईल.

## २.३ स्वअध्ययनासाठी प्रश्न -

अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) चार्वाक सुखवादी आहेत काय?

२) स्वभाववाद कोणत्या सिद्धांतात समाविष्ट होतो?

३) चार्वाकांचा नीतिविषयक विचार कोणत्या जीवनाविषयी आहे?

४) ''चार्वाक'' शब्दाची फोड कशी करता येईल?

५) चार्वाक ''आत्मा'' हे स्वतंत्र द्रव्य स्वीकारतात काय?

ब) योग्य पर्याय निवडा.

१) चार्वाक हे.............................आहेत.

अ) जडवादी ब) चिद्‌वादी क) एकत्त्ववादी

२) चार्वाकांनी.............................पदार्थाचा स्वीकार केलेला आहे.

अ) चार ब) पाच क) सहा

३) चार्वाक केवळ.............................प्रमाणाचा स्वीकार करतात.

अ) अनुमान ब) प्रत्यक्ष क) शाब्द

४) चार्वाकांच्या मते चैतन्य हा .............................अविष्कार आहे.

अ) जडाचा ब) ब्रहनाचा क) प्राण्याचा

५) चार्वाक.............................या पुरुषार्थाला नाकारतात.

अ) कामब) अर्थ क) मोक्ष

## २.४ सारांश -

चार्वाक हे एक जडवादी, नास्तिक दर्शन आहे. चार्वाकांच्या ज्ञानविषयक सिद्धांतात जडतत्त्ववाद, स्वभाववाद आणि आत्म्याचे निराकरण यांचा समावेश होतो. अंतिम सत्य जड स्वरूपी आहे असे जडत्त्ववादी म्हणतो. तर स्वभाववादाच्यामते सृष्टीतील घटना, प्राणी, पक्षी, यांच्यात घडणारे बदल, त्यांचे स्वभाव हे निसर्गत:च असतात. ते बदल घडवून आणणारा 'ईश्वर' अस्तित्त्वात नाही. 'ईश्वर' संकल्पनेबरोबरच चार्वाक ''आत्मा हा स्वतंत्र पदार्थ'' म्हणून नाकारतात.

चार्वाकांचे नीतिविषयक विचार ऐहिक जगाविषयी आहेत. ते म्हणतात, आहे हेच जीवन, स्वर्ग, पाप, पुण्य यांचा विचार करू नये. जगातील सर्व सुखे उपभोगावीत. तसेच कृषी, गोपालन, व्यापार, समाजकाराण अशा विधायक, फलदायी कार्यात माणसाने अधिकाधिक लक्ष घालावे. त्रिकाल स्नानसंध्या, वेदपठण, यज्ञयाग यामध्ये वेळ वाया घालवू नये. असा चार्वाकांचा नीतिविषयक विचार आहे.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे -

अ) १) होय. २) जडवाद ३) ऐहिक

४) चारु + वाक्यम् । ५) नाही.

ब) १) जडवादी २) चार ३) प्रत्यक्ष

४) जडाचा ५) मोक्ष

## २.६ सरावासाठी प्रश्न -

प्रश्न १ ला. चार्वाकांच्या जडवादाचे स्वरुप स्पष्ट करा.

प्रश्न २ रा. चार्वाकांचे नीतिविषयक विचार विशद करा.

## २.७ पारिभाषिक शब्द -

१) ऐहिक - या जगाविषयी

२) पारलौकिक - लौकिक जगापलीकडचे

३) लोक प्रसिद्ध - इंद्रीयाने सिद्ध होणारे

४) स्वभाववाद - जे घडते ते निसर्गत:च घडते असे मानणारा दृष्टीकोण

५) सुखवाद - सुखावर भर देणारी विचारसरणी

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके-

पुस्तकाच्या शेवटी यादी दिलेली आहे.

घटक - ३

# जैन दर्शन ( Jainism )

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक - जीवन वृत्तांत

३.२ विषय - विवेचन

३.२.१ जैन परंपरा

३.२.२ अहिंसा

३.२.३ अनेकान्तवाद

नयवाद

स्याद्वाद

३.२.४ जीव आणि अजीव

३.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सारांश

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

**३.० उद्दिष्टे :**

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला -

- जैन धर्माची परंपरा स्पष्ट करता येईल.
- जैन धर्माचे तत्त्वज्ञान व शिकवण वर्णन करता येईल.
- श्वेतांबर व दिगंबर या दोन पंथांचे वेगळेपण विशद करता येईल.
- 'अहिंसा' या जैनांच्या अत्यंत महत्त्वाच्या सूत्राचे स्वरूप स्पष्ट करता येईल.
- जैनांची मूळ भूमिका- अनेकान्तवाद वैशिष्ट्ये सांगता येतील.
- जीव आणि अजीव या दोन द्रव्यांचा तौलनिक परामर्श घेता येईल.

**३.१ प्रास्ताविक (जीवन वृत्तांत) :**

हिंदू धर्माखेरीज भारतात जैन, बौद्ध, पारशी, शीख, इस्लाम, ख्रिश्चन या विविध धर्मांच्या तत्त्वज्ञानाला व संप्रदायांना अनुसरणारे लोक आहे. हिंदू धर्मातून व भारतीय धर्मपरंपरेतून उत्क्रांत झालेले जैन धर्माचे

तत्त्वज्ञान व त्याचे कार्य समजावून घेणार आहोत. जैन धर्म भारतातील वैदिक धर्माइतका प्राचीन आहे, असे अभ्यासक मानतात.  जैन धर्माचे प्रवर्तन, संवर्धन आणि प्रसार ज्यांनी केला त्यांना 'तीर्थंकर' म्हणतात. असे एकूण २४ तीर्थंकर आहेत. या तीर्थंकरांना 'जिन' म्हणतात. जिन म्हणजे इंद्रिये जिंकणारा. जिन या संज्ञेवरून या धर्माला जैन धर्म हे नाव रूढ झाले. वर्धमान महावीर हे २४ वे तीर्थंकर आहेत.

वर्धमान यांचा जन्म वज्जी जमातीची राजधानी वैशाली येथे ख्रिस्तपूर्व ५९९ मध्ये झाला. (वैशाली हे ठिकाण बिहार राज्यात आहे). वर्धमानाचे आई-वडिल उच्च कुळातील होते म्हणजेच ते क्षत्रिय होते. त्याच्या पित्याचे नाव सिद्धार्थ व मातेचे नाव त्रिशला होते. त्याची माता एक राजकन्या होती. महावीराच्या माता-पित्यांनी त्याचे नाव 'वर्धमान' असे ठेवले होते.  महावीर ही एक उपाधी आहे. वर्धमानास ही उपाधी बेचाळीसाव्या वर्षी प्राप्त झाली. पण पुढे त्याचा उल्लेख महावीर या नावानेच केला जाऊ लागला. महावीराचा विवाह यशोदा हिच्याशी झाला होता.  त्यांना अणोज्जा नावाची एक मुलगी होती. महावीर तीस वर्षाचे असताना त्याचे माता-पिता मृत्यू पावले. त्यामुळे त्याचे वडिलबंधू नंदीवर्धन यांच्या हातात कुटुंबाचा अधिकार आला. महावीरानी आपले वडिल बंधू व कुटुंबातील इतर वडिलधारी माणसे यांच्याकडून जैन धर्माच्या विधीनुसार दिक्षा घेतली. त्यानंतर त्यांनी बारा वर्षे खडतर तपश्चर्या केली.  पहिल्या तेरा महिन्यानंतर त्यांनी आपल्या वस्त्रांचा त्याग केला. शेवटी तपश्चर्येतून ज्ञानप्राप्ती झाली. त्यातूनच त्यांनी आपल्या धर्माचा प्रचार केला. तेच म्हणजे जैन तत्त्वज्ञान होय. आपल्या धर्माचा प्रसार करत ते वयाच्या ७२ व्या वर्षी मृत्यू पावले.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ जैन परंपरा :

जैन धर्माची परंपरा फारच जुनी व प्राचीन आहे. जैन या शब्दाची व्युत्पत्ती 'जि' या मूळ संस्कृत धातूपासून झालेली असून त्याचा अर्थ जिंकणे किंवा स्वामित्व मिळविणे असा आहे. जैन हा आपल्या वासनाविकारांवर, क्रोधावर, कामावर विजय मिळवितो म्हणून जैन बनतो. रागद्वेष यासारख्या शत्रूंवर विजय मिळविल्यामुळे वर्धमानाला जिन किंवा जेता ही उपाधी मिळाली. जिन या संज्ञेवरून या धर्माला जैन धर्म हे नाव रूढ झाले.

**तीर्थंकर :**

जैन धर्माचे प्रवर्तन, संवर्धन आणि प्रसार ज्यांनी केला त्यांना 'तीर्थंकर' म्हणतात. असे एकूण २४ तीर्थंकर आहेत. तीर्थंकर म्हणजे मार्ग दाखविणारा. संसार सागरातून तरून जाण्यास मदत करणारा होय. ऋषभनाथ हे पहिले तीर्थंकर मानले जातात. ऋषभनाथ हा आद्य तीर्थंकर असल्यामुळे जैन धर्मात त्यास फार आदर दाखवितात. एवढेच नाहीतर ब्राह्मण धर्मातही विष्णूच्या चोवीस अवतारांमध्ये ऋषभाची गणना करण्यात येते. ऋषभानंतर होऊन गेलेल्या २३ तीर्थंकरांचे विस्तृत वर्णन जैन ग्रंथात पहावयास मिळते. मात्र २३ वे तीर्थंकर पार्श्वनाथ आणि २४ वे तीर्थंकर महावीर हे दोघे शेवटचे तीर्थंकर प्रसिद्ध आहेत.

जैन धर्मात जे २४ तीर्थंकर होऊन गेलेत त्यांची कालानुक्रमे नावे माहितीसाठी देत आहोत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) ऋषभदेव (नाथ) | २) अजितनाथ | ३) संभवनाथ | ४) अभिनंदननाथ |
| ५) सुमतिनाथ | ६) पदमप्रभ | ७) सुपार्श्वनाथ | ८) चंद्रप्रभ |
| ९) पुष्पदंत | १०) शीतलनाथ | ११) श्रेयासनाथ | १२) वासुपुज्य |
| १३) विमलनाथ | १४) अनंतनाथ | १५) धर्मनाथ | १६) शांतीनाथ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७) कुंथुनाथ | १८) अरहनाथ | १९) मल्लीनाथ | २०) मुनिसुब्रतनाथ |
| २१) नमिनाथ | २२) नेमिनाथ | २३) पार्श्वनाथ | २४) वर्धमान महावीर |

जैन धर्माचा शेवटचा म्हणजे चोवीसावा तीर्थंकर 'वर्धमान महावीर' होता. वर्धमान महावीर हा मगध देशात राहात असल्याने त्याने या प्रांताच्या अर्धमागधी भाषेत जैन तत्त्वांची मांडणी व प्रचार केला आणि असा प्रचार करत करत वयाच्या ७२ व्या वर्षी मृत्यू पावला. महावीराने जैन धर्मासाठी ऐतिहासिक कार्य करून जैन धर्माला प्रभावी बनविले. जैन धर्म हा एक भारताचा प्रमुख धर्म बनविण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य केल्यामुळे जगाच्या इतिहासात त्याला अढळ स्थान प्राप्त झाले आहे. अशा प्रकारे जैन धर्माची परंपरा अत्यंत दीर्घकालीन आहे.

**जैन धर्मातील पंथ : दिगंबर, श्वेतांबर**

महावीराच्या मृत्यूनंतर जैन धर्मात मतभेद होऊन त्याचे दोन पंथ पडले त्यांना दिगंबर व श्वेतांबर असे म्हणतात. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने या दोन संप्रदायात फारसा फरक नाही. मात्र त्यांच्या आचरणामध्ये भेद दिसून येतो तो असा -

* दिगंबर म्हणजे आकाश हेच अंबर. अंबर म्हणजे वस्त्र. याउलट श्वेतांबर म्हणजे शुभ्र वस्त्र परिधान करणारे होत.

* दिगंबर पंथ हा अधिक कडक व्रताचरण व उग्र तपस्या करण्यावर भर देतो तर श्वेतांबर पंथ मानवाचे काही बाबतीतील दौर्बल्य मान्य करून तपस्येची उग्रता कमी करतो.

* दिगंबर पंथाचे मते, मानवाने इतके निस्वार्थी व अपरिगही व्हावयास पाहिजे की त्याने अंगावर वस्त्रही ठेवता कामा नये. तसेच आकाशालाच आपले वस्त्र मानावे, जेवणासाठी सुद्धा पात्र वापरू नये, इत्यादी गोष्टींवर भर देतात. याउलट श्वेतांबर पंथीय मुनी हे अंगावर शुभ्र वस्त्र परिधान करून हिंडतात.

* थोडक्यात वर्धमान महावीराच्या मूळ आचारांचे समर्थन करणाऱ्या मुनींनी वस्त्रत्याग केला ते दिगंबर होत. याउलट ज्या मुनींनी वस्त्र वापराचे समर्थन करून शुभ्र वस्त्रे स्वीकारली त्यांना श्वेतांबर म्हणून ओळखले जाऊ लागले.

**जैनांचे मूल धर्मग्रंथ :-**

जैन तत्त्वज्ञानाचे ग्रंथ पुष्कळ आहेत. मूल धर्मग्रंथाची संख्या ८५ भरते. त्यामध्ये ४१ सूत्रग्रंथ, सुमारे ३१ प्रकीर्णके, १२ नियुक्ती (भाष्यग्रंथ) आणि १ महाभाष्य आहे. आचार्य बलदेव उपाध्याय यांनी जैन साहित्यिक ग्रंथाचे वर्गीकरण करण्यासाठी चार काल विभाग केले आहेत, ते असे- आगमग्रंथ, आरम्भकाळ, मध्ययुग आणि अर्वाचीन गुण. जैनांचे मूळ ग्रंथ अर्धमागधी भाषेत आहेत. या ग्रंथापैकी काही ग्रंथ महत्त्वाचे मानले जातात, ते असे- १) उमास्वातीचे- 'तत्त्वार्थाधिगमसूत्र' २) सिद्धसेन दिवाकराचे - न्यायावतार ३) कुन्दाकुन्दाचार्याचे- प्रवचनसार ४) नेमिचंडाचे - द्रव्यसंग्रह ५) मल्लिसेनसुरीचे- स्याद्वादमंजरी. हे ग्रंथ तात्वीक स्वरूपाचे आहेत.

### ३.२.२ अहिंसा :-

**अहिंसा परमो धर्म:** - याचा अर्थ अहिंसा हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. हे जैनांचे अत्यंत महत्त्वाचे सूत्र आहे. हा जैन सदाचाराचा पाया आहे. अहिंसा या संकल्पनेमध्ये खालील गोष्टींचा समावेश केला जातो.

**१) हिंसा न करणे -**

कोणत्याही स्वरूपात हिंसा करणे हे जैन धर्मात महापाप समजले जाते. कोणत्याही परिस्थितीत कोणाही

जीवाची हिंसा करू नये, मग ते जीव कीडे, मुंग्या, डास, ढेकूण, विंचू, सर्प, वनातील प्राणी (हरिण, ससा, इत्यादी) व मानव असले तरी त्यांची हत्या करू नये. स्वत:ला जरी कितीही त्रास, कष्ट, धोका निर्माण झाला तरी मुनीने कोणत्याही जीवाची हत्या करता कामा नये. या नियमाचे कसोशीने पालन केले पाहिजे अशी जैन धर्माची आग्रहाची शिकवण आहे.

गरीब जनावरांनाही दयेने वागवावे. त्यांना घट्ट दोर बांधू नये, त्याचे अवयव कापू नये, त्यांच्यावर भरमसाठ ओझे लादू नये, त्यांच्याकडून वाजवीपेक्षा अधिक काम करून घेऊ नये. त्यांना पुरेसे खाण्यापिण्यास द्यावे. या गोष्टींची काळजी घेणे जैनांच्या अहिंसेत समाविष्ट आहे. हिंसेपासून अलिप्त राहणे यास 'प्राणतिपात विरमण व्रत' असे म्हणतात. म्हणजेच मनुष्याने कोणत्याही जीव-जंतूंची हत्या हेतूपुरस्पर करू नये.

**२) हिंसेचे दोन भेद -**

हिंसेचे दोन भेद आहेत. त्यांना १) द्रव्य हिंसा - प्राण्याचा प्रत्यक्ष वध करणे किंवा त्यास पीडा देणे. २) भाव हिंसा - कोणत्याही प्राण्याच्या वधाचा किंवा पीडा देण्याचा मनात विचार करणे होय.द्रव्यहिंसेपेक्षा भाव हिंसा अधिक दोषयुक्त असते. कारण भाव हिंसेमुळे मनुष्य स्वत:च्या अंतरंगाचा घात करून घेतोच याउलट द्रव्यहिंसा प्रत्यक्ष झाली तरी हिंसा दोषापासून मनुष्याचा बचाव होऊ शकतो. ती क्षम्य असू शकते. उदा. रस्ता नीट पाहून अत्यंत सावधपणे चालणाऱ्या संयमी माणसाकडून त्याच्या पावलाखाली एखाद्या छोट्या जीवाची हिंसा झाली तरी त्याचे मन शुद्ध असल्याने तो दोषी ठरत नाही. हिंसा दोषामध्ये आपले मन कसे आहे. आचरणात अहिंसेचा प्रयत्न किती आहे हे महत्त्वाचे आहे. म्हणजेच मनुष्याच्या मानसिक शुद्धतेवर फार भर देण्यात आला आहे. जैन मतानुसार सर्वच व्रतांच्या बाबतीत मनाची शुद्धता फार महत्त्वाची मानतात. उदा.माता-पिता यांनी आपल्या मुलांना, गुरुंनी आपल्या विद्यार्थ्यांना, न्यायाधिशांनी अपराध्याना लहान मोठ्या केलेल्या शिक्षा दोषी मानल्या जात नाहीत कारण त्यामध्ये त्यांचे मन शुद्ध असते. त्यात त्या त्या व्यक्तीच्या व समाजाच्या कल्याणाची भावना असते.

३) गृहस्थाच्या दैनंदिन जीवनाच्या मर्यादा लक्षात घेऊन हिंसेचे चार प्रकार सांगितले आहेत.

**अ) आरंभी हिंसा -** उठणे, बसणे, चालणे, वगैरे शारीरिक हालचाल. झाडणे, झटकणे वगैरे साफसफाई, चूल पेटविणे, दळणे, इत्यादी क्रियामुळे होणारी हिंसा ही आरंभी हिंसा होय.

**ब) उद्योगी हिंसा -** कृषी, दुकानदारी, व्यापार, उद्योग, धन मिळविताना जी हिंसा होते तिला उद्योगी हिंसा म्हणतात.

**क) विरोधी हिंसा -** एखाद्या प्राण्याने आपल्यावर हल्ला केल्यास त्याच्यापासून स्वत:चे रक्षण करण्यासाठी हिंसा करणेचा समावेश विरोधी हिंसेमध्ये होते. म्हणजेच स्वजन, परिजन, धर्म, देश, समाज, इत्यादींच्या रक्षणार्थ केलेली हिंसा विरोधी हिंसा आहे.

**ड) संकल्पी हिंसा -** निरपराध प्राण्यांची सहेतुकपणे शिकार व हिंसा करणे ही संकल्पी हिंसा होय. मनोरंजन म्हणून, वैराचा बदला म्हणून, पराक्रम दाखविण्यासाठी म्हणून, किंवा कुठल्याही प्रकारचा स्वार्थ साधण्यासाठी जाणूनबुजून जी हिंसा केली जाते ती संकल्पी हिंसा होय.

गृहस्थाला या चारपैकी पहिल्या तीन पूर्ण टाळता येतच नाहीत. तरीपण त्याबाबतीत त्याने शक्य तितके अधिक विवेकशील राहून जितके टाळता येईल तितके पहावे. संकल्पी हिंसा हीच अत्यंत वाईट असते. ती टाळता येणे शक्य आहे व ती टाळलीच पाहिजे असे जैनांचे मत आहे.

## ४) पाच अतिचार किंवा अहिंसा अनुव्रताचे दोष -

वधाशिवाय अन्य प्रकारची पीडा देऊन हिंसा दोषाचे भागीदार होण्याची अनेक कारणे असू शकतात. कठोर शब्दांचा वापर केल्यामुळे दुसऱ्याचे मन दुखावले गेले तरी ती हिंसाच होते. परिजन व पशु वगैरेंच्या बाबतीत पाच प्रकारच्या क्रूर वर्तनाला अतिचार किंवा अहिंसा अनुव्रताचे दोष म्हणतात, हे अतिचार पाच प्रकारचे आहेत ते असे -

**अ) बन्धदोष -** कोणत्याही जीवाला (प्राण्याला) बांधून किंवा कोंडून ठेवणे, सेवकांना अधिक थांबवून ठेवणे, ठरलेल्या वेळेपेक्षा अधिक वेळ काम करून घेणे, इत्यादी क्रियांचा समावेश बन्धदोषामध्ये होतो.

**ब) वधदोष -** जीवे मारणे हा तर वध आहेच. पण प्राण्यांना मार देणे, आश्रित किंवा नोकर यांना मार देणे, कोणाच्या लाचारीचा गैरफायदा घेणे, शोषण करणे आणि प्राण्यांना इतर कुठलीही पीडा देणे इत्यादी वधदोष आहेत.

**क) छेद दोष -** प्राण्यांच्या अंगउपांगाला तोडणे, म्हणजेच माणसाच्या किंवा पशूच्या शरीराला जखमा करणे, इत्यादीचा समावेश छेद दोषामध्ये होतो.

**ड) अतिभारारोपण दोष -** पशूंच्या पाठीवर त्याला पेलवणार नाही इतके ओझे लादणे, कुणाकडून त्याच्या ताकदीपेक्षा अधिक काम करून घेणे, स्वत:मध्ये काम करण्याची शक्ती असूनसुद्धा दुसऱ्याकडून काम करवून घेणे, इत्यादींचा समावेश अतिभारारोपण दोषामध्ये होतो.

**इ) अन्नपान विरोध -** कोणत्याही माणसाला, प्राण्याला वा पशुला अन्नपाणी घेऊ न देणे किंवा त्यामध्ये अडथळा आणणे, नोकरांना वेळेवर अन्नपाणी न देणे किंवा थोडे देणे, इत्यादींचा समावेश अन्नपान विरोध मध्ये समावेश होतो.

जैन धर्माच्या मते वरील पाच प्रकारच्या अतिचार किंवा दोषापासून जैन धर्माचे पालन करणाऱ्या गृहस्थाला या सर्व अतिचारापासून दूर राहिले पाहिजे तरच ती अहिंसा होय.

## ५) अहिंसा म्हणजे प्रेम होय -

अहिंसा हा शब्द नकारात्मक आहे पण अहिंसा तत्त्व नकारात्मक नाही. अहिंसा म्हणजे प्रेम. सर्व प्राण्यांच्या बाबतीत दयाभाव व ममताभाव असणे हीच खरी अहिंसा होय.मला काटा बोचला की वेदना होतात, मला कोणी शिवी दिली की दु:ख होते तसेच दुसऱ्यासही वेदना होतात, दु:ख होते. मला जशी जगण्याची तीव्र इच्छा होते तशीच इतर सर्व प्राण्यांना आहे. या भावना सतत मनात बाळगणे म्हणजे खरे अहिंसा-व्रत होय. अहिंसा भावना जेव्हा खऱ्या अर्थाने विकसित होते तेव्हा मनुष्याला शत्रूदेखील मित्रच वाटतात. मित्रावर कोणीही प्रेम करेल पण शत्रूवरही प्रेम करावयास पाहिजे, हे अहिंसा व्रताचे मूलमंत्र आहे. ज्याच्याजवळ शांतता, प्रेम, सहानुभूती, समभाव असतो तो प्रेमळ असतो. थोडक्यात अहिंसा म्हणजे प्रेम होय.

## ६) विश्व कल्याणासाठी अहिंसा -

व्यक्तीने सुशील, सदाचारी व समाजहितवादी व्हावे त्याचबरोबर अनिष्ट प्रवृत्तीपासून दूर रहावे. अहिंसा तत्त्वाचे पालन केल्याने परस्परामधील प्रेम वाढेल. विषमता व पिळवणूक थांबेल. धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजनैतिक क्षेत्रात अहिंसेचा वापर करता येईल. तसे झाल्यास युद्धे टळतील. राष्ट्राराष्ट्रात शांतता व आपुलकीची भावना रूजेल, सारे आनंदमय व सुखमय होईल. अशाप्रकारे विश्व कल्याणासाठी अहिंसा हे व्रत उपयुक्त होईल.

### ३.२.३ अनेकान्तवाद :-

जैनमत हा एक धर्म आहे. तसेच ते एक तत्त्वज्ञान (दर्शन) आहे. धर्म या दृष्टीने पाहता अहिंसा हा त्याचा आत्मा (प्राण) आहे. तत्त्वज्ञान या दृष्टीने पाहता 'अनेकान्तवाद हा त्याचा पाया आहे. अनेकान्तवाद हा जैन दर्शनातील एक सिद्धांत नसून जगाकडे पाहण्याचा एक दृष्टीकोन आहे. अहिंसा या मूलभूत प्रेरणेतून अनेकान्तवादाची उभारणी झालेली आहे. अहिंसा म्हणजे हत्या न करणे, दुसऱ्या जीवावर प्रेम करणे, मन उदार करणे, तेव्हा बौद्धिक पातळीवर अहिंसा किंवा भिन्न मत सहिष्णुता म्हणजेच अनेकान्तवाद होय.कोणत्याही वस्तूचे ज्ञान प्राप्त करताना तिच्या संपूर्ण बाजूचा विचार करणे म्हणजे अनेकान्तवाद होय. कुठल्याही गोष्टीसंबंधी एकांगीकपणे मत न बनविणे म्हणजे अनेकान्तवाद होय.अनेकान्तवादातील अंत म्हणजे कड, शेवट किंवा निश्चित निर्णय होय आणि एकांत म्हणजे एकच एक निर्णय होय. म्हणून अनेकान्तवाद म्हणजे कोणत्याही गोष्टीसंबंधी एकांगीपणे विचार न करणे किंवा मत न बनविणे होय. कारण कोणत्याही वस्तुला अनेक बाजू असतात. म्हणून कोणत्याही वस्तूंचा विचार करताना तिच्या संपूर्ण बाजूचा विचार करणे म्हणजे अनेकान्तवाद होय.

**वस्तू अनन्तधर्मात्मक असते -**

कोणत्याही गोष्टीचा विचार एका दृष्टीकोनातून करता कामा नये अशी जैन धर्माची मुख्य शिकवण आहे. ज्या गोष्टीचा विचार करावयाचा त्यांना इतर काही बाजू आहेत किंवा नाहीत याचा विचार होणे आवश्यक असते. कोणाही व्यक्तीचा परिचय होण्यासाठी तिचा देश, जात, वय, धर्म, समाज, नाव, कुटुंब, इत्यादी जाणून घेणे आवश्यक आहे. मनमोहन या व्यक्तीचे गुण तो भारतीय, हिंदु, गौरवर्ण, ब्राह्मण, इतक्या उंचीचा, वयाचा, अमूक शिक्षण घेतलेला एवढेच समजून चालणार नाही तर त्याचबरोबर तो युरोपिय, आफ्रिकन, ख्रिश्चन धर्मीय नाही असे निषेधात्मक ज्ञान व्हावयास पाहिजे. याप्रमाणे जैनमतानुसार प्रत्येक वस्तू ही स्वपर्याय व परपर्याय यांचा समुच्चय असते.

वस्तू अनन्तधर्मात्मक आहेत. त्याचा विचार नेहमी सापेक्षतेने केला पाहिजे. आपण कितीही प्रयत्न केला तरी वस्तूचे आपणास होणारे ज्ञान व तिचे संपूर्ण स्वरूप यामध्ये अंतर राहणारच. कारण आपण वस्तूचे ज्ञान करून घेताना कुठला तरी एकच अंत किंवा शेवट पकडीत असतो. आपण असे म्हटले की, हे टेबल लाकडाचे केलेले आहे. अर्थात हे विधान खरे आहे. पण त्याच्या खरेपणास मर्यादा पडतात. ते कुठल्याही लाकडाचे नाही तर सागवान या जातीच्या लाकडाचे आहे. तो सागवानही अमूक एक प्रकारचा आहे. ते अमूक एका सुताराने बनविले आहे. इत्यादी गोष्टी संबंधीचे ज्ञान करून घ्यावे लागेल. थोडक्यात कोणत्याही वस्तूचे ज्ञान करून घेण्यासाठी त्याच्या सर्व बाजूंचा विचार करून माहिती घ्यावी. कारण कुठलीही वस्तू ही अनन्तधर्मात्मक असते. जैनांच्या या मतास अनेकान्तवाद म्हणतात.

**नयवाद व स्याद्वाद -**

अनेकान्तवाद हा एक दृष्टीकोन आहे. हा दृष्टीकोन वस्तू स्वरूपाच्या ज्ञानाच्या अपेक्षेने वापरल्यास त्यातून नयवाद निष्पन्न होतो व ज्यावेळी विधानाच्या अपेक्षेने वापरल्यास त्यातून स्याद्वाद निष्पन्न असतो. नयवाद आणि स्याद्वाद ही अनेकान्तवादाचीच दोन रुपे आहेत.


**नयवाद -**

* नय म्हणजे अंश, अंग किंवा पाहणाऱ्याचा विशिष्ट अभिप्राय होय.

* नय म्हणजे कोणत्याही वस्तूचे तिच्यासंबंधीच्या विशिष्ट दृष्टीकोनातून झालेले ज्ञान होय. नय म्हणजे जाणणाऱ्या व्यक्तीचा एक विशिष्ट दृष्टीकोन होय. तो असा की अनेक गुणधर्म असणाऱ्या वस्तूच्या एखाद्याच

गुणधर्मावर लक्ष केंद्रीत केले जाते व त्या गुणाबद्दल विधान केले जाते. याचा अर्थ असा की, कोणत्याही वस्तूच्या अनेक गुणापैकी एकावेळी एकाच गुणावर लक्ष केंद्रीत करणे म्हणजे नयवाद होय. सामान्य माणसे एकावेळी पदार्थाचा केवळ एकच गुणधर्म जाणू शकतात. त्यामुळे त्या व्यक्तीचे ज्ञान अंशरुप (कमी) असते. अशा या अंशरूप ज्ञानाला जैनानी नय म्हटले आहे.

**नयवाद प्रकार -**




नयाचे मुख्य प्रकार दोन पडतात. त्यांना द्रव्यनय व पर्यायनय असे म्हणतात. नयाचे एकूण प्रकार सात पडतात.

**द्रव्यनय -**

कोणत्याही वस्तूच्या ठिकाणी असा नित्य अंश असतोच की ज्यायोगाने तीच ही वस्तू आहे असे ज्ञान होते, त्यास द्रव्यनय म्हणतात. उदा.१) कापसाचा वेळू करून त्याचे सूत काढून त्यापासून कापड बनविले तरी त्यातील कापूस हे द्रव्य तेच राहते यालाच द्रव्यनय म्हणतात.

उदा. २) माती हे द्रव्य आहे. ती भिजवून तिच्या गोळ्यापासून तिला आकार देऊन घट तयार केले जातात व ते करताना माती वेगवेगळी रूपे घेते. ती भाजली की रंग बदलतो. आधी काळा रंग असतो व मग भाजल्यावर तांबूस बनतो. पण कितीही बदल झाले तरी माती हे द्रव्य राहतेच. सोन्याचेही उदाहरण असेच आहे. सोने तापवून त्यापासून विविध प्रकारचे अलंकार तयार केले जातात पण त्यातील सोने हे द्रव्य कायम राहतेच. थोडक्यात त्या त्या वस्तूचा तो तो विशिष्ट गुण तोच राहतो. उदा.सोन्याचे पिवळेपण, मिठाचे खारटपण, साखरेचे गोडपण, कार्ल्याचे कडूपण, बर्फाचे थंडपण, इत्यादी.

**द्रव्यनयाचे प्रकार -**

द्रव्यनयाचे तीन प्रकार पडतात. त्यांना १) नैगमनय २) संग्रहनय ३) व्यवहारनय असे म्हणतात.

**१) नैगमनय -**

कोणत्याही वस्तूबद्दल विचार करण्याची जी पद्धती असते तिला नैगमनय म्हणतात. प्रत्येक वस्तूला किंवा घटनेला सामान्य व विशेष असे गुण असतात. या पद्धतीमध्ये वस्तूचे सामान्य गुण व विशेषगुण लक्षात घेतलेले असतात. म्हणजेच वस्तूचा सामान्यगुण व विशेषगुण यात फरक केलेला नसतो. उदा.ज्यावेळी आपण आम्रवृक्ष असे म्हणतो. त्यावेळी त्यामध्ये वृक्षाचे सामान्यगुण व विशेषगुण समाविष्ट असतात. वृक्षाचे सामान्यगुण म्हणजे मुळे, खोड, फांद्या, पाने, हिरवेपणा असणे हे होत. आम्रवृक्षाच्या बाबतीत त्याचा विशेष गुण म्हणजे पानांचा विशिष्ट आकार, त्याला आलेला मोहोर व त्या मोहोराला आंबे लागणे असा आहे. सामान्य व विशेष हे एकमेकात मिसळलेले असतात व दोन्ही मिळून कोणतीही गोष्ट होत असते. अशाप्रकारे नैगमनयात सामान्य व विशेषगण लक्षात घेतले जातात.

२)   **संग्रहनय -**

यामध्ये कोणत्याही वस्तूच्या सामान्य गुणांचाच विचार केलेला असतो. (एका विशिष्ट जातीत  असलेल्या सर्व व्यक्तीमध्ये जे गुण समान असतात ते सामान्यगुण होत) या नयानुसार, कोणत्याही वस्तूचे  विशेषगुण त्या वस्तूच्या सामान्य गुणापेक्षा वेगळे नसतात. उदा.जर वृक्षच नसते तर आम्रवृक्षच अस्तित्वात राहिला नसता. म्हणजे आम्रवृक्षाच्या ठिकाणी असणारे विशेष गुण हे त्या आम्रवृक्षाच्या सामान्य गुणापासून वेगळे राहू शकत नाहीत असे संग्रहनय म्हणतो.

३)   **व्यवहारनय -**

व्यवहारनयामध्ये कोणत्याही वस्तूच्या ठिकाणी असणारे  विशेषगुणच लक्षात घेतले जातात. (जे गुण केवळ त्या विशिष्ट व्यक्तीतच आढळतात त्याना विशेष गुण म्हणतात). या विशेष गुणांच्या व्यतिरिक्त सामान्य गुणांचे अस्तित्व असत नाही असे मानले जाते. उदा.जेव्हा एखादा माणूस एखाद्या व्यक्तीला घट आणावयास सांगतो, तेव्हा ती व्यक्ती काळा किंवा लालसरच घट आणते. कारण रंगहीन घटक असा अस्तित्वातच नसतो.या नयामध्ये वस्तूकडे पाहण्याचा व्यावहारिक दृष्टीकोन असतो व तो इंद्रिय अनुभवावर आधारलेला आहे. आपण जेव्हा वस्तूशी व्यवहार करतो तेव्हा तो विशिष्ट वस्तूशी असतो, त्या वस्तूच्या जातीशी किंवा वर्गाशी नसतो.

**पर्यायनय -**

वस्तूंचा निरनिराळ्या अवस्थाना जैन भाषेत पर्यायनय म्हणतात. वस्तूच्या स्वरूपाचे ज्ञान करून घेण्यासाठी तिच्या ठिकाणी असणाऱ्या विविध पर्याय नयाचा वापर केला जातो. पर्यायनयाचे पुढील भाग पडतात - ४) ऋजूसूत्रनय ५) शब्दनय ६) समभिरूढ नय  ७) एवंभूत नय

४)   **ऋजुसूत्रनय -**

ऋजू म्हणजे सरळ व सूत्र हा वचनाच्या अर्थाने वापरलेला शब्द आहे. या नयाच्या मतानुसार कोणत्याही वस्तूच्या भूतकाळाचा किंवा भविष्यकाळाचा विचार न करता ती वस्तू वर्तमानकाळात कशी आहे याचा विचार केला जातो.  म्हणजेच कोणत्याही वस्तूच्या वर्तमान स्थितीचाच विचार केला जातो. कोणत्याही वस्तूच्या भूतकाळ व भविष्य स्थितीशी आपल्या दैनंदिन व्यवहाराचे कर्तव्य नसते. आपला संबंध फक्त वस्तूच्या वर्तमान स्थितीशीच असतो, असे ऋजुसूत्रनय स्पष्ट करतो. उदा.एखाद्याला त्याच्या पुण्यकर्मामुळे पूर्वजन्मी स्वर्गलोक मिळाला असेल परंतु ते पुण्य संपल्यामुळे तो या जन्मी माणूस झाला असेल तर पूर्वीच्या स्वर्गलोकी जीवनाचा त्याला वर्तमानकाळी काहीही उपयोग नाही. येथे फक्त तो सद्य स्थितीत कसा आहे याचा विचार केला जातो.हा नय फक्त विशिष्ट क्षणी वस्तूंचे असलेले रूप लक्षात घेतो. उदा.या क्षणी सुख आहे. या अनुभवात तो फक्त या क्षणी असणाऱ्या सुखाचाच विचार करतो. उद्या काय होईल याचा विचार करत नाही.

५)   **शब्दनय -**

शब्दनयाचा दृष्टीकोन हा शब्द व त्याचे अर्थ यांच्याशी संबंधीत असतो. कोणताही शब्द विशिष्ट वस्तू, विषय, गुण, संबंध किंवा क्रिया दर्शविणारा असतो. शब्द हे एक नाव किंवा संज्ञा असते. तो शब्द उच्चारल्यावर आपल्या मनासमोर एखादी वस्तू, गुण, संबंध, घटना उभी केली जाते. प्रत्येक शब्दाला अर्थ असतो. भिन्न शब्द एकच वस्तू निर्देश करू शकतात. उदा.दगड, पाषाण, अश्मा हे शब्द दगड ही वस्तू दाखवितात. राजा अधिपती, प्रभु, नरेश, इत्यादी शब्द राजा सुचविणारे आहेत. पत्नी, भार्या, जया, इत्यादी शब्द पत्नी सुचविणारे आहेत.

### ६) समभिरुढनय -

एकाच वस्तूचा किंवा व्यक्तीचा निर्देश करण्यासाठी उपयोगात आणलेल्या निरनिराळ्या समानार्थक शब्दांच्या साह्याने त्याचा निर्देश केला जातो तेव्हा त्यास समभिरुढनय असे म्हणतात. उदा.द्विप, हस्तिन्, करिन् हे गजनिर्देशक (हत्ती) शब्द आहेत. द्विप म्हणजे दोहोंनी सोंड व तोंड यांनी पिणारा असा अर्थ होतो. हस्तिन् म्हणजे हस्त असणारा येथे त्याची तोंड हाच त्याचा हात कल्पिलेला आहे. करिन् या शब्दातील मूळ कल्पना म्हणजे त्याची सोंड हाच त्याचा कर (हात) अशी आहे. अशा प्रकारे समानार्थक शब्द वापरून समभिरुढनय व्यक्त केला जातो.

### ७) एवंभूतनय -

त्या त्या वस्तूच्या किंवा व्यक्तीच्या त्या त्या स्थितीला अनुसरून त्या त्या वस्तूला किंवा व्यक्तीला जेव्हा नाव दिले जाते तेव्हा त्या विचारपद्धतीला एवंभूतनय असे म्हणतात. उदा.नरसिंह हे नाव ज्यावेळी एखादा पुरुष सिंहासारखे वर्तन करत असेल त्यावेळी देतात. गौ या शब्दाचा अर्थ फिरणारा प्राणी असा आहे. हिंडणारी, फिरणारी गाय म्हणजे 'गौ' परंतु जेव्हा ती गाय स्थिर व स्वस्थ बसली असेल तेव्हा तिला 'गौ' म्हणता येणार नाही. स्थिर स्थितीत असलेल्या गाईचे वर्णन करण्यासाठी दुसरा एखादा शब्द शोधावयास पाहिजे. गायक म्हणजे गाणारा पण हा नय त्याला नेहमी गायक म्हणून स्विकारणार नाही. ती व्यक्ती गात असेल तेव्हाच त्याचा गायक म्हणून स्वीकार करेल.

### स्याद्वाद (सप्तभंगीनय) -

विधानाच्या अपेक्षेने ज्यावेळी अनेकान्तवाद स्विकारला जातो त्यावेळी त्यातून स्याद्वाद निष्पन्न होतो. स्याद् याचा शब्दकोषातील अर्थ - कदाचित संभवत: कथंचित असे आहेत. पण येथे स्याद् याचा अर्थ एका परिने किंवा विशिष्ट संदर्भात असा आहे.

एखाद्या वस्तूसंबंधाने आपण निश्चितपणे काही सांगू शकत नाही किंवा त्या वस्तूच्या संदर्भात निश्चितपणे काही नाकारू शकत नाही. वस्तूच्या अनंत अशा गुंतागुंतीमुळे काही निश्चित विधान करता येत नाही. एखादी वस्तू किंवा तिचा धर्म याच्या संबंधी काही विधान केले तर ते एका विशिष्ट संदर्भातच खरे असते. परंतु संदर्भ बदलला तर नेमके त्याच्याविरूद्ध दिसणारे विधान हे तितक्याच समर्थपणे मांडता येईल असे स्याद्वादाचे तात्पर्य आहे. संदर्भ बदलून कुठल्याही गोष्टीसंबंधी विधान करण्याच्या एकंदर सात पद्धती आहेत त्या अशा -

१) स्याद् अस्ति । २) स्याद् नास्ति । ३) स्याद् अस्ति नास्ति ।

४) स्याद् अवक्तव्यम् । ५) स्याद् अस्ति अवक्तव्यम् ।

६) स्याद् नास्ति अवक्तव्यम् ७) स्याद् अस्ति नास्ति अव्यक्तयम्

अशा प्रकारे या सात विधानांची मिळून जी रचना तयार होते तिला सप्तभंगी नय असे म्हणतात. वरील सात विधानांची माहिती खालीलप्रमाणे देता येईल.

### १) स्याद् अस्ति ।

असे असू शकेल. हा विधान करण्याचा पहिला प्रकार आहे. कोणतीही वस्तू त्याचे द्रव्य, क्षेत्र, स्थान, काल व शुद्र या दृष्टीने विचार करता ती वस्तू म्हणून अस्तित्वात असते. उदा.घट हा मृतिके पासून (द्रव्य) तयार झालेला आहे म्हणून माझ्या खोलीत (स्थान) आहे. तसेच या क्षणी (काल) आहे आणि अमूक एका मापाचा

आणि आकाराचा (रूप) आहे म्हणून अस्तित्वात आहे.

**२) स्याद् नास्ति ।**

असे नसू शकेल. दुसऱ्या एखाद्या वस्तूच्या संदर्भातील द्रव्य, स्थान, काल आणि रुप याच्या दृष्टीने पाहता पहिली वस्तू अस्तित्वात नसते. उदा.स्याद् अस्ति मध्ये आपण एकदा घट मातीचा आहे असे म्हटले आहे. तसे येथे घट धातूचा (द्रव्य) बनविलेला आहे. तो दुसऱ्या ठिकाणी आहे. तसेच तो वेगळ्या वेळी आहे आणि वेगळ्या आकाराचा आहे या अर्थाने अस्तित्वात नाही.

**३) स्याद् अस्ति नास्ति ।**

असे असू व नसू शकेल. एकच वस्तू दोन भिन्न दृष्टींनी पाहिल्यास एकदा असते आणि एकदा नसते असे म्हणता येऊ शकेल. या तिसऱ्या प्रकारात कोणती वस्तू कशी आहे तसेच ती कशी नाही याचाही विचार केला जातो.

**४) स्याद् अवक्तव्यम् ।**

वर्णन न करण्यासारखे असेल. स्याद् अवक्तव्यम् म्हणजे दोन विरोधी गुण एकाच वस्तूच्या ठिकाणी असतात, आणि म्हणून त्या वस्तूचे नेमके स्वरूप कसे आहे हे ठरविणे अशक्य बनते. उदा.पृथ्वी ही म्हटले तर स्थिर आहे व म्हटले तर स्थिर नाही, म्हणून ती नेमकी कशी आहे ते सांगता येत नाही. अशा अर्थाने ती अवर्णनीय (अवक्तव्यम्) आहे.

**५) स्याद् अस्ति अवक्तव्यम् ।**

असू शकेल पण वर्णन करण्यासारखे नसू शकेल. म्हणजे पृथ्वी आहे, स्थिर आहे आणि तरीही तिचे नेमके स्वरूप कसे आहे ते सांगणे कठिण आहे. ते समजण्यासारखे नाही. म्हणून त्याला अवक्तव्यम् म्हटले आहे.

**६) स्याद्नास्ति अवक्तव्यम् ।**

असे नसू शकेल व वर्णन करण्यासारखे नसू शकेल. म्हणजे एखादी वस्तू अशी नाही आणि त्याचबरोबर ती अवर्णनीय आहे. उदा.पृथ्वी फिरत नाही असे दिसते. पण त्याचबरोबर तिचे स्वरूप अवक्तव्यही आहे.

**७) स्याद् अस्ति नास्ति अवक्तव्यम् ।**

असू, नसू व अवर्णनीय असे शकेल. स्याद् अस्ति नास्ति अवक्तव्यम् म्हणजे एखादी वस्तू अशी आहे, अशी नाही, आणि तरीही ती अवर्णनीय आहे. म्हणजे पृथ्वी एका अर्थाने स्थिर आहे, एका अर्थाने फिरत आहे. आणि तरीही तिचे खरे स्वरूप आकलनीय नाही व म्हणून ते अवर्णनीय (अवक्तव्यम्) आहे असा त्याचा अर्थ आहे.

अशाप्रकारे ज्ञान मिळविण्याच्या या भिन्न भिन्न सात बाजू आहेत. सातही एकत्र होऊन आपणास वस्तूची संपूर्ण कल्पना देतात. नयवाद व स्याद्वाद यांच्या आधारे जैनानी आपला अनेकान्तवाद वरीलप्रमाणे स्पष्ट केलेला आहे.

### ३.२.४ जीव आणि अजीव तत्वे:-

गुण आणि पर्याय यांनी युक्त असे जे द्रव्य पदार्थ आहेत ते द्रव्य पदार्थ जीव आणि अजीव या दोन प्रमुख प्रकारात विभागलेले आहेत. म्हणजेच जीव आणि अजीव ही दोन्हीही द्रव्ये होत म्हणजे ती गुण आणि पर्यायानी युक्त आहेत.जैन तत्त्वज्ञानानुसार या विश्वाची दोन अंतिम तत्त्वात विभागणी केलेली आहे व ती म्हणजे जीव आणि अजीव होय. ही दोन्ही तत्त्वे नित्य व शाश्वत असून ती परस्पराहून स्वतंत्र आहेत आणि तरीही त्यांचे सहअस्तित्व आहे. जीव हा भोक्ता आहे तर अजीव हा भोग्य विषय आहे. जीवाला जाणीव (बोध) किंवा ज्ञान असते आणि अजीव हे चार इंद्रियांना स्पर्श, रूची, गंध व दृष्टी यांच्यामार्फत प्रतीत होते. जीव चेतन असतो आणि अजीव अचेतन असतो. म्हणजेच जीव जिवंत व प्राणवान असतात आणि अजीव प्राणरहित किंवा जड व भौतिक स्वरूपाचे असते. जीव व त्याचे प्रकार आणि अजीव व त्याचे प्रकार यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे -

**जीव -**

जैन धर्मात जीव हा शब्द वेगवेगळ्या प्रकारे वापरला गेला आहे. जीव म्हणजे प्राणतत्त्व, आत्मा व जाणीव असेही म्हटले आहे.  ज्याला चेतना आहे तो म्हणजे जीव होय. जे तत्त्व जाणते, विचार करते आणि संवेदनशील असते ते तत्त्व म्हणजे जीवतत्त्व होय.  ज्ञान, संवेदना, विचार आणि संकल्प या गोष्टी कोणत्यातरी तत्त्वांशी संबंधित असतात ते तत्त्व म्हणजे जीवतत्त्व होय. जीवामुळे किंवा प्राणामुळे शरीराला जिवंतपण लाभते.ज्ञान अथवा जाणीव हा जीवाचा धर्म आहे. जीवाचा धर्म आणि स्वत: जीव या भिन्न गोष्टी नाहीत. उदा.ज्योतीचा प्रकाश हा ज्योतीहून भिन्न हे खरे आहे पण प्रकाशरहित ज्योत कशी असू शकेल? आणि ज्योतीशिवाय प्रकाश कसा असेल?  त्याप्रमाणे जाणीव ही जीवाहून भिन्न हे खरे आहे. पण जाणीवरहित जीव कसा असेल व जीवाशिवाय जाणीव कशी असेल ?

**जीवाचे गुण -**

जीव जेव्हा त्याच्या शुद्ध शाश्वत स्थितीत असतो तेव्हा त्याचे आठ गुण सांगितले आहेत ते असे -

१) अनंत ज्ञान - अमर्यादित असे ज्ञान

२) अनंत दर्शन - अमर्यादित अशी श्रद्धा अथवा साक्षात्कार

३) अव्याबाध - सुखदु:खापासून मुक्ती

४) सम्यकत्व - सम्यक् ज्ञान, सम्यक् दर्शन, सम्यक आचरण


५) अक्षय स्थिती - शाश्वत अवस्था

६) अरूपी - आकारहीनता अथवा रूपहीनता

७) अगुरूलघू - स्थितीची समानता, फार उंच नाही किंवा फार नीच नाही अशी स्थिती

८) अनंत-वीर्य - अमर्यादित क्रियाशीलत्व

**जीवाचे प्रकार -**




जीवाचे मुख्य प्रकार दोन पडतात त्यांना १) संसारी जीव व २) मुक्त जीव असे म्हणतात.

**१) संसारी जीव -**

संसारी जीव म्हणजे एका जन्मातून दुसऱ्या जन्मात प्रवेश करणारे किंवा जाणारे जीव होय. या संसारी जीवाचेही दोन प्रकार पडतात त्यांना अ) त्रस जीव व ब) स्थावर जीव असे म्हणतात.

**अ) त्रस जीव -**

त्रस म्हणजे स्थलांतर करणारे जीव होत. म्हणजेच एका जागेकडून दुसऱ्या जागेकडे जाणारे जीव होत. अशा या त्रस जीवाचे पाच उपप्रकार पडतात त्यांना १) द्वींद्रिय २) त्रींद्रिय ३) चतुरिंद्रिय ४) पंचेंद्रिय ५) समनस्क असे म्हणतात.

**१) द्वींद्रिय जीव -**

द्वी-इंद्रिय जीव उच्चश्रेणीचे असतात. ज्या प्राण्यांना केवळ स्पर्श व रसना अशी दोनच इंद्रिये असतात त्यांना द्वी-इंद्रिय जीव म्हणतात. या जीवांना सहा प्राण असतात. रस, स्पर्श, शरीर, श्वसनशक्ती, जीवनकाल आणि वाक् (चालणे) असे हे सहा प्राण आहेत. यामध्ये जंत, शिंपल्यात राहणारे सूक्ष्म आळ्यांसारखे जीव, गांडुळे, जळवा, सुरवंट हे प्राणी असतात. यांचा जगण्याचा कालावधी १२ वर्षाहून अधिक नसतो.

२)   **त्रींद्रिय -**

ज्या प्राण्यांना (किटकांना) केवळ स्पर्श (त्वचा), रसना (जीभ) व गंध (नाक) अशी तीन त्री-इंद्रिय जीव असे म्हणतात. या वर्गात तांबड्या, पांढऱ्या व काळ्या मुंग्या, ढेकूण व पतंग यासारख्या प्राण्यांचा समावेश होतो. यांचा जगण्याचा कालावधी ४९ दिवसांपेक्षा अधिक नसतो.

३)   **चतुरिंद्रिय -**

ज्या प्राण्यांना स्पर्श, रसना, गंध व चक्षू (डोळे) अशी चार इंद्रिये असतात त्यांना चतुर-इंद्रिय जीव म्हणतात. या वर्गात विंचू, डास, गांधीलमाशी, चिलटे, माशा, फुलपाखरे, टोळ यासारख्या प्राण्यांचा या वर्गात समावेश होतो. यांचा जगण्याचा कालावधी सहा महिन्यापेक्षा अधिक नसतो.

४)   **पंचेंद्रिय -**

ज्या प्राण्यांना स्पर्श, रसना, गंध, चक्षू व श्रवण अशी पाच इंद्रिये असतात त्यांना पंचेंद्रिय जीव असे म्हणतात. या वर्गात घोडा, गाय, वाघ, सिंह यासारख्या प्राण्यांचा समावेश होतो.

५)   **समनस्क जीव -**

मनुष्य प्राणी या प्रकारात येतो. मनुष्याला पंचज्ञानेंद्रिये (स्पर्श, रसना, गंध, चक्षू व श्रवण) व मन आणि विचार करण्याची शक्ती असते. इतर प्राण्यापेक्षा मनुष्य हा प्राणी त्यामुळेच वेगळा आहे. याशिवाय मनुष्यामध्ये वाचा (बोलणे) आहे. त्यामुळे तो आपले विचार व्यक्त करू शकतो. मनुष्याचा जगण्याचा कालावधी सरासरी १०० वर्षेपर्यंत असतो.

ब)   **स्थावर जीव -**

स्थावर जीव हे एक इंद्रिय असणारे जीव असतात. त्यांना फक्त स्पर्श हे एकच इंद्रिय असते. या एक-इंद्रिय जीवांना चार प्राण असतात. स्पर्श, शरीर, श्वसनशक्ती व जीवनकाळ हे ते प्राण होत. हे स्थावर जीव दोन प्रकारचे आहेत त्यांना १) स्थूल जीव व २) सूक्ष्म जीव असे म्हणतात.

१)   **स्थूल जीव व २) सूक्ष्म जीव -**

ज्या एक-इंद्रिय जीवाचे कर्म स्थूल असते ते स्थूल एकेंद्रिय जीव होत. हे स्थूल एकेंद्रिय जीव काही नियमित स्थळी असतात. या स्थूल जीवामध्ये विविध प्रकारच्या वनस्पतींचा समावेश होतो.

याउलट ज्या एकेंद्रिय जीवाचे कर्म  सूक्ष्म असते, त्यांना सूक्ष एकेंद्रिय जीव म्हणतात. या सूक्ष्म जीवामध्ये पृथ्वीकाय, जलकाय, अग्निकाय व वायुकाय यांचा समावेश होतो.

२)   **मुक्त जीव -**

मुक्त जीव म्हणजे पूर्णपणे मोकळे झालेले जीव होत.  मुक्त जीव ऐहिक गोष्टींपासून अलिप्त असून उच्च अध्यात्मिक अवस्थेप्रत गेलेले असतात. मुक्त जीव हे मुक्त (निरूपाधी) असतात. कारण ते शुद्ध अस्तित्व आणि अनंत जाणीव यांच्या अवस्थेत असतात. त्यांना अनंतज्ञान, अनंत दर्शन, अनंत वीर्य आणि अनंत सुख प्राप्त झालेले असते. या मुक्त जीवाची विभागणीसुद्धा दोन प्रकारात होते. त्यांना स्थूल जीव व तीर्थंकर जीव असे म्हणतात. स्थूल जीव हे संसारी जीवाच्या सुखदु:खासंबंधी उदासिन असतात. तसेच स्थूल जीव हे

पूर्णत्वास पोहोचलेले असतात. ते सर्व कर्मापासून मुक्त झालेले असतात. तीर्थंकर जीवसुद्धा मुक्त असतात. संसारी जीवांना काही काळ ज्यांनी मार्गदर्शन केलेले असते असे जीव तीर्थंकर जीव असतात.

**अजीव -**

जीवानंतरचे दुसरे तत्त्व म्हणजे अजीव होय. अजीव हा अचेतन असतो. म्हणजे अजीव प्राणरहित किंवा जड व भौतिक स्वरूपाचा असतो. चेतनेचा अत्यंत अभाव असणारा पदार्थ म्हणजे अजीव होय. अजीव हा भोग्य विषय आहे. अजीव हे चार इंद्रियांना म्हणजे स्पर्श, रूची, गंध व दृष्टी यांच्या मार्फत प्रतीत होते. असे हे अजीव तत्त्व पाच प्रकारात विभागले जाते.

**अजीव प्रकार -**

१) पुद्‌गल २) धर्म (गति) ३) अधर्म (स्थिती)

४) काल ५) आकाश

**पुद्‌गल -**

✻ पुद्‌गल हे पहिले अजीव द्रव्य होय. ज्या पदार्थाला शब्द, स्पर्श, रस, गंध व वर्ण हे गुण असतात तो पदार्थ म्हणजे पुद्‌गल होय. इंद्रियाना ज्याचे ज्ञान होते ती वस्तू, इंद्रिये, जीवांची शरीरे, स्थूल मन, कर्मे, इत्यादी आकार असलेल्या गोष्टी असतात त्यांना पुद्‌गल असे म्हणतात.

✻ ज्यांच्या लहान मोठ्या संघातानी जगातील निरनिराळे अचेतन पदार्थ बनविलेले आहेत त्या अणूंना पुद्‌गल म्हणतात. पुद्‌गलाच्या ठिकाणी शब्द, संयोग, मुलायमपणा, स्थूलता, आकार, विभाग, तेज व उष्णता आणि रूप या विक्रिया असतात.

✻ द्रव्य किंवा पदार्थ हे अविनाशी आहेत. द्रव्य कोणतेही रूप घेऊ शकते आणि कोणतेही गुण त्यात असू शकतात. द्रव्य किंवा पदार्थ हे हालचालींचे केंद्र आहे. त्यालाच पुद्‌गल असे म्हणतात.

✻ पुद्‌गलाच्या संबंधातील गती दोन प्रकारची आहे. त्यांना साधी परस्पंद गती व परिणाम गती असे म्हणतात. परिस्पंद गती म्हणजेच नुसतीच हालचाल होय. परिणाम गती म्हणजे गुणात व पर्यायात बदल होणे होय.

**२) व ३) धर्म व अधर्म -**

धर्म आणि अधर्म यांचे नेहमीचे अर्थ म्हणजे सदाचार होय. पण जैन दर्शनात हा अर्थ घेतलेला नाही. तसेच त्याचा अर्थ पुण्य व पाप किंवा नैतिक सद्‌गुण असा नसून विश्वात गती व स्थिती ज्यांच्यामुळे शक्य होतात अशी दोन तत्त्वे आहेत. धर्म व अधर्म दिसत नाहीत, परंतु जगात गती (हालचाल) व स्थिती (स्थिरता) यांचे स्पष्टीकरण करता येण्यासाठी त्या सहाय्यक प्रक्रिया म्हणून जैन दर्शनात गृहीत धरलेल्या आहेत.धर्म द्रव्य गति सहाय्यक आहे. म्हणजे स्वत: ते उदासीन असून गतीस उपकारक आहे. उदा.पाण्यामुळे माशाला इकडे तिकडे फिरणे शक्य होते पण पाणी माशाला स्वत: ढकलत नाही. धर्माचेही तसेच आहे म्हणून धर्मामुळे गति उत्पन्न होत नाही तर ते गतीस सहाय्यक ठरते.अधर्म द्रव्य हे स्थिरतेचे उदासिन कारण आहे. जसे वृक्षाची छाया वाटसरूला बळेच रोखून धरत नाही तर थकलेला वाटसरू वृक्षाच्या छायामुळे वृक्षाखाली विश्रांतीस थांबतो. अधर्म द्रव्याचे कार्य याच प्रकारचे आहे.

### ४) काल -

कालाचे लक्षण असणे हे आहे. तो द्रव्य असून अनंत असतो. तो दिसत नाही. काही जैन तत्त्वज्ञ कालाचे दोन प्रकार मानतात. त्यांना निश्चयकाळ व व्यवहारकाळ असे म्हणतात. निश्चयकाळ हा अनादी व अनंत असतो. व्यावहारिक कालाला समय म्हणतात. त्याची विभागणी क्षण, तास, दिवस, महिने, वर्षे यात करता येते.

### ५) आकाश -

आकाश हे प्रदेशांचे बनलेले आहे. एका पुद्‌गल परमाणुमुळे जेवढा अडथळा निर्माण होतो तेवढ्यास एक प्रदेश म्हणावयाचे. इतर द्रव्य पदार्थांना अवकाश करून देणे व त्यांच्या हालचालीस सहाय्यभूत होणे हे आकाशाचे कार्य आहे. आकाशाचे लोकाकाश व अलोकाकाश असे दोन भाग मानले आहेत. अलोकाकाशात काहीच नाही. ती नुसती अखंड पोकळी आहे. त्यात धर्म आणि अधर्म ही द्रव्ये नसल्याने त्यात पदार्थाच्या गतीची आणि हालचालीची शक्यता नसते. जीव, पुद्‌गल, धर्म व अधर्म हे बहुप्रदेशव्यापी असल्याने त्यांच्या विस्तारासाठी आकाश द्रव्याचे अस्तित्व सत्य मानणे आवश्यक ठरते.

## ३.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :-

अ) गाळलेल्या जागा भरा.

१) जिन या शब्दाचा अर्थ ----------- असा होतो.

२) जैन धर्माचे पहिले तीर्थंकर ----------- आहेत.

३) जैन धर्माचे चोवीसावे तीर्थंकर ----------- आहेत.

४) जैन धर्माचे ----------- आणि ----------- हे दोन ठळक पंथ आहेत.

५) ----------- हा जैन सदाचाराचा पाया आहे.

६) ----------- म्हणजे अंश, अंग किंवा पाहणाऱ्याचा विशिष्ट अभिप्राय होय.

७) ----------- आणि ----------- ही अनेकान्तवादाचीच दोन रुपे आहेत.

८) ज्याला चेतना आहे तो म्हणजे ----------- होय.

## ३.४ परिभाषिक शब्द, शब्दार्थ :-

१) तीर्थंकर - जैन धर्माचे प्रवर्तन संवर्धन आणि प्रसार ज्यांनी केला त्यांना तीर्थंकर म्हणतात.

२) जिन : इंद्रिये जिंकणारा

३) दिगंबर : अंगावर वस्त्र न ठेवता हिंडणारे

४) श्वेतांबर : शुभ्र वस्त्र परिधान करणारे

५) अहिंसा परमो धर्मा: : अहिंसा हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे.

६) नय : अंश, अंग, पाहणाऱ्याचा विशिष्ट अभिप्राय

७) ऋजू : सरळ

८) स्याद् : एका अर्थाने, एका परीने, विशिष्ट संदर्भात

९) त्रस : स्थलांतर करणारे

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :-

१) जिंकणारा  २) ऋषभनाथ  ३) भगवान महावीर

४) दिगंबर व श्वेतांबर  ५) अहिंसा  ६) नय

७) नयवाद आणि स्याद्‌वाद  ८) जीव

## ३.६ सारांश :-

जैन दर्शन हे एक अवैदिक (नास्तीक) दर्शन आहे. जैन दर्शनाचा प्रसार व संवर्धन ज्यांनी केला त्यांना तीर्थंकर असे म्हणतात. असे एकूण २४ तीर्थंकर होऊन गेलेत. त्यापैकी ऋषभनाथ हे पहिले तीर्थंकर आहेत. वर्धमान महावीर हे चौवीसावे तीर्थंकर आहेत. जैन दर्शनाथ दिगंबर व श्वेतांबर असे दोन ठळक पंथ दिसून येतात. दिगंबर म्हणजे अंगावर वस्त्र न ठेवता हिंडणारे व श्वेतांबर म्हणजे शुभ्र वस्त्र परिधान करणारे होत. जैनाचे मूलग्रंथ अर्धमागधी या भाषेत लिहिले आहेत. अहिंसा हा जैन सदाचाराचा पाया आहे. जैनांचे अत्यंत महत्त्वाचे सूत्र आहे. कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे हा जैनांचा मूलमंत्र आहे. अनेकान्तवाद हा त्यांचा महत्त्वाचा सिद्धांत आहे. अनेकान्तवादातून नयवाद व स्याद्‌वाद ही दोन रुपे निर्माण होतात. नय म्हणजे अंश, अंग किंवा पाहणाऱ्याचा विशिष्ट अभिप्राय होय. नयवादाचे मुख्य प्रकार दोन पडतात त्यांना द्रव्यनय व पर्यायनय असे म्हणतात. द्रव्यनयाचे तीन प्रकार व पर्याय नयाचे चार प्रकार असे मिळून नयवादाचे एकूण सात प्रकार पडतात त्यांना नैगमनय, संग्रहनय, व्यवहारनय, ऋजूसूत्रनय, शब्दनय, समभिरूढनय व एवंभूतनय असे म्हणतात. स्यादवादाचेही सात प्रकार पडतात.

जैन तत्त्वज्ञानामध्ये जीव आणि अजीव तत्त्वे महत्त्वाची आहेत. जीव हे चेतनतत्त्व आहे व अजीव हे अचेतन तत्त्व आहे. जीवाचे मुख्य प्रकार दोन पडतात. त्यांना संसारी जीव व मुक्त जीव असे म्हणतात. अजीवाचे एकूण पाच प्रकार पडतात त्यांना पुद्‌गल, धर्म, अधर्म, काल व आकाश म्हणतात.

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय :-

१) जैन धर्माची परंपरा विशद करा.

२) जैनांचा अनेकांतवाद स्पष्ट करा.

३) जैनांच्या अहिंसा या तत्त्वाची माहिती द्या.

४) जीवाचे प्रकार उदाहरणासह स्पष्ट करा.

५) अजीवाचे प्रकार स्पष्ट करा.

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :-

सर्व घटकाच्या शेवटी पुस्तकांची यादी दिली आहे.

घटक - ४

# बौद्ध दर्शन ( Buddhism )


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक (जीवनवृत्तांत)

४.२ विषय - विवेचन

४.२.१ चार आर्यसत्ये

४.२.२ अष्टांग मार्ग

४.२.३ क्षणिकवाद (अनित्यतावाद)

४.२.४ अनात्मवाद

४.२.५ निर्वाण संकल्पना

४.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सारांश

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ४.० उद्दिष्टे :-

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

* बौद्ध धर्माची शिकवण समजेल.
* जीवन दु:खमय आहे याची माहिती होईल.
* दु:खाची कारणे समजतील व दु:ख निरोधाचे मार्ग मिळतील.
* आपण अनुभवीत आहोत ते सुख क्षणजिवी आहे हे कळेल.
* मोक्ष मार्ग समजेल.

## ४.१ प्रास्ताविक (जीवनवृत्तांत) :-

भगवान गौतमबुद्ध हा बौद्ध दर्शनाचा संस्थापक आहे. त्याचा जन्म ख्रिस्तपूर्व ७ व्या शतकात झाला आहे. म्हणजेच त्याचा जन्म ख्रि.पू.५६३ या वर्षी हिमालयाच्या पायथ्याशी कपिलवस्तू या शहराजवळील लुंबिनी या गावात झाला. त्याच्या आईचे नाव मायादेवी व वडिलांचे नाव शुद्धोदन असे आहे. शुद्धोदन हा क्षत्रिय कुळातील असून तो एक आदर्श राजा होता. गौतमाच्या जन्मानंतर त्याची आई मायादेवी हिचे ७ दिवसांनी

निधन झाले. त्यानंतर गौतमाची मावशी गौतमी हिने त्याचे पालनपोषण केले. त्याचे मूळ नाव सिद्धार्थ असे होते. सिद्धार्थाला लहानपणापासून चिंतनाची सवय होती. तो सर्वसामान्य मुलांप्रमाणे खेळण्यात रमत नसे. तो तासन्‌तास ध्यानमग्न अवस्थेत असे. त्याचे चित्त संसारात रमावे म्हणून त्याच्या वडिलांनी त्याचा विवाह क्षत्रिय राजकुमारी यशोधरा हिचे बरोबर १६ व्या वर्षी लावून दिला. त्यास एक मुलगा झाला. तरीही त्याचे मन संसारात रमेना. मन संसारात रमावे म्हणून त्याच्या वडिलांनी खूप प्रयत्न केले पण शेवटी ते व्यर्थ ठरले.

एके दिवशी तो रथातून बाहेर जात असताना त्याला निरनिराळ्या वेळी तीन दृश्ये दिसली. ती अशी - १) वार्धक्याने वाकलेला, रक्त व मांस कमी झाल्याने शरीर शुष्क झालेला, दात पडलेला, केस पिकलेला, ऐकायला न येणारा असा  एक जख्ख म्हातारा त्याने पाहिला. २) दुसऱ्या दिवशी रस्त्यावर करूण वाणीने आक्रोश करणारा एक रोगग्रस्त माणूस त्याने पाहिले. ३) तिसऱ्या दिवशी करुण आक्रोश करणाऱ्या ज्ञाती बांधवांनी वेढलेले एक प्रेत त्याने पाहिले. म्हणजेच शरीराच्या वार्धक्य, रोगग्रस्तता व मृत्यू या तीन अवस्था त्याच्या दृष्टीस पडल्या. अशा दु:खी दृश्यांनी त्याच्या मनावर खोल परिणाम झाला.

**गृहत्याग :-**

सारी कपिलवस्तू निद्रेच्या अधीन झाली असताना आपल्या कंथक या लाडक्या घोड्यावर स्वार होऊन छंदक या सारथ्याला बरोबर घेऊन मध्यरात्री तो बाहेर पडला. थोड्या प्रवासानंतर त्याने घोड्याला व सारथ्याला रजा दिली. त्याने दाढी व डोक्याचे मुंढन केले आपली राजवस्त्रे एका शिकाऱ्याला देऊन त्याची मलिन वस्त्रे परिधान केली. शेवटी तो पाटण्याच्या दक्षिणेस असलेल्या उरूवेला येथे आला. तेथे त्याला आणखी पाच साधक भेटले. शरीराला नाना प्रकारे क्लेश देऊन परमप्राप्तीसाठी ते प्रयत्न करत होते. त्यांच्याप्रमाणे तो उपास-तपास करू लागला. त्यामुळे त्याचे शरीर अस्थिपंजर झाले. त्यावेळेपासून गौतमाने ठरविले की, परमप्राप्तीसाठी शरीर पीडा हा मार्ग नव्हे. प्रकृती स्वास्थ्यासाठी योग्य आहार घेण्याचा त्याने निर्णय घेतला.

उरुवेला या खेड्याजवळील निर्जन भागात तो एका पिंपळाच्या झाडाखाली ध्यान लावून बसला (त्यालाच आपण बोधीवृक्ष म्हणतो). त्या ठिकाणी त्याला आत्मसाक्षात्कार झाला व त्याला बुद्धत्व प्राप्त झाले. ज्ञान प्राप्त झाले. या ज्ञानप्राप्तीच्या वेळी, पुनर्जन्माच्या फेऱ्यातून होणारी परिभ्रमणे, दु:खाचे मूळ कारण आणि त्या दु:खाचा समूळ नाश करणारा उपाय याची त्याला जाणीव झाली. यातूनच त्याला परमबोध झाला. आपणास प्राप्त झालेले ज्ञान इतरांना देण्यासाठी तो बाहेर पडला. तेथून तो बनारस येथे आला. तेथे त्यास पूर्वी सोडून गेलेले ते  पाच भिक्षुक भेटले. स्वत: जे ज्ञान प्राप्त झाले होते त्याच्यासंबंधी पहिले प्रवचन त्या पाच तपस्यांच्या समोर दिले. या पहिल्या प्रवचनास 'धर्मचक्र प्रवर्तन' असे म्हणतात. बुद्धाला ज्या सत्याचा साक्षात्कार झाला ते म्हणजे, 'या जगात जे जे म्हणून काही आहे ते सर्व अनित्य, क्षणिक व नाशवंत आहे. या विश्वात सर्व घटना नियमानुसार घडतात. ईश्वर वगैरे कोणीही विश्वाचा व मानवाचा कर्ता व नियंता नाही. हे जग सतत बदलणाऱ्या प्रवाहासारखे आहे. त्यात नित्य, शाश्वत असे काहीच नसते. मानवाचे सर्व विचार, भावना, इच्छा व आसक्ती त्याच्या दु:खाला कारणीभूत असतात व त्यापासून मानवाला मुक्त होता येते व तो त्यापासून मुक्त झाला  तर तीच अखंड शांती (निर्वाण) असते. अशा प्रकारच्या प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उपदेश त्याने जन्मभर केला. शेवटी ख्रिस्तपूर्व ४८३ मध्ये वयाच्या ८० व्या वर्षी त्याचे निधन झाले. त्याला जे ज्ञान प्राप्त झाले त्याला आर्यसत्ये म्हणतात. हेच गौतमाचे तत्त्वज्ञान होय.

## ४.२ विषय विवेचन

४.२.१ चार आर्यसत्ये -

बुद्धाने जी चार सत्ये सांगितली ती चार आर्यसत्ये म्हणून ओळखली जातात. सारनाथ येथील पहिल्या

प्रवचनात बुद्धाने चार आर्यसत्यांचा उपदेश केला. ती चार आर्यसत्ये पुढीलप्रमाणे आहेत-

अ) सर्व दुःखम् ब) दुःख कारणम् क) दुःख निरोध ड) दुःख निरोधाचे मार्ग

**अ) सर्व दुःखम -**

दुःख हे पहिले आर्यसत्य आहे. बुद्धाने मानवी जीवनाचे निरीक्षण व चिंतन केलेले होते. या चिंतनातून त्यांनी असा निष्कर्ष काढला की, मानवी जीवन दुःखमय आहे. दुःखाबद्दल बुद्धाने आपले मत पुढीलप्रमाणे मांडले आहे -

* जगात सर्वत्र दुःख भरलेले आहे.
* जन्म, जरा, व्याधी आणि मृत्यू ही सगळी दुःखे होत.
* जन्माबरोबर दुःख असते.
* विध्वंस हा दुःखदायी असतो.
* सुखदायक गोष्टीपासून अलिप्त होणे दुःखदायक असते.
* इच्छेप्रमाणे न होणे किंवा न मिळणे हे दुःख होय.
* अनिच्छापूर्वक कुठल्याही गोष्टीशी संबंध येणे दुःखकारक असते.
* अप्रियाचा संयोग होणे व प्रियाचा वियोग होणे हे दुःख आहे.
* दुःख बोचते, टोचते, सलत राहते म्हणून दुःख हे आर्यसत्य आहे.

**ब) दुःख कारणम -**

दुःखाला कारण आहे हे दुसरे आर्यसत्य आहे. या विश्वात निष्कारण कोणतीही घटना घडू शकत नाही. अकारण एखादी घटना घडली असे होणे शक्य नाही, असे बुद्धाचे स्पष्ट मत आहे. साहजिकच दुःख ही घटना असल्यामुळे हिला सुद्धा कारण हे असलेच पाहिजे. इच्छा व जन्ममृत्यूची प्रेरणा ही दोन महत्त्वाची दुःख कारणे बुद्धानी सांगितलेली आहेत.

पुन्हा पुन्हा उत्पन्न होणारी आणि अनेक विषय उपभोगात रंगून व रूतून बसणारी इच्छा हीच दुःखाची जननी आहे. या इच्छेला बुद्ध तृष्णा असे म्हणतात. म्हणून बुद्ध म्हणतात, सर्व प्रकारची तृष्णा ही दुःखाचे मूळ किंवा कारण आहे. तृष्णा तीन प्रकारची असते -

१) कामतृष्णा - सुख उपभोगासाठी लागलेली तृष्णा.

२) भवतृष्णा - अस्तित्वासाठी लागलेली तृष्णा.

३) विभवतृष्णा - भव नाहीसे करण्याची तृष्णा (धनाची इच्छा व ऐश्वर्य या तृष्णा मानवाला कुठलेही कार्य करण्यास प्रवृत्त करतात आणि त्यातून दुःख निर्माण होते.) ह्या तृष्णाच सर्व दुःखाचे आणि जन्ममृत्यूचेही कारण आहेत.

सर्व दुःखाचे मूळ कारण अविद्या मानले आहे. अविद्येमुळे संस्कार, संस्कारामुळे विज्ञान, विज्ञानामुळे नामरुप, नामरुपामुळे षडायतने (पाच ज्ञानेंद्रिये व मन), षडायतनांच्या योगे स्पर्श, स्पर्शामुळे वेदना, वेदनेमुळे तृष्णा, तृष्णेमुळे उपादान, उपादानमुळे भव, भवामुळे जाती किंवा जन्म, जन्मामुळे जरा-मरणादिक दुःखे अशी बारा कारणांची मालिका बुद्धाने सांगितलेली आहे. या कारण परंपरेलाच 'प्रतित्यसमुत्पाद' असे म्हटले आहे.

तसेच या मालिकेतील प्रत्येक दुव्याला 'निदान' म्हणून संबोधिले आहे. त्याचप्रमाणे त्या बारा दुव्यांच्या परंपरेला 'द्वादश निदान' हे नाव दिलेले आहे. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे -

**दु:खाची बारा कारणे (द्वादश निदान) -**

**१) अविद्या -**

दु:खाचे मूळ कारण अविद्या होय. अविद्येचा उगम अहंकारातून निर्माण होतो. अहंकार म्हणजे मी आणि माझे (ममत्व) याचा उगम असलेली आत्मकल्पना म्हणजे अविद्या होय.चार आर्यसत्यासंबंधीचे अज्ञान म्हणजे अविद्या असाही अर्थ सांगितलेला आहे. अविद्येची कारणे म्हणून पाच निवारणे दिलेली आहेत. निवारण म्हणजे आच्छादन किंवा पडदा होय. ती अशी - कामाच्छंद, व्यापाद, औद्धत्य, कुक्कुच्च, योनमिद्ध. याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे-

१) कामाच्छंद - म्हणजे विषय उपभोगाची मनाला लागलेली चटक किंवा आत्यंतिक आवड होय.

२) व्यापाद - म्हणजे नावडत्या वस्तुविषयी किंवा व्यक्तीविषयी वाटणारा द्वेष होय.

३) औद्धत्य - म्हणजे चित्ताची चंचलता असा अर्थ घेतलेला आहे.

४) कुक्कुच्च - म्हणजे मनाची चुळबुळ. आपण करीत आहोत ते बरोबर आहे की चूक आहे अशा संशयात पडण्याची खोड होय.

५) योनमिद्ध - म्हणजे मनाचा जडपणा आणि आळशीपणा होय.

ही पाच निवारणे शरीर, वाणी आणि विचार यांच्या द्वारा केलेल्या पापांनी पुष्ट केली जातात. इंद्रिये ताब्यात न ठेवणे, वाईट संस्कारांचा अंगिकार करणे, धर्माची शिकवण न ऐकणे, भिक्षूंचा आदर न करणे अशी ती पापे होत. अशा प्रकारे अविद्येतून दु:ख निर्माण होत असते.

**२) संस्कार :-**

अविद्या हे संस्काराचे कारण असते. म्हणजेच अविद्येपासून संस्कार निर्माण होतात. संस्कार म्हणजे निरनिराळ्या विषयांच्या संबंधाने उत्पन्न होणारे सूक्ष्म स्वरूपातील राग, द्वेष, मोह हे विकार आहेत. यातून दु:ख निर्माण होते.

**३) विज्ञान :-**

या साखळीतील तिसरा दुवा म्हणजे विज्ञान होय. संस्काररूपी विकारातून (राग, द्वेष, मोह) अस्तित्वाची जाणीव निर्माण होते. मी आहे अथवा पदार्थ आहेत अशा या जाणीवेचे स्वरूप असते. या अस्तित्वाच्या जाणीवेस विज्ञान म्हणतात. यातून दु:ख निर्माण होते.

**४) नामरुप :-**

या साखळीतील चौथा दुवा म्हणजे नामरुप होय. विज्ञानामुळे नामरुप हे कार्य घडते. नाम म्हणजे मन:पिंड व रूप म्हणजे शरीरपिंड होय. मन:पिंड हा ज्ञाता (जाणणारा) असतो तर शरीरपिंड हा ज्ञेय विषय असतो. ज्ञाता खेरीज ज्ञेय हे अर्थहीन ठरते. म्हणून नामरुप व विज्ञान हे परस्परावर अवलंबून असते. विज्ञान हे स्वतंत्रपणे अस्तित्वात असू शकत नाही त्याला आधारासाठी नामरुपाची आवश्यकता असते.

### ५) षडायतन :-

नामरुपातून म्हणजे मन:पिंडातून व शरीरपिंडातून पुढे सहा प्रकारची ज्ञानेंद्रिये व त्यांची सहा कार्यक्षेत्रे निर्माण होतात. यामध्ये पंचज्ञानेंद्रिये (डोळा, कान, नाक, जीभ व त्वचा) व मन यांचा समावेश होतो.

### ६) स्पर्श :-

डोळा, नाक, कान, त्वचा व जीभ (जिव्हा) आणि मन या सहा इंद्रियांचा त्याच्या रूप (पाहणे), ऐकणे, गंध, रस, स्पर्श व धर्म या विषयाशी होणारा संयोग म्हणजे स्पर्श होय. ज्ञानप्रक्रियेत स्पर्श हा फार महत्त्वाचा आहे. कारण त्यामुळे बाह्य जगत व त्या जगातील वस्तू यांचा षडयतनातील इंद्रियाशी संबंध येतो. थोडक्यात इंद्रिय, त्याचा विषय व त्या इंद्रियामार्फत काम करणारे विज्ञान या तिहींची संगती म्हणजे स्पर्श होय.

### ७) वेदना :-

वेदना म्हणजे सुखदु:खाचा अनुभव येऊ लागणे होय. बाह्य जगतातील वस्तूंशी संबंध आल्यानंतर वेगवेगळ्या प्रकारच्या वेदना निर्माण होतात. या वेदना सुखकारक व दु:खकारकही असतात. म्हणजेच वेदनेतून सुखदु:खाचा अनुभव येऊ लागतो. या वेदनेमुळे व्यक्ती ही जगताशी अधिकाधिक एकरूप होऊ लागते.

### ८) तृष्णा :-

तृष्णा ही वेदनेतून निर्माण होते आणि ही तृष्णा जगतातील दु:खाचे प्रमुख कारण बनते. वेदनेपासून तृष्णा निर्माण होऊ द्यावयाची की नाही हे त्या व्यक्तीच्या हातात असते. या तृष्णेमुळेच मनुष्य जगतातील प्रत्येक गोष्टींच्या मागे मूर्खासारखा लागतो. तृष्णेमुळे मनुष्य आत्मा व ईश्वर यासारख्या गोष्टींच्या शोधात राहतो. तृष्णा ही एकसारखी वाढत राहते. या तृष्णा तीन प्रकारच्या असतात (कामतृष्णाा, भवतृष्णा, विभवतृष्णा) याचा उल्लेख मागे येऊन गेलेलाच आहे. जेव्हा तृष्णेवर आपण विजय मिळवितो त्यावेळी सर्व दु:खे नाहीशी होतात. ज्याप्रमाणे कमलपुष्पावरील दव त्वरित गळून पडतो त्याप्रमाणे तृष्णेवरती नियंत्रण ठेवल्याने सर्व दु:खे त्वरित नाहीशी होतात.

### ९) उपादान :-

* उपादान हे तृष्णेचेच एक रुप आहे. तृष्णेची आत्यंतिक अवस्था म्हणजे उपादान होय. उपादान म्हणजे अतितृष्णा. उपादानाचा अर्थ आसक्ती असाही केला जातो. अस्तित्वासाठी लागलेली तृष्णा म्हणजेही उपादान होते.

* जी सुखे प्राप्त झालेली आहेत ती सुखे कधीही नष्ट होऊ नयेत, किंबहुना त्यापेक्षा अधिक प्रमाणात सुखे प्राप्त व्हावीत हा हव्यास म्हणजे उपादान होय.

* तृष्णाग्नी हा उपादानाच्या इंधनाने प्रज्वलित होते असे बुद्ध एके ठिकाणी म्हणतो. ज्या ज्या ठिकाणी अग्नि त्या त्या ठिकाणी इंधन हे असतेच आणि म्हणून ज्या ज्या ठिकाणी तृष्णा असते त्या त्या ठिकाणी उपादान असते. या उपादानामुळे जीव बाह्य वस्तूत अधिकाधिक गुरफटत जातो. बंधनास पात्र ठरतो यासाठी उपादानापासून स्वत:हून मुक्त झाल्याखेरीज व्यक्तीस मोक्ष मिळत नाही.

* उपादानाचे चार प्रकार मानता येतात ते असे. १) काम उपादान २) दृष्टी उपादान ३) शीलव्रत उपादान ४) आत्मवाद उपादान.

१) काम उपादान - इंद्रिय उपभोगांबद्दल असलेली आसक्ती हा पहिला प्रकार म्हणजे काम उपादान. हे खऱ्या अर्थाने तृष्णा होय. इतर तीन प्रकार अज्ञानातून निघालेले आहेत.

२) दृष्टी उपादान - पाखंडी मतांबद्दलच्या आवडीने आलेली अशुची आसक्ती म्हणजे दृष्टी उपादान होय.

३) शीलव्रत उपादान - पाखंडी लोकांनी आपल्या ध्येय प्राप्तीसाठी अंगिकारलेले आचारधर्म व व्रतवैकल्ये याबद्दलची आसक्ती म्हणजे शीलव्रत उपादान होय.

४) आत्मवाद उपादान - आत्म्याच्या अस्तित्वावर असलेला विश्वास म्हणजे आत्मवाद उपादान होय.

**१०) भव :-**

आसक्ती मधून पुनर्जन्मास कारणीभूत ठरणारे जे कर्म घडते त्यास भव असे म्हटले आहे. भव हा उपादानातून निर्माण होतो. भवाचा परिणाम म्हणून पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो आणि त्यातून म्हातारपण, रोग आणि मृत्यू ही दु:खे भोगावी लागतात.

**११) जाति :-**

भव मधून जाती निर्माण होते. जाति म्हणजे जन्म. भवाच्या कर्मामुळेच प्राणी जन्मास येतो. हे जन्मास येणे म्हणजेच जाति होय. जोपर्यंत मनुष्य जन्म मृत्यूच्या चक्रात अडकलेला असतो तोपर्यंत तो मोक्षापासून अलिप्त राहतो.

**१२) जरा - मरण :-**

जरा याचा अर्थ वार्धक्य असा शब्दशा अर्थ घेतला जातो. पुनर्जन्म हे दु:खाचे कारण असते. एकदा जन्म मृत्यूच्या चक्रात मनुष्य अडकला की त्याला म्हातारपण व मृत्यू या बाबी आपोआपच येऊन चिकटतात. यातून मनुष्याला पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो व पुनर्जन्माने दु:ख भोगावे लागते.

**भवचक्र :-**

या बारा निदानांची तीन जन्मात विभागणी केलेली आहे. म्हणून याला जन्मत्रय असे म्हणतात. या जन्मत्रयाला व्यापणाऱ्या या बारा निदानांच्या मालिकेला भवचक्र म्हणतात.

**द्वादश - निदानाची प्रतिलोम क्रमाने मांडणी :-**

द्वादश - निदानाची उलट्या क्रमाने म्हणजे प्रतिलोम क्रमाने मांडणी करणे समजण्याच्या दृष्टीने अधिक सुबोध ठरते. ती अशी करता येते - १२) आपला जन्म हा वार्धक्य, मृत्यू, रोग यामुळे दु:खमय बनतो (जरामरण). ११) आपणास दु:ख भोगावे लागते कारण आपण जन्माला येतो (जाति) १०) मी जन्माला येतो कारण मी या जगात असतो (भव) ९) मी या जगात जगतो कारण मला या जगाविषयी आसक्ती, प्रेम वाटते (उपादान) ८) मी जगतो कारण मला अनेक इच्छा व वासना असतात (तृष्णा) ७) मला इच्छा होतात कारण मला संवेदन होत असते (वेदना) ६) मला संवेदन होते कारण माझा जगाशी संबंध येतो (स्पर्श) ५) माझा या जगाशी संबंध येतो कारण मला सहा इंद्रिये असतात (षडायतन) ४) माझा या जगाशी संबंध येतो कारण हे नामरुपाचे जग असते (नामरुप) ३) मी एक जाणणारी व्यक्ती असल्याने माझा नामरूपात्मक जगाशी संबंध येतो. मला जाणीव असल्याने हे जग मला समजू शकते (विज्ञान) २) हे विज्ञान किंवा ही जाणीव पूर्वजन्मीच्या संस्कारामुळे निर्माण होते (संस्कार) १) या सर्वांचे मूळ कारण मला माझे स्वत:विषयीचे असत्यज्ञान किंवा अज्ञान असते (अविद्या).

**क) दु:खनिरोध :-**

बुद्धाने सांगितलेले हे तिसरे आर्यसत्य होय. यात त्याने दु:खाचा संपूर्ण उपशम (नाश) करावा असे सांगितले आहे. दु:खाचा संपूर्ण उपशम करावा म्हणजेच वासना, तृष्णा, आत्मप्रेम या सर्व गोष्टी नष्ट करावयास

पाहिजेत. तृष्णेचा नाश झाला म्हणजे सर्व दु:खाचा अंत होऊन निर्वाण प्राप्त होईल. तृष्णा नाशाने मनुष्य सर्व दु:खातून मुक्त होतो. जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटतो आणि ज्ञान प्राप्त होऊन अखेर निर्वाणप्रत जातो.

अहंकार नष्ट केल्याने व सत्यविषयक प्रेम ठेवल्याने दु:खाचा नाश होतो. राग, द्वेष, संशय या सर्वांचा त्याग केल्याने निर्वाणप्रत जाता येते. निर्वाण अवस्थेत वासना संदेह, इंद्रिय सुखे, इत्यादींचा नाश झालेला असतो. या अवस्थेला बुद्ध शुण्यावस्था म्हणतो. शुण्यावस्थेत एक प्रकारची शांती मिळते.

**ड) दु:ख निरोधाचे मार्ग :-**

हे चौथे आर्यसत्य होय. दु:ख निरोध हा होऊ शकतो. इतकेच नव्हे तर त्या दु:खमार्गापासून आपली सुटकाही करून घेता येते. दु:ख निरोध करण्याचा जो मार्ग बुद्धानी सांगितला त्यालाच दु:ख निरोध मार्ग असे म्हणतात. यालाच आर्य अष्टांगिक मार्ग किंवा मध्यम प्रतिपद् असेही म्हणतात. याची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**४.२.२ अष्टांग मार्ग :-**

दु:ख निरोध करण्याचा जो मार्ग बुद्धांनी सांगितला त्याला आर्य अष्टांगिक मार्ग म्हणतात. गौतम बुद्धांनी आपल्या पहिल्या प्रवचनात सर्व मानव जातीच्या कल्याणासाठी सदाचाराचा मार्ग कथन केला. त्याची आठ अंगे असल्याने त्याला अष्टांगिक मार्ग असे म्हणतात.बुद्धाने केवळ दु:खाची कारणे सांगितली नाहीत आणि जीवनाकडे केवळ दु:खमय भूमिकेतूनच पाहिले नाही तर या दु:खाचा नाश होण्यासाठी आणि जगाकडे आशादायी दृष्टीकोनातून पाहण्यासाठी बुद्धाने दु:ख निरोधाचे आठ मार्ग सांगितले आहेत. त्याला अष्टांगिक मार्ग किंवा मध्यम प्रतिपद् असे म्हणतात. त्याची आठ अंगे पुढीलप्रमाणे आहेत -

| | | |
|---|---|---|
| १) सम्यक् दृष्टी | २) सम्यक् संकल्प | ३) सम्यक् वाचा |
| ४) सम्यक् कर्मान्त | ५) सम्यक् आजीविका | ६) सम्यक् व्यायाम |
| ७) सम्यक् स्मृती | ८) सम्यक् समाधि | |

**१) सम्यक् दृष्टी :-**

* सम्यक् शब्दाचा अर्थ 'योग्य' असा घेतला जातो. सम्यक् दृष्टी म्हणजे योग्य (चांगली) दृष्टी होय. सम्यक् दृष्टी म्हणजे चार आर्यसत्याचे ज्ञान होणे होय. स्वतंत्र मन आणि विचार सम्यक् दृष्टीला आवश्यक आहेत.

* या विश्वात जे जे काही घडते त्याची उत्पत्ती होते. ते एकसारखे बदलत राहते व संपुष्टात येते. ही निसर्गाची क्रिया आहे. ही अशीच चालत राहते व चालत राहणार व म्हणून कशाचाही शोक वाटून घेण्याने दु:खाव्यतिरिक्त काहीही हाती येणार नाही. याची खात्री होणे हे सम्यक् दृष्टीनेच शक्य होते. निसर्ग नियमाविरूद्ध कोणतीही गोष्ट होत नाही हे लक्षात ठेवावे.

* सम्यक् दृष्टी अंधश्रद्धेला दूर सारून माणसांच्या विचारांना बुद्धीप्रामाण्यवादी वळण लावते. सारासार विवेक बाळगून, कुठलेही टोक न गाठता समतोल साधणारा वर्तन व्यवहार साधण्यावर येथे भर दिलेला आहे.

* सम्यक् दृष्टीचे अत्यंत व्यापक स्वरूपात 'सम्मादिठ्ठिसुत्ता' मध्ये सारिपुत्ताने तपशीलवार वर्णन केले आहे. बरोबर काय आहे व चुकीचे काय आहे हे कसे समजायचे याविषयी विवेचन करताना असे म्हटले आहे की, हिंसा करणे, चोरी करणे, लैंगिक व्यभिचार, असत्य भाषण करणे, निंदा करणे, कठोर वागणे, कंड्या पिकविणे, लोभ बाळगणे, तिरस्कार करणे, भ्रमात राहणे हे दुर्गुण आहेत. या सर्वांचे मूळ लोभ, द्वेष, मोह हे

आहेत व त्याच्यापासून सर्व दुर्गुणांचा उदय होतो. म्हणून अशा दुर्गुणांचा लोप झाल्यानंतर ज्या कृती केल्या जातात त्या निर्दोष राहतात व त्या कृती सद्‌गुणांच्या असतात हे कळणे म्हणजे सम्यक् दृष्टी होय.

**२) सम्यक् संकल्प :-**

* सम्यक् संकल्प म्हणजे योग्य ध्येय, उचित आकांक्षा ठेऊन त्यानुसार वाटचाल करणे होय. प्रत्येकाने शुभकामना, शुभ आकांक्षा, प्राण्यांविषयी प्रेम भावना, शुद्ध हेतू यांचा संकल्प करावा आणि त्यानुसार आपले आचरण ठेवावे.

* सम्यक् दृष्टी असलेल्या साधकाचा निर्वाण प्राप्त करून घेण्याचा दृढ निश्‍चय म्हणजे सम्यक् संकल्प होय.

* सम्यक् दृष्टी विकसित करीत असताना विचारांना संकल्पाच्या साह्याने नीट दिशा देऊन त्यांच्यात समन्वय घडविणे आवश्यक असते. स्वार्थीपणा मध्ये आडवा न आणता संकल्पाच्या साह्याने विचारांमध्ये सुसंवाद घडवून आणावयास पाहिजे.

**३) सम्यक् वाचा :-**

* सम्यक् वाचा म्हणजे योग्य भाषण होय. म्हणजेच खोटे न बोलणे, अप्रिय न बोलणे, परनिंदा न करणे, कटू शब्द न बोलणे, व्यर्थ बडबड न करणे, इत्यादींचा समावेश सम्यक् वाचा मध्ये येतो.

* एकाने दुसऱ्याविषयी वाईट बोलू नये. सर्वांशी आपुलकीने व सौजन्याने बोलून सम्यक् वाचा मार्गाचे पालन करावे.

* प्रत्येकाने योग्य आणि सत्य बोलावे. अपशब्दयुक्त निंदानालस्ती टाळावी. हा मार्ग समाज स्वास्थ्यासाठी अत्यंत उपकारक आहे.

**४) सम्यक् कर्मान्त :-**

* सम्यक् आचरणासाठी 'सम्यक् कर्मान्त' हा शब्द योजला आहे. यामध्ये दुसऱ्याचे प्राण न घेणे, चोरी न करणे, इंद्रियांवर संयम ठेवणे या गोष्टी येतात.

* सम्यक् कर्मान्त या शब्दाचा अर्थ योग्य वर्तन असा होतो. प्रत्येकाने दुसऱ्याचे हक्क आणि भावना यांचा आदर राखून कृती करावी.

* जीवनाच्या मूलभूत नियमांशी सुसंगत वर्तन म्हणजे सम्यक् कर्मान्त होय. समाज धारणेला पोषक असा हा मार्ग आहे. सत्कर्माचे कायीक, वाचिक व मानसिक असे प्रकार आहेत. थोडक्यात कुकर्मापासून प्रत्येकाने दूर राहिले पाहिजे.

* सर्वसामान्य माणसांसाठी व सर्वसामान्य व्यवहारासाठी बुद्धांनी काही नियम सांगितले आहेत ते असे

१) आई वडिलांनी आपल्या मुलांना पापी आचरणापासून परावृत्त करावे आणि त्याच्यामध्ये अधिकाधिक चांगले गुण कसे येतील यादृष्टीने प्रयत्न करावेत. शिक्षण संपल्यावर म्हणजे योग्य वयात आल्यावर त्याचा विवाह करावा. मुलांनीही वृद्धापकाळी आपल्या आईवडिलांची व पालकांची योग्य काळजी घ्यावी.

२) विद्यार्थ्याने गुरुविषयी आदर ठेवावा. त्यांच्या आज्ञा पाळाव्यात व त्यांच्या गरजा पूर्ण कराव्यात. गुरु ज्याप्रमाणे सांगेल त्याप्रमाणे अध्ययन करावे. गुरुनेही विद्यार्थ्यांशी प्रेमपूर्वक व्यवहार करावा. त्यांना शास्त्र, कला, इत्यादीमध्ये पारंगत करावे. त्यांच्यामध्ये चांगल्या चांगल्या सवयी निर्माण करण्याचा प्रयत्न करावा.

३) पतीने पत्नीशी आदरभाव बाळगावा व तिच्याशी एकनिष्ठ रहावे. तिच्या सर्व कल्याणाची जबाबदारी घ्यावी. पत्नीनेही पतीशी प्रेमपूर्वक वर्तन केले पाहिजे. घराची संपूर्ण काळजी घेतली पाहिजे. सर्व अतिथींचा योग्य सन्मान केला पाहिजे.

* याशिवाय साधुलोकांनीही सम्यक् कर्माबाबत काही नियम पाळणे आवश्यक आहे असे बुद्ध मानतो. त्यांच्या मते साधु लोकांनी आहार, विहार, सामाजिक संघर्ष, सौंदर्याची कृत्रिम साधने वापरणे, दागदागिने, सोने, शय्यासोबत इत्यादीपासून अलिप्त राहिले पाहिजे.

**५) सम्यक् आजीविका :-**

* सम्यक् आजीविकेस 'सम्यक् निर्वाह' असेही म्हटले आहे. आपण योग्य मार्गांचा अवलंब करून आपली उपजीविका चालविणे म्हणजे सम्यक् आजीविका होय.

* प्रत्येकाने आपली उपजीविका कोणावरही अन्याय न करता, योग्य मार्गाने धनप्राप्ती करून आणि नैतिकता पाळून करावी. प्रत्येकाला जिवंत राहण्यासाठी धनप्राप्तीची आवश्यकता असते. चोरी, शिकार, भ्रष्टाचार यासारखी कुकर्मे करून धन मिळविणे योग्य नाही.

* आजीविका न्यायपूर्ण व समाजमान्य असली पाहिजे म्हणजेच सम्यक् आजीविका हा नैतिकतेने जगण्याचा मार्ग आहे.

**६) सम्यक् व्यायाम :-**

* मनातील दुर्विचार काढून टाकून त्या ठिकाणी शुभविचारांची स्थापना करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे म्हणजेच सम्यक् व्यायाम होय.

* सम्यक् व्यायामाची चार उपांगे आहेत ती अशी -

१) आपल्या अंगात असलेले दुर्गुण घालविणे.

२) आपल्या अंगात नसलेले सद्‌गुण संपादणे.

३) घालविले दुर्गुण पुन: आपल्यात येऊ न देण्याचा प्रयत्न करणे.

४) संपादन केलेल्या सद्‌गुणांची जोपासना करणे.

* त्याचबरोबर आत्मनियंत्रण, इंद्रिय सुखोपभोगाचा त्याग करणे, वाईट इच्छा मनात न आणणे, संपूर्ण कल्याणासाठी शुभविचारांची मनात प्रयत्नपूर्वक प्रतिष्ठापना करणे, इत्यादींचा समावेश होतो.

* चांगल्या विचारावर चिंतन करणे, कृतीचे परिणाम चांगले की वाईट याचा अभ्यास करणे, वाईट विचारांची कारणे शोधणे, मनावर नियंत्रण ठेवणे यासारख्या बाबींचा समावेश सम्यक् व्यायामात होतो.

७) सम्यक् स्मृती :-

* सम्यक् स्मृती म्हणजे सर्व दु:खमय आहे. क्षणिक आहे, 'मी' नावाचा कोणी स्थिर पदार्थ नाही, वगैरे गोष्टीचे सतत स्मरण ठेवणे होय.

* चित्त स्थिर ठेवून त्याची चलबिचल होऊ न देणे म्हणजे सम्यक् स्मृती होय.

* मनातील दुष्ट वासनांवर खंबीर पहारा ठेवणे, वाईट विचारांची हकालपट्टी करणे आणि मन सदैव जागृत ठेवणे म्हणजे सम्यक् वृत्ती होय.

* सत्कर्माचे आकर्षण आणि दुष्कर्मांचा तिरस्कार केल्यामुळे सम्यक् न्यायबुद्धी निर्माण होते व त्यामुळे मानवी जीवन निर्वाण पद प्राप्तीला पात्र होते, असा विश्वास या मार्गातून व्यक्त होतो.

### ८) सम्यक् समाधि :-

* सम्यक् समाधि ही अष्टांग मार्गाची परिणती होय. ध्यानाच्या चार निरनिराळ्या अवस्थातून गेल्यावर चित्तात जो परम्शांतीचा (मन:शांतीचा) अनुभव येतो त्याला समाधि अवस्था म्हणतात.

* ध्यानाच्या चार अवस्था -

१) पहिल्या अवस्थेत चार आर्यसत्ये व बुद्धाची शिकवण यावर शांत चित्ताने ध्यान करावयाचे असते आणि अनासक्त विचार निर्माण करून अद्वितीय स्वरूपाचा आनंद निर्माण करावयाचा असतो.

२) दुसऱ्या अवस्थेत विचार हे अनावश्यक ठरतात. ही माणसाची विचाररहित अवस्था असते. संशयाचे निर्धारण होऊन चार आर्यसत्यावरील श्रद्धा बळकट होते. प्रज्ञेतून नवीन उच्चारांची निर्मिती होत असते. ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर चित्तात एक प्रकारची शांतता व शाश्वतता निर्माण होत असते.

३) या अवस्थेत आनंद व चित्त एकच आहेत याची प्रचिती येते. या अवस्थेत चित्त हे एकाग्र होत असते.

४) संपूर्ण शांतीची अवस्था चौथ्या अवस्थेत प्राप्त होते. यावेळी सर्व प्रकारच्या सुखदु:खाचा नाश झालेला असतो. तसेच मनाच्या सर्व वृत्ती व उर्मी नष्ट झालेल्या असतात. या अवस्थेत पूर्णत्व, शांती अनुभूतीस येतात. यातून निर्वाण प्राप्त होते.

* सम्यक् समाधी या शब्दाचा अर्थ चित्ताची एकाग्रता असा होतो. मनाला चांगल्या गोष्टीचा विचार करण्याची सवय लावणे, चांगले वळण लावणे म्हणजे सम्यक् समाधी होय. चित्ताची चलबिचल थांबविणे म्हणजे सम्यक् समाधी होय. ती साध्य करण्यासाठी आधी सांगितलेल्या सातही मार्गांचे यथोचित आचरण गौतम बुद्धांना अभिप्रेत आहे.

* एकदा यथार्थ दृष्टी प्राप्त केली म्हणजे यथार्थ निश्चय करता येतात. त्यामुळे स्वाभाविकपणे यथार्थ वाणी, यथार्थ कर्म, यथार्थ कर्मसाधने यांच्याविषयी जागरूकता निर्माण होते. यथार्थ चिंतन आणि प्रयत्न यांचे जोड मिळाली म्हणजे माणूस सम्यक् समाधीला पात्र होतो. या मार्गात इंद्रिय निग्रह आणि मानसिक एकाग्रता या गोष्टीवर भर देण्यात आलेला आहे. त्यांच्यामुळे तृष्णेवर विजय मिळविता येतो. यातून सम्यक् समाधीला माणूस पात्र होतो.

* धनाचा अभ्यास चालू असताना चार प्रकारच्या भावना मुद्दाम वृद्धिंगत कराव्यात असे सांगितले आहे. या चार भावना म्हणजे मैत्री, करूणा, मुदिता व उपेक्षा या होत. प्राणीमात्रावर प्रेम करावे (मैत्री) त्यांची दु:खे लक्षात घेऊन त्यांच्याविषयी दया बाळगावी (करूणा), त्यांच्या सुखानी आनंदून जावे (मुदिता) व असे करीत करीत जगाविषयी आपल्या मनात उपेक्षा बुद्धी दृढ करावी, म्हणजेच चित्त स्थिर करावे (उपेक्षा) यालाच समाधी असे म्हणतात.

### ४.२.३ क्षणिकवाद (अनित्यवाद) :-

अर्थ - हे जग व या जगातील सर्व वस्तू व घटना परिवर्तनशील (बदलणाऱ्या) आहेत. या जगातील प्रत्येक गोष्ट प्रतिक्षणी बदलत असते. या जगात काहीही स्थिर, नित्य, शाश्वत, टिकाऊ किंवा अमर नसते. असा बुद्धाचा महत्त्वाचा सिद्धांत आहे. यालाच क्षणिकवाद किंवा अनित्यवाद असे म्हणतात.

* बौद्ध दर्शनानुसार सर्व धर्म अनित्य आहेत. एका क्षणाला एक धर्म उत्पन्न होतो व नाश पावतो. या

मताला क्षणिकवाद असे म्हणतात.

(धर्म म्हणजे ज्या कशास ‘आहे’ म्हणता येईल ते, ज्याचा प्रत्यय येतो ते, जे स्वलक्षणाने विद्यमान आहे ते)

* जगात जे अनुभूतीस येते ते क्षणभरच टिकते. जगात नित्य असे काहीही नसते. बौद्ध दर्शनात याला सर्व क्षणिकम् किंवा सर्वम् अनित्य असे म्हटले आहे.

* जगात सर्व वस्तू क्षणिक आहेत, नित्य असे काहीही नाही (क्षणिकवाद) हे सांगण्यासाठी पुढील युक्तिवाद बौद्ध दर्शनात करण्यात आलेले आहेत - १) अर्थक्रियाकारित्व युक्तिवाद २) अनुभवाधारित युक्तिवाद.

**१) अर्थक्रियाकारित्व युक्तिवाद :-**

जगात जे अस्तित्वात आहे, सत् आहे पण ते क्षणभरच टिकते (क्षणभर टिकते याचा अर्थ प्रत्येक गोष्ट प्रतिक्षणी बदलत असते असा घेतला आहे). एखादी गोष्ट अस्तित्वात आहे याचा अर्थ त्या गोष्टीत अर्थक्रियाकारित्व असले पाहिजे. ''अर्थक्रियाकारित्व म्हणजे काहीतरी घडवून आणण्याचे सामर्थ्य होय. यालाच कार्योत्पादन क्षमता असे म्हणतात.'' (ज्याच्या योगे काहीच घडत नाही ते असले काय आणि नसले काय दोन्हीही गोष्टी सारख्याच). जिच्याद्वारे काहीतरी घडून येते म्हणजेच जिच्यात अर्थक्रियाकारित्व आहे तेच सत् होय आणि ते प्रतिक्षणी बदलणारे आहे, अनित्य आहे, क्षणभंगूर आहे.

काहीतरी घडून येते म्हणजे पहिली गोष्ट नष्ट होते आणि त्यातून नवीन गोष्ट निर्माण होते. निर्माण झालेली नवीन गोष्ट क्षणभर टिकते, ती नष्ट होते आणि त्यातून नवीन गोष्ट निर्माण होते.
उदा.जेव्हा बीजातून अंकूर फुटतो तेव्हा बीज नष्ट होते व अंकूर तयार होतो. काहीतरी उत्पन्न केल्याशिवाय अस्तित्व नाही. पण दुसरे उत्पन्न होण्यासाठी पूर्वीचे नष्ट होणे आवश्यक आहे. याचाच अर्थ असा की, सर्व धर्म क्षणिक आहेत.

**आक्षेप** - यावर काहीजण असा आक्षेप घेतात की, कुणग्यात ठेवलेल्या बियाच्या ठिकाणी अंकुरोत्पत्ती हे कार्य घडवून आणण्याचे सामर्थ्य आहे. पण अंकूर निर्माण न करता देखील कितीतरी वेळ (क्षण) ते बीज तसेच टिकून राहते. ते अंकूर निर्माण करत नाही. ते बी अस्तित्वात नाही असे म्हणता येणार नाही. त्याच्या ठिकाणी कार्य घडवून आणण्याचे सामर्थ्य आहे पण त्यास क्षणिक म्हणता येणार नाही.या आक्षेपास बौद्धांचे उत्तर - सामर्थ्य असेल तर कार्य तत्काळ घडून आलेच पाहिजे. अमूक एक कालपर्यंत ते सामर्थ्य वाट पहात राहते असे मानता येणार नाही. कारण अमूक एक काळ लोटला हे त्या सामर्थ्याला कळणार कसे ? तो काळ एवढा किंवा तेवढा असे म्हणताच येणार नाही. तसे म्हणण्यासाठी काहीतरी घडावे लागेल. म्हणून पदार्थ या क्षणापासून त्या क्षणापर्यंत अस्तित्वात आहे याचा अर्थ मध्यंतरी काहीतरी घडले आहे असाच होईल. जेव्हा काही घडते तेव्हा पूर्वक्षणीचा पदार्थ नष्ट होऊन त्याच्या ठिकाणी दुसरा उत्पन्न झाला असेच म्हणता येईल. हे विधान कुठल्याही क्षणासंबंधी करता येते. थोडक्यात जे सत आहे त्याच्या ठिकाणी अर्थक्रियाकारित्व आहे आणि म्हणून ते क्षणिक आहे. (सत् --- अर्थक्रियाकारित्व ---क्षणिकता असा युक्तीवाद होय.)

**२) अनुभवाधारित युक्तिवाद :-**

* क्षणिकतेसंबंधीचा दुसरा युक्तिवाद मांडताना बुद्ध अनुभवाचा आधार घेतो. त्यांच्या मते आपल्या अनुभवास येणाऱ्या सर्वच गोष्टी नाशवंत आहेत. म्हणजेच त्या क्षणभंगूर आहेत. या जगातील सर्व वस्तू व घटना परिवर्तनशील आहेत. या जगातील प्रत्येक गोष्ट प्रतिक्षणी बदलत असते, या जगात काहीही स्थिर, नित्य, शाश्वत व टिकाऊ नाही, असा अनुभवावर आधारित सिद्धांत बुद्धाने मांडला आहे. त्यासच क्षणिकवाद असे म्हणतात.

* उदाहरणादाखल बुद्ध असे म्हणतो की, समोरचा पर्वत देखील काही लाख वर्षांनी नष्ट होणार आहे. तो अगदी एका क्षणात नष्ट होतो असे नाही तर आपल्या अनुभवास न येता देखील तो बदलत असतो. त्यामध्ये काहीतरी दरक्षणी फरक पडत असतो. म्हणजेच प्रत्येकक्षणी त्या पर्वतास कुठलासा-कुठलातरी बदल झालेला असतो. हा बदल म्हणजे पहिला पर्वत नष्ट होणे व त्याजागी दुसरा पर्वत निर्माण होणे हे होय. नित्य असा पर्वत कोणालाही अनुभवास येत नाही. थोडक्यात जगातील कोणत्याही वस्तूत कालांतराने बदल होत राहणार हे अनुभवाचे सत्य आहे.

**आक्षेप** - बुद्धाच्या यावरील मतावर काहींनी आक्षेप घेतला आहे तो असा :

''निसर्गाचे नियम हे मात्र क्षणिक व अनित्य नसतात. निसर्गाचे नियम हे शाश्वत व नित्य असतात. पण त्या नियमांप्रमाणे होणाऱ्या विशिष्ट घटना मात्र परिवर्तनशील व सतत बदलत असतात. तेव्हा नित्यता व अनित्यता या दोन गोष्टी मान्य कराव्या लागतात. आपल्या ह्या मताच्या स्पष्टीकरणा साठी त्यांनी काही उदाहरणे पुढीलप्रमाणे दिलेली आहेत.

उदाहरण १) पळापळाने दिवस वाढत असतो. पहाट, उषःकाल, सकाळ, दुपार, तिसरा प्रहर, संध्याकाळ, रात्र, मध्यरात्र, पुन्हा पहाट असे दिवस-रात्रीचे चक्र अव्याहतपणे फिरत असते.

उदाहरण २) समुद्राला भरती-ओहोटी येते. समुद्राच्या पाण्यावर चंद्रसूर्याचे आकर्षण कार्य करीत असते. समुद्राचे पाणी वाढते, मोठमोठ्या लाटा उसळून किनाऱ्याकडे धावत येतात, मोठी गर्जना करतात व पाणी फुगते त्याला भरती येते म्हणतात. भरती संपताच ओहोटी सुरू होते व ओहोटी संपताच भरती सुरू होते. दिवसातून दोनदा भरती व दोनदा ओहोटी येते. एकवेळ घड्याळ चुकेल पण भरती-ओहोटीच्या वेळा चुकत नाहीत.उदाहरण ३) वर्षाची विभागणी सहा ऋतूत केलेली आहे. एक ऋतू संपताच दुसरा ऋतू सुरू होतो व त्याला ठराविक वेळी अंत येतो. प्रत्येक ऋतूचा काळ दोन महिन्यांचा असतो. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत व शिशिर हे ऋतू याच क्रमाने न चुकता सातत्याने हजारो वर्षे होत आलेले आहेत. उदाहरण ४) जीवाची निर्मिती, वाढ, जन्म होणे व जन्मानंतर शैशव, बाल्य, कौमार्य, यौवन (तारुण्य), प्रौढत्व, वार्धक्य व शेवटी अंत होणे हे चक्र मानव धरून सर्व जिवंत प्राण्यात चालू असते.थोडक्यात - निसर्गाचे नियम सातत्याने कार्य करतात व त्याचे नियम चक्र अव्याहतपणे (नियमित) फिरत राहते. या जगात परिवर्तन सतत चालू असते हा प्रत्येकाचा अनुभव आहे. निसर्गाचे नियम हे मात्र क्षणिक व अनित्य नसतात.

या आक्षेपास बौद्धाचे उत्तर - बुद्धाने मात्र यातील परिवर्तनाच्या भागावर जोर दिला. या जगात सर्वच बदलणारे, परिवर्तनशील व अनित्य असते. अशा विश्वाच्या गतिमानतेचा महत्त्वाचा सिद्धांत मांडला आहे. म्हणजेच 'सर्व क्षणिकम्, सर्व अनित्यम् ।' आहे असा त्याचा मूलभूत सिद्धांत आहे.बुद्ध यासाठी उदाहरण देतो ते असे - ज्योत जळत असते तेव्हा प्रत्येक क्षणी नवी ज्योत असते. ती एकच व स्थिर वाटत असली तरी प्रत्येक क्षणी वेगळी व नवी ज्योत तयार होत असते. प्रत्येक क्षणी नवे कण जळून त्यातून प्रकाश बाहेर येत असतो.तसेच नदीचा वाहता प्रवाह जरी तोच दिसत व वाटत असला तरी त्यातील पाणी अखंडपणे वाहत असल्याने त्यात नित्य नूतनता असते. प्रत्येक क्षणाला नवीन पाणी वाहत व पुढे सरकत असते. थोडक्यात नदीचे वाहते पाणी किंवा दिव्याची जळती ज्योत जरी एकच व तीच दिसत असली तरी तो भास असतो व त्याचे प्रतिक्षणी बदलणारे रूप हेच खरे असते असे बुद्ध म्हणतो. म्हणजे बुद्धाच्या मते परिवर्तनशीलता हे सत्य असते आणि नित्यता असत्य व भासमान असते, असा अनुभवाधारित युक्तिवाद मांडला आहे.

## ४.२.४ अनात्मवाद :-

**बौद्ध मत** – स्वत: गौतम बुद्ध आणि सर्व बौद्धधर्मीय हे आत्मा मानत नाहीत. सर्व बौद्ध पंथांना समान असणारे आणखी एक तत्त्व म्हणजे अनात्मवाद होय. यालाच Theory of Nonsoul असे म्हणतात.अर्थात् बुद्ध हा आत्मा मुळीच मानीत नाही असे नाही, तर तो आत्मा नावाचे नित्य, शाश्वत, अविकारी, अपरिवर्तनीय अविनाशी द्रव्य आहे हे स्वीकारत नाही. विश्वातील प्रत्येक गोष्ट, वस्तू व घटना क्षणिक, प्रतिक्षणी बदलणारी असल्याने आत्माही परिवर्तनाच्या नियमाला अपवाद नाही. आत्माही सतत बदलणारा आहे असे बुद्धाचे म्हणणे आहे.

**वेदांती मत** – वेदांती मतानुसार, आत्मा हा एक स्थिर पदार्थ किंवा द्रव्य आहे असे मानले आहे. म्हणजेच या ठिकाणी आत्मा याचा अर्थ केवळ सजीव पदार्थाच्या ठिकाणी मानला जाणारा आत्मा (self, soul) एवढाच नाही तर आत्मा म्हणजे ज्या निरनिराळ्या धर्माचा अथवा गुणांचा आपणास प्रत्यय येत राहतो त्यांना आधारभूत असलेला एक स्थिर पदार्थ अथवा द्रव्य असा आहे.

उदा. फूल हे द्रव्य घ्या. त्यामध्ये गंध, रंग, स्पर्श, इत्यादी गुणधर्म राहतात. म्हणजेच फुलाचा आपणास गंध येतो, रंग दिसतो, स्पर्श जाणवतो. पण या गुणधर्मांना आधारभूत असलेले फूल नावाचे द्रव्य वेगळेच असते. गुणधर्म थोडेबहुत बदलतात किंवा परिवर्तीत होतात. तरीदेखील ही परिवर्तने ज्याच्या आश्रयाने होतात ते द्रव्य स्थिर राहते आणि त्याला फूल असे म्हणतात. यातील फूल हे द्रव्य होय व हे नित्य असते. ज्याप्रमाणे फूल हे द्रव्य नित्य असते, त्याच्या आधाराने गुणधर्म बदलत असतात त्याप्रमाणे आत्मा नावाचा एक नित्य पदार्थ असतो व त्याच्या आधाराने राग, द्वेष, इत्यादी भावना बदलत असतात असे वेदांती सांगतात.

**बौद्ध मत** – बौद्धांना नित्य असे द्रव्य नाकारावयाचे आहे. मग ते जड असो अथवा चेतन असो. गंध, रंग, स्पर्श इत्यादी गुणधर्माहून वेगळा असा फूल नावाचा काही द्रव्य पदार्थ नाही. कारण त्याचा आपणास अनुभव नाही असे त्यांचे म्हणणे आहे. रंग, गंध, स्पर्श, इत्यादी धर्म जर काढून टाकले तर फूल नावाचा पदार्थ अस्तित्वात देखील राहणार नाही. या विविध धर्माचा संघात म्हणजे फूल हे द्रव्य होय आणि हे द्रव्य नित्य असे नसते. जोपर्यंत गुणधर्म टिकून आहेत तोपर्यंत ते असते.जी गोष्ट फूलासारख्या अचेतन पदार्थाची तीच गोष्ट 'मी', 'तू', देवदत्त यासारख्या चेतन पदार्थांची असते. प्रतिक्षणी निर्माण होणाऱ्या राग, द्वेष, इच्छा, सुख, दु:ख, इत्यादी चित्तधर्मांना आधारभूत अशा एका स्थिर पदार्थाची आपण कल्पना करतो व त्यास आत्मा म्हणतो. पण निरनिराळ्या चित्तधर्माच्या समुदयाचा संघात म्हणजे आत्मा होय असे बुद्धाचे मत आहे.

उदा. या संदर्भात ग्रीक राजा मिलींद व भिक्षू नागसेन यांची गोष्ट प्रसिद्ध आहे. ती अशी, मिलींद राजा भेटावयास आला असता नागसेनाने प्रश्न विचारला, महाराज आपण कसे आलात ? राजा म्हणाला, रथातून आलो. नागसेन म्हणाला, नेमके रथ कशास म्हणावयाचे ? रथाची चाके म्हणजे रथ की कणा म्हणजे रथ की घोडे म्हणजे रथ इत्यादी. रथ म्हणजे केवळ चाके, कणा, घोडे यापैकी कोणतेही एक किंवा त्यांची बेरीज नसून त्या सर्वांना मिळून रथ असे म्हणतात असे मिलींद राजाच्या लक्षात आणून दिले.

त्याप्रमाणे माणसाचे हात, पाय, नख, केस, डोके, डोळे, तोंड, इत्यादी अवयवांच्या संघाताहून भिन्न असा माणूस (आत्मा) कोणीही नाही. आत्मा नावाचे नित्य असे काहीही नाही. ज्याप्रमाणे जड वस्तूच्या धर्मांना कुठलेही आधार द्रव्य नाही त्याप्रमाणे चेतन वस्तूच्या धर्माना कुठलेही आधार द्रव्य नाही. जे आहे ते धर्माचे (गुणाचे) संघात व त्या संघाताचे संतान होय या मतास अनात्मवाद असे म्हणतात.

* कुठलाही धर्म दुसऱ्या धर्मावर अवलंबून असतो, दुसरा तिसऱ्यावर, तिसरा चौथ्यावर असा त्यामध्ये क्रम असतो. समुद्रातील एक लाट दुसऱ्या लाटेस जन्म देते, दुसरी तिसरीस याप्रमाणे ती एक अखंड प्रक्रिया

चालू असते. याप्रमाणे एक धर्म दुसऱ्यास जन्म देतो, दुसरा तिसऱ्यास जन्म देतो. या पाठीमागे स्व असा कोणीही नसतो यालाच अनात्मवाद असे म्हणतात.

* खरे पाहता उपनिषदांत सांगितलेला नित्य, स्थिर, शाश्वत, अविकारी, द्रव्यरुप किंवा ब्रह्म असा आत्मा आहे हे बुद्धाने पूर्णपणे नाकारले असून तो पुन्हा पुन्हा सांगतो की, चिरकाल टिकणारा, नित्य, शाश्वत, निर्गुण व निराकार आणि अनेक जन्म घेणारा असा आत्मा नाही. आपणास जो आत्मा म्हणून वाटतो तो केवळ प्रतिक्षणी बदलत राहणारा 'पंचस्कंधांचा' संघात आहे. यापेक्षा अधिक वेगळे काही नाही. (पंचस्कंध - रुप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान)

### ४.२.५ निर्वाण संकल्पना :-

निर्वाण हा बौद्धांचा महत्त्वाचा सिद्धांत आहे. बुद्धाने या दुःखमय जगापासून मुक्त होण्याचे ध्येय अंतिम व सर्वोच्च आहे असे सांगून ते प्राप्त करून घेण्यासाठी आर्य अष्टांगमार्ग सांगितला. हिंदू धर्मात मोक्ष किंवा मुक्ती हे अंतिम व परमोच्च ध्येय व आदर्श समजला जातो. तसेच बौद्ध धर्मात निर्वाणाला परमोच्च स्थान आहे. मानवाने सर्व मिळवायचे ज्ञान, करावयाचे कर्म, आचरावयाचे तप, अंगीकारयची साधना, करावयाचे ध्यान या सर्वांचे एकमेव उद्दिष्ट म्हणजे निर्वाणप्राप्ती आहे. निर्वाणामध्ये परमशांती, परमसुख, परम आनंद, परम विश्राम यांचा अनुभव येतो असे म्हटलेले आहे.

**निर्वाण म्हणजे काय ?**

१) निर्वाण या शब्दाचा मूळ अर्थ विझणे किंवा विझविणे, शांत किंवा थंड होणे, सर्व काही अस्तंगत होणे असा आहे.

२) निर्वाण या शब्दाची व्युत्पत्ती निस्+र+वा या धातूपासून दिली जाते. त्याचा अर्थ असा घेतला आहे की, दिव्याची ज्योत आपण जशी फुंकून विझवितो तसे विझवून टाकणे असा आहे. निर्वाणासाठी योग्य झाला असता, सत्त्व एखाद्या दिव्यासारखा विझून जाता. दिवा विझला असता नंतर त्याचा मागमूसही राहत नाही, तसे निर्वाणप्राप्ती झालेल्या सत्त्वाचे अस्तित्व रहात नाही आणि तो पुन्हा जन्माला येत नाही.

३) निर्वाण या शब्दाचा अर्थ दिवा अथवा ज्योत विझणे, शांत होणे असा घेतला आहे. जीवनास ज्योतीची उपमा बौद्ध दर्शनात वारंवार येते. जीवन ज्योत शांत होणे, जीवनाच्या तापाचा उपशम होणे म्हणजे निर्वाण होय.

४) बौद्ध धर्मानेही ऐहिक अस्तित्वापासून शाश्वत मुक्ती हे मानवी आयुष्याचे अंतिम ध्येय ठरविले आहे. त्यास निर्वाण हे नाव दिले गेलेले आहे.

५) जन्म, जरा, मृत्यू आणि आयुष्यात नेहमी येणारी दुःखे यापासून मुक्तता म्हणजे निर्वाण होय.

६) निर्वाण म्हणजे दुःख-रहित परम आनंद (निर्वाणं परम् सुखम्) होय. निर्वाण हेच अंतिम सुख आहे.

७) निर्वाणाचे रुप, आकार, कालमान, इत्यादीविषयी माहिती देता येत नसली तरी त्याच्या गुणाचे वर्णन मात्र आलेले आहे, ते असे -

* निर्वाण हे वाईट संस्कारानी दुषित झालेले नसते. उलट वाईट संस्कारापासून होणारा ताप ते शांत करते.

* निर्वाण हे पावित्र्य, ज्ञान आणि मोक्ष यांच्या पुष्पांनी बहरलेले असते. दुःख आणि संकटे यांच्यापासून मुक्तता पावून शांती, आनंद आणि पावित्र्य यांच्याद्वारा निर्वाण अनुभविता येते.

८) बारा निदानांचे रहाटगाडगे कायम चालू रहात असते. परंतु त्यापासून बाजूला राहणे किंवा मुक्तता मिळविणे म्हणजे निर्वाण होय.

९) निर्वाण संकल्पनेचा भावरुप अर्थही करता येतो. व्यक्तित्वाचा विनाश म्हणजे अस्तित्वाचा विनाश नव्हे असे म्हणता येईल. पंचस्कंधरुपी व्यक्तित्व विरून जाईल पण जेथून त्याने आकार घेतला ते अखंड अस्तित्व उरून राहील अशी कल्पना करता येते. अशी निरहंकारी आणि म्हणून केवळ साक्षित्वाची स्थिती अनुभवता येते. हे भारतीय आध्यात्मिक परंपरेचे प्रमुख सूत्र आहे.

सरोवरात लाट उठते आणि जिरून जाते. लाट नष्ट झाली तरी सरोवर शाबूतच राहते आणि लाटेचे खरे स्वरूप सरोवर हेच आहे. निर्वाण याचा हा अर्थ घेतल्यास तो उपनिषदातील अखंड आनंदमय अमृतत्वाच्या कल्पनेशी जुळणारा आहे.

१०) निर्वाणाचा असाही एक अर्थ घेतला जातो की, मृत्यूनंतर तथागताचे (अस्तित्वाचे) काय होते ? तो अस्तित्वात राहतो की नाही ? या प्रश्नाचे उत्तर देण्यास गौतम बुद्धाने नकार दिला. यावरून आपण म्हणू शकतो की, निर्वाण म्हणजे अशी अवस्था की जिच्या संबंधी कसलेच विधान करता येत नाही. ती एक अनिर्देश्य, अनिर्वाच्य स्थिती आहे. निर्वाण याचा हा अर्थसुद्धा वेदान्तातील अनिर्वचनीय स्वरूपाच्या मोक्ष कल्पनेशी जुळणारा आहे.

याबाबतीत एक संवाद दिलेला आहे. कोसलचा राजा प्रसेनजित व विद्वतेबद्दल प्रसिद्ध अशी भिक्षुणी खेमा यांच्यामधील संवाद बघण्यासारखा आहे.

राजा प्रसेनजित भिक्षुणीला विचारतो की, मृत्यूनंतर तथागत (अस्तित्वात) उरतो किंवा नाही. त्यावेळी ती भिक्षुणी स्पष्टपणे उत्तर देत नाही, कारण तथागतांनीच ते स्पष्ट केलेले नाही. राजा तिला पुढे असे विचारतो की, तथागतानी हे का स्पष्ट केले नाही ? यावर ती विद्वान भिक्षुणी राजाला उलट विचारते की, हे राजन, तुझ्याकडे असा कोणी हिशोब करणारा खजिनदार आहे काय की जो गंगेच्या काठावरची वाळू बिनचूकपणे मोजून दाखवील ? किंवा समुद्राचे पाणी व्यवस्थित आणि योग्य रितीने मोजून दाखवील ? राजाला अर्थातच नाही म्हणणे भाग पडते. भिक्षुणी त्याला पुढे म्हणते की, जसा महासमुद्र अमर्याद आणि अगाध आहे त्याप्रमाणे तथागत (अस्तित्व) अमर्याद आणि अगाध आहे. या अशा प्रकारच्या उत्तरावरून, जेथे विचार आणि वाणी मूक बनते असे परमपद म्हणजे निर्वाण होय.

११) बुद्धाचा उपदेश नैतिक स्वरूपाचा होता हे लक्षात घेऊन, निर्वाण याचा असाही एक अर्थ घेतला आहे, तो असा की, सर्व नैतिक गुणांची कमाई करून पूर्णावस्थेत पोहचलेल्या मनाची प्रसन्न, गंभीर आणि शांत अवस्था म्हणजे निर्वाण होय.

१२) निर्वाणात काही मिळवायचे नसते तर मानवाच्या सर्व इच्छा, तृष्णा, विकार, आकांक्षा, क्षुधा व त्यातून निर्माण होणारे मानवाचे संक्षोभ, चिंता, अस्वस्थता, दुःख यांचा लय व्हावयाचा असतो. त्याच्या मते निर्वाण म्हणजे जीवनातील सर्व दुःखकारक, अशुभ गोष्टींचा अंत होणे, इच्छांच्या ज्वालानी वेढलेल्या जागापासून सुटका होणे म्हणजेच सर्व इच्छा, तृष्णा, आसक्ती, द्वेष, मोह यापासून मुक्त होणे होय.

**४.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :-**

अ) गाळलेल्या जागा भरा.

१) -------- हे बौद्ध धर्माचे संस्थापक आहेत.

२) -------- हे दु:खाचे मूळ आहे.

३) इंद्रिय उपभोगाबद्दल असलेली आसक्ती म्हणजे -------- होय.

४) दु:ख निरोध करण्याच्या मार्गाला -------- म्हणतात.

५) बौद्ध दर्शनात -------- ला परमोच्च स्थान आहे.

**ब) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) चार आर्यसत्याची नावे द्या.

२) अष्टांग मार्गाची यादी करा.

३) क्षणिकवाद म्हणजे काय ?

४) व्यापाद् म्हणजे काय ?

५) निर्वाण म्हणजे काय ?

## ४.४ परिभाषिक शब्द, शब्दार्थ :-

१) दर्शन : तत्त्वज्ञान

२) अविद्या: अज्ञान

३) वेदना : सुख दु:खाचा अनुभव

४) तृष्णा : इच्छा

५) जाती : जन्म

६) भव : आसक्तीमधून पुनर्जन्मास कारणीभूत ठरणारे कर्म

७) सम्यक्: योग्य, चांगला

८) षडायतन : पंचज्ञानेंद्रिय व मन

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :-

अ) गाळलेल्या जागा भरा - उत्तरे

१) गौतमबुद्ध २) तृष्णा ३) काम उपादान

४) अष्टांग मार्ग ५) निर्वाण

ब) एका वाक्यात उत्तरे द्या : उत्तरे

१) सर्वम् दु:खम्, दु:ख कारणम्, दु:ख निरोध, दु:ख निरोधाचे मार्ग

२) सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्मान्त, सम्यक् आजिविका, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती, सम्यक् समाधी

३) या जगातील प्रत्येक गोष्ट प्रतिक्षणी बदलत असते. या जगात काहीही स्थिर, नित्य, शाश्वत नसते म्हणजे क्षणिकवाद होय.

४)　नावडत्या वस्तुविषयी किंवा व्यक्तिविषयी वाटणारा द्वेष होय.

५)　ऐहिक अस्तित्वापासून शाश्वत मुक्ती हे अंतिम ध्येय म्हणजे निर्वाण होय.

**४.६　सारांश :-**

भगवान गौतमबुद्ध हा बौद्ध दर्शनाचा संस्थापक आहे. बौद्ध दर्शन हे अवैदिक (नास्तीक) दर्शन आहे. गौतम बुद्धाला बोधीवृक्षाच्या खाली जे सत्याचे ज्ञान प्राप्त झाले त्याला चार आर्यसत्ये म्हणतात. सर्व दुःखम्, दुःख कारणम्, दुःख निरोध व दुःख निरोधाचे मार्ग ही ती चार आर्यसत्ये आहेत. दुःख निरोध करण्याचा जो मार्ग बुद्धांनी सांगितला त्याला अष्टांग मार्ग असे म्हटले आहे. सम्यक् दृष्टी, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्मात, सम्यक् आजीविका, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृती व सम्यक् समाधी हे अष्टांगमार्ग आहेत. दुःखाचा नाश होण्यासाठी या अष्टांग मार्गाचा उपयोग होतो. सम्यक् शब्दाचा अर्थ योग्य असा घेतला जातो. सम्यक् दृष्टी अंधश्रद्धेला दूर सारून माणसांच्या विचारांना बुद्धी प्रामाण्यवादी वळण लावते. मनातील दुर्विचार काढून टाकून त्या ठिकाणी शुभ विचारांची स्थापना करण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे ही समाधीकडे जाण्याचे मार्ग आहेत.

गौतम बुद्धाने आपल्या तत्त्वज्ञानामध्ये क्षणिकवाद, अनात्मवाद, निर्वाण संकल्पना यांची सविस्तर माहिती दिलेली आहे. हे जग व या जगातील वस्तू व घटना परिवर्तनशील (बदलणाऱ्या) आहेत असा क्षणिकवाद मांडला आहे. गौतम बुद्धाने आत्मा मानलेला नाही. त्यासाठी अनात्मवादातून त्याची माहिती दिलेली नाही. निर्वाण हा बौद्धांचा महत्त्वाचा सिद्धांत मानला जातो. निर्वाणामध्ये परमशांती, परमसुख, परम आनंद, परम विश्राम याचा अनुभव येतो असे म्हटले आहे.

**४.७　सरावासाठी स्वाध्याय :-**

१)　बौद्ध तत्त्वज्ञानाची चार आर्यसत्ये स्पष्ट करा.

२)　आर्य अष्टांगमार्ग याविषयीची सविस्तर माहिती द्या.

३)　क्षणिकवादाविषयीचे बौद्धांचे मत व्यक्त करा.

४)　बौद्धांचा अनात्मवाद स्पष्ट करा.

५)　बौद्धांनी मांडलेली निर्वाण संकल्पना स्पष्ट करा.

**४.८　अधिक वाचनासाठी पुस्तके :-**

ग्रंथाच्या शेवटी यादी दिली आहे.

▼ ▼ ▼

घटक – ५

# अद्वैत वेदान्त

५.० उद्दीष्टे

५.१ प्रास्ताविक

५.२ विषय विवेचन

 ५.२.१ ब्रह्मनचे स्वरुप

 ५.२.२ जगाचे भासमय स्वरुप

 ५.२.३ मायावाद

 ५.२.४ मोक्षाचे स्वरुप

५.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

५.४ सारांश

५.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

५.६ सरावासाठी स्वाध्याय

५.७ पारिभाषिक शब्द

५.८ अधिक वाचनासाठी पुस्तके.

## ५.० उद्दीष्टे –

या घटकाचा अभ्यास केल्यावर आपणास खालील गोष्टींची माहिती मिळेल.

* शंकराचार्याच्या अद्वैत वेदान्ताची ओळख होईल.
* ब्रह्मनचे स्वरुप स्पष्टपणे समजेल.
* जगाचे भासमय स्वरुप कसे आहे हे लक्षात येईल.
* मायावादाचे स्पष्टीकरण होईल.
* जीव आणि ब्रह्म यांच्यातील नाते लक्षात येईल.
* अद्वैत वेदान्ताची "मोक्ष संकल्पना" जाणून घेता येईल.

## ५.१ प्रास्तविक –

भारतीय तत्त्वज्ञानात शंकराचार्यांच्या अद्वैत वेदान्ताला सर्वाधिक लोकमान्यता मिळालेली आहे. लोक मानसात तत्त्वज्ञान = वेदान्त = अद्वैत वेदान्त असे समीकरण होऊन बसलेले आहे.

''वेदान्त'' या शब्दाचे दोन अर्थ सांगता येतील-

१) वेदाचा निष्कर्ष किंवा सार २) वेदांचा अंत असणारी उपनिषदे

ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद असे चार वेद आहेत. उपनिषदे, ब्रह्मसूत्रे आणि भगवद्गीता ही भारतीय तत्त्वज्ञानाची उगमस्थाने आहेत. म्हणून त्यांना ''प्रस्थानश्रयी'' म्हणून संबोधले जाते. बादरायणांनी 'ब्रह्मसूत्रे' रचली. त्यांनाच ''वेदान्तसूत्रे'' असेही म्हणतात. वेदाच्या विचारांची शुद्धता या उगमाशी येऊन पारखली जाते. निरनिराळ्या आचार्यांनी प्रस्थानश्रयीवर भाष्ये केलेली आहेत.

१) शंकराचार्य ख्रि. ७८८ ते ८२० - केवलाद्वैतबाद

२) रामानुजाचार्य ख्रि. १०५६ ते ११३७ - विशिष्टाद्वैतवाद

३) मध्वाचार्य ख्रि. ११९९ ते १२७८ - द्वैतवाद

४) वल्लभाचार्य ख्रि. १४८१ ते १५३३ - शुद्धाद्वैतवाद

५) निंबाकाचार्य (१३ वे शतक) - द्वैतवाद (भेदाभेद) वाद

**श्रीमद् आद्य शंकराचार्य चरित्र आणि कार्य-**

आद्य शंकराचार्य हे प्राचीन श्रेष्ठ अशा पंडितापैकी एक मानले जातात. त्यांचा जन्म इ.स. ७८८ मध्ये झाला तर मृत्यू इ.स. ८२० मध्ये झाला. अवघ्या ३२ वर्षाच्या कालखंडात त्यांनी केलेले कार्य, लेखन फारच प्रचंड स्वरुपाचे आहे. त्यांनी हिंदू धर्माची पुनर्स्थापना केली. हिंदू धर्माच्या प्रसारार्थ देशभर भ्रमण केले आणि पांच पीठांची स्थापना केली.शंकराचार्यामध्ये एक कवि, भक्त आणि दार्शनिक अशा तीन्हिचाही सुरेख संगम झालेला दिसून येतो. त्यांनी उपदेशसहस्त्री, शतश्लोकी असे ग्रंथ दक्षिणामूर्ती, आनंदलहरी अशी काव्ये तर षट्पदी स्तोत्रम । द्वादशपज्जरिका स्तोत्रम् । अशी स्तोत्रे रचली. वेदान्तसूत्रे, उपनिषदे आणि भगवद्गीता अशा प्रस्थानश्रयीवर त्यांनी केलेली भाष्ये सुप्रसिद्ध आहेत.शंकराचार्य हे अद्वैत वेदान्ती म्हणून ओळखले जातात. अद्वैत याचा अर्थ एकमेवाद्वितीय असा आहे. अंतिम सत्य हे एकमेव आहे. या सत्याला ते ''बह्म'' या नावाने संबोधितात.

एका जुन्या सुभाषितकाराने अर्ध्या श्लोकात पूर्ण अद्वैत वेदान्त सांगुन टाकलेला आहे.

बह्मं सत्यं, जगन्मिथ्या, जीवोब्रह्नैव नापरः ।

ब्रह्म हे एकमेव सत्य आहे. जग मिथ्या आहे. जीव ब्रह्मापेक्षा वेगळे नाही.

**५.२.१ ब्रहनाचे स्वरुप :**

ब्रह्म सत्य - अद्वैत वेदान्ताच्या मते ब्रह्म हे एकमेव सत्य आहे. अव्दैत वेदान्तात ब्रह्माचे स्वरुप पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहे- ब्रह्म म्हणजे जाणीव होय, चैतन्य होय. अद्वैत वेदान्ती सत् (आहे) आणि चित्त (जाणीव) एकच मानतात. या दोन्ही गोर्ष्टींची सर्वस्वी अभेद्य अशा आहेत. तो आनंदाचा स्तोत्र आहे.ब्रह्म कसे आहे? या प्रश्नाचे उत्तर अव्दैत वेदान्ती ''ब्रह्म हे सत् चित् व आनंदस्वरुपी आहे'' असे देतात. अशा या सच्चिनानंद स्वरुपी ब्रह्माविषयी तीन विधाने करता येतील-

क) ब्रह्म हे साक्षीचैतन्य आहे.

ख) ब्रह्म हे भेदरहित आणि निर्गुण आहे.

ग) ब्रह्म नित्य आहे.

क) ब्रह्म साक्षीचैतन्य आहे- ब्रह्म हे बदलत असणाऱ्या अंत:करणाच्या वृत्तींना साक्षी रहात असते. ते प्रवाही नाही तर स्थिर आहे, नित्य आहे. त्याला अद्वैत वेदान्ती ''कूटस्थ नित्य'' असे संबोधितात. ''कूटस्थ नित्य'' म्हणजे असे की ज्याच्यावर कशाचाही विकार घडत नाही परिणाम घडत नाही ''कूट'' या शब्दाचा संस्कृत शब्दाचा एक अर्थ ''पर्वतशिखर'' असा आहे. ऐरणीवर ठेवून ठोकलेल्या वस्तूत बदल घडतात, ऐरण तशीच राहते.

आपल्या मनोवृत्ती स्थिर नसतात. त्यात अस्थिरता असते मनामध्ये अनेक विकार, विचार असतात (सुख, दु:ख) जसे पाण्याने भरलेल्या भांड्यात चंद्राचे प्रतिबिंब पडलेले आहे, पाणी हलले की चंद्राचे प्रतिबिंबही हलते. प्रत्यक्षात चंद्र स्थिर असतो. याप्रमाणेच ब्रहन हे साक्षीचैतन्य असते.

अद्वैत वेदान्ती वृत्तीचैतन्य आणि साक्षी चैतन्य असा भेद करतात.

ख) ब्रह्म हे भेदरहित व निर्गुण आहे-

ब्रह्म हे निर्गुण आहे कारण गुण हे भेदावर आधारित असतात. शब्द, स्पर्श, गंध, रस, रुप यांच्या सहाय्याने आपणास गुण जाणवतात.

ब्रह्मे हे भेदरहित असल्यामुळे ते निर्गुण आहे. ते गुणांनी बद्ध नाही. बांधलेले नाही.

ग) ब्रहन नित्य आहे-

जीवाच्या जागृतावस्था, स्वप्नावस्था आणि सुषुप्ति (गांढ झोप) ह्या तीन अवस्था आहे. पण ब्रह्म हे ह्या तीन्हि अवस्थापासून अलिप्त आहे. ते विश्वाच्या आरंभापासूनच आहे. जगातल्या सर्व इतर गोष्टींना आदि अंत आहे. त्याचा प्रारंभ होतो, शेवट होतो. या सर्व गोष्टी परिवर्तनशील (बदलणाऱ्या) जगातील आहे तर ब्रहन हे नित्य आहे, स्थिर आहे.

**सगुण ब्रह्म आणि निर्गुण ब्रह्म**

ब्रह्माचे सगुण ब्रह्म आणि निर्गुण ब्रहन असे दोन प्रकार आहेत. असे ब्रहनाचे दोन प्रकार करण्याची काय गरज आहे याचे अद्वैत वेदान्तात पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले जाते-सगुण ब्रहन म्हणजे मायेच्या उपाधीसहीत स्वीकारलेले ब्रह्म होय. सामान्य माणसांना उपासना शक्य व्हावी म्हणून सगुण ब्रहन आवश्यक आहे. अद्वैत वेदान्ताच्या मते ईश्वर म्हणजे सगुण ब्रहन होय.निर्गुण ब्रहन म्हणजे अंतिम, निरुपाधिक सत्य होय. त्यास परब्रहन म्हणतात. पर म्हणजे श्रेष्ठ ''सत्यं ज्ञानं अनन्तं ब्रहनं'' असे ब्रहनाचे स्वरुप लक्षण आहे. ब्रहन सत्, चित, आनंद स्वरुपी आहे असे मानले जाते परंतू ब्रहनाचे स्वरुप नकारात्मक पद्धतीने स्पष्ट केले जाते. ''नेति नेति'' । (न+इति), हे नाही, हेही नाही असे.

''बाष्कली '' नांवाच्या शिष्याने ब्राहव ऋषींना विनविले, मला ब्रहन म्हणजे काय ते सांगा? ब्राहव ऋषी 'सांगतो' असे म्हणाले व शांत राहिले. असे दोन तीनदा झाले. बाष्कली म्हणाला, आचार्य तुम्ही मला ब्रहनाचे स्वरुप कसे आहे हे सांगतो म्हणालात, पण सांगत का नाही? त्यावर ब्राहव शेवटी ब्रादव म्हणाले, मी तुला सांगतच होतो पण तू लक्षात घेतले नाहीस. ''ब्रह्म हे शांतस्वरूप आहे.''ब्रहन हे स्थूल नाही, सूक्ष्म नाही. ऱ्हस्व नाही, दीर्घही नाही. ते अणूपेक्षा लहान व मोठ्यापेक्षाही मोठे असे आहे. अशी ब्रहनाला परस्परविरोधी लक्षणे लावली जातात. तर जेथे न पोहोचताच वाणी आणि मन परत येते ते ब्रहन असेही ब्रहनाचे वर्णन आढळते. अर्थात हे निर्गुण ब्रहन होय, परब्रहन होय.

### ५.२.२ जगाचे भासमय स्वरुप

अद्वैत वेदान्ताच्या मते ''ब्रहम'' हे एकमेव सत्य आहे. मग आपण जे जग अनुभवतो ते कसे आहे? ते सत्य नाही काय? जगाचे स्पष्टीकरण अद्वैत वेदान्त ''मिथ्या'' असे वर्णन करतो मिथ्या म्हणजे खोटे असत्य नव्हे. ''जग मिथ्या आहे'' या अद्वैत वेदान्ताच्या सिद्धांताबद्दल बरेच गैरसमज आहेत.आपल्याला जाणवणारे जग, व्यावहारिक जग मिथ्या आहे पण ते एका विशिष्ट पातळीवर, तात्त्विक पातळीवर मिथ्या आहे. या संदर्भात एक कथा सांगितली जाते- एक वेदान्ती आचार्य, वनामध्ये आपल्या शिष्यांना शिकवीत असतात, ब्रहन सत्य आहे, जग मिथ्या आहे. त्यावेळेस तिथे एक वाघ येतो. वाघाला पहाताच आचार्य, आणि शिष्य दोघेही तिथून पळ काढतात. सुरक्षित ठिकाणी आल्यावर शिष्य गुरुंना विचारतो - आचार्य, आपण जग मिथ्या आहे अशी शिकवण देता मग वाघ आला हे पाहिल्यावर आपण पळून का आलो? त्यावर आचार्य उत्तरतात (उत्तर देतात) ''बटो, पलायनमपि मिथ्या ।'' हे शिष्या, आपले पळणे देखील मिथ्या आहे. आचार्याचे उत्तर विचार करण्यासारखे आहे.

**सत्तात्रय सिद्धांत-**

अद्वैत वेदान्तात सत्तेचा त्रिविध सिद्धांत मांडलेला आहे. त्यांच्या मते सत्ता (सत्य) ह्या तीन प्रकारच्या आहेत. व्यावहारिक सत्ता, प्रातिभामिक सत्ता, आणि पारमार्थिक सत्ता या तीन सत्ता होत.व्यावहारिक पातळीवर वाघ दिसणे, आपण पळून जाणे हे सत्य आहे. व्यावहारिक सत्तेत ''अनुभव'' हा प्रमाण मानला जातो. त्यांच्या आधारे जीवनव्यवहार साधला जातो. आपले जगणे घडत असते तर प्रातिभासिक सत्तेत दोरीच्या ठिकाणी साप पहाणे, शिंपेच्या ठिकाणी रुपे पाहणे होय. या गोष्टीचा समावेश होतो अंधारातून जात असताना रस्त्यात दोरी पडलेली असते तिला आपण साप समजतो किंवा समुद्रकिनाऱ्याला शिंपले पडलेले असतात ते उन्हात चमकतात त्यामुळे ते चांदीप्रमाणे वाटतात. वस्तूत: या दोन्ही गोष्टी भासस्वरूप आहेत. आपल्याला जाणवणारे जगदेखील असेच आहे. तर पारमार्थिक सत्ता म्हणजे अंतिम सत्य ''ब्रहम'' यांचे ज्ञान होणे होय. या ज्ञानप्राप्तीसाठी व्यावहारिक सत्याचा त्याग करणे आवश्यक आहे.व्यावहारिक जग (सत्य) हे दिक कालाने बद्ध आहे. ते दृश्य स्वरुपाचे (इंद्रीयांना जाणवणारे) आहे. जड स्वरुपाचे आहे. पारमार्थिक सत्तेचे ज्ञान झाल्यावर, ब्रहनाचे ज्ञान झाल्यावर व्यावहारिक जग मिथ्या आहे याची जाणीव होते.'मिथ्या' या शब्दाचा आणखी एक अर्थ आला आहे की विकारी, बदलणारे होय. आपल्याला जाणवणारे जग हे विकारी, बदलणारे असे आहे. आपल्याला जग सत्य का भासते? बदलणाऱ्या विकारी जगाचे स्पष्टीकरण करण्यासाठी शंकराचार्य ''मायावाद'' सिद्धांत मांडतात.

### ५.२.३ मायावाद

व्यावहारिक जगाचे स्पष्टीकरण करण्यासाठी अद्वैत वेदान्त ''मायावादाचा'' सिद्धांत मांडते ब्रहन जर चेतन चिन्मय आहे तर त्यापासून निर्माण होणारे जग जडस्वरुपी का आहे? एकाच ब्रहन तत्त्वापासून जर जग उत्पन्न झालेले असेल तर जगात नाना भेद का आहेत? अशा प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी शंकराचार्यांनी ''मायावाद'' किंवा ''विवर्तवाद'' मांडलेला आहे.जगाचा आधार ब्रहम आहे. ब्रहम नसते तर जग भासलेच नसते. अद्वैत वेदान्त म्हणजे जग हा ब्रहनावार केलेला ''अध्यास'' आहे. अध्यास म्हणजे प्रथम पाहिलेल्या वस्तूचे दुसऱ्या वस्तूच्या ठिकाणी होणारे स्मरणाच्या स्वरुपातील ज्ञान होय. अध्यासाचे स्वरुप स्पष्ट करण्यासाठी रज्जू - सर्प, शिंपला-रजत अशी उदाहरणे वापरली जातात. रात्री आपण दोरीला साप समजतो, प्रत्यक्ष साप नसतो पण पूर्वी आपण पाहिलेल्या सापाचे आपणास स्मरण होते म्हणून आपण दोरीच्या ठिकाणी साप पहातो. किंवा समुद्रकिनाऱ्यावर उन्हामध्ये शिंपले चमकतात तेव्हा ते रुप्यासारखे, चांदीसारखे वाटतात. वस्तूत: तसे ते नसतात.

ब्रह्मावर आपण जगताचा अध्यास (आरोप) का करतो? तर अविद्येमुळे, अज्ञानामुळे म्हणजे मायावादाचे मूळ अविद्येत आहे. जगाचे मालिन्य, (दूषितपणा) जडता ब्रहनाला दुषित करत नाही. रज्जू-सर्प संबंधात सर्प हे रज्जूचे कार्य आहे. पण कार्य म्हणजे परिणाम नव्हे सर्प म्हणजे विवर्त तर रज्जू हे विवर्ताचे कारण होय. ज्याठिकाणी विषम दर्जाची सत्ता असते त्याला विवर्त म्हणतात. तेव्हा उपादान कारण आणि त्याचे कार्य यांची सत्ता (सत्यत्त्व) सारखे असते तेव्हा त्यास परिणाम म्हणतात. उदा. बर्फ आणि पाणी. परंतू रज्जू-सर्प यांच्यात विषम दर्जाची सत्ता असते त्यामुळे त्याला विवर्त म्हणतात. शिंपला हे कारण व रजत् हे कार्य या उदाहरणातही घडणाऱ्या कार्यास ''विवर्त''म्हणता येईल.

ब्रहम हे सनातन आहे तर जग हे अध्यस्त आहे, विवर्त आहे. अशा तऱ्हेने जगाला ''माया'' म्हटले आहे. ''माया'' म्हणजे अविद्याकल्पित नामरुपे होत. जी असत्यही नाहीत पण पूर्णपणे सत्यही नाहीत. हीच व्यावहारिक सत्ता होय.

नामरुपात्मक जग व्यावहारिक दृष्ट्या सत्य आहे परंतू पारमार्थिक दृष्ट्या सत्य नसल्याने त्याला मिथ्या म्हणावयाचे, माया म्हणावयाचे माया सत्ही नाही आणि असत्ही नाही. मग माया कशी निर्माण होते? अविद्येमुळे मायेचा उद्भव होतो. अविद्येमुळे सद्वस्तूवद (ब्रहनावर) नामरुपाचा अध्यास केला जातो. ही नामरुपे म्हणजे माया होय.

अशा तऱ्हेने मायावादाचा स्पष्टीकरण करता येईल.

### ५.२.४ मोक्षाचे स्वरुप

अद्वैत वेदान्ताच्या मते मोक्ष प्राप्त करणे हे जीवनाचे अंतिम ध्येय आहे. जेव्हा जीव आणि ब्रहन यांच्यातील ऐक्याचे (एकत्त्वाचे) ज्ञान होते तेव्हा मोक्ष प्राप्त होतो. भगवद्‌गीतेत म्हटलेले आहे, ''ज्याने ब्रहन जाणले तो ब्रहनमय होतो'' अज्ञानाचा नाश होणे म्हणजे मोक्ष प्राप्त होणे होय.मोक्ष कोणाला प्राप्त होतो? अद्वैत वेदान्ताच्या मते जीवाला मोक्ष प्राप्त होतो. जग मिथ्या आहे, ब्रहन हेच सत्य आहे. ते सच्चिदानंद स्वरुपी आहे. ते कुठे आहे? तर वेदान्त म्हणते, ''अहं ब्रहनास्मि'' । मीच ब्रहन आहे. जीव हाच ब्रहन आहे. ब्रहन हे कूटस्थ नित्य आहे. त्याचा उल्लेख 'साक्षीचैतन्य' असाही केला जातो. जीव आणि ब्रहन यात नेमका फरक कोणता आहे? जीव आणि ब्रहन यात ऐक्य कसे साधता येईल याचे उत्तर अद्वैत वेदान्त ''मोक्ष संकल्पनेतून'' देते.जीव आणि ब्रहनातील फरक सांगता येईल. जीव हा ज्ञानाचा विषय आहे तर आत्मा किंवा ब्रहन हे ज्ञानाच्या पलीकडचे आहे. जीव सुखी किंवा दुखी होतो. तर ''आत्मब्रहन'' हा सुख दुःखाच्या पलीकडचे असते.केवळ ''आत्मा'' सत्य असताना जीव कोठून उत्पन्न होतो? या प्रश्नांचे अद्वैत वेदान्ती असे उत्तर देतात, ''उपाधीमुळे आत्म्यास जीवत्त्व प्राप्त होते.'' उपाधी म्हणजे आपले गुण दुसऱ्यात उमटविणारा पदार्थ होय. उदा. स्फटिकाशेजारी जास्वंदीचे फूल ठेवल्यास स्फटिक 'रक्तवर्ण' लाल रंगाचा भासतो. स्फटिक हा पारदर्शी असतो. तो रक्तवर्णी नसतो परंतू ''जास्वंदीचे फूल'' या उपाधीने त्याला रक्तवर्णत्त्व प्राप्त होते. आत्म्याबाबत तसेच घडते.अन्नमयकोरा, प्राणमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश आणि आनंदमय कोश अशा पंचकोशासहीत आत्मा म्हणजे ''जीव'' होय. आत्म्याला आपल्या खऱ्या रुपाची जाणीव होणे म्हणजे मोक्ष होय. असा आत्मा आणि ब्रहन एकच एक होय.मोक्ष प्राप्त कसा करावयाचा? जीवाचे ब्रहनाशी नाते जोडल्याने मोक्ष प्राप्त होईल. केवळ अज्ञानामुळे अविद्येमुळे जीव आत्म्याहून भिन्न भासतो. हा भ्रम दूर करण्यासाठी ज्ञानरुपी प्रकाश आवश्यक ठरतो. अद्वैत वेदान्ताच्या मते केवळ ज्ञानमार्गानेच मोक्ष प्राप्त होतो. (ज्ञानान एव मोक्षः)

मोक्ष हा भक्ती किंवा कर्म अशा उपायांनी मिळणार नाही तर तो ज्ञानानेच प्राप्त होईल असा अद्वैत वेदान्ताचा आग्रह आहे. ''ज्ञान म्हणजे साक्षात अनुभव होय'' मी ब्रहनरुप आहे याची जीवाला जाणीव होणे

म्हणजे आत्मज्ञान  होय. हे ज्ञान व्हावयाचे असेल तर चित्तशुद्धी झाली पाहिजे. निष्काम कर्म आणि भक्ती यांनी चित्तशुद्धी होते.चित्त शुद्धीसाठी वेदान्ताने ''साधन चतुष्टय'' चार साधने सांगितलेली आहेत. ही साधने पुढीलप्रमाणे-

१) नित्यानित्यवस्तूविवेक- आत्मा हीच नित्य वस्तू आहे. बाकी सर्व वस्तू अनित्य आहेत हा विचार सतत मनात घोळवत ठेवला पाहिजे.

२) इहामुत्रार्थफल भोग विराग - या जगातील किंवा अन्य जगातील (लोकांतील) जी सुखे मिळणे शक्य आहे त्यापासून परावृत्त होणे, विरक्त होणे होय.

३) शमदमनादिसाधनसंपद - शम म्हणजे मनाचा इंद्रीयप्रवृत्तीवर आतून निग्रह करणे, दम म्हणजे इंद्रीयाच्या बाहेरुन निरोध, उपरती म्हणजे विधियुक्त संन्यास घेणे होय, तितिक्षा म्हणजे शीत-उष्ण, सुख-दु:ख एकाच वृत्तीने सहन करणे होय. समाधान  म्हणजे चित्त एकाग्र ठेवणे तर श्रद्धा म्हणजे वेदान्तसिद्धांतावर निष्ठा ठेवणे होय.

४) मुमुक्षत्त्व - म्हणजे मोक्ष प्राप्ती संबंधी जबरदस्त इच्छा बाळगणे होय.

साधनचतुष्अयाची पूर्तता झाल्यावर साधकाने ''तत्त्वमसि'' 'ब्रहन वेद ब्रहनेव भवति' अशी उपनिषदातील वाक्ये श्रवण करणे, त्यांचे मनन करणे. मनावर ठसविणे आणि निदिध्यास करणे म्हणजे चित्तात तो विचार सतत घोळविणे  होय.

अशा तऱ्हेने साधन चतुष्टय, निदिध्यासाने मोक्षप्राप्ती होईल.मोक्षप्राप्ती झाल्यावर आत्मा सत्, चित्त, आनंदाचा साक्षात्कार अनुभवतो, तो ब्रहनमय बनतो.

**५.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) ''ब्रहमसूत्रे'' कोणी रचले?

२) ब्रहमाचे स्वरुप कसे आहे?

३) शंकराचार्य कोणत्या सिद्धांताच्या आधारे जगाचे स्पष्टीकरण करतात?

४) मोक्षप्राप्तीचे तीन मार्ग कोणते?

५) अद्वैत वेदान्ताच्या भ्रमविषयक सिद्धांताचे नांव सांगा.

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) शंकराचार्य हे............................वेदान्ती म्हणून ओळखले जातात.

(अद्वैत / विशीष्टाद्वैत / द्वैत)

२) ...........................च्या सुषुप्ती, जागृती व स्वप्न ह्या तीन अवस्था आहेत.

(ब्रहम / जीव / जगत)

३) दोरीच्या ठिकाणी साप पहाणे...........................सत्तेचे उदाहरण आहे.

(व्यावहारिक / प्रातिभासिक / पारमार्थिक)

४) आत्म्यावरील आवरणे म्हणजे.............................होय.

(पंचकोश / अविद्या / माया)

५) ............................साठी सगुण ब्रहन आवश्यक ठरते.

(प्रार्थनेसाठी / उपासनेसाठी / ज्ञानासाठी)

## ५.४ सारांश

शंकराचार्य आपल्या अद्वैत वेदान्तात ब्रहनाचे स्वरुप स्पष्ट करतात. त्याच्या मते ब्रहन हे साक्षोचैतन्य, निर्गुण आणि नित्य असे आहे. ते जगाचे मिथ्या असे वर्णन करतात. जग हे बदलणारे परिवर्तनीय असे आहे त्याच्या मुळाशी ब्रहन आहे. जगाचे स्पष्टीकरण करण्यासाठी शंकराचार्यानी ''मायावाद'' मांडलेला आहे. अविद्येमुळे आपण ब्रहन या अंतिम सद्‌वस्तूवर जगाचा अध्यास (आरोप) करीत असतो.जीव आणि आत्मा यातील संबंध स्पष्ट करताना शंकराचार्य म्हणतात, पंचकोशामुळे आत्म्याला जीवत्व प्राप्त होते. आत्म्याला जेव्हा त्याचे खरे स्वरुप प्राप्त होते तेव्हा त्याला मोक्ष प्राप्त होतो. ''मोक्ष'' म्हणजे आत्म्याला त्याचे खरे स्वरूप प्राप्त होणे. मोक्ष प्राप्तीचे ज्ञान, कर्म, भक्ती असे तीन मार्ग आहे परंतू अद्वैत वेदान्ताच्या मते ''ज्ञान'' मार्ग हा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे.

## ५.५ स्वयंअध्ययन प्रश्नाची उत्तरे

अ)

१) बादरायण २) सत्+चित्+ आनंद सच्चिदानंद

३) मायावाद ४) ज्ञान, कर्म, भक्ती ५) अनिर्वचनीय ख्यातिवाद

ब)

१) अद्वैत २) जीव ३) प्रातिभासिक

४) पंचकोश ५) उपासनेसाठी

## ५.६ सरावासाठी स्वाध्याय.

१) अद्वैत वेदान्ताच्या ''ब्रहन'' चे स्वरुप स्पष्ट करा.

२) 'जग भासमय आहे' कसे ते विशद करा.

३) मायावादाचा सिद्धांत स्पष्ट करा.

४) मोक्षाचे स्वरुप स्पष्ट करा.

## ५.७ पारिभाषिक शब्द

१) साक्षीचैतन्य - बदलाला साक्षी असणारे चैतन्य (ब्रहन)

२) सत्तात्रयाचा सिद्धांत - तीन सत्ता- व्यावहारिक - प्रातिभासिक - पारमार्थिक विवेचनकरणारा सिद्धांत

३) अध्यास - आरोप

४) विवर्त - कार्य आणि कारण यांच्यातील विषम दर्जाची सत्ता

५) पंचकोश - आत्म्यावरील पांच आवरणे.

६) अविद्या- आत्म्याचे खरे स्वरुप जाणून घेणे हे अज्ञान.

**५.८ अधिक वाचनासाठी पुस्तके.**

पुस्तकाच्या शेवटी यादी दिलेली आहे.

घटक - ६

# सॉक्रेटिस व प्लेटो ( Socrates and Plato )

६.० उद्दिष्टे

६.१ प्रास्ताविक (जीवनवृत्तांत)

६.२ विषय - विवेचन

६.२.१ सॉक्रेटिसची पद्धती

६.२.२ सॉक्रेटिस - नैतिक शिकवण

६.२.३ प्लेटोची ज्ञानविषयक उपपत्ती

६.२.४ प्लेटोची कल्पना उपपत्ती

६.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

६.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

६.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

६.६ सारांश

६.७ सरावासाठी स्वाध्याय

६.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ६.० उद्दिष्टे :-

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

* सॉक्रेटिसच्या अभ्यास पद्धतीचे स्वरूप समजेल.
* सॉक्रेटिसची नैतिक शिकवण लक्षात येईल.
* प्लेटोची ज्ञानविषयक उपपत्ती समजून येईल.
* प्लेटोच्या कल्पना उपपत्तीचे स्वरूप कळेल.

## ६.१ प्रास्ताविक :-

सॉक्रेटिस -

तत्त्वज्ञानाच्या इतिहासात ग्रीक तत्त्वज्ञान अतिप्राचीन मानले जाते. आरंभीच्या तत्त्वचिंतकांनी मुख्यत: विश्वमीमांसा हे तत्त्वज्ञानाचे कार्य समजले आहे. प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञान थेलिस पासून ॲरिस्टॉटल पर्यंतचे मानले जाते. सॉक्रेटिस पूर्वीच्या तत्त्वचिंतकांनी विश्वाच्या मूलकारणाचा प्रश्न हा तत्त्वज्ञानाचा मुख्य प्रश्न मानलेला होता. थेलिस, ॲनॅक्झिमँडर, ॲनॅक्झिमेनिस, पायथागोरस यांनी तत्त्वमीमांसेला आरंभ केला.

त्यानंतरच्या पार्मेनायडिज या तत्त्वचिंतकाने सत्‌तत्वाचा (Theory of Being) विचार मांडला. ल्युपस व डेमॉक्रिटस अणुवादाच्या सहाय्याने विश्वमीमांसा केली व सूक्ष्म अणू हेच विश्वाचे अंतिम घटक होत असे प्रतिपादन केले.

ग्रीक तत्त्वज्ञानात मानवी समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था यावर तत्त्वचिंतन करणारा प्रथम तत्त्वचिंतक सॉक्रेटिस ठरतो. सॉक्रेटिसने पूर्वीच्या तत्त्वचिंतकांपेक्षा भिन्न विषय निवडून आपले विचार मांडले. आपण ज्या समाजात जगतो त्या समाजाचे स्वरूप, त्याचा वैचारिक आधार, सांस्कृतिक आधार हे सॉक्रेटिसच्या दृष्टीने महत्त्वाचे विषय आहेत. समाजातील शासन पद्धती व लोकमानस आदर्शवाद मानणारी नसेल तर समाजाचा ऱ्हास अटळ आहे असे सॉक्रेटिसला वाटते. म्हणून सॉक्रेटिसने भौतिक द्रव्यांच्या सहाय्याने तत्त्वचिंतन करण्याऐवजी समाजकेंद्री व मनुष्यकेंद्री तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून तत्त्वमीमांसा केली.

सॉक्रेटिसचा जन्म इ.स. पूर्व ४७० मध्ये अथेन्स शहरात झाला. त्याचे वडील शिल्पकार होते व आई गृहिणी होती. त्याचे शिक्षण व जीवनाच्या सुरूवातीच्या काळाविषयी विशेष माहिती उपलब्ध नाही. तो अथेन्स शहराचा अभिमानी असल्याने त्याने आपले संपूर्ण आयुष्य अथेन्समध्ये व्यतित केले. अथेन्सच्या लष्करी मोहिमेत त्याने भाग घेतला होता. जवळजवळ ३० वर्षे त्याने तत्त्वचिंतनाचे कार्य केले. सॉक्रेटिसचा कालखंड धर्मनिष्ठ विचारांचा प्रभाव मानणारा होता. परंतु धर्माच्या नावाखाली ग्रीसमध्ये सामान्यजनांची जी पिळवणूक होत होती तिला विरोध करणारा सॉक्रेटिस हा पहिला तत्त्वचिंतक ठरतो.

सॉक्रेटिस राष्ट्रीय देवतांचा अव्हेर करून स्वत:ची दैवते निर्माण करतो, अथेन्समधील युवकांना राजसत्तेच्या विरूद्ध भडकावून त्यांना वाममार्गाला लावतो असे अथेन्सच्या राजवटीने सॉक्रेटिसवर आरोप ठेवले. अथेन्सच्या न्याय व्यवस्थेने सॉक्रेटिसवर ठेवलेले आरोप खरे आहेत असे मानून सॉक्रेटिसला स्वहस्ते हेमलॉक नावाचे प्राणघातक विष प्राशन करण्याची शिक्षा सुनावली. न्यायदेवतेचा आपल्यावर अन्याय करणारा आदेशही सॉक्रेटिसने शिरसवंद्य मानून न्यायसभेमध्येच हेमलॉक विष प्राशन करून सॉक्रेटिसने देहत्याग केला.

**प्लेटो :-**

प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानामध्ये तत्त्वचिंतनाला सुव्यवस्थित स्वरूप देण्याचा पहिला प्रयत्न प्लेटोने केला. प्लेटोचा जन्म इ.स.पूर्व ४२७ मध्ये अथेन्समधील एका खानदानी घराण्यात झाला. प्लेटोचे खरे मूळ नाव ॲरिस्टोक्लिस होते. मात्र ग्रीसमधील तत्कालिन प्रथेनुसार सर्व तरुणांना भरपूर व्यायाम करून उत्तम शरीर संपदा प्राप्त करावी लागत असे. प्लेटो याला अपवाद नव्हता. त्याने भरपूर व्यायाम करून बलदंड शरीरयष्टी कमावली होती. त्याच्या भरदार व रूंद छातीवरून त्याचे नाव प्लेटो असे पडले आहे. मात्र पुढे तत्त्वज्ञानाच्या इतिहासात तो प्लेटो या नावानेच प्रसिद्ध झाला.

प्लेटो वयाच्या २० व्या वर्षी सॉक्रेटिसच्या संपर्कात आला व सॉक्रेटिसच्या मृत्यूपर्यंत सॉक्रेटिसचा शिष्य म्हणून राहिला. त्याने सॉक्रेटिसची शिकवण आत्मसात केली. अथेन्समधील लोकशाहीवर अधिष्ठित राज्यव्यवस्थेने त्याचे गुरु सॉक्रेटिसला खोट्या आरोपावरून देहांताची शिक्षा दिलेली होती. सॉक्रेटिसवरील राग त्यावेळची ग्रीकमधील लोकशाही त्याच्या अनुयायांवर काढील या भीतीने प्लेटो अथेन्स शहर सोडून निघून गेला. मेगॅरस, सायरीन, इजिप्त, इटली, सिसिली वगैरे देशांना भेटी देऊन वयाच्या ४० व्या वर्षी प्लेटो अथेन्सला परतला. अथेन्स येथे त्याने एक ॲकॅडमी - ज्ञानविद्यालय (आजच्या परिभाषेत त्यास विश्वविद्यालय म्हणता येईल) स्थापन केले व तेथे अध्यापन व लेखन करू लागला. प्लेटोच्या या गुरुकुलात जगभरातून विद्यार्थी येऊ लागले. किंबहुना प्लेटोच्या ॲकॅडमीमध्ये शिक्षण घेणे जगभरात प्रतिष्ठेचे मानले जाऊ लागले.

आपल्या गुरुला अथेन्सच्या लोकशाहीने देहांताची शिक्षा दिल्यामुळे प्लेटो लोकशाही राज्यव्यवस्थैचा तिरस्कार करू लागला. राज्यव्यवस्थेच्या संदर्भात तो म्हणत असे की, राज्यकर्ते विचारवंत, ज्ञानी, सुसंस्कृत व विवेकाला मानणारे असले पाहिजेत. त्याच्या या विचारातूनच 'तत्त्वज्ञ राज्यकर्ते' (Philosopher King) ही कल्पना उदयास आली. राज्यव्यवस्थेचे ओंगळ व मूर्त स्वरूप बदलून त्याला नीती व अध्यात्माचा पाया दिला पाहिजे अशी त्याची पक्की खात्री पटली व त्याच्या अशा विचारातून रिपब्लिक The Republie हा आदर्शवादी ग्रंथ उदयास आला.

प्लेटोने सर्व ग्रंथलेखन संवाद रूपाने केलेले आहे. त्याच्या बहुतेक ग्रंथामध्ये आपला गुरु सॉक्रेटिसला वक्ता केलेले आहे. त्याच्या संवादाचे तीन गट पडतात. पहिला गट प्लेटोने सॉक्रेटिसच्या हयातीत सॉक्रेटिसच्या हाताखाली शिष्य म्हणून असताना केलेल्या संवादांचा या गटात खालील संवादांचा समावेश होतो -

१) लायसिस (हा संवाद मैत्रीसंबंधाविषयी आहे).

२) ॲपॉलॉजी (Apology) - या संवादात सॉक्रेटिसने जे वर्तन केले त्याचे प्लेटोने समर्थन केले आहे. ३) क्रिटो - हा संवाद सॉक्रेटिसच्या कायदा पालनासंबंधी आहे.

३) **क्रियो - हा संवाद सॉक्रेटिसच्या कायदा पालनासंबंधी आहे.**

४) प्रोटॅगोरस - या संवादात प्लेटोने सोफिष्ट तत्त्वज्ञानावर टीका केलेली आहे.

५) लॅकेस - या संवादात धैर्य या सद्‌गुणावर चर्चा केलेली आहे.

६) कारमायडिस - या संवादात संयम या सद्‌गुणाची चर्चा केलेली आहे.

७) युथिफ्रो - हा संवाद सॉक्रेटिसच्या धर्मनिष्ठेसंबंधीत आहे.

प्लेटोच्या संवादाच्या दुसऱ्या गटात प्लेटोचे स्वत:चे तत्त्वज्ञान आलेले आढळते. या संवादावर इलियाटिक या अद्वैत मानणाऱ्या विचारांचा प्रभाव दिसतो. या गटात खालील संवाद मोडतात -

८) गॉर्जिआस - सद्‌गुणांच्या वस्तुनिष्ठतेचे तत्त्वज्ञान.

९) थियॅटिटस - सत्याच्या वस्तुनिष्ठतेची चर्चा.

१०) सोफिष्ट - ज्ञान, सत्, असत् यासंबंधीची चर्चा.

११) स्टेटस्मन - राजा, राजाने पाळावयाची नैतिक तत्त्वे.

१२) पार्मेनायडिज - अद्वैतवाद

१३) मेनो - संत्संकल्पाविषयी विचार

१४) युथिडिमस - सोफिष्टांच्या हेत्वाभासासंबंधी विचार

१५) पॉलिटिक्स - राजनीतिशास्त्राचे मूलगामी विवेचन

१६) क्रेटिलस - सोफिष्टांच्या भाषाशास्त्रावरील टिका

संवादाच्या तिसऱ्या गटात प्लेटोच्या विचारगर्भ तत्त्वज्ञानाचे दर्शन घडविणारे संवाद समाविष्ट आहेत.

१७) सिम्पोझिअम् - प्लेटोची सत्संकल्पनांवरील भक्ती

१८) फायलीबस - संवाद नीतिशास्त्राचे विस्तृत विवेचन करतो

१९) टिमिअस - पदार्थविज्ञान विषयक तत्त्वज्ञानाचा परामर्श

२०) रिपब्लिक - प्लेटोचे राजनीति, शिक्षण, साहित्य, कला, अध्यात्म, वगैरे विषयांवरील तत्त्वज्ञान

२१) फीडो - आत्म्याच्या अमरत्वासंबंधीचे तत्त्वज्ञान

२२) फिड्रस - राज्यातील शिक्षणक्रमासंबंधीचे तत्त्वज्ञान

२३ व २४) क्रिटिआस व लॉज - प्लेटोची नंतरची राजनीतिविषयक मते

## ६.२. विषय विवेचन -

### ६.२.१ सॉक्रेटिसची पद्धती :-

सॉक्रेटिसने विशिष्ट असे तत्त्वज्ञान किंवा तत्त्वज्ञानाचा संप्रदाय निर्माण केला नाही. तत्त्वज्ञानाच्या नंतरच्या इतिहासात अनुभववाद, बुद्धिवाद यासारखे तत्त्वज्ञानाचे संप्रदाय निर्माण झाले. यासारख्या संप्रदायाचे विवेचन त्याने केलेले नाही. कारण एखाद्या संप्रदायाचे विवेचन व समर्थन करणे म्हणजे तत्त्वचिंतनाला मर्यादा घालणे होय. सॉक्रेटिसचे तत्त्वज्ञान तत्त्वज्ञानातील सर्व संप्रदायांनी स्वीकारले यातून सॉक्रेटिसच्या तत्त्वदृष्टीचे द्रष्टेपण स्पष्ट होते.तत्त्वचिंतन अक्षरबद्ध होण्यासाठी त्या तत्त्वचिंतनाला विशिष्ट शब्दप्रयोगाने संबोधले पाहिजे. यादृष्टीने सॉक्रेटिसच्या विचारांना संवाद पद्धती म्हणून संबोधले जाते. सॉक्रेटिसची भूमिका केवळ तत्त्वचिंतन प्रकटपणे सांगणे एवढ्यापुरती मर्यादित नव्हती. तत्त्वचिंतन म्हणजे एखाद्या विचारवंताने, अधिकारी पुरुषाने किंवा जाणकाराने समाजातील सामान्य माणसांच्या व्यावहारिक समस्यांवर केलेले विचार व त्या समस्यांवर सुचविलेले उपाय होत.सॉक्रेटिसची अभ्यास पद्धती संवादात्मक होती. संवाद पद्धतीत एखाद्या प्रश्नाचे, समस्येचे नुसते उत्तर सुचविणे अपेक्षित नसून त्या प्रश्नाविषयी, समस्येविषयी समोरच्या व्यक्तीला विचार प्रवृत्त करणे अपेक्षित असते. उदा.चांगले प्रशासन म्हणजे काय ? या प्रश्नाचे संवाद पद्धतीद्वारे लोकांकडून जनतेचे प्रश्न सोडवणारे, जनतेच्या अडचणींचे निवारण करणारे, जनतेचे जगणे सुसह्य करणारे व जनतेला आपले वाटणारे असे प्रशासन हे उत्तर सॉक्रेटिसला अभिप्रेत असे.

संवाद पद्धतीद्वारे सॉक्रेटिस अथेन्समधील प्रशासनाच्या उणीवांचे लोकांमध्ये प्रबोधन करीत असे. या प्रबोधन कार्यासाठी त्याने अथेन्समधील सार्वजनिक ठिकाणे उदा.शहरातील महत्त्वाचे चौक, बाजारतळ व इतर गजबजलेल्या ठिकाणांची निवड केलेली आढळते. याचे कारण म्हणजे तेथे लोकांशी संवाद साधण्यासाठी लोक सहजपणे उपलब्ध होत असत.सॉक्रेटिसच्या संवाद पद्धतीचा मुख्य हेतू म्हणजे लोकांना जीवनातील व्यावहारिक प्रश्नांविषयी,स्थानिक प्रशासनाविषयी विचार प्रवृत्त करणे हा होय. सॉक्रेटिसचे मते स्वत: विचार करण्याविषयीच्या उदासिनतेतून व्यक्तिगत व सामाजिक प्रश्न वाढत जातात. सॉक्रेटिसने आपल्या संवाद पद्धतीत तरुण पिढीला प्राधान्य दिले होते. अथेन्स शहर व ग्रीक नगर राज्यांमध्ये प्रशासनाबाबत जे असमाधानकारक चित्र दिसत होते. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे लोकजागृती नसणे हे होय. विचारमंथनाबाबत अथेन्स मध्ये जी सामसूम दिसत होती त्यामुळे राज्यकर्ते अनिर्बंधपणे व अन्यायकारकपणे भ्रष्टाचार करीत होते. अथेन्सच्या राज्यकर्त्यांविरूद्ध बंड करण्यासाठी सॉक्रेटिसने तरुण पिढीला हाताशी धरले. आपल्या संवाद पद्धतीचा उपयोग करून अथेन्समध्ये लोक प्रबोधन करण्याचे महत्त्वाचे कार्य सॉक्रेटिसने केले.

**सॉक्रेटिसच्या संवाद पद्धतीची वैशिष्ट्ये :-**

**१) संशयवाद -**

सॉक्रेटिसच्या पद्धतीत संशयवाद (Scepticism) असतो. संशयवादात एखाद्या तथ्याविषयी, गोष्टीविषयी

सुरूवातीला शंका उपस्थित केली जाते, संशय व्यक्त केला जातो. उदा. 'हे' सोने खरे आहे काय ? म्हणजे आपल्या समोरच्या सोन्याच्या खरेपणाविषयी प्रथम संशय व्यक्त करावयाचा. या सोन्याच्या खरे-खोटेपणाविषयी जाणकार सुवर्णकाराचे मत घ्यावयाचे, विशिष्ट रसायन वापरून सोन्याला हिरवट रंग येतो काय ते पहावयाचे. या रासायनिक प्रचितीनंतरही आधीचे सोने हिरवट न पडता पिवळे धमकच राहत असेल तर सोने खरेच आहे असा निष्कर्ष काढावयाचा. म्हणजे संशयाचा शेवट सत्याच्या शोधामध्ये करावयाचा. यावरून सॉक्रेटिसचा संशय हा सत्यान्वेषण करणारा होता असे म्हटले पाहिजे.

**२) संभाषणात्मक -**

सॉक्रेटिस एखाद्या गोष्टीविषयी अनेक लोकांशी चर्चा करीत असे. चर्चेमध्ये अनेकांची अनेक मते असू शकतात. प्रत्येक व्यक्ती आपल्या वैचारिक कुवतीनुसार अनुभवातील वस्तूंविषयी, प्रश्नांविषयी आपले मत बनवित असते. वस्तूचे ज्ञान मिळविताना वस्तूविषयी भिन्न मते असतील. मात्र अगदीच भिन्न मत असेल तर ते विचारात न घेता त्याचे वर्जन करावयाचे. अनेकांपैकी जे मत 'साधारण' असेल, म्हणजे ज्याविषयी अनेकांचे एकमत होऊ शकते ते स्वीकारावयाचे. अशा रितीने संभाषण पद्धती वापरून सॉक्रेटिस ज्ञाननिश्चिती करीत असे. सॉक्रेटिसचे मते ज्ञानविस्तारासाठी, विचारांच्या विकासासाठी संभाषण पद्धती अधिक उपयुक्त आहे. कारण या पद्धतीत सर्वसाधारण विचारक्षमता असलेल्या व्यक्तीपासून ते विशेषज्ञापर्यंत सर्वांच्या सहभागाचा उपयोग करून घेता येतो.

**३) व्याख्यानात्मक व संकल्पनात्मक -**

सॉक्रेटिसचे मते वस्तूंच्या मुलभूत व निश्चित ज्ञानासाठी त्या त्या वस्तूंच्या व्याख्या करणे आवश्यक असते. या संदर्भात व्याख्या म्हणजे काय ? या प्रश्नाचे उत्तर प्रथम पाहू. शब्दांना, कल्पनांना अनेक अर्थ असू शकतात. जेव्हा अर्थाच्या बाबतीत अनेक पर्याय असतात तेव्हा नेमका कोणता अर्थ स्वीकारावयाचा हा प्रश्न उपस्थित होतो. व्याख्या म्हणजे एखाद्या पदाचा, शब्दाचा निश्चित ऊ नेमका व सर्वमान्य होईल असा अर्थ सांगणे होय. तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत एखाद्या पदाची व्यवच्छेदक लक्षण सांगणे, नेमका अर्थ सांगणे म्हणजे व्याख्या होय. पदाचा अथवा शब्दाची व्याख्या केल्यावर ते पद अथवा शब्द इतरांपासून कसे भिन्न आहेत हे स्पष्ट होते. सॉक्रेटिसचे मते व्याख्येशिवाय ज्ञानाचा विस्तार शक्य नसतो. व्याख्या करताना व्याख्येय वस्तूचे सार्वत्रिक स्वरूप स्पष्ट होते.

सॉक्रेटिसने आपल्या पद्धतीमध्ये न्याय, शहाणपण, धैर्य यासारख्या संकल्पनांच्या व्याख्या निश्चित केलेल्या दिसून येतात. आपल्या संभाषण पद्धतीद्वारे न्याय या संकल्पनेला योग्य गोष्ट करणे, असा एक अर्थ केला. उदा.कर्जदाराने आपण घेतलेल्या कर्जाची वेळेवर परतफेड करणे न्यायाचे आहे, योग्य आहे. प्रत्येकाने आपले नेमून दिलेले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणे म्हणजे न्याय होय. प्लेटोने आपल्या 'रिपब्लिक' या ग्रंथामध्ये सॉक्रेटिसने 'न्याय' या शब्दाचा जो अर्थ सांगितला तो प्रमाण मानलेला आहे. यावरून सॉक्रेटिस शब्दांचे किती अचूक अर्थ निश्चित करीत असे हे स्पष्ट होते. सॉक्रेटिसने शहाणपण, धैर्य यासारख्या संकल्पनांच्या व्याख्या निश्चित केलेल्या आहेत.

**४) अनुभवावर आधारित व विगामी :-**

तत्त्वज्ञानातील विचार केवळ काल्पनिक असणे योग्य नाही. तात्त्विक विचार सर्वसामान्य माणसाला समजले पाहिजेत यासाठी तत्त्वचिंतनाला लौकिक व्यवहाराती अनुभवांचा आधार असला पाहिजे. सॉक्रेटिसने अथेन्स नगर राज्यातील प्रशासनाचा स्वत: अनुभव घेतला होता व त्या अनुभवावरून त्याने आपले राज्य व्यवस्थेबद्दलचे विचार व्यक्त केले होते. सॉक्रेटिसचे मते जगताना माणसाने वेगवेगळे अनुभव मग - ते सुखद

असोत वा दु:खद असोत -घेतले पाहिजे व आपल्या अनुभवाच्या आधारे आपले विचार पक्के केले पाहिजेत. आपल्या विचारांचा अनुभव हा आधार असला पाहिजे असे सॉक्रेटिस आग्रहपूर्वक प्रतिपादन करतो.

विगामी पद्धती म्हणजे काय ?

तत्त्वज्ञान व तर्कशास्त्राच्या अभ्यासात विगामी पद्धती ही एक मान्यता पावलेली पद्धती आहे. आपल्या सभोवतीच्या विश्वातील सर्वच घटनांचे ज्ञान अथवा अनुभव आपल्याला नसतो. तथापि अनुभवातील काही मोजक्या घटनांच्या आधारे आपल्याला काही निष्कर्ष काढता येतात. विगामी पद्धतीत विशिष्ट उदाहरणे विचारात घेऊन त्यांच्या आधारे तशाच प्रकारच्या सर्व उदाहरणांविषयी एक व्यापक निष्कर्ष काढला जातो. उदा. 'क्ष' ही कष्टाळू व्यक्ती आयुष्यात यशस्वी झाली. 'य' ही कष्टाळू व्यक्ती आयुष्यात यशस्वी झाली. म्हणून सर्व कष्टाळू व्यक्ती आयुष्यात यशस्वी होतील. या निष्कर्षाचा अर्थ असा की जो जो कोणी आपापल्या क्षेत्रात कष्ट करील तो यशस्वी होईल असा सामान्य निष्कर्ष काढता येतो. विगामी पद्धतीत विशिष्ट उदाहरणांच्या सहाय्याने सामान्य निष्कर्ष काढला जातो मात्र हा निष्कर्ष संभाव्य मानला जातो. संभाव्य निष्कर्षाचे खंडन करणे शक्य असते, त्याचा बाध होऊ शकतो. आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा विकास ही विगमन पद्धतीची यशस्वी फलनिष्पत्ती मानली जाते.

**५) निगामी :-**

सॉक्रेटिसची पद्धती निगामी स्वरूपाचीही (Deductive) आहे. तत्त्वज्ञान व तर्कशास्त्राच्या अभ्यासात विगामी पद्धतीप्रमाणेच निगामी पद्धतीही विशेष महत्त्वाची आहे. या दोन पद्धतींचा उपयोग करून ज्ञानविस्तार शक्य असतो. जेव्हा एखाद्या व्यापक तत्त्वाच्या अथवा नियमाच्या आधारे ते तत्त्व अथवा नियम ज्या क्षेत्राला लागू पडतो त्या क्षेत्रातील सर्व वस्तूंच्याविषयी अनुमान करणे म्हणजे निगामी पद्धती होय. निगामी पद्धतीचे स्वरूप खालील युक्तीवादावरून स्पष्ट करू -

१) सर्व भौतिक वस्तू गुरुत्वाकर्षणाच्या नियमाने बद्ध आहेत.

२) दगड ही भौतिक वस्तू आहे.

म्हणून दगड गुरुत्वाकर्षणाच्या नियमाने बद्ध आहे. या युक्तीवादाचा निष्कर्ष आधार विधानांवरून म्हणजे पुराव्याच्या विधानांवरून निष्पन्न झाला आहे. तर्कशास्त्रातील अनुमानाचा आशय असा असतो की जर आधार विधाने सत्य असतील तर निष्कर्ष सत्यच असला पाहिजे. निगामी पद्धतीने प्राप्त झालेले निष्कर्ष सबळ पुराव्यावर आधारित असल्याने त्याचे खंडन करता येत नाही किंवा त्यांचा बाध होत नाही.

### ६.२.२ **सॉक्रेटिसची नीतिविषयक शिकवण** (Moral Teachings of Socrates) :-

ग्रीक तत्त्वज्ञानाच्या इतिहासात सॉक्रेटिसला जे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले ते मुख्यत: त्याच्या नीतिविषयक तत्त्वज्ञानामुळे होय. सॉक्रेटिसने तत्त्वज्ञानविषयक विशिष्ट विचार संप्रदाय सांगितलेला नसला तरी त्याच्या तत्त्वज्ञानाची तत्त्वज्ञानाच्या इतिहासात जी नोंद घेतली गेली ती प्रामुख्याने त्याने सांगितलेल्या व सर्वमान्य झालेल्या नीतिविषयक दृष्टीकोनामुळे. सॉक्रेटिस एक महान नीतिशिक्षक होता. आजही नैतिकतेच्या बाबतीत ''माणूस कसा असावा'' असा प्रश्न विचारला तर ''सॉक्रेटिससारखा असे '' उत्तर द्यावे लागते. अथेन्स या प्राचीन ग्रीक नगर राज्यामध्ये सॉक्रेटिसपूर्वी सोफिष्ट नावाचा तत्त्वज्ञानातील एक संप्रदाय होऊन गेला. सोफिष्ट संप्रदायातील विचारवंत मोठे तत्त्वपंडित होते. ते वादविवादात अत्यंत पटाईत असल्याने प्रत्यक्ष चर्चेमध्ये आपल्या प्रतिपक्षाला विचारांच्या पातळीवर नामोहरम करीत असत. सोफिष्टांच्या वादविवाद शैलीमुळे संपूर्ण ग्रीसमध्ये तत्त्वज्ञानाचे महान शिक्षक म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. सोफिष्ट व्यवहारवादाचे समर्थक असल्याने

प्रत्यक्ष व्यवहारात जगताना येणाऱ्या प्रश्नांचे व्यवहारवादी उत्तर शोधण्यास त्यांचे प्राधान्य होते. सोफिष्टांच्या व्यवहारवादी शिकवणीमुळे ग्रीसमध्ये व्यवहारवादी नीतिमत्ता (Practical Morality) मानली जाऊ लागली. प्रत्यक्ष व्यवहार व नीतिमत्ता यांचा मेळ बसणे कठीण होऊ लागल्याने शुद्ध नैतिक जीवनाचा पाया डळमळीत होऊ लागला. कोणत्याही मानवी समाजाची वैचारिक व नैतिक बैठक भक्कम असेल तरच तो समाज जीवनाच्या लढ्यात दीर्घकाळ टीकावा धरू शकतो.सॉक्रेटिसने ग्रीसमधील सोफिष्ट विचारवंतांनी समाजाला जे व्यावहारिक नीतिमत्तेचे धडे दिले व त्यामुळे ग्रीक नगरराज्याचा ऱ्हास कसा झाला यावर स्पष्टपणे भाष्य करावयास प्रारंभ केला. प्रत्येक मानवी समाजाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची उभारणी शाश्वत, चिरंतन व आदर्श तत्त्वांवर झाली पाहिजे, अशी सॉक्रेटिसची धारणा होती. सोफिष्टांच्या नैतिक शिकवणीमुळे समाजामध्ये जी स्वार्थ लोलुपता, मूल्यहीन, आदर्शाला न मानणारी वृत्ती निर्माण झाली ती रोखण्यासाठी उभ्या माणूस जातीला मार्गदर्शक ठरेल अशी आदर्श नैतिक शिकवण सांगितली.

**सॉक्रेटिसची नैतिक शिकवण :-**

सॉक्रेटिसची नैतिक शिकवण व त्याचे संपूर्ण नीतिशास्त्र पुढील तीन तत्त्वांवर आधारित आहे - १) सद्‌गुण म्हणजे ज्ञान २) सद्‌गुणांची शिकवण देता येते. ३) सद्‌गुण एकस्वरूपी आहे.

**वरील प्रत्येक तत्त्वाचे विस्ताराने स्पष्टीकरण करू :**

१) सद्‌गुण म्हणजे ज्ञान (Virtue is Knowledge) :-

सद्‌गुण म्हणजे व्यक्तीने हेतुत: प्राप्त करून घ्यावयाची गोष्ट. व्यक्तीच्या अंगी असलेले आदर्श गुण म्हणजे सद्‌गुण होय. प्राचीन काळापासून संयम किंवा सहनशीलता (Patience), न्याय (Justice), धैर्य (Courage) व शहाणपण (Wisdom) यांना सद्‌गुण म्हणून समाजमान्यता मिळाली आहे. सॉक्रेटिसने या चारही सद्‌गुणांचे आपल्या नैतिक शिकवणीमध्ये विवेचन केले आहे. सॉक्रेटिसच्या मतानुसार कोणत्याही माणसाला संयमाने वागल्याशिवाय, पराकोटीची सहनशीलता दाखविल्याशिवाय यशस्वी होता येणार नाही. संयम म्हणजे आपल्या वर्तनावर, कृतीवर, कार्यावर स्वत: नियंत्रण ठेवणे होय. आपली कृती आपल्या नियंत्रणात असेल तर कृती करण्यात चूक होणार नाही व ती कृती किंवा कार्य इतरांना मार्गदर्शक अशी होईल. संयम/सहनशीलता या सद्‌गुणाचा दुसरा अर्थ म्हणजे प्राप्त परिस्थितीवर माणसाला मात करता आली पाहिजे. परिस्थिती अनुकूल असो वा प्रतिकूल असो ती स्थिर मनाने पचविता आली पाहिजे.

'न्याय' या सद्‌गुणाचा अर्थ स्पष्ट करताना सॉक्रेटिस म्हणतो की, एखादी कृती योग्य रितीने करणे म्हणजे न्याय होय. त्यासाठी व्यक्तीला योग्य काय अयोग्य काय हे समजले पाहिजे. न्याय म्हणजे ज्या त्या व्यक्तीला व्यक्तीच्या सामाजिक स्थानाप्रमाणे वागणूक देणे होय. न्याय म्हणजे सर्वांना समान वागणूक देणे असे म्हणण्यात वरील आशय व्यक्त होतो. उदा.एखाद्या सामान्य अकुशल कामगारास उच्च पदस्थ अधिकाऱ्याइतके वेतन देणे म्हणजे न्याय नव्हे, तर त्या दोघांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे वेतन देणे म्हणजे न्याय होय. न्याय या शब्दाचा आणखी एक अर्थ म्हणजे 'समान परिस्थितीत असणाऱ्यांना समान वागणूक देणे'. म्हणजे सॉक्रेटिस सद्‌गुण व ज्ञानाला एकच मानतो. तेव्हा ज्ञान म्हणजे ज्ञानविषयाचे ठाम आकलन, सत्याचा साक्षात्कार व दैवी मूल्यांचे योग्य रसग्रहण असा अर्थ सॉक्रेटिसला अभिप्रेत आहे. सद्‌गुण जाणणे म्हणजे वरील सद्‌गुणानुरूप वागणे होय. आपल्याला ज्या गोष्टीचे ज्ञान नसते त्या गोष्टी आपल्या हातून घडल्यामुळे चुका होतात. म्हणून अज्ञान हे सर्व प्रमादांचे (चुकांचे) उगमस्थान होय. सद्वर्तन केवळ योगायोगाने कधीच घडत नाही.

२) **सद्‌गुणांची शिकवण देता येते** (Virtues can be taught) :-

सॉक्रेटिस नुसता पुस्तकी पंडीत नव्हता. समाजातील प्रत्येक माणसाच्या अंगी आदर्श, मूल्ये हे गुण असले पाहिजेत. त्याने अथेन्समधील सामाजिक जीवनातील दोष स्वत: अनुभवले होते. सॉक्रेटिसच्या वरील विधानातून 'यथा राजा तथा प्रजा' या लौकिक विधानाचा प्रत्यय येतो. सॉक्रेटिसचे मते समाज अनुकरणशील स्वभावाचा असतो. ज्यांना समाज गुरुस्थानी मानतो, आदर्श मानतो त्यांच्या प्रत्येक कृतीतून समाज काहीतरी शिकत असतो. ज्ञानी माणसापासून समाज ज्ञानप्राप्तीचा मार्ग शिकत असतो. वीरचक्र धारकाकडून धैर्य हा गुण घेतला जातो. सॉक्रेटिसने सांगितलेले वरील सद्‌गुण कसे अंगी बाणावेत याची समाजाला शिकवण देणे शक्य आहे. आपण भारतीय माणसे राष्ट्रपिता महात्मा गांधीपासून संयम, धैर्य, शहाणपण व न्याय या सद्‌गुणांची शिकवण घेतो.

३) **सद्‌गुण एकस्वरूपी आहे** (Virtue as a whole) :-

आपल्या अनुभवातील विषय कमी जास्त स्वरूपात सत्य असू शकतात. एखादी वस्तू इतके टक्के चांगली आहे पण तितके टक्के चांगली नाही असे आपल्या अनुभवात असू शकते. सॉक्रेटिसचे मते वस्तूप्रमाणे अंशिक सत्याची भाषा सद्‌गुणाबाबत वापरता येत नाही. म्हणजे शहाणपण हा सद्‌गुण ७० टक्के योग्य व ३० टक्के अयोग्य असे या सद्‌गुणाच्या बाबतीत म्हणता येत नाही. या संदर्भात सॉक्रेटिस म्हणतो की माणूस शहाणा असेल अथवा शहाणा नसेल, माणूस धैर्यवान असेल अथवा धैर्यवान नसेल. म्हणजे न्याय होय. उदा. अ आणि ब दोघेही कनिष्ठ लेखनिक असून दोघांचीही सेवा समान वर्षांची असेल तर त्या दोघांनाही समान वेतन देणे म्हणजे न्याय होय.

शहाणपण या सद्‌गुणाचे विवेचन करताना सॉक्रेटिस म्हणतो, की शहाणपण व बुद्धिमत्ता यांची गल्लत करू नये. शहाणपण म्हणजे माणसाची सारासार विचारबुद्धी. आपल्या सारासार बुद्धीचा उपयोग करून प्रसंगानुसार, परिस्थितीनुसार जो योग्य तोच निर्णय घेतो, योग्य तीच कृती करतो तो शहाणा होय. उदा. 'क्ष' हा बुद्धिमान पोलीस अधिकारी आहे. त्याच्यावर समाजातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची कायदेशीर जबाबदारी आहे. त्यास आवश्यक तेव्हा गोळीबार करण्याचा अधिकार असतो. त्याच्या कार्यालयावर जनतेचा मोर्चा आल्यावर तो अधिकारी गोळीबाराचा आदेश देऊ शकतो व मोर्चा पांगवू शकतो. मात्र मोर्चेकरी नेत्यांशी सौहार्दपूर्ण चर्चा करून, जनतेच्या भावना लक्षात घेऊन सामंजस्याने तो मोर्चेकऱ्यांना शांत करतो. या उदाहरणात पोलीस अधिकाऱ्याच्या बुद्धिमत्तेपेक्षा त्याचे शहाणपण अधिक उपयुक्त ठरते. म्हणून सॉक्रेटिसचा असा आग्रह होता की समाजाला शहाण्या माणसांची अधिक गरज आहे. शहाणपणात ज्ञान विषयाची पुरेशी ग्रहण क्षमता, पुरेपूर आकलन व प्रासंगिक निर्णय क्षमता यांचा समावेश असला पाहिजे असे सॉक्रेटिसचे मत असे.

धैर्य म्हणजे व्यक्तीच्या अंगी असलेली धाडसाची वृत्ती. प्रसंगाला सामोरे जाण्याची वृत्ती, परिस्थिती पासून पलायनवाद न स्वीकारता त्या परिस्थितीला जाणीवपूर्वक सतर्कतेने तोंड देणे म्हणजे धैर्य होय. सॉक्रेटिसचे मते शूराचा गुण म्हणजे धैर्य. सॉक्रेटिस समाजाला नैतिकतेचे शिक्षण देत असताना समाजातील प्रत्येकाने जीवनातील धैर्य हा सद्‌गुण अंगी बाणलाच पाहिजे याबाबत आग्रही असे. समाजातील भेकडांच्या फौजेपेक्षा एक शूरवीर केव्हाही श्रेष्ठ ठरतो. सद्‌गुणांबाबत आंशिक सत्य ही कल्पना चुकीची ठरते.

सॉक्रेटिसच्या नैतिक शिकवणीत त्याने चारित्र्याचा विचार केला आहे. त्याचे मते माणूस व प्राणी यात माणूस शतपटीने श्रेष्ठ आहे तो चारित्र्याच्या कल्पनेमुळे. ज्याचे वागणे न्याय, नीती, सामाजिक आदर्श, मूल्ये यांना अनुसरून असते असा मनुष्य चारित्र्यवान होय. जीवनात इतर गोष्टी मिळतील व जातील पण चारित्र्य मात्र संपादन करावेच लागेल. चारित्र्याशिवाय मनुष्य ही कल्पनाच करवत नाही. म्हणून माणसाने सक्षम चारित्र्य

संपादन करावे. चारित्र्यवान माणसे दीर्घकाळ समाजाच्या स्मरणात राहतात.

मानवाच्या भौतिक प्रगतीबाबत सॉक्रेटिस म्हणतो की, केवळ बाह्य-भौतिक प्रगतीवरून मानवी समाजाचे मोठेपण मोजले जात नाही तर मानवी समाज आंतरिकदृष्ट्या किती समाधानी आहे हे अधिक महत्त्वाचे आहे. माणूस विचार, कल्पना, सद्‌गुण, समाजशीलता, ज्ञानलालसा, राष्ट्रीय अस्मिता याबाबत किती समृद्ध आहे यावरून त्याचे सुख-समाधान मोजले पाहिजे. नैतिक जीवन मानवाच्या दृष्टीने किती श्रेष्ठ आहे याबाबत सॉक्रेटिस म्हणतो की, ''भौतिक समाधानाने तृप्त असलेल्या पशुपेक्षा असमाधानी विद्वान केव्हाही श्रेष्ठ होय.'' (It is better to be a man dis-satisfied than to be a pig satisfied.)

नीतिमत्तेचे श्रेष्ठत्व सांगताना सॉक्रेटिस म्हणतो की, माणसातून नीतिमत्ता वजा केल्यास शिल्लक राहतो तो पशू. सॉक्रेटिसच्या दृष्टीकोनातून सद्‌गुणाबरहुकुम आचरण करणे, प्रत्येक कृतीगणिक न्याय-नीति यांचा अवलंब करणे हीच मानवी आत्म्याची खरी सिद्धी होय.

**सारांश :-**

प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानात विश्वासंबंधी विवेचन केले. मात्र सॉक्रेटिस हा पहिलाच तत्त्वचिंतक की ज्याने मानवकेंद्री - मानवी जीवनासंबंधी महत्त्वाच्या विषयांना स्पर्श केला. सॉक्रेटिसला असे अभिप्रेत होते की, मानवी समाज चिरंतन व आदर्श मूल्यांवर आधारित असला पाहिजे. ज्या समाजाला शाश्वततेचे अधिष्ठान असत नाही त्या समाज जीवनाची वाताहत होते. याचे ठळक उदाहरण म्हणून सॉक्रेटिसने अथेन्स ग्रीक नगर राज्याचा ऱ्हास हे दिलेले आहे. नैतिक विचारांचे समर्थन करताना त्याने भौतिकाला गौण स्थान दिलेले आहे. समाजाचे श्रेष्ठत्व समाजातील भौतिक सुधारणांवर अवलंबून नसून समाजातील चारित्र्यवान, नीतिमान माणसांवर कसे अवलंबून आहे हे दाखवून दिले आहे. सॉक्रेटिसने तत्त्वज्ञानाच्या इतिहासात संशय पद्धतीला मानाचे स्थान मिळवून दिले. मात्र त्याची संशयपद्धती संशयासाठी संशय अशी नसून सत्यान्वेषण- सत्याचा शोध घेणारी संशय पद्धती आहे, ज्ञान विस्तार करणारी पद्धती आहे.

### ६.२.३ **प्लेटोची ज्ञानविषयक उपपत्ती** (Plato's Theory of Knowledge) :-

प्लेटोपूर्वी सोफिष्ट तत्त्वज्ञानामध्ये प्रोटॅगोरस या सोफिष्ट तत्त्वचिंतकाने 'संवेदन पद्धतीला' ज्ञानाची उपपत्ती म्हणून मान्यता दिली होती. प्रोटॅगोरसचे मते आपल्याला भौतिक वस्तूंचा संवेदनाच्या पातळीवर जो अनुभव येतो ते आपले वस्तूंविषयक ज्ञान होय. प्रत्येक ज्ञात्याला येणारा अनुभव म्हणजे त्याचे ज्ञान होय. यावरून 'मनुष्य हाच सर्व गोष्टींचा मापदंड होय' (Man is the measure of all things) हाच ज्ञानाचा निकष मानला. संवेदन हेच ज्ञानाचे प्रमाण साधन होय, पद्धती होय. ज्ञान हे संवेदनातून जन्माला येते व संवेदन हाच ज्ञानाचा आधार होय असा प्रोटॅगोरसने दृष्टीकोन स्वीकारला होता.

आपली ज्ञानेंद्रिये आपल्या अनुभवातील ज्ञानविषयांचे अनुभव घेतात, त्या अनुभवांचे ग्रहण होते व त्या अनुभवांतून आपल्याला ज्ञानप्राप्ती होते असे प्रोटॅगोरसने स्पष्ट केले आहे. सोफिष्टांच्या संवेदनजन्य ज्ञानाचे प्लेटोने आपल्या 'प्रोटॅगोरस' या संवादात खंडन केले आहे. हे खंडन म्हणजेच प्लेटोची ज्ञान उपपत्ती होय. प्लेटोच्या ज्ञान उपपत्तीत प्रोटॅगोरसच्या वरील सिद्धांतावर खालील आक्षेप घेतलेले आहेत -

१) प्लेटोचे मते आपले इंद्रियानुभव सारखे बदलत असल्यामुळे इंद्रियानुभवांमुळे एखाद्या ज्ञान विषयाचे विद्यमान ज्ञान भविष्यकालीन ज्ञानापेक्षा भिन्न असू शकेल.

२) एकाच वस्तूची संवेदने भिन्न प्रकारची असू शकतात. उदा.कावीळ झालेल्या व्यक्तीस समोरच्या सर्वच वस्तू पिवळ्या दिसतात. मग वस्तू नेमकी कशी मानावयाची ? पित्त व्याधीने ग्रस्त असलेल्या व्यक्तीला

साखरही कडू लागते. मग साखर कडू मानावयाची का ?

३) संवेदन उपपत्तीनुसार प्रत्येक व्यक्तीचे संवेदन व अनुभव भिन्न असल्यामुळे 'सामान्यज्ञान सिद्धांत' कधीच अस्तित्वात येऊ शकणार नाही.

४) सत्याविषयी प्रोटॅगोरस म्हणतो की, ज्याला त्याला भिन्न गोष्टी सत्य वाटू शकतात यावर प्लेटोचे प्रतिपादन असे की, प्रोटॅगोरसचा सत्याचा निकष मानला तर 'सामान्य सत्य' कधीच सांगता येणार नाही.

५) आपल्याला येणारा अनुभव हा केवळ इंद्रियांद्वारे प्राप्त होत नाही. येणाऱ्या अनुभवाचा अर्थ लावण्याचे महत्त्वाचे कार्य बुद्धीचे आहे.

६) ज्ञान प्रक्रियेत सोफिष्टांनी बुद्धी या घटकाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

७) सोफिष्ट तत्त्वज्ञानात ज्ञान व मत यात फरक केलेला नाही. एखाद्या गोष्टीबाबत आपण मते (Opinions) बनवित असतो. कालचे मत आज बदलू शकते. मत वरवरचे देखील असू शकते. मात्र ज्ञानाच्या बाबतीत असे असू शकत नाही. म्हणजेच प्रोटॅगोरस व सोफिष्टांनी ज्ञान उपपत्तीचा व्यापक आशय व अर्थ लक्षात घेतलेला नाही असे दिसून येते.

### ६.२.४ **प्लेटोची कल्पनाविषयक उपपत्ती** (Plato's Theory of Ideas) :-

प्लेटोच्या तत्त्वज्ञानातील महत्त्वाची उपपत्ती किंवा सिद्धांत म्हणजे प्लेटोची कल्पना उपपत्ती होय. आपल्या अनुभवात अनेक व्यक्ती, वस्तू असू शकतात. उदा. हिरवा चेंडू, पिवळा चेंडू, तांबडा चेंडू या सर्व उदाहरणात चेंडू तीन आहेत - वस्तू तीन आहेत. या तीनही चेंडूचे रंग भिन्न आहेत तरी या सर्वांमध्ये 'चेंडू' ही कल्पना एकच आहे. त्याची कल्पना उपपत्ती म्हणजे मानवी विचारांना वास्तविक अनुभवाच्या पातळीवरून वैचारिक पातळीवर नेणे होय.

**प्लेटोच्या कल्पना सिद्धांतानुसार कल्पनांची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे -**

१) कल्पना द्रव्यात्मक आहेत (Ideas are Substances). जे कशावरही अवलंबून नसते, स्वत:च निर्धारित असते त्यास द्रव्य म्हणतात. उदा.माणूस हा जीव हवा, अन्न, पाणी यावर अवलंबून आहे. पण 'मनुष्य' ही कल्पना यापैकी कशावरही अवलंबून नाही.

२) कल्पना सार्वदेशिक असतात (Ideas are Universal). याचा अर्थ कल्पना सर्वत्र असतात. कल्पनांना स्थलकालाचे बंधन नसते. उदा.कोणत्याही गावच्या, देशाच्या माणसांमध्ये मनुष्य ही कल्पना असते. एखादा अनोळखी माणूस भेटला तरी त्याला आपण माणूसच म्हणतो. कल्पना भूतकाळात होत्या, आज वर्तमानकाळी आहेत व भविष्यकाळातही असतील.

३) कल्पना पदार्थ रुप किंवा वस्तूरूप नसून विचाररूप असतात (Ideas are not things but they are thoughts). अनुभवातील वस्तूंचे अथवा पदार्थांचे अस्तित्व हे भौतिक अस्तित्व असते. वस्तूंचा ज्ञानेंद्रियांना अनुभव घेता येतो. मात्र वस्तूंच्या कल्पना ज्ञानेंद्रियाच्या कक्षेत येत नाहीत तर विचारानेच समजू शकतात. उदा.सुंदर वस्तू डोळ्यांना दिसते पण सुंदर वस्तूतील सौंदर्य विचारांनीच समजू शकते.

४) कल्पना ऐक्यरूप असतात (Ideas are Unitary). याचा अर्थ वस्तू अनेक असू शकतात पण त्या अनेक वस्तूतील कल्पना एकच असते. उदा.माणसे उंच, मध्यम, बुटकी, स्वार्थी, प्रामाणिक, लबाड अशी असू शकतात पण त्या सर्वातील 'मनुष्य' ही कल्पना मात्र एकच असते. यालाच नित्यम् एकम् अनेकानुगतम (one among many) असे म्हणता येईल.

५) कल्पना परिवर्तनीय असतात (Ideas are unchanging). अनुभवातील वस्तूंमध्ये सारखे परिवर्तन होत असते. वस्तूंचे स्वरूप सारखे बदलत असते. उदा. मातीपासून कुंभार घट बनवितो. आजचा घट काही वर्षांनी वेगळा वाटेल व नंतर फुटूनही जाईल. मात्र घट फुटला म्हणून घटाची कल्पना नष्ट होणार नाही.

६) प्रत्येक कल्पना हे पूर्णत्व असते (Every Idea is a perfection). अनुभवातील वस्तूंमध्ये तर-तमत्व असते म्हणजे वस्तू लहान-मोठ्या असू शकतात. वस्तू लहान असो वा मोठ्या असोत यावरून लहान वस्तूतील कल्पना लहान, मोठ्या वस्तूतील कल्पना मोठी असे मात्र असू शकत नाही. उदा.पर्वत लहान असो वा हिमालयासारखा मोठा असो 'पर्वत' ही कल्पना पूर्णत: असते.

७) कल्पना फक्त बुद्धीनेच जाणल्या जाऊ शकतात (Ideas are known by reason alone). कल्पना स्वरूपाने भौतिक वस्तूंसारख्या नसल्याने त्यांचा इंद्रिय संवेदनाने प्रत्यय येऊ शकत नाही. उदा.गायी आपल्याला इंद्रिय संवेदनाने दिसतात पण गायींमध्ये जे 'गोत्व' असते ते फक्त विचाराने किंवा बुद्धीनेच समजू शकते.

**६.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :-**

१) अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१) सॉक्रेटिसची पद्धती ------------ आहे.

( संवादात्मक / अनुभवात्मक / प्रामाण्यात्मक )

२) सॉक्रेटिसचे मते ------------ म्हणजे ज्ञान.

( सद्‌गुण / संवेदन / अंतर्ज्ञान )

३) सॉक्रेटिसची पद्धती ------------ चा शोध घेणारी आहे.

( सत्या / असत्याचा / लबाडीचा )

४) प्लेटोचे तत्त्वज्ञान ------------ आहे.

( आदर्शवादी / जडवादी / अनुभववादी )

५) आदर्श राज्यकारभारासंबंधी प्लेटोने ------------ हा ग्रंथ लिहिला.

( रिपब्लिक / फिडो / पॉलिटिक्स )

६) सोफिष्टांच्या ज्ञान सिद्धांताचे खंडन प्लेटोने -------- या संवादात केलेले आहे.

( प्रोटॅगोरस / युथिफ्रो / क्रेटो )

**ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) सॉक्रेटिसने कोणते सद्‌गुण सांगितले आहेत ?

२) सॉक्रेटिसला कोणते विष प्राशन करण्याची शिक्षा दिली गेली ?

३) अथेन्स येथे प्लेटोने स्थापन केलेल्या ज्ञान केंद्राचे नाव काय ?

४) कल्पनांची सार्वदेशिकता म्हणजे काय ?

५)   प्लेटोने ग्रंथलेखन कोणत्या स्वरूपात केले आहे ?

६)   प्लेटोने सत्याच्या वस्तुनिष्ठतेची चर्चा कोणत्या संवादात केली आहे ?

## ६.४ पारिभाषिक शब्द :-

| | | |
|---|---|---|
| संवाद | - | परस्परांमधील संभाषण |
| तत्त्वमीमांसा | - | एखाद्या विचाराचे विवेचन किंवा चर्चा |
| सत्‌तत्त्व | - | अस्तित्वविषयक तत्त्व |
| भौतिक विश्व | - | आपल्या सभोवतीचे जग |
| अ‍ॅकॅडेमी | - | ज्ञानकेंद्र |
| संवेदन | - | ज्ञानेंद्रियांनी होणारे ज्ञान |

## ६.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :-

१) अ)   १) संवादात्मक   २) सद्‌गुण   ३) सत्याचा

४) आदर्शवादी   ५) रिपब्लिक   ६) प्रोटॅगोरस

ब)   १) संयमशीलता, न्याय, शहाणपण व धैर्य हे चार सद्‌गुण सांगितले आहेत.

२) सॉक्रेटिसला 'हेमलॉक' विष प्राशन करण्याची शिक्षा दिली होती.

३) अथेन्स येथे प्लेटोने 'अ‍ॅकॅडेमी' हे ज्ञान केंद्र स्थापन केले होते.

४) कल्पना सर्वत्र असणे म्हणजे कल्पनांची सार्वदेशिकता होय.

५) प्लेटोने ग्रंथलेखन संवादात्मक स्वरूपात केले आहे.

६) सत्याच्या वस्तूनिष्ठतेची चर्चा प्लेटोने थिऑटिटस या संवादात केली आहे.

## ६.६ सारांश :-

प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञानात विश्वासंबंधीचे विवेचन केले गेले आहे. मात्र सॉक्रेटिस हा पहिलाच तत्त्वचिंतक की ज्याने मानवकेंद्री - मानवासंबंधी, राज्य व्यवस्थेसंबंधी महत्त्वाच्या विषयांना स्पर्श केला. सॉक्रेटिसला असे अभिप्रेत होते की, मानवी समाज चिरंतन व आदर्श मूल्यावर आधारित असला पाहिजे. ज्या समाजाला शाश्वततेचे अधिष्ठान असत नाही त्या समाजाचा ऱ्हास होतो हे अथेन्सच्या उदाहरणावरून दाखवून दिले आहे. समाजाची पडझड रोखण्यासाठी समाजाला नैतिक शिकवण देणे गरजेचे आहे असे आग्रहाने तो सांगतो. समाजाचे श्रेष्ठत्व समाजातील नुसत्या भौतिक सुधारणांवर अवलंबून नसते तर समाजातील चारित्र्यवान, नीतिमान माणसांवर कसे अवलंबून आहे हे दाखवून देण्यासाठी सद्‌गुणांचे समर्थन केले आहे. सॉक्रेटिसने सत्यशोधनासाठी संशय पद्धतीला महत्त्वाचे स्थान मिळवून दिले.

प्लेटोने आपल्या तत्त्वज्ञानात आदर्श राज्याची कल्पना स्पष्ट केली आहे. ज्ञानाच्या क्षेत्रात प्रणालीबद्ध तत्त्वज्ञान सांगणारा प्लेटो हा पहिला तत्त्वचिंतक ठरतो. राजनीति, शिक्षण, साहित्य अशा अनेक विषयांवर त्याने आदर्शवादी दृष्टीकोन सांगितले. सोफिष्टांच्या संवेदन सिद्धांताची समिक्षा करून ज्ञानसिद्धांताची स्थलकाल

निरपेक्षता प्रतिपादन केली. प्लेटोची कल्पना उपपत्ती म्हणजे मर्यादित अशा अनुभवांच्या जगापलिकडे पाहण्याचा बुद्धिवादी दृष्टीकोन होय. कल्पना उपपत्तीद्वारे त्याने आपल्या अनुभवांचे बौद्धिकीकरण केले आहे.

## ६.७ सरावासाठी स्वाध्याय :-

१) सॉक्रेटिसच्या संवाद पद्धतीचे स्वरूप विशद करा.

२) सॉक्रेटिसच्या सद्‌गुणांची चर्चा करा.

३) सॉक्रेटिसची नैतिक शिकवण स्पष्ट करा.

४) एक महान शिक्षक म्हणून सॉक्रेटिसचे कार्य सांगा.

५) प्लेटोची ज्ञान उपपत्ती स्पष्ट करा.

६) प्लेटोच्या कल्पना उपपत्तीचे स्वरूप स्पष्ट करा.

## ६.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :-

कृपया ग्रंथाच्या शेवटी सूची पहा.

▼ ▼ ▼

घटक - ७

# संत थॉमस अक्विनास ( St.Thomas Acquinas )

७.० उद्दिष्टे

७.१ प्रास्ताविक

७.२ विषय - विवेचन

७.२.१ ईश्वरशास्त्र व तत्त्वज्ञानाचा संबंध

७.२.२ श्रद्धा व बुद्धी

७.२.३ ईश्वराचे स्वरूप व ईश्वराच्या अस्तित्वासंबंधीचे पुरावे

७.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

७.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

७.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

७.६ सारांश

७.७ सरावासाठी स्वाध्याय

७.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ७.० उद्दिष्टे :-

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

* ईश्वरशास्त्र व तत्त्वज्ञानाचा संबंध समजेल.
* श्रद्धा व बुद्धी यांच्यातील संबंध स्पष्ट होईल.
* ईश्वराचे स्वरूप व ईश्वराच्या अस्तित्वाच्या पुराव्यांची माहिती होईल.

## ७.१ प्रास्ताविक :-

मध्ययुगीन कालखंडाच्या आरंभापासून ते प्रबोधन काळापर्यंत युरोपमध्ये धर्मसत्तेचा जीवनाच्या सर्व क्षेत्रावर विशेष प्रभाव होता. धर्म तत्त्वज्ञान हेच जीवनाचे तत्त्वज्ञान मानले जात असे. धर्मसत्तेच्या प्रभावकाळातच संत थॉमस अक्विनासचे जीवन गेले. अक्विनासचा जन्म इ.स.१२२४-२५ मध्ये एका कुलीन घराण्यात झाला. त्याचे वडील ॲक्विनो येथे काऊंट होते. ॲक्विनासचे प्रारंभिक शिक्षण कॅसिनोच्या ख्रिश्चन धर्म मठात (Abbey of Mante Cassino) झाले. अल्बर्ट दि ग्रेट या ख्रिश्चन धर्म पंडिताच्या सहवासात राहून त्याने १२५२ पर्यंत विद्याध्ययन केले.

थॉमस ॲक्विनासने Summa Cantra Gentiles d Summa Theologiae हे दोन महत्त्वाचे ग्रंथ लिहिले. या दोन्ही ग्रंथांमध्ये त्याने ख्रिश्चन धर्म तत्त्वज्ञान व ईश्वरशास्त्राचे विस्तृत विवेचन केले आहे.

### ७.२ विषय विवेचन :-

#### ७.२.१ ईश्वरशास्त्र व तत्त्वज्ञानाचा संबंध -

थॉमस अक्विनास धर्म तत्त्वज्ञानाचा विशेष अभ्यासक असल्याने त्याने धर्मतत्त्वज्ञान व तत्त्वज्ञानाचा संबंध दाखवून दिला आहे. त्याचे मते धर्मतत्त्वज्ञान हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. धर्मतत्त्वांच्या आधारे मानवाला धर्माप्रमाणे आचरण करा, इतरांचा द्वेष करू नका, परस्परांवर प्रेम करा, पापाचे आचरण करू नका, सदैव खरे बोला यासारख्या उदात्त तत्त्वांची शिकवण दिली जाते. ईश्वरशास्त्र हा धर्मशास्त्राचा एक उपविभाग असतो. ईश्वरशास्त्रानुसार विश्वात ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे. आपण जे काम करतो ते ईश्वराच्या इच्छेनुसारच करीत असतो. ॲक्विनासने धर्मशास्त्रे, ग्रीक तत्त्वज्ञान व ख्रिश्चन तत्त्वज्ञानांचा अभ्यास करून त्यातील ईश्वर, आत्मा या महत्त्वाच्या कल्पना निवडल्या. ईश्वरशास्त्र हा धर्मशास्त्राचा प्राण आहे. या विश्वात जे जे काही घडते ते ईश्वराच्या इच्छेनुसारच घडते अशी त्याची श्रद्धा होती.ॲक्विनासने ईश्वरशास्त्राचे जे समर्थन केले आहे ते ॲरिस्टॉटलच्या सत्ताशास्त्रातील ईश्वर विचारांचेच प्रकटन आहे. ईश्वरशास्त्र मानवी समाजाला आध्यात्मिक बैठक प्राप्त करून देते. ईश्वरशास्त्र तत्त्ववादाशी चिकटून राहणारे असल्याने ईश्वरशास्त्रात मानवी विचार स्वातंत्र्याला फारशी मुभा नसते. ईश्वरशास्त्रात त्रित्व (Trinity), अवतार कल्पना (Incarnation) व कालिक सर्जनता (Temporal Creation) या कल्पनांना विशेष महत्त्व असते.

तत्त्वज्ञान मानवी जीवनाचा सर्व बाजूंनी विचार करते. ॲक्विनासचे मते तत्त्वज्ञान म्हणजे संपूर्ण मानवी जीवनाला व्यापून टाकणारा विचार होय. तत्त्वज्ञानात धर्मशास्त्र-ईश्वरशास्त्र, संस्कृती, मूल्यशास्त्र व विज्ञानाचाही समावेश होतो. ईश्वरशास्त्र व तत्त्वज्ञानाचा संबंध दाखविताना तो म्हणतो की, ईश्वरशास्त्र जीवनाच्या आध्यात्मिक अंगाचा विचार करते. त्यात ईश्वराचा विचार व ईश्वराच्या आज्ञा हा मुख्य भाग असतो. ईश्वरशास्त्र मानवी आचरणाच्या शुद्धतेला श्रेष्ठ मानते. ईश्वरशास्त्रानुसार मानव कोठे जन्मला यावरून तो श्रेष्ठ-कनिष्ठ ठरत नाही तर तो कशा प्रकारचे आचरण करतो यावरून मानवाची श्रेष्ठता-कनिष्ठता ठरविली जाते. तत्त्वज्ञान मानवी अस्तित्व, नैतिकता, संस्कृती, विचार पद्धती उदा.अनुभववाद, बुद्धिवाद, ईश्वरशास्त्र या सर्वच अंगांचा विचार करते. तत्त्वज्ञानाचे अभ्यासक्षेत्र फारच व्यापक असते. ईश्वरशास्त्र व तत्त्वज्ञान हे दोन्हीही मानवी अस्तित्वासाठी आवश्यक असल्याने त्यांच्यात विरोध असू शकत नाही. या दोहोंत संबंध आहे असे सांगण्याचा हेतू म्हणजे ख्रिश्चनधर्म व ॲरिस्टॉटलचे धर्मशास्त्र व तत्त्वज्ञानविषयक विचारात त्याला मेळ बसवावयाचा होता.

#### ७.२.२ श्रद्धा व बुद्धी (Faith and Reason) :-

ख्रिश्चन धर्म तत्त्वज्ञानात धर्मवचनांना विशेष महत्त्व आहे. या तत्त्वज्ञानात सत्य, अहिंसा, प्रेम, करुणा, शांती, दया यांना जीवनाची शाश्वत मूल्ये मानले आहे. या जीवन मूल्यांना मानवी जीवनात उच्च स्थान असले पाहिजे. ॲक्विनासचे मते श्रद्धा म्हणजे ईश्वरावर अढळ विश्वास असणे, ईश्वराच्या अस्तित्वाविषयी विश्वास, ईश्वराबद्दल परम आदर असणे म्हणजे श्रद्धा होय. श्रद्धा ही मानवी जीवनाची आध्यात्मिक बाजू आहे. श्रद्धेमध्ये व्यक्तिनिष्ठता असते. प्रत्येक व्यक्तीची ईश्वरावर श्रद्धा असणे आवश्यक आहे. मध्ययुगात प्रत्येक गोष्टीचे नियंत्रण करणारे तत्त्व म्हणून ईश्वराकडे पाहिले जात असे. त्यातूनच ईश्वरश्रद्धा दृढ झाली. आपले कर्तव्य ईश्वरार्पण बुद्धीने करावे म्हणजेच आपल्या कर्तव्यावर श्रद्धा असणे होय.ॲक्विनासने मध्ययुगातील ईश्वरी कृपेच्या जगाला भौतिक जगाची जोड दिली. त्याचे मते श्रद्धा व बुद्धी या एकाच संपूर्ण अस्तित्वाच्या दोन पातळ्या आहेत.

बुद्धी - मानवाच्या शारीरिक क्रिया उदा.चालणे, पाहणे, ऐकणे व आंतरिक क्रिया अशा दोन प्रकारच्या क्रिया

असतात. कल्पना करणे, विचार करणे, स्मरण करणे या आंतरिक क्रिया होत. या आंतरिक क्रियांपेक्षा उच्च पातळीवर बुद्धीचे कार्य चालते. बुद्धी विवेकशील व विमर्शशील (Reflective) असते. योग्य काय अयोग्य काय हे ठरविणे विवेकबुद्धीचे कार्य असते व योग्य-अयोग्य काय हे ठरविल्यानंतर योग्य तेच करणे म्हणजे विमर्शशील बुद्धी होय. बुद्धी घटनांचे, विचारांचे अर्थ लावते, विश्लेषण करते. सदैव विचार करणे हे बुद्धीचे वैशिष्ट्य होय.

ॲक्विनासचे मते बुद्धी केवळ अनुभवातील संवेद्य वस्तूंचे ज्ञान करून देत नाही तर ती संपूर्ण अस्तित्वाचा विचार करते. बुद्धी आत्म्याला विश्वाच्या आदितत्त्वाकडे वळविते. श्रद्धा व बुद्धीचा संबंध स्पष्ट करताना ॲक्विनास म्हणतो की, या दोन्हीत विरोध असू शकत नाही. श्रद्धा ही व्यक्तिगत बाब आहे. मानवी बुद्धी श्रद्धेची चिकित्सा करू शकते. श्रद्धा ही आध्यात्मिक माणसाची गरज असते तर विचारी माणसाला विमर्शक बुद्धीची गरज असते. ज्ञान संपादनासाठी श्रद्धा व बुद्धी या दोन्हीचीही गरज असते. 'श्रद्धावान लभते ज्ञानम' ही उक्ती प्रसिद्धच आहे. श्रद्धेशिवाय बुद्धी कोरडी ठरते तर बुद्धीशिवाय श्रद्धा आंधळी ठरते.

### ७.२.३ ईश्वराचे स्वरूप व त्याच्या अस्तित्वाचे पुरावे -

ख्रिश्चन धर्म तत्त्वज्ञानात ईश्वराचे अस्तित्व मानलेले आहे. संत ऑगस्टाईन, संत ॲन्सेल्म यांनी ईश्वरी भूमिकेचा उघड पुरस्कार केला आहे. या तत्त्वज्ञानात ईश्वराविषयी 'दैवी कल्पना' (Divine Idea) स्वीकारली आहे. मानवी इतिहासात ख्रिस्ताच्या रूपाने ईश्वराचे एक प्रकटन - अवतार झाला आहे अशी या तत्त्वज्ञानाची श्रद्धा आहे. थॉमस ॲक्विनास ईश्वरप्राप्तीसाठी चर्च हे एक माध्यम मानतो. चर्चची मदत न घेता केवळ स्वत:च्या प्रयत्नांच्या बळाने मानव ईश्वरापर्यंत पोहोचू शकत नाही. चर्चकडून मिळणाऱ्या धार्मिक संस्कारांची ईश्वरप्राप्तीसाठी गरज आहे.

ॲक्विनासच्या तत्त्वज्ञानानुसार ईश्वर किंवा मानवी आत्मा द्रव्यविरहित (Matterless) असतात. भौतिक द्रव्यांना असे किंवा तसे विशिष्ट आकार असतात मात्र ईश्वर द्रव्यविरहित आकार (Pure Form) आहे. ईश्वर हा शुद्ध आकार आहे, शुद्ध साक्षातता (Pure Actuality) , विश्वातील सर्व वस्तूंमधील भेद ईश्वरात विलीन होतात, तो अद्वितीय (unique) आहे. ईश्वर हा 'परमजाती' (Absolute Genus) आहे. त्यानेच निसर्ग, मानवी आत्मा व देवदूत निर्माण केले आहेत.

ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी ॲक्विनासने पुरावे म्हणून खालील युक्तीवाद सांगितले आहेत -

१) **अचल चालकाचा युक्तीवाद** (Agrument of Unmoved Mover) :-

ॲक्विनासचा हा युक्तीवाद ॲरिस्टॉटलच्या 'अचल चालक' विचारासारखा आहे. आपल्या अनुभवातील सर्व वस्तू परिवर्तनीय आहेत, गतीमान आहेत. या सर्व वस्तूंना गती देणारी एक शक्ती असली पाहिजे. इतर वस्तूतील शक्ती हळूहळू कमी होत जाते. मात्र सर्व वस्तूंना गती व शक्ती देणारे तत्त्व सदैव शक्तीमान असले पाहिजे. ज्याप्रमाणे वाहन चालक स्वत: अचल राहून वाहन चालविती तसेच या विश्वाचे असले पाहिजे. म्हणून या विश्वाचा चालक असलेला ईश्वर हा स्वत: अचल असला पाहिजे. जगाच्या प्रारंभी असणारे व जगाचे प्रेरक तत्त्व म्हणजे ईश्वरच होय.

२) **निमित्त कारणाचा युक्तीवाद** (Agrument of Efficient Cause) :-

सर्जनाच्या प्रक्रियेत प्रत्येक वस्तूला विशिष्ट कारण असते. ठराविक कारणापासून ठराविक कार्य निर्माण होते. म्हणजे वस्तू ह्या स्वत:चे कारण असू शकत नाहीत. कारण हे कार्याच्या आधी असावयास हवे. प्रत्येक कारणाचे कारण मानावे लागते व या कारण परंपरेत मागे जात-जात जे आरंभीचे कारण असेल ते मूळ कारण ईश्वर असला पाहिजे. ॲक्विनास ईश्वराला जगाचे निमित्त कारण मानतो.

३) अनिवार्य अस्तित्वाचा युक्तीवाद (Argument of necessary Existence) :-

जगात वस्तू, प्राणी अस्तित्वात येतात व निसर्गक्रमात नष्टही होतात. अशा अस्तित्वाला नैमित्तिक अस्तित्व असे म्हणतात. या काही काळापुरतेच अस्तित्वात असलेल्या वस्तूंना काहीतरी अनिवार्य- आवश्यक असे अस्तित्व गृहीत धरावेच लागते. कधीही नाश न पावणारे हे अनिवार्य अस्तित्व म्हणजेच ईश्वर होय.

४) सर्वोच्चतेचा युक्तीवाद (Agrument of Supremaly) :-

या जगात वस्तू लहान-मोठ्या, पूर्ण-अपूर्ण, सुंदर-कुरुप आहेत. म्हणजेच अनुभवाच्या जगात तर-तमत्व आढळून येते. मात्र तरतमभावाने जे सर्वात श्रेष्ठ, अधिकाधिक परिपूर्ण व पूर्णतम असे काहीतरी असले पाहिजे व जे सर्वात परिपूर्ण असणारे सर्वोच्च अस्तित्व (Maximens) म्हणजे ईश्वरच होय. ॲक्विनासचा सर्वोच्च अस्तित्वाचा हा विचार संत ऑगस्टाईन व संत ॲन्सेल्म यांच्याही तत्त्वज्ञानात आढळून येतो.

५) प्रयोजनवादी युक्तीवाद (Teleological Agrument) :-

या जगातील प्रत्येक निर्मितीला हेतू असतो. आपण वस्तू निर्माण करतो त्या समाजाच्या उपयोगासाठी वस्तूंना स्वत:चे उद्दिष्ट नसते. बुद्धिमान प्राणी आपल्या हेतूसाठी - व्यावहारिक गरजांसाठी वस्तूंचा उपयोग करतात. ईश्वराला मात्र स्वत:चा कोणताही हेतू नसतो. ईश्वर हा या जगाचा नियंता, शिल्पकार, आयोजक (Designer) असला पाहिजे. ईश्वराच्या सिद्धीचा हा युक्तीवाद नंतर कांटच्या तत्त्वज्ञानातही स्वीकारलेला आढळतो.

थोडक्यात ॲक्विनासचा ईश्वर पूर्ण, निरवयव, प्रज्ञानी, अनंत, अविनाशी असा आहे.

**७.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :-**

१) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.

१) ॲक्विनासने ------- या धर्मपंडिताच्या सहवासात अध्ययन पूर्ण केले.

( अल्बर्ट दि ग्रेट / ॲन्सेल्स / ऑगस्टाईन )

२) ------- हा ॲक्विनासचा धर्मशास्त्रावरील ग्रंथ आहे.

( Summa Theologiae / Republic / Politics )

३) श्रद्धा व बुद्धी यांच्यात ------- असला पाहिजे.

( सुसंवाद / विरोध / व्याघात )

४) ईश्वर हा ------- असतो.

( परमजाती / वस्तुरूप / आकाररुप )

५) ईश्वर हा ------- आहे.

( अचल चालक / गतिमान / चंचल )

६) ईश्वराचे अस्तित्व ------- अस्तित्व आहे.

( अनिवार्य / नैमित्तिक / अल्पकालीन )

२) **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) ऑक्विनासचे प्रारंभिक शिक्षण कोठे झाले ?

२) ऑक्विनासने ईश्वरशास्त्रावर कोणते ग्रंथ लिहिले ?

३) ईश्वरशास्त्रात कोणत्या तीन कल्पना महत्त्वाच्या आहेत ?

४) संपूर्ण अस्तित्वाचे ज्ञान कशामुळे होते ?

५) विमर्शशील बुद्धी म्हणजे काय ?

## ७.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :-

| | | |
|---|---|---|
| मित्त्व | : | पिता, पुत्र व पवित्र आत्म्याचे एकत्रीकरण |
| श्रद्धा | : | परमेश्वरावर विश्वास ठेवणारी बुद्धी |
| ईश्वरशास्त्र | : | ईश्वराच्या अस्तित्वावर श्रद्धा ठेवणारे शास्त्र |
| सर्जनता | : | नवे निर्माण करण्याची शक्ती - क्षमता |
| मूल्य | : | जीवनात मानावयाची व पाळावयाची तत्त्वे |
| दैवी कल्पना | : | अनुभवापलिकडील कल्पना |
| प्रयोजन | : | हेतू |
| सर्वोच्च अस्तित्व | : | ज्या अस्तित्वापेक्षा दुसरे श्रेष्ठ अस्तित्व नसते. |

## ७.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :-

१) योग्य पर्याय - १) अल्बर्ट दि ग्रेट २) Summa Theologiae ३) सुसंवाद ४) परमजाती ५) अचल चालक ६) अनिवार्य

२) **एका वाक्यात उत्तरे :**

१) ऑक्विनासचे प्रारंभिक शिक्षक कॅसिनोच्या ख्रिश्चन धर्म मठात झाले.

२) ऑक्विनासने ईश्वरशास्त्रावर Summa Cantra Gentile d Summa Theologiae हे ग्रंथ लिहिले.

३) ईश्वरशास्त्रात मित्व, अवतार व कालिक सर्जनता या तीन महत्त्वाच्या कल्पना आहेत.

४) संपूर्ण अस्तित्वाचे ज्ञान बुद्धी होते.

५) विमर्शशील बुद्धी - प्रागतिक व स्वतंत्रपणे विचार करणारी बुद्धी म्हणजे विमर्शशील बुद्धी होय.

## ७.६ सारांश :-

संत थॉमस ऑक्विनास ख्रिश्चन धर्मतत्त्वज्ञानाचा महान उपासक होता. त्याने आपल्या तत्त्वज्ञानात धर्मतत्त्वज्ञानाची मानवी जीवनातील गरज विशद केली. मनुष्यप्राणी केवळ भौतिक जीवनाच्या आधारे जगू शकत नाही. त्याला आध्यात्मिक ज्ञानाचीही गरज असतेच. मानवी जीवनात श्रद्धा महत्त्वाची आहे. तत्त्व, विचार, कार्य-कर्तव्य यांच्या पूर्ततेसाठी श्रद्धेची आवश्यकता आहे. श्रद्धा व बुद्धी यांचा जवळचा संबंध आहे. त्यांच्यात विरोध नाही हे त्याने आग्रहपूर्वक प्रतिपादन केले आहे. या विश्वाच्या मुळाशी एखादे अभौतिक तत्त्व असले

पाहिजे. या श्रद्धेतून त्याने ईश्वरविषयक विचार स्पष्ट केले. ईश्वराचे अस्तित्व जड वस्तूंच्या अस्तित्वापेक्षा भिन्न आहे व हे अस्तित्व युक्तीवादांच्या आधारे सिद्ध करण्याचा प्रयत्न त्याने केला आहे.

### ७.७ सरावासाठी स्वाध्याय :-

१) ईश्वरशास्त्राची गरज स्पष्ट करा.

२) श्रद्धा व बुद्धी यांचे स्वरूप विशद करा.

३) ईश्वरशास्त्र व तत्त्वज्ञानाचा संबंध स्पष्ट करा.

४) ॲक्विनास ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी कोणते युक्तीवाद (पुरावे) देतो ?

### ७.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

ग्रंथाच्या शेवटी दिलेली सूची पहावी.

घटक - ८

# रेने देकार्त ( Rene Descartes )


८.० उद्दिष्टे

८.१ प्रास्ताविक

८.२ विषय - विवेचन

- ८.२.१ संशय पद्धती
- ८.२.२ मी जाणतो म्हणून मी आहे
- ८.२.३ शरीर मनाचे द्वैत
- ८.२.४ ईश्वराच्या अस्तित्वाचे पुरावे

८.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

८.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

८.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

८.६ सारांश

८.७ सरावासाठी स्वाध्याय

८.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ८.० उद्दिष्टे :-

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

* आधुनिक तत्त्वज्ञानाचे स्वरूप लक्षात येईल.
* रेने देकार्तच्या तत्त्वज्ञानातील संशय पद्धतीचे स्वरूप समजेल.
* 'मी' च्या अस्तित्वाविषयी माहिती होईल.
* शरीर-मनाचा संबंध स्पष्ट होईल.
* ईश्वराच्या अस्तित्वाविषयीचे पुरावे समजतील.

## ८.१ प्रास्ताविक :-

रेने देकार्तचे तत्त्वज्ञान अर्वाचीन (आधुनिक) तत्त्वज्ञानाचा भाग मानले जाते. अर्वाचीन युगाचा प्रारंभ इ.स.१४५३ पासून मानला जातो. अर्वाचीन तत्त्वज्ञान प्रामुख्याने मानवी बुद्धीचे सहाय्याने निसर्ग व मानवी जीवनातील सत्याचा शोध घेणारे आहे. या तत्त्वज्ञानात तत्त्वज्ञानातील महत्त्वाच्या संकल्पनांचे अनुभव व बुद्धिनिष्ठ स्वरूपाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न आढळतो.

मध्ययुगीन कालखंडानंतर तत्त्वज्ञानाच्या इतिहासात अनुभववाद, बुद्धिवाद यासारखे विचारप्रवाह उदयास आले. कारण मध्ययुगात विचारांच्या क्षेत्रात, ज्ञानाच्या क्षेत्रात तत्त्वज्ञानाचे (Dogmatism) व धर्मतत्त्वांचे प्राबल्य निर्माण झाले होते. त्यामुळे स्वतंत्र मानवी विचारांना महत्त्वच उरले नव्हते.रेने देकार्तचा जन्म ३१ मार्च १५९६ रोजी झाला. रेने देकार्त बुद्धिवाद्यांच्या परंपरेतील आद्य तत्त्वचिंतक मानला जातो. देकार्त गणित तत्त्वज्ञानाचा पुरस्कर्ता होता. देकार्तने Meditations on First Philosophy हा तत्त्वज्ञानावरील पहिला ग्रंथ लिहिला. निसर्ग विज्ञानाचा अभ्यास करून त्यावर त्याने Le Mande नावाचा ग्रंथ लिहिला. देकार्त हा अर्वाचीन तत्त्वज्ञानाचा जनक (Father of Modern Philosophy) आहे असे मानले जाते. कारण देकार्तच्या विचाराने तत्त्वज्ञानामध्ये सुव्यवस्थितपणा, तर्कशुद्धता व वस्तुनिष्ठता निर्माण केली.

**८.२ विषय विवेचन :-**

**८.२.१ संशय पद्धती** (Method of Doubt) :-

देकार्तच्या बुद्धिवादी तत्त्वज्ञानात त्याने संशयपद्धती वापरली आहे. या पद्धतीला कार्टेशियन पद्धती (Cartesian Method) असेही म्हटले आहे.  मानवी मनाच्या काही क्षमता असतात उदा.ज्ञान विषयाचा अर्थ लावणे, त्याचे ग्रहण करणे, ते स्मरणात ठेवणे. देकार्तची पद्धती मनाच्या स्वाभाविक कलाप्रमाणे ज्ञान मिळविण्यास मदत करते. त्याच्या पद्धतीत मनाच्या दोन कार्यशक्ती मानल्या आहेत. त्या कार्यशक्ती म्हणजे अंतर्ज्ञान (Intuition) व निगमन (Deduction) या होत.

**१) निगामी** – जेव्हा कोणत्याही ज्ञान माध्यमाशिवाय (उदा.डोळा, नाक, इ.) आपल्याला ज्ञान मिळते तेव्हा त्यास अंतर्ज्ञान असे म्हणतात. अंतर्ज्ञानात अवधानपूर्वक व नि:संदिग्ध अशी संशयविरहित संकल्पना असते.  अंतर्ज्ञान ही बुद्धीची क्रिया असून बुद्धीला होणारे स्पष्ट ज्ञान असते. त्यावर संशय घेता येत नाही. देकार्तच्या पद्धतीत निगमनाचाही समावेश आहे. निगमनात पायरी-पायरीने निष्कर्ष काढला जातो. उदा.गणितातील एखादे उदाहरण सोडविताना पायरी-पायरीने निष्कर्ष म्हणजे उत्तर मिळविले जाते.  देकार्तचे मते ज्ञानाचे पहिले किंवा आद्य तत्त्व अंतर्ज्ञानाने मिळते व ज्ञानातील निष्कर्ष निगमनाने मिळतो.देकार्तच्या पद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या मनात ज्या कल्पना असतात, आपले जे विश्वास पक्के झालेले असतात त्यांची छाननी करणे किंवा चिकित्सा करणे हे होय.  देकार्तची भूमिका बुद्धिवादी आहे हे यावरून स्पष्ट होते. आपली सत्याविषयीची जी भूमिका असते ती नेहमी तपासून घेतली पाहिजे. म्हणजेच सत्याविषयीची भूमिका प्रत्यक्ष असली पाहिजे.

**२) मौलिक स्वरूपाची** – देकार्तची संशयपद्धती तत्त्वज्ञानात अत्यंत मौलिक पद्धती मानली जाते. देकार्तच्या संशयाला एक स्वतंत्र स्थान आहे.  देकार्तची संशयपद्धती सामान्य माणसाची संशयपद्धती नव्हे. सामान्य माणसाच्या संशयाला तथ्याचा आधार असेलच असे नाही. उदा.एखादी व्यक्ती अविरतपणे कष्ट करते, जीवनाची कौशल्ये प्राप्त करते व आयुष्यात उत्तम यश मिळविते. सामान्य माणसाला या यशात काहीतरी काळेबेरे दिसते. म्हणजे त्याचा संशय रास्त वाटत नाही.

**तात्त्विक स्वरूप** – देकार्तचा संशय हा 'तात्त्विक स्वरूपाचा (Philosophical Doubt) ' आहे. केवळ संशयासाठी संशय घेणे असे नकारात्मक स्वरूप त्याच्या संशयवादात नाही.  एखाद्या गोष्टीच्या निश्चित ज्ञानास जाऊन पोहोचणे त्याच्या संशयाचे उद्दिष्ट आहे.  या संशय पद्धतीनुसार मनातील सर्व विचार, एखाद्या गोष्टीच्या सत्याविषयीची मते, विश्वास, मानवाच्या श्रद्धा यांच्या सत्यतेविषयी प्रथम संशय व्यक्त करावयाचा, त्यास पुराव्यांचा आधार द्यावयाचा. जर पुराव्यानंतर 'सत्य' हे सत्यच राहात असेल तर ते सत्य खरेच होय व सत्यावर आपण जो संशय घेतलेला असतो तो संशयच खोटा होय.

४) चिकित्सक - देकार्तचा संशय शास्त्रीय, चिकित्सक व सत्यशोधन करणारा आहे. त्यात चांगल्यावर चिखलफेक नाही किंवा असत्याला सत्य म्हणून स्विकारणेही नाही. देकार्तच्या कालखंडात पाश्चिमात्य देशांमध्ये बुद्धिवादाचे जे वैचारिक वारे वाहत होते त्याचा प्रभाव संशयपद्धतीवर पडलेला आढळतो. बुद्धिवादी तत्त्वज्ञान मानवी मनाला चिकित्सक बनविते, प्रत्येक गोष्टीची चिकित्सा करून ती स्वीकारण्याचा आग्रह धरते. तात्त्विक ज्ञानाला हट्टाग्रहवादाच्या (Dogmatism) प्रभावातून मुक्त करणे देकार्तच्या बुद्धिवादाचे लक्षण आहे.

### ८.२.२ मी जाणतो म्हणून मी (अस्तित्वात) आहे (Cogito Ergo Sum) :-

देकार्तच्या तत्त्वज्ञानात त्याच्या संशयवादाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. संशयवादानुसार आपल्या सभोवतीच्या कोणत्याही गोष्टीची सत्यता प्रथमदर्शनी संशयास्पद असू शकते. आपले विचार, विश्वास, श्रद्धा, आनुभविक सत्य या सर्वांविषयी संशय असू शकतो. या गोष्टींच्या सत्यतेबाबत आपण उपस्थित केलेल्या शंका पुराव्यांच्या / प्रमाणांच्या आधारे खोडून काढता येतात. म्हणजेच कोणत्याही गोष्टीच्या संशयाचे निराकरण किंवा वर्जन केले की निखळ सत्य हाती लागले. विज्ञानातील प्रचिती तत्त्वाचा उपयोग करून संशय खोटा ठरविता येतो.देकार्तचे 'मी जाणतो म्हणून मी आहे' हे तत्त्व म्हणजे त्याच्या तत्त्वज्ञानातील आत्म तत्त्वाचा विचार आहे. 'मी' चे अस्तित्व आपल्या प्रत्येक अनुभवात स्पष्ट होत असते. मी सुरेल गीत ऐकले, असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा ते गीत आपल्या कानी पडले, ते सुरेल आहे असे आपणास आकलन झाले. या सर्व क्रियांमध्ये आपले अस्तित्वात असणे प्रथम आवश्यक आहे. आपल्या अनुभवातील ज्ञान विषयांचे स्वरूप असे आहे किंवा तसे आहे याविषयी आपणास संशय येऊ शकेल. पण संशय घेणारा अस्तित्वात असल्याशिवाय संशय नावाची प्रक्रिया असू शकत नाही. विचार असण्यासाठी विचार सांगणारा, विचार करणारा अस्तित्वात असलाच पाहिजे. म्हणजे विचार सांगणाऱ्यावर संशय नावाची प्रक्रिया चुकीची ठरते. संशय असेल तर तो कशाला तरी असेल व कोणाचा तरी असेल यावरून असे म्हणता येईल की संशयावरून 'संशय घेणारा' व्यंजित होतो (Doubt implies Doubter). तर्कशास्त्राच्या सरल परिभाषेत असे म्हणता येईल की जर संशय असेल तर संशयाच्या आधी संशय घेणारा अस्तित्वात असला पाहिजे. या संदर्भात देकार्त म्हणतो की, 'मी जाणतो म्हणून मी आहे (I think therefore I am) ' हे माझ्या तत्त्वज्ञानाचे आद्य तत्त्व आहे.देकार्तचे 'मी जाणतो म्हणून मी आहे' हे विधान केवळ अनुमानात्मक नाही तर जाणणारा 'जे' आहे त्याचे अस्तित्व ही एक वास्तविकता आहे. आपण जाणत असण्यातच आपले अस्तित्व अंतर्भूत आहे. आपल्या अस्तित्वाची जाणण्याखेरीज अन्य कोणत्याही पुराव्याने सिद्धता देण्याची गरज नाही. 'मी जाणतो म्हणून मी आहे' हे अत्यंत स्पष्ट व स्वयंसिद्ध सत्य आहे आणि हे तत्त्व तत्त्वमीमांसेचा आरंभबिंदू आहे.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, देकार्तच्या तत्त्वज्ञानाचा पाया 'आत्म्याचे अस्तित्व' हा आहे. आपल्या संशय घेण्यामध्येही आत्म्याचे अस्तित्व असतेच. आपल्या ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने आत्मतत्त्वाची प्रचिती घेता येत नाही. प्रत्यक्ष इंद्रिय अनुभवाच्या पातळीवर भौतिक वस्तूंप्रमाणे त्याचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही. आत्म्याच्या अस्तित्वाशिवाय 'जाणीव' किंवा ज्ञान होणे शक्य नाही. आत्मा म्हणजे आपल्याला होणाऱ्या ज्ञानाची अनिवार्य अशी पूर्व उपाधी (necessary precondition) आहे. आत्म्याचे अस्तित्व नाकारण्यातही आत्म्याचे अस्तित्व असतेच. आत्म्यासंबंधी 'केन' उपनिषदात म्हटले आहे की, जे डोळ्यांनी दिसत नाही पण ज्याच्या साहाय्याने डोळे पाहतात, जे कानांनी ऐकता येत नाही पण ज्याच्या साहाय्याने कान ऐकतात तसा आत्मा दिसत नाही. आपल्या जाणीवपूर्वक ज्या ज्या क्रिया होतात त्या सर्वांमध्ये आत्मा उपस्थित असतो. संशय घेणारी, विचार करणारी, कल्पना करणारी, कल्पना नाकारणारी, आकलन होणारी, स्मरण होणारी जी 'अवस्था' आहे ती 'मी' ही आहे.

'मी जाणतो म्हणून मी आहे' या तत्त्वाच्या आधारे देकार्त बुद्धिवादाच्या थोडे पुढे जातो असे मानावे लागेल. कारण बुद्धीवर आधारित सर्व क्रियांमध्येही 'मी' म्हणजेच आत्म्याचे अस्तित्व मान्य करावेच लागते. यावरून देकार्त म्हणतो की, आत्मतत्त्व म्हणजे मानवी ज्ञानाचे प्रथम गृहीतत्त्वच होय.

### ८.२.३ **शरीरमनाचे द्वैत** (Dualism of Body and Mind) :-

देकार्तच्या तत्त्वज्ञानात शरीर-मन संबंधावर महत्त्वपूर्ण चर्चा केलेली आढळते. देकार्तचे तत्त्वज्ञान बुद्धिवादी तत्त्वज्ञान असल्याने त्याने शरीर-मन संबंधाची चर्चा बुद्धिवादी दृष्टीकोनातून केली आहे. देकार्तने शरीर व मनाला स्वतंत्र द्रव्ये मानले आहेत. ते स्वतंत्र असून एकमेकांहून भिन्न आहेत. विस्तार हा शरीराचा गुण मानला आहे तर विचार हा मनाचा गुण मानला आहे. म्हणजे शरीराला असे किंवा तसे उदा.सशक्त, सडपातळ असे परिमाण आहे. शरीर जागा व्यापते. म्हणजे भौतिक द्रव्याचे गुण शरीरात दिसून येतात. तर मनाला भौतिक द्रव्याप्रमाणे विस्तार नाही. ही दोन द्रव्ये परस्पर भिन्न (व्यावर्तक) आहेत हे त्यांच्या स्वरूपावरून सांगता येते. उदा. शरीराला परिमाण आहे (म्हणजे माझे वजन ५५ किलो ग्रॅम, ६० किलोग्रॅम आहे असे म्हटले जाते) मनाला इतके किंवा तितके परिमाण नाही. शरीर जागा व्यापते, मनाला जागा लागत नाही. शरीर दृष्टी संवेदनाने कळते मन दृष्टीसंवेदनाने कळत नाही.

देकार्त शरीर-मन द्वैतवादात असे प्रतिपादन करतो की, जरी शरीर-मन स्वरूपत: भिन्न असले तरी त्यांच्यात अत्यंत निकटचा संबंध आहे. उदा.आपल्याला तहानभूक लागली तर जीव कासावीस होतो. आपल्या कार्यावर आपले लक्ष लागत नाही. शरीराला बाह्य गोष्टींमुळे अथवा शरीरांतर्गत बदलामुळे जखम झाली तर मनाला वेदना होतात, आपला जीव विव्हळतो. एखादा निसर्गरम्य देखावा पाहिला, कर्णमधूर संगीत ऐकले तर मन उल्हसित होते. म्हणजेच वरीच प्रकारच्या शारीरिक क्रिया घडल्या तर मनाला सुखद अथवा दु:खद अनुभव येतात. याचा अर्थ शरीरात होणारे बदल व शारीरिक क्रियांमुळे मनावर आघात होऊन मनात बरे-वाईट बदल घडवून आणतात. वरील विवेचनातून शरीरातील बदलांचे किंवा क्रियांचे मनावरील परिणाम स्पष्ट होतात.

त्याचप्रमाणे मनात होणाऱ्या बदलांमुळे शरीरावर परिणाम होतो. आपले मन ज्या कल्पना करते त्या कल्पनांना अनुसरून कार्य करण्यास शरीर सज्ज होते. उदा.मी आयुष्यात यशस्वी व्हावयाचे अशी प्रतिज्ञा केली तर आयुष्यात यशस्वी होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रत्येक कृती-कार्यासाठी शरीर सज्ज होते. देकार्तचे मते मानव म्हणजे शरीर व मनाचे संयुग आहे. शरीर व मनाचे द्वंद्व आहे. शरीर-मनाचा संबंध जहाज व त्याचा कप्तान यांच्या संबंधासारखा नसतो म्हणजेच यांत्रिक स्वरूपाचा नसतो. आपल्या मनाचा शरीराशी निकटचा संबंध नसता तर आपल्याला भूक लागल्यावर आपण व्याकुळ झालो नसतो. शरीराला प्रसंगानुसार होणाऱ्या वेदनांनी आपण दु:खी, आनंदी अथवा रोमांचित झालो नसतो.

शरीर व मन ही दोन्ही द्रव्ये स्वतंत्र व भिन्न असली तरी त्यांच्यात ऐक्य झालेले असते व त्या दोघांचेही अस्तित्व स्वतंत्रपणे स्पष्ट होत असते. शरीर व मन यांच्यात आंतरक्रिया घडत असतात. आंतरक्रियेत दोघांचा एकमेकांशी सतत संबंध येत असतो. शरीर व मनामध्ये घडणाऱ्या आंतरक्रिया कारण - स्वरूपाच्या असतात. कार्यकारणामध्ये जसे कारणात बदल झाला तर कार्यातही बदल घडतो त्याप्रमाणे शरीरात होणाऱ्या बदलाचा मनावर परिणाम होतोच. आंतरक्रियावादानुसार आत्म्याचा शरीराशी जो संयोग होतो त्याचा मुख्य आधार म्हणजे मेंदूतील पिनियल ग्रंथी हा होय. विस्तार व विचार हे अनुक्रमे शरीर व मनाचे जे गुणधर्म आहेत त्यांचे एकत्रीकरण मेंदूतील पिनियल ग्रंथीमध्ये होते. पिनियल ग्रंथीमध्ये जी स्पंदने (हालचाल) निर्माण होतात ती मनाने संक्रमित होतात. मनाला जेव्हा एखादी क्रिया करण्याची इच्छा होते तेव्हा प्रथम पिनियल ग्रंथीत स्पंदने निर्माण होतात व त्याद्वारे शरीरात ती विशिष्ट क्रिया करण्यासाठी हालचाली होतात. यावरून असे स्पष्ट होते

की, शरीर व मनाचा संबंध कारण तत्त्वानुसार येतो व या दोहोत क्रियेनुसार योग्य त्या हालचाली घडण्यास पिनियल ग्रंथीचा माध्यम म्हणून उपयोग होतो. देकार्तच्या वरील विवेचनाला आंतरक्रियावाद (Interactionism) असेही म्हटले जाते.

यंत्रातील भूताची कल्पना (The Ghost in mechine) - देकार्त आपल्या तत्त्वज्ञानात असे स्पष्ट करतो की जरी शरीर-मन स्वतंत्र द्रव्ये असली तरी त्यातील एकाचा दुसऱ्याशी संबंध लावल्याशिवाय मानवी अस्तित्वाचा अर्थच लावता येत नाही. देकार्तचे मते शरीर व मनाचा संबंध यंत्रातील भूताच्या कल्पनेप्रमाणे आहे. यंत्रातील भूताची कल्पना म्हणजे यंत्रातील कार्य करणारी शक्ती नेमकी यंत्राच्या कोणत्या भागात असते हे ठामपणे सांगता येत नाही. त्याप्रमाणेच शरीर व मनाचा नेमका संबंध कोठे येतो हे देखील सांगता येत नाही. देकार्तच्या यंत्रातील भूताच्या कल्पनेने तत्त्वचिंतकांना संभ्रमात टाकले आहे. कारण भूताच्या असंभव कल्पनेचा मानवी बुद्धीला पटणारा अर्थ सांगता येत नाही. २० व्या शतकातील प्रो.गिलबर्ट राईल यांच्यासारख्या विद्वानालाही देकार्तच्या वरील कल्पनेने संभ्रमात टाकले आहे. प्रो.राईल यांचे मते शरीर व मन या स्वतंत्र व परस्पर भिन्न द्रव्यांना एकत्र आणण्याचा देकार्तने तर्कशास्त्रात न बसणारा संबंध आणला आहे व ही देकार्तची चूक आहे. देकार्तच्या या भूमिकेला 'पदार्थांतर प्रमाद' (Category Mistake) असे म्हटले जाते.

थोडक्यात देकार्तने शरीर-मन द्वैतवादात शरीर व मनाचे स्वरूप स्पष्ट करून त्यांच्यात असलेला व प्रत्यक्ष मानवी अनुभवात येणारा संबंध दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

### ८.२.४ **ईश्वराच्या अस्तित्वाचे पुरावे** (Proofs for the Existence of God) :-

देकार्त हा बुद्धीवादी परंपरेतील तत्त्वचिंतक होय. बुद्धिवादी तत्त्वज्ञानाची परंपरा विज्ञानाच्या विकासाबरोबर अधिक सक्रीय झालेली आढळते. बुद्धिवादी तत्त्वचिंतकांनी विज्ञानातील प्रत्यक्षवाद, अनुभववाद मानला असला तरी 'ईश्वर' या संकल्पनेचे जोरदारपणे समर्थन केलेले आढळते. बुद्धिवादानुसार अनुभव गम्यता व बुद्धिगम्यता यात विरोध असण्याचे कारण नाही.

देकार्तपूर्वी संत ॲन्सेलम, संत ऑगस्टाईन या धर्म-तत्त्वचिंतकांनी ईश्वरवादाचे (Theism) प्रतिपादन केलेले आढळते. देकार्तने १७ व्या शतकात ईश्वरवादाचा पुरस्कार केला त्यावर मध्ययुगीन कालखंडातील धर्मतत्त्वांचा प्रभाव जाणवतो. देकार्तचा ईश्वराविषयीचा दृष्टीकोन केवळ तर्कावर आधारित नाही तर अस्तित्ववादी स्वरूपाचा आहे. देकार्त उपजत कल्पनांचे अस्तित्व मानतो. त्याचे मते आपल्याला जन्मत:च अनेक कल्पना प्राप्त असतात. उदा.वस्तूंचे हिरवे, पिवळेपण आपल्याला न शिकविता कळतात. त्याअर्थी हिरवे, पिवळे याविषयीच्या कल्पना जन्मजात आहेत असे तो ठामपणे सांगतो. पुढे तो असेही म्हणतो की, इतर कल्पनांप्रमाणेच मला माझ्या मनात 'ईश्वर' ही कल्पना सापडली. ती बाहेरून कोणी माझ्यावर लादलेली नाही. म्हणजे माझ्या मनात ही कल्पना बाहेरून संवेदन अथवा इतर ज्ञान माध्यमांतून आलेली नाही. यावरून ईश्वर अस्तित्वात असला पाहिजे असे मानण्यात तार्किक विसंगती दिसत नाही. देकार्तने आपल्या तत्त्वज्ञानात ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी खालील पुरावे/युक्तीवाद दिलेले आहेत.

**१) कारण युक्तिवाद** (Agreement of Causation ) :-

कार्यकारणाचा विचार करताना देकार्त म्हणतो की, कारण हे कमीतकमी कार्याइतके तरी मोठे असले पाहिजे. तसेच आपल्या अनुभवातील कोणतीही गोष्ट परिपूर्ण नाही. जे स्वत:च परिपूर्ण नाही ते त्याच्यापेक्षा अधिक परिपूर्ण असलेल्या गोष्टीला कसे निर्माण करील ? मी व माझे अस्तित्व हे परिपूर्ण नाही. माझी व आपली परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने वाटचाल चालू आहे. यावरून देकार्त असे प्रतिपादन करतो की, आपल्यापेक्षा परिपूर्ण असे ईश्वराशिवाय काहीही असू शकत नाही. परिपूर्णतेमध्ये अस्तित्व अंतर्भूत असते. हे भौतिक विश्व

अत्यंत व्यापक आहे, मोठे आहे. या अत्यंत व्यापक अशा विश्वाचे कारण ईश्वराशिवाय दुसरे कोणतेही असू शकत नाही. म्हणून ईश्वर अस्तित्वात असला पाहिजे असे मानावेच लागते.

२) **सान्त- अनन्त संबंध** (Finite-Infinite Relation) :-

देकार्तचे मते आपल्या अनुभवातील कोणतीही वस्तू मर्यादित आहे. सान्त म्हणजे ज्याला अंत आहे, मर्यादा आहे असे. जर आपण परिपूर्ण असतो तर आपण स्वत:ला पाहिजे तसे बनवू शकलो असतो. आपल्याला ज्ञान, शक्ती याबाबत मर्यादा आहेत हे आपण जाणतो. याचा अर्थ आपल्यापेक्षा काहीतरी अमर्याद आहे, अनंत आहे. यावरून तो म्हणतो की, आपल्या अस्तित्वाच्या तुलनेत जे अनंत आहे ते ईश्वरच असले पाहिजे.

३) **निर्मितीविषयक युक्तिवाद** (Argument of Creation) :-

देकार्तचे मते आपल्या अनुभवातील प्रत्येक वस्तू ही निर्माण झालेले कार्य आहे. कारण तत्त्वाच्या मीमांसेनुसार प्रत्येक निर्मितीला, कार्याला कारण असलेच पाहिजे. कारण शून्यातून कशाचीही निर्मिती होऊ शकत नाही. शून्य असणे म्हणजे नसणे व जे नसतेच ते कशालाही जन्म देऊ शकत नाही. विश्व हे निर्मित कार्य मानले तर त्याचे कारण काहीतरी असलेच पाहिजे. मग ज्या कारणापासून हे विश्व निर्माण झाले असेल त्याचेही आणखी तिसरेच कारण मानावे लागेल व असे कारणाचे कारण शोधत आपण मागे मागे गेलो तर शेवटी जे कारण हाती लागेल त्याचे कारण कोणते हा प्रश्न राहतोच. अशा रितीने या विश्वाचे नेमके कारण आपणास सापडणारच नाही या प्रसंगाला तत्त्वज्ञानात 'अनवस्था प्रसंग' असे म्हणतात. म्हणून देकार्त म्हणतो की, विश्व निर्मिती प्रक्रियेत सर्वात शेवटी आपण जेथे थांबतो तो ईश्वरच असला पाहिजे.

ख्रिश्चन धर्म तत्त्वज्ञानात संत ॲन्सेल्म व संत ऑगस्टाईन यांनीही ईश्वराविषयी असाच युक्तीवाद केलेला आहे.

४) **निरपेक्ष ईश्वर** (Absolute God) :-

विश्वातील प्रत्येक अस्तित्व कशाशी तरी निगडीत आहे. प्रत्येक अस्तित्वाला आकार, स्वरूप आहे व एक अस्तित्व दुसऱ्यापेक्षा भिन्न आहे. अशा अस्तित्वाला सापेक्ष अस्तित्व असे म्हणतात. ईश्वराला विशिष्ट आकार, प्रकार अथवा व्यक्तिमत्व नाही तर ईश्वर निरपेक्ष द्रव्यात्मक आहे. निरपेक्ष द्रव्याचे अस्तित्व स्वयंनिर्धारित असते, स्वयंभू असते, दुसऱ्यावर अवलंबून नसते. जे अस्तित्वासाठी कशावरही अवलंबून नसते. ते अस्तित्वात नसते असे मानणे म्हणजे आत्मव्याघात स्वीकारणे होय. म्हणून देकार्त म्हणतो की, निरपेक्ष द्रव्यात्मक ईश्वर अस्तित्वाच असलाच पाहिजे. देकार्त ईश्वराला परिपूर्ण, सर्वव्याप्त, सर्वज्ञ, चिरंतन व स्वत:च स्वत:चे कारण असलेला व या विश्वाचे मंगलमय शीवतत्त्व (Goodness of the world) म्हणून मानतो.

## ८.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :-

**अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) देकार्तने मनाच्या अंतर्ज्ञान व ------------ या दोन कार्यशक्ती मानल्या आहेत.

१) निगमन २) विगमन ३) अनुभव

२) देकार्तचा संशय ------------ आहे.

१) उथळ २) तात्त्विक ३) भाषाशास्त्रीय

३) संशयावरून संशय घेणाऱ्याचे अस्तित्व ------------ होते.

१) व्यंजित   २) बाधित   ३) खंडित

४) देकार्तच्या शरीर-मन द्वैतवादाला ------------ असेही म्हणतात.

१) आंतरक्रियावाद   २) समांतरवाद   ३) भांडवलवाद

५) देकार्तचे तत्त्वज्ञान ------------ आहे.

१) बुद्धिवादी   २) अनुभववादी   ३) अत:प्रज्ञावादी

६) देकार्तच्या यंत्रातील भूताच्या कल्पनेला ------------ म्हणतात.

१) पदार्थांतर प्रमाद   २) काल्पनिक   ३) आनुभविक

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) देकार्तच्या दोन ग्रंथांची नावे कोणती ?

२) ज्ञानाचे आद्यतत्त्व कशाने मिळते ?

३) हट्टाग्रहवाद म्हणजे (ऊेसारींळीा) काय ?

४) देकार्तच्या ईश्वराचे स्वरूप कसे आहे ?

५) देकार्तचे मते शरीर-मनाचा संबंध कशामुळे येतो ?

६) पदार्थांतर प्रमाद ही कल्पना कोणी सांगितली ?

## ८.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :-

| | | |
|---|---|---|
| द्वैतवाद (Dualidm) | - | दोन तत्त्वे मानणारा |
| हट्टाग्रहवाद (Dogmatism) | - | आपल्याच तत्त्वाला चिकटून राहणारा |
| तात्त्विक संशयवाद | - | एखाद्या गोष्टीचे विचारांच्या पातळीवरून सत्यशोधन करणारी मनोवृत्ती |
| व्यंजित होणे | - | निष्पन्न होणे |
| निरपेक्ष ईश्वर | - | निर्गुण ईश्वर |

## ८.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :-

**अ) योग्य पर्याय -** १) निगमन   २) तात्त्विक   ३) व्यंजित

४) आंतरक्रियावाद   ५) बुद्धिवादी   ६) पदार्थांतर प्रमाद

**ब) एका वाक्यात उत्तरे -**

१) Meditations on first philosophy and Le Mande.

२) ज्ञानाचे आद्यतत्त्व अंतर्ज्ञानाने मिळते.

३) आपल्याच भूमिकेला, तत्त्वाला किंवा विचाराला चिकटून राहणे.

४) देकार्तच्या ईश्वराचे स्वरूप निरपेक्ष द्रव्यात्मक आहे.

५) शरीर-मनाचा संबंध पिनियल ग्रंथीमुळे होतो.

६) प्रो.गिलबर्ट राईल यांनी पदार्थांतर प्रमाद ही कल्पना सांगितली.

**८.६ सारांश :-**

देकार्तचे तत्त्वज्ञान हे बुद्धिवादी तत्त्वज्ञान आहे. देकार्तने आधुनिक तत्त्वज्ञानाचा पाया घातला. त्यामुळे त्यास आधुनिक तत्त्वज्ञानाचा जनक मानले जाते. बुद्धिवादी दृष्टीकोनातून त्याने संशयवादाचे विवेचन केले व ते तर्कशुद्ध रितीने सिद्ध केले आहे. तत्त्वज्ञानातील अंतर्ज्ञान, निगमन व निदर्शनात्मक पद्धतींचा वापर करून त्याने संशयवादाचे स्पष्टीकरण केले आहे. 'मी' चे म्हणजेच आत्म्याचे अस्तित्व सिद्ध करतानाही त्याने तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान व विज्ञानवादी दृष्टीकोनात विरोध असू शकत नाही हे दाखवून दिले. शरीर-मन संबंधविषयक द्वैतवाद सांगून त्यांचा परस्परसंबंध कसा दाखविता येतो हे व्यावहारिक अनुभवांच्या आधारे दाखवून दिले आहे. ईश्वर कल्पना मान्य करून बुद्धिवाद हा अनुभवापलिकडील सत्यांचे बुद्धिनिष्ठ व सर्वमान्य होऊ शकेल असे स्पष्टीकरण करू शकतो हे दाखवून दिले आहे. ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करताना मध्ययुगीन धर्मपंडितांच्या मताशी बुद्धिवादाचा विरोध असू शकत नाही हे प्रामाणिकपणे स्पष्ट केले आहे.

**८.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :-**

ग्रंथाच्या शेवटी सूची पहावी.

▼ ▼ ▼

घटक - ९

# Om°Z bm°H$ (John Locke)


९.० उद्दिष्टे

९.१ प्रास्ताविक - चरित्र, कार्य व तत्त्वज्ञान

९.२ विषय - विवेचन

९.२.१ जन्मजात कल्पना

९.२.२ कल्पनांची उत्पत्ती व प्रकार

- साध्या व संमिश्र कल्पना

९.२.३ ज्ञानसिद्धांत

- ज्ञानोत्पत्ती

- ज्ञानाचे स्वरूप व प्रकार

९.२.४ अमूर्त कल्पना

९.२.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

९.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ, इत्यादी

९.४ स्वयं-अध्ययन प्रश्नाची उत्तरे

९.५ सारांश

९.६ सरावासाठी स्वाध्याय

९.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ९.० उद्दिष्टे :

* या घटकाच्या अभ्यासाने आपल्याला अनुभववादाचा जनक - जॉन लॉकच्या जीवन चरित्रातील ठळक घटनांची, तसेच त्याच्यावरील संस्कार (प्रभाव) आणि त्याची तत्त्वप्रणाली या विषयीची माहिती मिळेल.
* लॉकच्या तत्त्वज्ञानाचे स्वरूप, प्रमुख सिद्धांत व संकल्पना याविषयीचे ज्ञान मिळेल.
* जन्मजात कल्पनांचे त्याने कसे खंडन केले आहे ते समजून मानवी ज्ञानाचे स्वरूप, प्रकार, कल्पनांची उत्पत्ती व अमूर्त कल्पना याविषयीची चिकित्सक मिमांसा स्पष्ट होऊ शकेल.

## ९.१ प्रास्ताविक - चरित्र, कार्य व तत्त्वज्ञान :

जॉन लॉक हा अनुभववादी तत्त्वज्ञानाचा जनक मानला जातो. त्याचा जन्म २९ एप्रिल १६३२ मध्ये ब्रिस्टलजवळ रिंग्टन या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. लॉकचे वडील कायदेपंडीत होते. जन्माने तो

प्यूरीटन पंथाचा होता. प्यूरीटन पंथीय विचारप्रणालीचा त्याच्यावर खूपच प्रभाव पडलेला होता. त्यातूनच पावित्र्य, दूरदर्शीपणा, प्रामाणिकता, उद्योगशीलता, स्वावलंबन आणि स्वातंत्र्य प्रेम या गोष्टी तो शिकला होता.

१६४६ ते १६५२ पर्यंत त्याचे शिक्षण लंडन येथील वेस्ट-मिनिस्टर विद्यालयात झाले. १६५२ मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठात ख्राईस्ट चर्च कॉलेजमध्ये त्याने प्रवेश घेतला. १६५९ पर्यंत तेथे त्याने अध्ययन केले. ऑक्सफर्ड विद्यापीठातील त्याचे अध्ययन तत्त्वज्ञानापुरते मर्यादित न राहता त्याने पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र आणि वैद्यकशास्त्र यांचाही अभ्यास केला. १६६० ते १६६६ या काळात लॉकने ऑक्सफर्ड विद्यापीठात अध्यापनाचे कार्य केले. १६७४ मध्ये त्याने वैद्यकशास्त्रातील पदवी संपादन केली व वैद्यकीय व्यवसायाचा परवाना मिळविला. १६८५ मध्ये इंग्लंडमधील राजकीय परिस्थितीमुळे त्याला इंग्लंड सोडून हॉलंडला जावे लागले. हॉलंडमध्ये तो अज्ञातवासात राहिला. या काळात केलेल्या चिंतनातून लॉकने 'Essay Concerning Human Understanding' हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला. १६८९ मध्ये तो इंग्लंडमध्ये परत आला. त्याने विविध विषयावर लेखन केले. १७०४ मध्ये त्याचे निधन झाले.

लॉक हा विविध अभिरूची असलेला विचारवंत (Man of many interests) होता. सुरूवातीस त्याला ईश्वरमीमांसा शास्त्राबद्दल (Theology) आकर्षण वाटत होते. पण नंतर तो वैद्यकशास्त्राकडे वळला. त्यानंतर पदार्थविज्ञान व रसायनशास्त्राच्या अभ्यासाविषयी त्याची अभिरूची वाढली. त्याशिवाय त्याने धार्मिक व राजकीय समस्यांचा अभ्यास केला. देकार्तच्या बुद्धिवादी तत्त्वप्रणालीचा प्रभाव लॉकवर दिसून येतो. तसेच त्याच्या काळातील प्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ बेल आणि विख्यात शरीरशास्त्रज्ञ सिडनेहॅम यांच्याशी लॉकचे वैयक्तिक मैत्रीचे संबंध होते. त्यांच्याकडून त्याने अनुभवनिष्ठ पद्धतीचा अंगीकार केला. तसेच त्याला अनुभववादी विचाराची प्रेरणा मिळाली. शिवाय न्यूटनच्या गणिती सिद्धांतामुळे लॉकच्या कल्पनाशक्तीस चालना मिळाली. विचाराच्या मुलभूत व सर्वोच्च तत्त्वांना आव्हान देऊन त्याने ज्ञानाच्या क्षेत्रातील गोंधळ, संदिग्धता दूर करण्याचा प्रयत्न केला.

मानवी मनातील जन्मजात कल्पना सिद्धांतासंबंधी टीका करून लॉकने आपल्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली. त्याने ज्ञानसिद्धांत किंवा ज्ञानमिमांसा याकडे विशेष लक्ष केंद्रीत केले. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अनुभवाचा आधार घेऊन मानवी मूल्ये शोधण्याचा लॉकने प्रयत्न केला. 'अनुभवास येईल तेच सत्य' आणि 'सर्व ज्ञान हे अनुभवजन्य असते' या भूमिकेचा त्याने पुरस्कार केला. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात अनुभववादी विचारप्रणालीचे बीजारोपण लॉकने केले व ज्ञानशास्त्रीय अनुभववाद प्रतिपादन केला. म्हणूनच त्याला 'अनुभववादाचा जनक' असे म्हटले जाते. लॉकनंतर अनुभववादी भूमिकेचा विस्तार बर्कले आणि ह्यूम यांनी केला. अशाप्रकारे ब्रिटनमध्ये अनुभववादी तत्त्वज्ञानाची एक परंपराच निर्माण झाली.

## ९.२ विषय विवेचन :

### ९.२.१ जन्मजात कल्पना (Innate Ideas)-

लॉकने आपली ज्ञानविषयक भूमिका व कल्पनांच्या निर्मितीची उपपत्ती मांडण्यापूर्वी जन्मजात (उपजत) कल्पना सिद्धांतावर जोरदार टीका करून त्याचा अस्विकार केला आहे. इसवी सन पूर्व काळापासूनचा अतिशय प्राचीन वारसा असलेल्या जन्मजात कल्पना सिद्धांतास तत्त्वज्ञानात फार महत्त्व आहे. ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटोने समर्थन केलेला हा सिद्धांत पुढे मध्ययुगीन तत्त्वज्ञ ऑगस्टीन यानेही प्रतिपादन केला आहे. आधुनिक काळात देकार्त, स्पिनोझा व लायब्नीट्झ या बुद्धिवादी तत्त्वज्ञांनी जन्मजात कल्पना सिद्धांताचे समर्थन केले आहे. त्यांच्यामते निश्चित व सुस्पष्ट ज्ञान जन्मजात कल्पनावर आधारित असते. एवढेच नव्हे तर देकार्तने ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी जन्मजात कल्पना सिद्धांताचा आधार घेतला आहे. देकार्तच्या मते मानवाच्या मनात उपजतच कल्पनांचे अस्तित्व असते. अशा कल्पना आपल्या मनावर कोणीही रूजविलेल्या नसतात, त्या बाहेरूनही आलेल्या

नसतात. म्हणून ज्या कल्पना जन्मत:च आपल्या मनात असतात त्यांना जन्मजात कल्पना असे म्हणतात. अशा कल्पना इंद्रिय संवेदनातून निर्माण झालेल्या नसतात. उदा.देकार्तच्या मते गणितातील तत्त्वे, भूमितीतील प्रमेये, तर्कशास्त्रीय नियम व ईश्वराचे अस्तित्व यांच्या कल्पना उपजत असतात.

जॉन लॉकने 'Essay Concerning Human Understanding' या ग्रंथात सुरूवातीस जन्मजात कल्पना सिद्धांताचे खंडन केले आहे. लॉकच्या मते आपल्या मनात कोणत्याही प्रकारच्या उपजत किंवा जन्मजात कल्पना नसतात. कोणत्याही प्रकारची जन्मजात नैतिक किंवा गणिती किंवा तर्कशास्त्रीय तत्त्वे आपल्या मनात आधीपासूनच उपजतपणे अस्तित्वात असूच शकत नाहीत. कारण लॉकच्या मते सर्व ज्ञान हे अनुभवातून निर्माण होते. मन हे जन्मत: एखाद्या कोऱ्या कागदासारखे किंवा पूर्णपणे कोऱ्या पाटीसारखे (Blank Sheet / Tabula rasa) असते. मन मूळत: संस्कारहीन असते. इंद्रिय संवेदनातून त्यावर छाप किंवा ठसे उमटतात व बाह्य वस्तूंच्या प्रतिमा तयार होतात आणि त्यातून प्रतिमा किंवा कल्पनांची निर्मिती होते. जन्मजात कल्पना सिद्धांताचे खंडण करून अशा प्रकारच्या जन्मजात (उपजत) कल्पना नसतात हे सिद्ध करण्यासाठी लॉकने केलेले युक्तिवाद खालीलप्रमाणे-

**जन्मजात कल्पना सिद्धांतावरील टीका : लॉकचे युक्तिवाद -**

१) सार्वदेशिक (सार्वत्रिक) संमतीवर आधारित युक्तिवाद - (Argument of Universal Assent)

लॉकचा हा युक्तिवाद सर्व माणसांच्या सार्वदेशिक संमतीवर आधारलेला आहे. त्याच्या मते काही व्यावहारिक तत्त्वे अशी असतात की त्याबाबत सर्व लोकांचे एकमत होते. काही कल्पना सार्वत्रिकपणे व्यक्तिगत अनुभवाशिवाय अस्तित्वात असतात. म्हणून अशी व्यावहारिक तत्त्वे किंवा कल्पना उपजत स्वरूपात अस्तित्वात असतात असे म्हटले जाते. परंतु लॉकच्या मते हा युक्तिवाद खरा नसून तो फसवा आहे. काही तत्त्वांच्या बाबतीत सर्वच माणसांचे एकमत होत असते असे समजणे चूक आहे. कारण लहान मुले, वेडी माणसे, अडाणी व निर्बुद्ध व्यक्ती यांना अशा तत्त्वांचे ज्ञान अजिबात नसते. यावरून जन्मजात कल्पनांना सार्वदेशिक संमती असते हे मत यथार्थ नाही. याशिवाय लॉक असेही स्पष्ट करतो की, सर्व माणसांचे काही तत्त्वाविषयी जरी सार्वत्रिक एकमत (संमती) असते हे जरी खरे मानले तरी त्यावरून ही तत्त्वे उपजत असतात हे सिद्ध होत नाही.

२) नैतिक तत्त्वे व सद्गुण (Virtue) यांच्या बाबतीत जी सार्वदेशिक संमती आढळून येते त्याचे कारण - लॉकच्या मते - त्यांचे उपजत स्वरूप नव्हे, तर ती सर्वांना सारख्याच रितीने हितकारक व उपयुक्त असतात म्हणून सर्व लोक त्याचा स्वीकार करतात, अशी वस्तुस्थिती असते. यावरून नैतिक तत्त्वांचा स्वीकार सर्वांनी केला आहे म्हणून ती जन्मजात आहेत असे म्हणणे बरोबर ठरत नाही असे लॉक स्पष्ट करतो.

३) आपल्या मनात काही कल्पना जन्मजात अस्तित्वात असतात ही गोष्ट जरी गृहीत धरली तरीही लॉकच्या मते आपल्या मनातील कल्पनांपैकी कोणत्या जन्मजात आहेत आणि कोणत्या अध्ययनाने प्राप्त झालेल्या आहेत यातील फरक स्पष्ट करणे कठीण आहे. म्हणून जन्मजात कल्पना अस्तित्वात नसून सर्व कल्पनांची निर्मिती आपल्या दैनंदिन अनुभवातून होत असते.

४) तार्किक युक्तिवाद - जर अशी जन्मजात तत्त्वे (कल्पना) असतील तर अध्ययन प्रक्रियेचे एकंदर स्वरूपच उलट दिशेने जाणारे वाटते असे लॉक स्पष्ट करतो. सामान्य तत्त्वांचा स्वीकार करण्यापूर्वीच आपणास विशिष्ट विधानांचे सत्य समजते असे यावरून स्पष्ट होते. परंतु अत्यंत अनिवार्य व युक्त स्वरूपाच्या विधानाकडे आपले लक्ष गेल्याशिवाय ती आपणास समजत नाहीत. यावरून उपजत कल्पनांचे अस्तित्व व्यक्तीच्या मनात जन्मत:च असते, पण त्यांचे ज्ञान त्याला नसते असे म्हणणे तर्क विसंगत आहे.

५) देकार्तने आग्रही प्रतिपादन केल्याप्रमाणे नैतिक तत्त्वे किंवा नीतिनियम जन्मजात नसतात असे लॉक

स्पष्ट करतो. त्याच्यामते सार्वत्रिक व स्वयंसिद्ध स्वरूपाची नैतिक तत्त्वे आपणास आढळत नाहीत. कारण सर्व नीतिनियम व योग्य-अयोग्य कल्पना स्थल-काळ परिस्थितीसापेक्ष स्वरूपाच्या असतात. तसेच नैतिक तत्त्वांचे नेहमी स्पष्टीकरण व समर्थन करावे लागते. एवढेच नव्हे तर नैतिक आचरणास दिशा देणारी सद्सद्विवेक बुद्धी क्षणिक, आत्मविसंगत, व्यक्तिपरत्वे बदलणारी आणि एकाच व्यक्तीच्या बाबतीत विविध प्रसंगी संघर्षजन्य असते. म्हणून नैतिक नियम उपजत नसतात.

६) याशिवाय धार्मिक श्रद्धा, सर्व धर्मांची मुलभूत तत्त्वे आणि ईश्वराची संकल्पना या सुद्धा जन्मजात नसतात हे लॉक स्पष्ट करतो. त्याच्या मते या कल्पना सार्वत्रिक नसतात. कारण काही विशिष्ट जमातीत ईश्वर कल्पनेचा पूर्णपणे अभाव दिसून येतो. तसेच धार्मिक श्रद्धा परस्परविरोधी स्वरूपाच्या असतात. याशिवाय निसर्ग नियमांचे ज्ञान आपणास उपजतच असते या मताचेही लॉक खंडन करतो. तसेच जर काही तत्त्वे व कल्पना उपजत असतील तर ती सर्व मानवी व्यक्तीमध्ये निरपवादपणे दिसून आली पाहिजेत पण वस्तुस्थिती तशी आढळत नाही.

७) शेवटी लॉक असे स्पष्ट करतो की, जर या सर्व कल्पना जन्मजात (उपजत) असतील तर त्या अनुभवाद्वारे प्रचितीस आल्या पाहिजेत. तर्कशास्त्रातील अनिवार्य सत्ये (Necessary truths), गणितातील तत्त्वे किंवा नीतिनियम जन्मजात नसतात.अशा प्रकारे जन्मजात कल्पना सिद्धांताचे खंडन करून लॉक असे प्रतिपादन करतो की, आपले सर्व ज्ञान अनुभवातून प्राप्त होते. जन्मत: आपले मन हे कोऱ्या कागदाप्रमाणे किंवा अंधाऱ्या खोलीप्रमाणे (Dark Chamber) असते. जन्मत: मन कोणत्याही कल्पनापासून मुक्त असते. इंद्रिय संवेदन व चिंतन याद्वारे मनामध्ये संस्कारांचे ठसे उमटून त्यातूनच कल्पनांची उत्पत्ती होते.

### ९.२.२ कल्पनांची उत्पत्ती (Origin of Ideas) -

जन्मजात कल्पना सिद्धांताचे खंडण करून लॉक आपल्या ज्ञान सिद्धांताची विधायक भूमिकेतून मांडणी करतो. कल्पनांची उत्पत्ती कशी होते हे स्पष्ट करीत असता सर्व ज्ञान अनुभवातून निष्पन्न होते (All knowledge is derived from experience) असे लॉक प्रतिपादन करतो. आपले मन जन्मत: कोऱ्या पाटीसारखे असून सर्व कल्पना अनुभवाद्वारे संपादित केल्या जातात. त्याच्या मते इंद्रिय संवेदन (sensation) आणि चिंतन (reflection) याद्वारे मनामध्ये कल्पनांची उत्पत्ती होते. अनुभव किंवा बाह्य संवेदनाद्वारेच मनात कल्पना निर्माण होतात. कोणतीही कल्पना जन्मजात नसते असे तो स्पष्ट करतो.

अशा प्रकारे लॉकच्या मते इंद्रिय संवेदन व चिंतन हीच ज्ञानाची दोन साधने असून त्याद्वारे मनामध्ये कल्पनांची निर्मिती किंवा उगम होतो. सर्व ज्ञान हे अनुभवातून प्राप्त होत असते. आपल्या मनाच्या अंधाऱ्या खोलीमध्ये ज्ञान प्रकाशाची किरणे प्रवेश करण्याच्या दोन खिडक्या म्हणजेच इंद्रिय संवेदन आणि चिंतन ही साधने होत. याद्वारे तयार झालेल्या मनातील कल्पना म्हणजे ज्ञान होय. कल्पनांचे लॉकने दोन प्रमुख प्रकार केले आहेत. १) साध्या कल्पना (Simple Ideas) आणि २) संमिश्र कल्पना (Complex Ideas).

**१) साध्या कल्पना -** लॉकच्या मते साध्या कल्पना इंद्रिय संवेदनातून मनाने ग्रहण केलेल्या असतात. तसेच साध्या कल्पना अणूंसारख्या अविभाज्य असतात व त्यांची पुनरावृत्ती करता येते. त्यांचा पुन्हा पुन्हा अनुभव घेता येतो. उदा.वस्तूचा रंग, गंध, स्पर्श, आवाज, आकार व रूपाची कल्पना म्हणजे साधी कल्पना होय. साध्या कल्पना म्हणजेच निरवयव कल्पना होत. मानवी मनाच्या आंतरिक प्रक्रियेद्वारे म्हणजेच चिंतनाद्वारे सुद्धा साध्या कल्पनांची निर्मिती होत असते. चिंतनाद्वारे आपणास आपल्या आंतरिक अवस्थांची जाणीव होत असते. उदा.इच्छा, संदेह, संवेदन, विचार, इत्यादी. याशिवाय इंद्रिय संवेदन आणि चिंतन यांच्या एकत्रिकरणातून साध्या कल्पनांचे पुन्हा चार प्रकार केले आहेत. १) फक्त एकाच ज्ञानेंद्रियाकडून निर्माण होणाऱ्या साध्या कल्पना म्हणजेच

एकेन्द्रिय कल्पना होत. उदा.रंग, आवाज, रूची, उष्णता, थंडी, घनता, इत्यादी. २) एकाचवेळी अनेक ज्ञानेंद्रियाकडून निर्माण होणाऱ्या कल्पना उदा.दिक्, विस्तार, आकृती, स्थिरता व गती इत्यादी प्रकारच्या दृष्टी व स्पर्श वेदनेंद्रियाकडून मिळणाऱ्या कल्पना. ३) चिंतनातून निर्माण होणारी साधी कल्पना. उदा.संवेदन, विचार, संदेह, इच्छा, इ. आंतरिक अवस्थांच्या कल्पना. इंद्रियाकडून निर्माण होणाऱ्या कल्पनांचे वर्गीकरण, अमूर्तीकरण, संयोजन व विभाजन मनाने करून जेव्हा वस्तूचे ज्ञान होते ते चिंतनाच्या स्वरूपाचे असते. ४) इंद्रिय संवेदन आणि चिंतन या दोन साधनांच्या संयुक्त प्रभावाने तयार होणाऱ्या साध्या कल्पना - उदा.सुख-दु:खाचे वेदन, शक्ती, अस्तित्व, एकता आणि क्रम यासंबंधीच्या कल्पना.

**२) संमिश्र कल्पना -**

लॉकच्या मते साध्या कल्पनापासून संमिश्र कल्पना निर्माण होतात. साध्या कल्पनांचे वेगवेगळ्या प्रकारे एकत्रीकरण व जुळणी करून आपणास संमिश्र कल्पना बनविता येतात. म्हणूनच अनेक साध्या कल्पनांचे एकत्रीकरण (combination), तुलना किंवा संबंध (relation) आणि अमूर्तीकरण (abstraction) याद्वारे मनामध्ये संमिश्र कल्पनांची निर्मिती केली जाते. थोडक्यात अनेक साध्या कल्पनांचे संमिश्रण व संयोजन करून त्यातून जी संयुक्त कल्पना निर्माण केली जाते तिला संमिश्र कल्पना म्हणतात. उदा.वस्तू - वस्तूतील संबंधाची कल्पना, सौंदर्य, कृतज्ञता, सैन्य, विश्व, इ. अशा प्रकारे साध्या कल्पनांची सामग्री वापरून त्यांच्यापासून आपणास पाहिजे तशा प्रकारच्या वेगवेगळ्या संमिश्र कल्पना मानवी मन तयार करीत असते. लॉकने संमिश्र कल्पनांचे पुन्हा तीन प्रकार केले आहेत- विकार (Modes) , द्रव्ये (Substances) आणि संबंध (Relation).

**१) विकाराची कल्पना** (Idea of Modes) -

जेव्हा अनेक साध्या कल्पना एकत्रित करून त्यांची एक विशिष्ट संमिश्र कल्पना तयार केली जाते तेव्हा तिला विकाराची कल्पना म्हणतात. उदा.त्रिकोण, डझन, मैत्री, कृतज्ञता, सौंदर्य, इ. लॉकने विकारांचे लॉकने दोन प्रकार केले आहेत - अ) साधे विकार (Simple Modes) म्हणजे केवळ एकाच प्रकारच्या कल्पनांचे एकत्रीकरण होय. उदा.डझन. यावरून एकाच प्रकारच्या बारा वस्तूंच्या कल्पना एकत्र करून डझन ही संमिश्र कल्पना बनते. तिलाच साधा विकार म्हणतात. ब) संमिश्र विकार (Complex Mode) - म्हणजे अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या साध्या कल्पनांची एकत्रित किंवा संयुक्त कल्पना होय. उदा.मैत्री ही वेगवेगळ्या साध्या कल्पनांच्या एकत्रिकरणामुळे बनलेली संमिश्र कल्पना होय. तसेच सौंदर्य ही संमिश्र विकाराची कल्पना म्हणजे प्रमाणबद्धता, लयबद्धता, रंग, आकर्षकता, माधुर्य यांच्या एकत्रिकरणातून बनलेली कल्पना होय.

**२) द्रव्यविषयक संमिश्र कल्पना** (Idea of Substance) -

ज्यांना स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व असते अशा अनेक वस्तूंच्या साध्या कल्पनांच्या संयोगातून तयार झालेली संमिश्र कल्पना म्हणजे द्रव्य होय. उदा.द्रव्याची अंधुक किंवा फिकट रंगाची कल्पना किंवा द्रव्याच्या टणकतेची कल्पना ही या प्रकारची असते.

**३) संबंधविषयक संमिश्र कल्पना** (Idea of Relations) -

म्हणजे एका कल्पनेची दुसऱ्याशी तुलना केल्याने किंवा दोन कल्पनांच्या परस्पर संबंधातून तयार होणारी संमिश्र कल्पना होय. उदा.कारणविषयक कल्पना, स्थल-काल संबंधाची कल्पना ही या प्रकारची असते. कारण ही कल्पना अनेक घटकांच्या परस्परसंबंधातून बनते. अशाप्रकारे लॉकने इंद्रिय संवेदन व चिंतन ही ज्ञानोत्पत्तीची दोन साधने मानली असून या साधनातूनच साध्या कल्पना व संमिश्र कल्पना तयार होतात असे म्हटले आहे.

### ९.२.३ ज्ञान सिद्धांत (Theory of Knowledge) -

जॉन लॉकच्या ज्ञान सिद्धांताला ज्ञानमिमांसेत अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवाच्या ज्ञान प्रक्रियेची तपशीलात जावून चिकित्सा व संशोधन करणारा लॉक हा पहिला तत्त्वज्ञ मानला जातो. लॉकच्या पूर्वी सॉक्रेटीस प्लेटो, अरिस्टॉटल, देकार्त, बेकन व हॉब्ज यांनी मानवी ज्ञानाविषयीची मीमांसा केली आहे. परंतु या सर्वांपेक्षा लॉकची ज्ञानविषयक भूमिका वैशिष्ट्यपूर्ण आणि नाविन्यपूर्ण आहे. लॉकने मानवाच्या आकलनाचे स्वरूप, त्याची व्याप्ती व मर्यादा याविषयी संशोधन केले. त्याने आपल्या तत्त्वज्ञानात ज्ञानाची उत्पत्ती, ज्ञानाची उगमस्थाने, ज्ञानाचे स्वरूप-प्रकार व मर्यादा यासंबंधी तपशीलवार विवेचन केलेले आहे. आपले संपूर्ण तत्त्वचिंतन ज्ञानाचे अन्वेषण करण्यात घालविणारा लॉक हा एकमेव तत्त्वज्ञ होय. आधुनिक तत्त्वज्ञानात ज्ञान विषयक समस्येला जे महत्त्व प्राप्त झाले आहे त्याचे सर्व श्रेय लॉकला आहे. त्याने ज्ञानशास्त्रीय अनुभववादाची भूमिका 'Essay Concerning human understandinng' या ग्रंथात विस्ताराने मांडली आहे.

**ज्ञानोत्पत्ती** (Origin of Knowledge) -

लॉकच्या मते सर्व ज्ञान अनुभवातून निर्माण होत असते व अनुभवावरच आधारलेले असते. मनात उपजत कल्पनांना मुळीच अस्तित्व नसते असे तो स्पष्ट करतो. सर्व प्रकारच्या ज्ञानाचा अथवा कल्पनांचा उगम अनुभवातून होत असतो अशी अनुभवनिष्ठ भूमिका घेऊन लॉकने ज्ञानमीमांसा केलेली आहे. त्याच्या मते जन्मत: मानवाचे मन कोरी पाटी किंवा कोऱ्या कागदासारखे असते. मनामध्ये सुरूवातीस संस्कार अथवा कल्पना यापैकी काहीही नसते. इंद्रिय संवेदन व चिंतन याद्वारे मनात छाप किंवा ठसे उमटून मगच त्यापासून संस्कार, कल्पना व संकल्पना यांचा हळूहळू प्रवेश होत असतो. अशा रितीने ज्ञानाची उत्पत्ती होत असते. इंद्रिय संवेदन आणि चिंतन याद्वारे निर्माण होणाऱ्या साध्या व संमिश्र कल्पनाद्वारे ज्ञानाची उत्पत्ती होते.

**ज्ञानाचे स्वरूप व प्रकार** - लॉकच्या मते आपल्या मनाचा प्रत्यक्ष संबंध फक्त कल्पनाशीच येतो व प्रत्यक्ष भौतिक वस्तूपर्यंत आपण कल्पनांच्या माध्यमातून पोहोचतो. कल्पनातील परस्पर संबंधातून ज्ञानाची निर्मिती होते.

**व्याख्या** - लॉकने ज्ञानाची व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे - ''कोणत्याही कल्पनातील परस्पर संबंध, अन्वय (संवाद) किंवा व्यतिरेक (विसंवाद) आणि विरोध यांचे संवेदन होणे म्हणजे ज्ञान होय.''('Knowledge seems to be nothing but the perception of the connection and agreement or disagreement and repugnancy of any of our ideas') अशा प्रकारे इंद्रिय संवेदन आणि चिंतन यांच्या मार्गे कल्पनांची निर्मिती होऊन त्यातून ज्ञानाची उत्पत्ती होते. लॉकच्या मते यथार्थ किंवा युक्त ज्ञान होण्यासाठी कल्पना सुस्पष्ट (clear) आणि निश्चित (distinct) स्वरूपाच्या असल्या पाहिजेत. कारण अस्पष्ट व दुर्बोध कल्पनाद्वारे सत्य व वास्तव ज्ञान मिळू शकत नाही. शिवाय कल्पना पर्याप्त असल्या पाहिजेत, कारण पर्याप्त कल्पनानीच विषयाचे ज्ञान पूर्णपणे होऊ शकते. तसेच लॉकच्या मते आपले सर्वात निश्चित ज्ञान हे कल्पनांमध्ये असणारा अन्वय, व्यतिरेक व विरोध यांचे संवेदन असते. ज्या वेगवेगळ्या मार्गानी मन कल्पनामधील परस्परसंबंध पाहते त्यानुसार ज्ञानाची स्पष्टता बदलत असते. ज्ञानाच्या स्पष्टतेच्या अंशानुसार त्याचे स्वरूप व पातळी ठरते. लॉकने मानवी ज्ञानाच्या तीन पातळ्या स्पष्ट करून ज्ञानाचे तीन प्रकार सांगितले आहेत.

**ज्ञानाचे प्रकार** -

१) अन्तर्ज्ञान (Intuitive Knowledge)

२) निदर्शनात्मक ज्ञान (Domonstrative Knowledge)

३) संवेदनात्मक ज्ञान (Sensitive Knowledge)

१) अन्तर्ज्ञान - या ज्ञान प्रकारात व्यक्ती आपल्या मनाच्या सहाय्याने कल्पनातील संबंध इतर कल्पनांची मदत न घेता प्रस्थापित करीत असते. म्हणजे जेव्हा मनाला कल्पनांमधील अन्वय व विसंवाद इतर कल्पनांची मदत न घेता प्रस्थापित करीत असते. म्हणजे जेव्हा मनाला कल्पनांमधील अन्वय व विसंवाद इतर कल्पनांच्या मध्यस्थीशिवाय प्रत्यक्ष दर्शनाने कळतो अशा ज्ञानाला अंतर्ज्ञान म्हणतात. उदा.वर्तुळ हे त्रिकोण नसते, दोन आणि दोन मिळून चार होतात. या प्रकारचे ज्ञान सर्वात श्रेष्ठ दर्जाचे असते. ते सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ व स्पष्ट असते. या प्रकारच्या ज्ञानाबद्दल मनात संदेह, संशय व अनिश्चितता यांना वाव नसतो. या ज्ञानाच्या सिद्धतेची गरज नसते. लॉकच्या मते अंतर्ज्ञान हे सर्वात अधिक स्पष्ट, स्वच्छ व निश्चित असते. त्याची सुस्पष्टता व निश्चिती सिद्ध करणे शक्य नसते. कारण ते स्वयंसिद्ध व स्वयंप्रकाशी असते.

२) निदर्शनात्मक ज्ञान - जेव्हा दोन कल्पनामधील अन्वय किंवा विसंवाद इतर कल्पनांच्या मध्यस्थीशिवाय प्रत्यक्षपणे दिसू शकत नाही, तेव्हा इतर कल्पनांचे सहाय्य घेऊन त्या दोहोतील संबंध  स्पष्ट केला जातो. तेव्हा अशा ज्ञानास निदर्शनात्मक ज्ञान असे म्हणतात. निदर्शनात्मक ज्ञान हे बुद्धिनिष्ठ आणि तर्कशुद्ध असते. यात प्रामुख्याने गणित व भूमितीतील ज्ञानाचा समावेश होतो. लॉकच्या मते निदर्शनात्मक ज्ञान हे अंतर्ज्ञानाइतके स्पष्ट व निश्चित नसते. कल्पनामध्ये जर तर्काधिष्ठित संबंध नसेल तर निदर्शक ज्ञानाला मर्यादा पडतात.

३) संवेदनात्मक ज्ञान - ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने किंवा मध्यस्थीने होणारे ज्ञान म्हणजेच संवेदनात्मक ज्ञान होय. बाह्य जगातील वस्तूचे ज्ञान आपणास संवेदनाने होते. उदा.सूर्य, चंद्र, नद्या, डोंगर, इ. वस्तूंचे आपणास संवेदनाने होणारे ज्ञान. हे ज्ञान इतके स्पष्ट व स्वच्छ असते की त्याची स्पष्टता व निश्चितता आपण नाकारणे शक्यच नसते. परंतु आपली ज्ञानेंद्रिये ही नेहमीच वस्तुचे वास्तव ज्ञान करून देतात असे नाही.  काहीवेळा  आपणास होणारे ज्ञान भ्रमात्मक (Illusion) असते किंवा फारसे अवस्तुसंवेदन असते. म्हणून संवेदनात्मक ज्ञानास अंतर्ज्ञान किंवा निदर्शनात्मक ज्ञानाइतकी स्पष्टता व निश्चितता नसते. कारण हे ज्ञान सर्वस्वी ज्ञानेंद्रियावर अवलंबून असते. तसेच काहीवेळा अतिदूरची किंवा अतिजवळची वस्तू नीटपणे ज्ञानेंद्रियाना दिसत नाही. त्यामुळे संवेदनात्मक ज्ञानात भ्रम आणि विभ्रम यासारखे दोष निर्माण होण्याची शक्यता असते.  तसेच इंद्रिय संवेदनाचे स्वरूप अस्थिर, चंचल, व्यक्तिनिष्ठ, सदोष व मर्यादित स्वरूपाचे असते. तथापि संवेदनात्मक ज्ञान स्मरणात्मक ज्ञानापेक्षा आणि स्वप्नातील अनुभवापेक्षा निश्चित असते असे लॉक स्पष्ट करतो.

लॉकने वरील तीन प्रकारच्या ज्ञानात जो फरक केला आहे तो ज्ञानाचे निश्चित व सुस्पष्ट स्वरूप दाखविण्यासाठी केला आहे. सुस्पष्टता व निश्चिततेच्या स्वरूपानुसार त्याने ज्ञानाचे तीन प्रकार किंवा अवस्था स्पष्ट केल्या आहेत. यापैकी अंतर्ज्ञान सर्वात अधिक स्पष्ट व निश्चित असते, त्यानंतर निदर्शनात्मक ज्ञान ही अवस्था येते. पण संवेदनात्मक ज्ञानात इतकी निश्चितता नसते. लॉकच्या मते आपणास स्वत:च्या अस्तित्वाचे अंतर्ज्ञान असते, ईश्वराच्या अस्तित्वाचे निदर्शनात्मक ज्ञान असते आणि बाह्य जगातील सर्व वस्तूंचे संवेदनात्मक ज्ञान असते. इंद्रिय संवेदनाद्वारे आपणास भौतिक वस्तूंचे होणारे ज्ञान हे स्वत:च्या व ईश्वराच्या ज्ञानाइतके जरी निश्चित नसले तरी व्यावहारिक दृष्टीने ते निश्चित असते.

### ९.२.४ **अमूर्त कल्पना** (Abstract Ideas) -

लॉकने आपल्या ज्ञानसिद्धांताचे प्रतिपादन करताना अमूर्त कल्पनांना महत्त्व दिलेले आहे. आपणास भौतिक वस्तूंचे ज्ञान कसे होते हे स्पष्ट करताना त्याने अमूर्त कल्पना सिद्धांत मांडला आहे. त्याच्या मते भौतिक वस्तूंचे दोन प्रकारचे गुणधर्म असतात - प्राथमिक व दुय्यम गुणधर्म.  गुणांना आधार असणारी वस्तू अस्तित्वात असते. अशा अमूर्त गुणांच्या द्वारे तो अमूर्त कल्पनाचे अस्तित्व मान्य करतो. लॉकच्या मते अमूर्तीकरणाच्या किंवा वियोगीकरणाच्या प्रक्रियेतून अमूर्त कल्पना तयार होतात. अमूर्तीकरण (abstraction) करणे हा मानवी स्वभाव

असून आपल्या ज्ञानाच्या सोयीसाठी अमूर्तीकरण केले जाते. अमूर्तीकरण म्हणजे जगातील वस्तूंना दिलेली वर्गत्वाची किंवा सामान्य नावे होत. जगात अनंत वस्तू आहेत तसेच अनंत कल्पना आहेत. या अनंत वस्तूंना विशिष्ट नावे देऊन ओळखावावयाचे झाल्यास सर्वच नावे लक्षात ठेवणे अशक्य होईल. यासाठी आपण भाषेत काही सामान्य कल्पना तयार करतो. त्यामुळे विचारांची देवाणघेवाण शक्य होते. अशाप्रकारे जगातील विविध वस्तू आणि कल्पना यांच्यात असलेला साधारण गुण लक्षात घेऊन मानवी मन अमूर्तीकरण करीत असते वत्यातून अमूर्त कल्पना तयार केल्या जातात. उदा.सर्व माणसात आढळून येणाऱ्या 'मनुष्यत्व' या साधारण गुणाच्या आधारे 'मनुष्य' ही अमूर्त कल्पना आपण तयार करतो.

यावरून अमूर्त कल्पना म्हणजे विविधतेमध्ये सामान्यत्व शोधून तयार केलेली कल्पना होय. तसेच विविधतेत एकता शोधण्याचा प्रयत्न म्हणजे अमूर्तीकरण होय. यालाच सामान्य कल्पना असेही म्हटले जाते. जगात असंख्य वस्तू असून त्या सर्व वस्तू - फुले, फळे, प्राणी, पक्षी ही वैयक्तिकरित्या लक्षात ठेवणे अशक्य ठरते. लॉकच्या मते वर्ग किंवा सामान्य पदे वापरल्याशिवाय विचारांची देवाण-घेवाण करता येणार नाही. म्हणूनच भाषेची देवाण-घेवाण सुलभतेने करण्यासाठी सामान्य पदे किंवा अमूर्त कल्पनांचे सहाय्य आवश्यक ठरते. उदा.गाय, घोडा, वृक्ष, फळे, माणूस, डोंगर, नदी, सागर, इत्यादी सामान्य पदाच्या साह्याने जगातील सर्व गायी, सर्व घोडे, सर्व वृक्ष, सर्व फळे, सर्व माणसे, सर्व डोंगर, सर्व नद्या, सर्व सागर निर्देशित केले जातात. म्हणजे व्यक्तित्वाची पदेच सामान्य पदे किंवा अमूर्त कल्पना बनतात. वस्तूमध्ये दिसून येणाऱ्या सामाईक गुणधर्मांना एकत्र करून जी सामान्य कल्पना तयार केली जाते त्यास 'अमूर्त कल्पना' असे म्हणतात. अमूर्त कल्पना स्थल-काल-परिस्थिती निरपेक्ष असतात. त्या कधीही नाहीशा होत नाहीत. त्या नित्य, अपरिवर्तनीय व स्थिर असतात.

**९.२.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न -**

**१) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

अ) लॉक हा बुद्धिवादी तत्त्वज्ञ होय.

ब) लॉकने जन्मजात कल्पनांचे समर्थन केले आहे.

क) लॉकने कल्पनांचे दोन प्रमुख प्रकार केले आहेत.

ड) लॉकच्या मते सर्व ज्ञान अनुभवातून प्राप्त होते.

इ) अमूर्त कल्पना म्हणजेच संमिश्र कल्पना होत.

**२) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) ----------- हा अनुभववादाचा जनक होय.

अ) लॉक　　ब) बार्कले　　क) ह्यूम

२) लॉकने ----------- सिद्धांताचे खंडण केले आहे.

अ) जन्मजात कल्पनाब) अमूर्त कल्पना　　क) ईश्वर

३) इंद्रिय संवेदन व चिंतन ही ----------- ची साधने आहेत.

अ) ज्ञानाची　　ब) सत्याची　　क) विचाराची

४) लॉकच्या मते ----------- कल्पनांपासून संमिश्र कल्पना निर्माण होतात.

अ) अमूर्त　　ब) साध्या　　क) सामान्य

५)  विकार, द्रव्य आणि संबंध हे ----------- कल्पनांचे तीन प्रकार आहेत.

अ) साध्या    ब) संमिश्र    क) अमूर्त

६)  लॉकने ज्ञानाचे ----------- प्रकार केले आहेत.

अ) दोन    ब) तीन    क) चार

७)  लॉकच्या मते ----------- ज्ञान सर्वात श्रेष्ठ दर्जाचे असते.

अ) अंतर्ज्ञान    ब) निदर्शनात्मक    क) संवेदनात्मक

**९.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ, इत्याद**

अनुभववाद - Empiricism

ज्ञानमिमांसाशास्त्र - Epistemology

बुद्धिवाद - Rationalism

जन्मजात (उपजत) कल्पना - Innate Ideas

साध्या कल्पना - Simple Ideas

संमिश्र कल्पना - Complex Ideas

इंद्रिय संवेदन - Sensation

चिंतन - Reflection

अमूर्तीकरण - Abstraction

अमूर्त कल्पना - Abstract Ideas

द्रव्य - Substance

विकार - Modes

संबंध - Relations

अंतर्ज्ञान - Intuitive Knowledge

निदर्शनात्मक ज्ञान - Demonstrative Knowledge

संवेदनात्मक ज्ञान - Sensitive Knowledge

भ्रम - Illusion

सामान्य कल्पना - General Ideas

अनिवार्य सत्य - Necessary Truth

**९.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे -**

१)  अ)  चूक

ब)  चूक

क) बरोबर

ड) बरोबर

इ) चूक

२) १) अ) लॉक

२) अ) जन्मजात कल्पना

३) अ) ज्ञानाची

४) ब) साध्या

५) ब) संमिश्र

६) ब) तीन

७) अ) अंतर्ज्ञान

## ९.५ सारांश -

जॉन लॉक हा अनुभववादाचा जनक असून त्याने ज्ञानसिद्धांतावर विशेष भर दिला आहे. सर्व ज्ञान हे अनुभवातून प्राप्त होते असे तो स्पष्ट करतो.लॉकने जन्मजात कल्पना सिद्धांतावर टीका केली असून मानवी मनात जन्मत: किंवा उपजत कल्पना असू शकत नाहीत हे सिद्ध करण्यासाठी त्याने युक्तिवाद मांडले.लॉकच्या मते मानवी मन हे जन्मत: कोऱ्या कागदाप्रमाणे संस्कारहीन असते. इंद्रिय संवेदन व चिंतन याद्वारे मनामध्ये संस्कारांचे ठसे उमटून त्यातूनच कल्पनांची निर्मिती होते.कल्पनांचे दोन प्रकार लॉकने केले आहेत.

**१) साध्या कल्पना -** इंद्रिय संवेदनातून मनाने ग्रहण केलेल्या कल्पना म्हणजे साध्या कल्पना होय. साध्या कल्पना अणूसारख्या अविभाज्य असून त्यांची पुनरावृत्ती करता येते. साध्या कल्पनांचे चार प्रकार आहेत.

**२) संमिश्र कल्पना -** साध्या कल्पनांचे वेगवेगळ्या प्रकारे एकत्रिकरण व जुळणी करून संमिश्र कल्पना निर्माण केल्या जातात. त्या तीन प्रकारच्या असतात - द्रव्य, विकार आणि संबंध.

ज्ञानसिद्धांत - सर्व ज्ञान अनुभवातून निर्माण होत असते व अनुभवावरच आधारलेले असे लॉक आपल्या ज्ञानमीमांसेत स्पष्ट करतो.

ज्ञानाची व्याख्या - कोणत्याही कल्पनातील परस्पर संबंध, अन्वय किंवा व्यतिरेक आणि विरोध यांचे संवेदन म्हणजे ज्ञान होय.

**ज्ञानाचे तीन प्रकार -**

१) अंतर्ज्ञान - व्यक्ती आपल्या मनाच्या सहाय्याने कल्पनातील संबंध इतर कल्पनांच्या मदतीशिवाय भेट प्रस्थापित करते त्यास अंतर्ज्ञान म्हणतात.

२) निदर्शनात्मक ज्ञान - इतर कल्पनाच्या साहाय्याने जेव्हा दोन कल्पनामधील संबंध स्पष्ट केला जातो तेव्हा त्यास निदर्शनात्मक ज्ञान म्हणतात.

३) संवेदनात्मक ज्ञान - म्हणजे ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने होणारे ज्ञान होय.

अमूर्त कल्पना - विविधतेमधील सामान्यत: शोधून तयार केलेली कल्पना म्हणजे अमूर्त कल्पना होय. जगातील अनंत वस्तुंना दिलेली वर्गत्वाची किंवा सामान्य नावे म्हणजे अमूर्त कल्पना होत.

### ९.६ सरावासाठी स्वाध्याय -

१) जन्मजात कल्पना सिद्धांताचे लॉकने कसे खंडण केले आहे ते स्पष्ट करा.

२) कल्पनांच्या उत्पत्ती संबंधीच्या लॉकच्या सिद्धांताचे स्पष्टीकरण करा.

३) साध्या व संमिश्र कल्पनांचे स्वरूप व प्रकार स्पष्ट करा.

४) लॉकची ज्ञानविषयक उपपत्ती स्पष्ट करा.

५) मानवी ज्ञानाचे लॉकने सांगितलेले प्रकार स्पष्ट करा.

६) टीपा लिहा - अ) लॉकचा अनुभववाद

ब) अमूर्त कल्पना

### ९.७ अधिक वाचनासाठी पुस्तके -

कृपया ग्रंथाच्या शेवटी सूची पहावी.

घटक -१०

# बर्कले ( Berkeley )


१०.० उद्दिष्टे

१०.१ प्रास्ताविक - चरित्र, कार्य व तत्त्वज्ञान

१०.२ विषय - विवेचन

१०.२.१ लॉक - बर्कले संबंध

१०.२.२ अमूर्त कल्पनांचे खंडण

१०.२.३ 'अस्तित्व म्हणजे संवेदन'
( "Esse est percipi" )

१०.२.४ अभौतिकवाद ( Immaterialism )

१०.२.५ ईश्वराचे स्थान

१०.२.६ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१०.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ, इत्यादी

१०.४ स्वयं-अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१०.५ सारांश

१०.६ सरावासाठी स्वाध्याय

१०.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १०.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासाने आपल्याला -

* लॉक आणि बर्कले यांच्यातील संबंधाचे स्वरूप समजून येईल.

* लॉकच्या अमूर्त कल्पना सिद्धांतावर बर्कले याने केलेली टीका स्पष्ट करता येईल.

* 'अस्तित्व म्हणजेच संवेदन' या बर्कलेच्या तत्त्वज्ञानातील मध्यवर्ती सिद्धांताचे स्वरूप, व्याप्ती व महत्त्व याविषयी माहिती मिळेल.

* जडद्रव्याच्या स्वतंत्र अस्तित्वाचे त्याने केलेले खंडण - म्हणजेच बर्कलेच्या अभौतिक वादाचे स्वरूप स्पष्ट होईल.

* बर्कलेच्या तत्त्वज्ञानातील ईश्वराचे स्थान काय आहे याविषयी माहिती मिळू शकेल.

## १०.१ प्रास्ताविक : चरित्र, कार्य व तत्त्वज्ञान

बर्कलेचा जन्म एका इंग्लिश कुटुंबात १२ मार्च १६८५ रोजी आयर्लंडमध्ये झाला. १७०० मध्ये त्याने

ट्रिनिटी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तेथे त्याने गणित, भाषा, तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयांचा अभ्यास केला आणि १७०४ मध्ये बी.ए. ही पदवी संपादन केली. पुढे १७०७ मध्ये त्याच कॉलेजमध्ये तो फेलो (Fellow) म्हणून रूजू झाला. १७०९ मध्ये इंग्लिश चर्चमध्ये बिशप म्हणून त्याची नेमणूक झाली. तसेच त्याने आपला अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ - An Essay towards a new Theory of Vision प्रसिद्ध केला.

बर्कलेच्या विचारावर लॉक आणि मालब्रंश यांचा प्रभाव दिसून येतो. लॉकच्या अनुभववादाचा तो वारस मानला जातो. कल्पनांच्या उत्पत्तीविषयीचे लॉकचे मानसशास्त्रीय विश्लेषण त्याने मान्य केले. बर्कलेने जरी लॉकच्या अनुभववादाचे समर्थन केले असले तरी तो लॉकचा आंधळा अनुयायी नव्हता. त्याने लॉकच्या अमूर्त कल्पना सिद्धांतावर केलेल्या टीकेवरून हे स्पष्ट होते. त्याचे तत्त्वज्ञान लॉकच्या तत्त्वज्ञानापेक्षा वेगळे असून त्याने अनुभवनिष्ठ चिदवादाचा (Empirical Idealism) पुरस्कार केला आहे.

बर्कले हा केवळ तत्त्वचिंतक नव्हता तर तर तो एक चांगला जिद्दीचा व तळमळीचा कार्यकर्ताही होता. त्याने शिक्षण प्रसाराचे कार्य केले आहे. तसेच सामान्य जनतेचे व्यावहारिक जीवनात भौतिक व अध्यात्मिक कल्याण व्हावे अशी त्याची तीव्र इच्छा होती. धर्मोपदेशक म्हणून त्याची कामगिरी खूपच महत्त्वाची आहे. त्याचे जीवन व तत्त्वज्ञान हे धार्मिक व अध्यात्मिक कार्याला वाहिलेले होते. त्यामुळे बर्कले हा 'धार्मिक प्रबोधनकर्ता' मानला जातो. बर्कले याने विविध स्वरूपाचे लेखन केले असून त्याचे महत्त्वाचे ग्रंथ खालीलप्रमाणे आहेत -

१) Arithmetica

२) A Treatise Concerning the principless of Human Knowledge

३) The Minute Philosopher (1732)

ऑक्सफर्ड येथे त्याने शेवटचे दिवस घालविले. १४ जानेवारी १७५३ रोजी बर्कलेचे निधन झाले.

## १०.२ विषय विवेचन :-

### १०.२.१ लॉक - बर्कले संबंध -

बर्कले हा अनुभववादी परंपरेतील एक महत्त्वाचा तत्त्वचिंतक होय. अनुभववादाची सुरूवात ब्रिटनमध्ये जॉन लॉकने केली. ज्ञानाची निर्मिती व स्वरूप, कल्पनांची उत्पत्ती याविषयी लॉकने केलेली मिमांसा बर्कले याने मान्य केली असून लॉकच्या अनुभववादाचे त्याने समर्थन आहे. लॉकच्या अनुभववादी संप्रदायाचा वारसा बर्कलेस मिळाला असल्याने त्याच्या तत्त्वज्ञानावर लॉकचा प्रभाव दिसून येतो. तथापि लॉकच्या तत्त्वज्ञानातील सर्वच सिद्धांत त्यास मान्य होते असे म्हणता येत नाही. कारण लॉकच्या अमूर्त कल्पना सिद्धांतावर बर्कले याने टिका केली आहे

लॉक आणि बर्कले यांचे विचार व तत्त्वज्ञान यात बरेच साम्य दिसून येते. कारण बर्कले हा लॉकने सुरू केलेल्या अनुभववादाचा पुरस्कर्ता होता. लॉकच्या अनुभववादी ज्ञानसिद्धांताशी तो सहमत होता. इंद्रिय संवेदन व चिंतन या मार्गांनी ज्ञानाची निर्मिती होते ही अनुभववादी विचारसरणी लॉकप्रमाणे त्याला मान्य होती. भौतिक जगाचे ज्ञान इंद्रिय अनुभवातून होते असे बर्कलेसुद्धा मान्य करतो. बर्कलेचा लॉकशी असलेला संबंध त्याच्या अनुभववादी तत्त्वज्ञानाच्या पुरस्कारातून स्पष्ट होतो. ब्रिटीश अनुभववादाच्या विकासामध्ये लॉक व बर्कले यांचे योगदान महत्त्वाचे ठरते.

अशा रितीने बर्कले हा लॉकच्या अनुभववादी तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन चिद्वाद प्रस्थापित करतो. लॉक अनुयायी असूनही त्याचे तत्त्वज्ञान लॉकपेक्षा वेगळे आहे. त्याने अनुभवनिष्ठ चिद्वादाचा पुरस्कार केला

आहे. तसेच बर्कले याने भौतिकवादाचे आणि निरिश्वरवादाचे खंडण केलेले आहे. जाणीव निरपेक्ष व स्वतंत्र असे जडद्रव्यास अस्तित्व असूच शकत नाही असे बर्कले स्पष्ट करतो. यावरून लॉक व बर्कले यांच्या तत्त्वप्रणालीमध्ये असे साम्य आढळून येते. त्याचप्रमाणे भेदही दिसून येतो. लॉकच्या अमूर्त कल्पना सिद्धांतावर टीका करून बर्कले असे स्पष्ट करतो की मनाला अमृर्त कल्पना तयार करता येतात असे म्हणणे चूक आहे.

### १०.२.२ अमूर्त कल्पनांचे खंडण -

लॉकने आपल्या ज्ञानसिद्धांताचे प्रतिपादन करताना अमूर्त कल्पनांचे अस्तित्व मान्य केले आहे. त्याच्या मते मनुष्य आपल्या ज्ञानाच्या सोयीसाठी अमूर्तीकरणाचे सहाय्य घेत असतो. अमूर्तीकरण म्हणजे जगातील वस्तूंना दिलेली वर्गत्वाची किंवा सामान्य नावे होत. थोडक्यात, अमूर्त कल्पना म्हणजे विविधतेत सामान्यत्व शोधून तयार केलेली कल्पना होय. अनेक वस्तूमध्ये दिसून येणाऱ्या सामाईक गुणधर्मांना एकत्रित करून जी सामान्य कल्पना तयार केली जाते त्यास अमूर्त कल्पना म्हणतात. उदा. सर्व माणसात आढळून येणारा 'मनुष्यत्व' हा साधारण गुण असून त्याच्या आधारे आपण 'मनुष्य'ही अमूर्त कल्पना तयार करतो. लॉकच्या मते अमूर्त कल्पना स्थल-काल निरपेक्ष असतात. त्या कधीही नाहीशा होत नाहीत. त्या कायम असतात. लॉकच्या अमूर्त कल्पना सिद्धांतावर बर्कले खालीलप्रमाणे टीका करतो.

**बर्कलेची अमूर्त कल्पनेवरील टीका -**

१) जगातील सर्व वस्तू व घटना यांच्यातील साधारण गुणधर्म लक्षात घेऊन मानवी मन अमूर्त कल्पना तयार करीत असते आणि या अमूर्त कल्पनेच्या सहाय्यानेच पुन्हा विशिष्ट वस्तू व घटना यांचे ज्ञान होते. या लॉकच्या विचाराशी बर्कले सहमत नाही. बर्कलेच्या मते अशा अमूर्त कल्पना रचण्याची क्षमता मनामध्ये नसते. शिवाय अमूर्त कल्पना आपणास कधीही अनुभवास येत नाहीत. अमूर्त कल्पना ज्या शब्दांनी निर्देशित केल्या जातात ते फक्त 'शब्द' असतात. शब्दाहून अधिक इतर काहीही नसते. उदा.त्रिकोणाच्या सामान्य कल्पनेला अनुरूप असा कोणताही सामान्य त्रिकोण वास्तव जगात अस्तित्वात नसतो.

२) अमूर्त कल्पनेने निर्देशित होणारी गोष्ट प्रत्यक्ष/वास्तविक जगात अनुभवास येत नाही. म्हणून 'अमूर्त कल्पना' म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून केवळ एक 'शब्द' असतो असे बर्कले स्पष्ट करतो. हा शब्द विशिष्ट वस्तूंचा निर्देश करण्यासाठी आपण अनेकवेळा वापरतो व त्यामुळे तो 'सामान्य' बनतो. वास्तवात सामान्य शब्द किंवा अमूर्त कल्पना ही केवळ एक प्रतीक आहे. केवळ एक शब्द आहे.

३) बर्कलेच्या मते मनाला अमूर्त कल्पना तयार करता येतात असे म्हणणे चुकीच्या समजुतीवर आधारित आहे. एखादा शब्द निर्माण झाला म्हणजे त्या शब्दाने निर्देशित केलेली वस्तू प्रत्यक्षात अस्तित्वात असली पाहिजे असे समजणे चूक आहे. थोडक्यात, शब्द असला म्हणजे त्याला अनुरूप अशी वस्तू/घटना प्रत्यक्ष जगात असतेच अशी चुकीची समजूत करून घेतल्यामुळे खूप गोंधळ निर्माण झालेला आहे. शब्द आणि वास्तव वस्तू यांना एकच समजणे चूक आहे. म्हणून बर्कले स्पष्ट करतो की, शब्द बाजूला ठेवून प्रत्यक्ष वस्तूंच्या कल्पनांनाच आपण जावून भिडले पाहिजे. शब्दांचा अडसर दूर केल्याशिवाय आपणास वस्तूचे सत्य ज्ञान होऊ शकत नाही.

४) शेवटी बर्कले असा युक्तीवाद करतो की, अमूर्त कल्पना रचणे केवळ अशक्य आहे. त्यामुळे लॉकचा अमूर्त कल्पना सिद्धांत अस्वीकाराई आहे. उदा.'मनुष्य' या अमूर्त कल्पनेत सर्व माणसांचे विविध, परस्परविरोधी गुण अंतर्भूत असूच शकत नाहीत. कारण आपला अनुभव असा आहे की, भोवतालच्या जगात विविध माणसे असून त्यांच्या ठिकाणी विविध परस्पर विरोधी स्वरूपाचे गुणधर्म आहेत. त्यांच्याबाबतीत काहीही साम्य नाही. उंची, रंग, स्वभाव, रूप-सौंदर्य, बुद्धिमत्ता, इ. गुणधर्मा-बाबतीत व्यक्ती-व्यक्तीमध्ये

भिन्नता किंवा विविधता दिसून येते. त्यामुळे परस्पर विरोधी गुण असलेल्या व्यक्तींच्या ठिकाणी सामान्यत्व किंवा सामान्य गुण कसा असू शकेल ? यावरून अशा परस्पर विरोधी गुणांना सामावून घेणारी अमूर्त कल्पना अस्तित्वात असणे अशक्य आहे असा बर्कलेचा निष्कर्ष आहे.

आधुनिक मानसशास्त्रज्ञांनाही बर्कलेची अमूर्त कल्पना सिद्धांताचे खंडण करणारी भूमिका मान्य आहे. कारण त्यांच्यामते आपण 'सामान्य माणूस' किंवा 'सामान्य त्रिकोण' अशा प्रकारची कल्पना मनात तयार करू शकत नाही. कोणतीही कल्पना (प्रतिमा) ही एखाद्या विशिष्ट माणसाशी किंवा विशिष्ट त्रिकोणाशी संबंधित असते. म्हणून 'त्रिकोण' ही अमूर्त कल्पना म्हणजे केवळ एक शब्द होय.या सर्व युक्तीवादावरून बर्कले असे स्पष्ट करतो की, मनाला अमूर्त कल्पना तयार करता येत नाही आणि अमूर्त कल्पना या केवळ शब्द/नाम असतात. वास्तवात त्या काहीही नसतात. अमूर्त कल्पनांना शब्दाशिवाय दुसरे महत्त्व नाही. अशाप्रकारे बर्कलेने अमूर्त कल्पनांचे खंडण केले आहे.

### १०.२.३ 'अस्तित्व म्हणजे संवेदन' ("Esse est percipi") -

बर्कलेच्या तत्त्वज्ञानाच्या दोन बाजू आहेत - निषेधात्मक (Negative) आणि विधायक (Positive). सर्वप्रथम त्याने लॉकच्या अमूर्त कल्पना सिद्धांताचे खंडण केले आहे. त्यानंतर जडद्रव्यास स्वतंत्र जाणीव निरपेक्ष अस्तित्व नसते असे तो स्पष्ट करतो. ज्ञानाची उत्पत्ती व ज्ञानाची साधने (इंद्रिय संवेदन व चिंतन) याविषयीची लॉकची अनुभववादी मीमांसा त्याने मान्य केली आहे. परंतु बर्कलेच्या मते भौतिक वस्तूंच्या प्रतिमा, ठसे किंवा संस्कार यांना मनाबाहेर अस्तित्व नसते. ज्या ज्या वेळी भौतिक वस्तूचे ज्ञान होते त्यावेळी ती भौतिक वस्तू आपल्या (व्यक्तीच्या) मनात असते. व्यक्तीच्या मनाशिवाय भौतिक वस्तूंचे ज्ञान होऊ शकत नाही. यावरून भौतिक वस्तूंच्या अस्तित्वाचे ज्ञान मन सापेक्ष असते असे बर्कले म्हणतो. बर्कलेच्या तत्त्वज्ञानाची ही विधायक बाजू होय. 'अस्तित्व म्हणजेच संवेदन (Existence is perception)' हा त्याच्या तत्त्वज्ञानातील मध्यवर्ती सिद्धांत असून त्याचे सर्व तत्त्वज्ञान या सिद्धांतावरच आधारित आहे.

मनाशिवाय भौतिक वस्तूचे ज्ञान व अस्तित्व सिद्ध होत नाही ही बर्कलेची भूमिका तर्कशुद्ध असून त्याचा हा विचार बहुतेक सर्व विचारवंतांनी मान्य केला आहे. व्यक्तीच्या मनाशिवाय कल्पना अगर विचार यांना स्वतंत्र अस्तित्व नसते हे स्पष्ट करून बर्कले भौतिक वस्तूंच्या ज्ञानासंबंधी व अस्तित्वासंबंधी विचार करतो. याबाबत लॉकची भूमिका बर्कलेला मान्य नाही. त्याच्या मते संवेदनाशिवाय भौतिक वस्तूचे स्वतंत्र अस्तित्व अशक्य आहे. बर्कलेच्या मते ज्याचे संवेदन होत नाही अशी भौतिक वस्तू अस्तित्वात असणे शक्य नाही. संवेदनाशिवाय भौतिक वस्तूची आपणास कल्पना देखील करता येणार नाही. असंवेदनीय व अज्ञात द्रव्याची कल्पना अशक्य होय. बर्कलेच्या मते जगात जडवस्तू आहेत हे आपणास केवळ कल्पनांच्या मार्फत समजते आणि कल्पना मनाशिवाय असू शकत नाहीत. कल्पनांना मनातच अस्तित्व असते. संवेदनक्षम मनाशिवाय कल्पनांचे ज्ञान होऊ शकत नाही.

'वस्तूंना अस्तित्व असते' या विधानाच्या नेमक्या अर्थाविषयी बर्कले चिकित्सा करतो. संवेद्य वस्तूंना अस्तित्व असते असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा 'संवेद्य' या शब्दाचा नेमका अर्थ तो स्पष्ट करतो. तो म्हणतो 'मी ज्या टेबलावर लिहितो आहे असे जेव्हा मी म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ मी ते पाहतो व ते मला जाणवते'. मी खोलीच्या बाहेर गेल्यावरही - 'खोलीत टेबल आहे' असे मी म्हणतो. तेव्हा माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की, मी जर खोलीत असेल तर ते मला दिसले असते. पण अज्ञात व अज्ञेय भौतिक द्रव्याचे अस्तित्व कसे सिद्ध करता येईल ? म्हणून बर्कलेच्या मते जे अज्ञात आहे त्याचे संवेदन होणार नाही आणि ज्याचे संवेदन होणार नाही त्याची कल्पनाही तयार होणार नाही. त्यामुळे कल्पना नसेल तर भौतिक द्रव्य अस्तित्वात आहे असे म्हणण्यास

कोणताही तार्किक पुरावा आपल्याजवळ नाही. अशाप्रकारे सर्व वस्तूंचे व भौतिक जगाचे अस्तित्व व्यक्तीच्या मनाला होणाऱ्या संवेदनावर अवलंबून असते असे स्पष्ट करून बर्कले 'अस्तित्व म्हणजेच संवेदन' हा सिद्धांत महत्त्वाचा मानतो.

बर्कलेच्या मते ज्याचे ज्याचे आपणास संवेदन होते ते सर्व अस्तित्वात असते. आपले विचार व कल्पना आपल्या मनात अस्तित्वात असतात. त्यांचे अस्तित्व हे आपणास त्यांचे संवेदन होण्यात सामावलेले असते. अशाप्रकारे बर्कले 'अस्तित्व = संवेदन' असे समीकरण मांडून दोघाना परस्परांशी एकरूप समजतो. म्हणजे एखादी गोष्ट - मग ती रंग, आकार काहीही असो - जोपर्यंत एखादी व्यक्ती संवेदनाच्या मार्गाने ती अनुभवीत असते, तोपर्यंत तिला अस्तित्व असते. या जगात जे कोणाच्याही अनुभवास कधीही आलेले नाही, त्याला अस्तित्व असते असे म्हणणे बर्कलेच्या मते 'वदतो व्याघात' आहे. म्हणूनच वस्तूचे अस्तित्वात असणे म्हणजे तिचे संवेदन होणे व ती मनात असणे होय असे बर्कले स्पष्ट करतो (To be is to be percieved).

'अस्तित्व म्हणजे संवेदन' या बर्कलेच्या प्रमुख सिद्धांतातील ठळक गोष्टी खालीलप्रमाणे-

१) आपल्या कल्पना, प्रतिमा आणि भावना यांना मनाबाहेर किंवा मनाशिवाय अस्तित्व असू शकत नाही. (Our ideas, feelings and images have no existence apart from the mind.)

२) जाणणाऱ्या व्यक्तीशिवाय सुद्धा कल्पनांना अस्तित्व नसते. म्हणजे व्यक्तीच्या मनाबाहेर कल्पना असते असे म्हणता येत नाही. (Ideas independent of the knower also have no existence.)

३) जेव्हा 'अस्तित्व' हा शब्द भौतिक वस्तूंच्या संदर्भात वापरला जातो तेव्हा त्याचा अर्थ संवेदाशिवाय इतर काहीही नसतो. म्हणजे एखादी वस्तू अस्तित्वात आहे याचा अर्थ ती संवेदनीय आहे असा होतो.

४) कोणत्याही वस्तूचा विचार करताना किंवा त्या वस्तूबद्दल बोलताना ती वस्तू संवेदनीय नाही असे म्हणणे अर्थहीन व निरूपयोगी आहे. म्हणजेच वस्तू 'आहे' पण ती संवेदनीय नाही असे म्हणणे निरर्थक आहे. म्हणूनच अस्तित्वात असणे म्हणजेच संवेदन होणे होय.

**बर्कलेच्या सिद्धांतावरील टीका -**

**१) मुर-रसेलची टिका -**

भौतिक वस्तूचे अस्तित्व व्यक्तीच्या जाणीवेवर किंवा संवेदनावर अवलंबून असते. तसेच भौतिक वस्तूला जाणीव निरपेक्ष स्वतंत्र अस्तित्व नसते असे बर्कले स्पष्ट करतो. आपल्या 'Esse est percipie' या सिद्धांताचे समर्थन करताना बर्कले म्हणतो की, भौतिक वस्तूची जाणीव आणि भौतिक वस्तू या दोन्ही एकच असून भौतिक वस्तू अस्तित्वात असणाऱ्यांसाठी व्यक्तीच्या जाणीवेची गरज आहे. परंतु मूर व रसेल यांना हे मान्य नाही. मूर आणि रसेल यांनी भौतिक वस्तूंच्या अस्तित्वाबद्दल वास्तववादी भूमिका स्वीकारली आहे. त्यांच्या मते भौतिक वस्तूंना जाणीव निरपेक्ष, स्वतंत्र व स्वयंभू अस्तित्व असते. तसेच जाणीव व जाणीवेत येणारी भौतिक वस्तू या दोन्ही गोष्टी भिन्न असून भौतिक वस्तूला स्वतंत्र वास्तव अस्तित्व असते.

बर्कलेच्या सिद्धांतावर टीका करताना मूर व रसेल असे स्पष्ट करतात की, जाणीव ही मानसिक अवस्था असून भौतिक वस्तू या जाणीवेला कारण होत असतात. भौतिक वस्तू मनाबाहेर असतात. तसेच जाणीव ही मानसिक प्रक्रिया असून भौतिक द्रव्य ही बाह्य वस्तुस्थितीत असलेली गोष्ट आहे. म्हणून मूर-रसेल यांच्यामते जाणीव व भौतिक वस्तू या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत हे मान्य केल्याशिवाय भौतिक वस्तूचे ज्ञान होणे अशक्य आहे. उदा.रंग ही भौतिक वस्तू स्वतंत्र अस्तित्वात असून तिची जाणीव आपल्या मनात आहे. म्हणून पिवळा रंगही मनात आहे असे म्हणणे चुक आहे. जाणीवेला कारण होणाऱ्या भौतिक वस्तूला जाणीव समजून बर्कलेने

मोठी चूक केली आहे हे मूर-रसेल म्हणतात. म्हणून 'अस्तित्व म्हणजे संवेदन' हा बर्कलेचा सिद्धांत मुळातच सदोष आहे.

**२) नव- वास्तववाद्यांची टीका -**

नव वास्तववाद्यांनी बर्कलेच्या अस्तित्व म्हणजे संवेदन या सिद्धांतातील खालीलप्रमाणे दोष दाखविले आहेत-

१) आत्मकेंद्रीत निष्कर्ष काढण्याचा दोष- याबाबत नव वास्तववादी विचारवंत असे स्पष्ट करतात की, आपल्या भोवताली अनंत पदार्थ असतात. 'मी' ज्या वस्तू अगर घटना पाहतो त्या सर्वांच्या केंद्रस्थानी 'मी' (Self / Ego) असतोच. जेव्हा जेव्हा 'मी' काहीतरी पाहतो किंवा अनुभवितो तेव्हा तेव्हा त्याच्या केंद्रस्थानी 'मी' सदैव असतोच, किंबहुना जाणणारा 'मी' जर केंद्रस्थानी नसलो तर होणारे ज्ञान माझे स्वत:चे असणार नाही. त्यामुळे माणसाला असे वाटते की, माझ्या जाणीवेवरच (ज्ञानावरच) पदार्थाचे अस्तित्व अवलंबून आहे. यालाच आत्मकेंद्रीत निष्कर्ष काढण्याचा दोष म्हणतात. बर्कलेच्या सिद्धांतात हा दोष दिसून येतो.

२) विशेषीकरणाचा दोष- बर्कले आपल्या सिद्धांतात पदार्थांना संकुचित स्वरूप देतो. जगात एखादा पदार्थ एक क्षेत्राशी संबंधीत असताना तो इतर क्षेत्राशी सुद्धा संबंधित असतो ही वस्तुस्थिती बर्कले विसरतो. म्हणजेच भौतिक पदार्थ आपल्या जाणीवेशी संबंधित असताना इतर क्षेत्राशीही पदार्थांचा संबंध असतो हे मान्य केले पाहिजे. परंतु बर्कले असे न करता पदार्थास स्वत:च्या जाणीवेशी संबंधित करून त्याचे स्वरूप संकुचित करतो, आणि जाणणाऱ्या किंवा पाहणाऱ्या व्यक्तीवरच भौतिक पदार्थाचे अस्तित्व अवलंबून असते असा निष्कर्ष काढतो. त्यामुळे संवेदन होणे म्हणजेच पदार्थ (वस्तू) असा विशेषीकरणाचा तर्कदोष येथे निर्माण होतो.

३) भौतिक वस्तूंच्या प्रारंभिक संवेदनालाच व्याख्येत घेण्याचा दोष बर्कलेच्या भूमिकेत दिसून येतो.

**१०.२.४ अभौतिकवाद** (Immaterialism) -

बर्कले हा लॉकप्रमाणेच अनुभववादी तत्त्वज्ञ आहे. पण लॉकने भौतिक द्रव्याचे स्वतंत्र अस्तित्व मान्य केले तर बर्कले याने भौतिक द्रव्याच्या स्वतंत्र जाणीवनिरपेक्ष अस्तित्वाची शक्यता नाकारली. म्हणून तो अभौतिकवादी मानला जातो. बर्कलेच्या मते जगात फक्त दोन प्रकारच्या वस्तू अस्तित्वात आहेत त्या म्हणजे - संवेदनाच्या अनुभव घेणारा आत्मा आणि संवेदनाच्या विषय होणाऱ्या कल्पना. आत्मा (Soul) आणि कल्पना (Ideas) याशिवाय जगात काहीही अस्तित्वात नसते. याप्रकारे बर्कले भौतिक द्रव्याच्या अस्तित्वाची शक्यता नाकारतो. लॉकच्या भूमिकेस विरोध करून त्याने आपला अभौतिकवादाचा सिद्धांत मांडला आहे.

लॉकच्या मते भौतिक द्रव्याच्या ठिकाणी प्राथमिक व दुय्यम गुण असून त्याने प्राथमिक व दुय्यम गुणातील फरक स्पष्ट केला आहे. लॉकच्या मते दुय्यम गुणांचे ज्ञान मनावर अवलंबून असते, तर प्राथमिक गुण अज्ञात भौतिक द्रव्यात असतात की, जे भौतिक द्रव्य मनाबाहेर असते. म्हणजेच प्राथमिक गुणांना धारण करणारे हे अज्ञात द्रव्य की जे मनाबाहेर अस्तित्वात असते त्यास लॉकने भौतिक द्रव्य (Matter) असे म्हटले आहे. त्याच्या मते दुय्यम व प्राथमिक गुण हे स्वावलंबी व स्वयंपूर्ण नसतात. त्यांना धारण करण्यासाठी एखादी आधारभूमी किंवा अधिष्ठान लागते. म्हणून या गुणांना धारण करणारे द्रव्य म्हणजे भौतिक द्रव्य होय. अशाप्रकारे लॉकने भौतिक द्रव्याचे स्वतंत्र अस्तित्व मान्य केले आहे. याउलट बर्कले याने भौतिक द्रव्याचे स्वतंत्र अस्तित्व नाकारले आहे.

**भौतिक द्रव्याविरोधीचे बर्कलेचे युक्तीवाद -**

भौतिक द्रव्याच्या स्वतंत्र अस्तित्वाचे खंडण करण्यासाठी बर्कले खालीलप्रमाणे युक्तीवाद करतो

### १) भौतिक द्रव्याचे प्राथमिक गुणही व्यक्तिनिष्ठ असतात-

लॉकने प्रतिपादन केलेली प्राथमिक आणि दुय्यम गुणातील भेदाची मीमांसा बर्कले मान्य करतो. लॉकच्या मते प्राथमिक गुण अपरिवर्तनीय असून ते व्यक्तीनिरपेक्ष असतात, तर दुय्यम गुण परिवर्तनीय असून ते व्यक्तीसापेक्ष असतात. बर्कलेच्या मते भौतिक द्रव्याच्या दुय्यम गुणाप्रमाणेच प्राथमिक गुणसुद्धा व्यक्तिनिष्ठ असतात. कारण भौतिक द्रव्याची व्यापकता, गती आणि अवकाश या प्राथमिक गुणांचे ज्ञान व्यक्तीशिवाय किंवा जाणणाऱ्या मनाशिवाय होऊ शकत नाही.

### २) अज्ञात भौतिक द्रव्य गुणांचा आधार असू शकत नाही -

लॉकच्या मते गुणांना आधार किंवा अधिष्ठान म्हणून भौतिक द्रव्य मान्य करावे लागते. पण भौतिक द्रव्य हे अज्ञात व अज्ञेय असते. पण बर्कलेस लॉकचे हे मत मान्य नाही. बर्कलेच्या मते, गुणांना आधार देणारे भौतिक द्रव्य हे व्यक्तीच्या ज्ञानाचाच भाग असून ते अज्ञात आहे असे म्हणणे चूक आहे. म्हणून भौतिक द्रव्य आणि त्याच्या गुणांचे ज्ञान व्यक्तीच्या मनावर अवलंबून असते. मनाशिवाय किंवा मननिरपेक्ष असे भौतिक द्रव्य गुणांचा आधार असूच शकत नाही.

३) लॉकने भौतिक द्रव्य क्रियाहीन असते असे म्हटले आहे. परंतु बर्कले असा युक्तीवाद करतो की, क्रियाहीन भौतिक द्रव्य आपल्या मनात कल्पना निर्माण करू शकत नाही. आणि जर ते व्यक्तीच्या मनात कल्पना निर्माण करण्यास असमर्थ असेल तर ते अस्तित्वात आहे याला पुरावा कोणता ? क्रियाशील मनच कल्पना निर्माण करू शकते, क्रियाहीन भौतिक द्रव्याच्या सहाय्याने कल्पना निर्माण होत नाहीत असे बर्कले मानतो. म्हणूनच मनाशिवाय भौतिक द्रव्य अस्तित्वात असत नाही.

४) बर्कलेच्या मते अज्ञात भौतिक द्रव्याची कल्पना असत्य असून ती कपोलकल्पित आहे. लॉक म्हणतो त्याप्रमाणे भौतिक द्रव्य अज्ञात नसते. याचा अर्थ भौतिक द्रव्य अनुभवास येत नाही, ते अनुभव पलिकडे आहे असा होतो. बर्कलेच्या मते ज्याचे आपल्या ज्ञानेंद्रियाना वेदन होत नाही, जे आपल्या अनुभवास येऊ शकत नाही त्याचे मला ज्ञान कसे होऊ शकेल ? म्हणूनच जे अनुभवास येऊ शकत नाही असे अज्ञात भौतिक द्रव्य असत्य असून मनाशिवाय भौतिक द्रव्याची कल्पनाच करता येणार नाही. अशाप्रकारे जाणीव निरपेक्षपणे म्हणजे जाणणाऱ्या व्यक्तीच्या जाणीवेबाहेर भौतिक द्रव्य स्वतंत्रपणे अस्तित्वात असूच शकत नाही.

बर्कलेच्या वरील युक्तीवादावरून असे स्पष्ट होते की, दुय्यम गुणाप्रमाणे प्राथमिक गुण सुद्धा व्यक्तीच्या मनावर अवलंबून असतात आणि हे गुण धारण करणारी भौतिक वस्तूही मनावर अवलंबून असते. म्हणजे लॉक म्हणतो त्याप्रमाणे भौतिक वस्तू मननिरपेक्ष नसून ती मनसापेक्ष - व्यक्तीसापेक्ष असते. कोणतीही कल्पना मनाशिवाय अस्तित्वात असू शकत नाही. जगात भौतिक वस्तू असतात याचा अर्थ त्या कुणाच्या तरी अनुभवाचा विषय असतात. ज्याचा कुणालाही अनुभव येत नाही अशी जाणीव निरपेक्ष अज्ञात भौतिक वस्तू अस्तित्वात असणे शक्य नाही असे बर्कलेचे प्रतिपादन आहे.

यावरून भौतिक वस्तू अस्तित्वात आहे याचा अर्थ ती संवेदनीय आहे असा होतो. म्हणून 'अस्तित्वात असणे म्हणजे संवेदनीय असणे' असा सिद्धांत बर्कले मांडतो. 'जे जे संवेदनीय आहे ते ते अस्तित्वात आहे' (Existence is perception), ज्याचे संवेदन होत नाही असे काहीही अस्तित्वात असू शकत नाही. जाणीवेशिवाय स्वतंत्र व स्वयंभू असे भौतिक द्रव्य अस्तित्वात असू शकत नाही असे बर्कले स्पष्ट करतो.

### १०.२.५ बर्कलेच्या तत्त्वज्ञानातील ईश्वराचे स्थान (Place of God) -

बर्कले आपल्या तत्त्वज्ञानात जडद्रव्याचे स्वतंत्र अस्तित्व नाकारतो. तसेच भौतिकवाद व निरीश्वरवाद

नाकारतो आणि व्यक्तिनिष्ठ किंवा अनुभवनिष्ठ चिद्‌वादाची मांडणी करतो. जड द्रव्याच्या व भौतिक जगाच्या अस्तित्वाचा विचार करीत असता बर्कले ईश्वराची कल्पना मान्य करतो. बर्कलेच्या सिद्धांताप्रमाणे वस्तूचे अस्तित्व जर आपल्या संवेदनावर अवलंबून असेल तर आपण डोळे मिटल्यावर सर्व जग दिसेनासे होऊन नाहीसे होते काय ? वस्तू मला दिसत नाहीत म्हणून त्या अस्तित्वात नाहीत असे म्हणता येईल काय ? बर्कले म्हणतो की, रात्री मी झोपल्यावर माझे घर, अंगणातील झाडे, घरातील वस्तू, समोरचा डोंगर व नदी हे सर्व मला दिसेनासे होतात. याचा अर्थ त्यांचे अस्तित्व नाहीसे होते की काय ? पुन्हा सकाळी जेव्हा मी डोळे उघडून पाहतो तर त्या सर्व वस्तू होत्या तशा आणि तेथेच असतात. म्हणजे त्या वस्तू नित्यपणे असतातच. बर्कलेच्या मते मी झोपी गेल्यावर त्या वस्तू दिसेनाशा झाल्या तरी त्यांचे संवेदन इतर जाणत्या व्यक्तीच्या मनाला होत असते आणि सर्व एकाचवेळी झोपली तरी त्या ईश्वराच्या मनाला दिसत असतात. ईश्वर सदैव जागृत असल्याने व त्याचे अस्तित्व नित्य व शाश्वत असल्याने जगाच्या अस्तित्वाची ईश्वरामुळे हमी मिळते.

अशा रितीने बर्कले आपल्या तत्त्वज्ञानात एक प्रकारे ईश्वराची योजना करतो. जेव्हा वस्तूंचे मला संवेदन होत नाही किंवा इतर कोणालाच संवेदन होत नाही अशावेळी ती वस्तू अस्तित्वात नाही असे म्हणता येत नाही. कारण अशा वस्तूचे संवेदन माझ्याशिवाय किंवा इतर मानवी मनाशिवाय ईश्वराला होत असते असे बर्कले म्हणतो. त्याच्या मते जेव्हा एखाद्या वस्तूचे मला/इतरांना संवेदन होत नाही, तेव्हा ते ईश्वरी मनाला होत असले पाहिजे. म्हणून ईश्वर अस्तित्वात असला पाहिजे. कारण अखिल विश्वातील वस्तूमात्रांचा कर्ता, सर्वज्ञ, सर्वशक्तीमान असा ईश्वर असून त्याला सर्व वस्तुमात्राच्या अस्तित्वाचे ज्ञान होत असते असे बर्कले म्हणतो. त्याच्यामते या संपूर्ण जगाचा व विश्वाचा द्रष्टा, संवेदक ईश्वर असतो.

बर्कलेच्या मते आपणास ज्याचे संवेदन होते अशा वस्तू म्हणजे ईश्वराच्या संवेदनातील चिरंतन कल्पनांच्या प्रतिकृती होत. जेव्हा आपणास संवेदन होत नाही तेव्हा या सर्व वस्तूंना ईश्वराच्या मनातील कल्पना म्हणून अस्तित्व असतेच. ईश्वर म्हणजे सर्व वस्तुमात्रांचे मूळ कारण असून त्याच्या ठिकाणी सर्व वस्तूंना अस्तित्व असतेच. अशाप्रकारे 'अस्तित्व म्हणजे संवेदन' या आपल्या प्रमुख सिद्धांताचा ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी एक युक्तिवाद म्हणून बर्कले उपयोग करतो. त्याच्यामते कोणत्याही वस्तूचे अस्तित्व संवेदन किंवा जाणीवेशिवाय असू शकत नाही व अंतिमत: त्या वस्तूचे अस्तित्व सर्वज्ञ अशा ईश्वराच्या मनात असते.

बर्कलेच्या मते ईश्वर म्हणजे एकमेवाद्वितीय सर्वज्ञ, सर्वव्यापी असे चिद्‌तत्त्व असून प्रत्येक वस्तूचे अस्तित्व ईश्वरावर अवलंबून असते. ईश्वर म्हणजे सर्वात परिपूर्ण असे अस्तित्व, शुद्ध क्रियाशीलता आणि वासना विरहित व शुद्ध बुद्धीची अवस्था होय. ईश्वर हा परमात्मा असल्याने तो सर्व निर्मितीचे मूळ असतो. ईश्वर नित्य, सनातन, सर्व वस्तूंचा निर्माता व धारणकर्ता असतो. बर्कलेच्या मते असा ईश्वर म्हणजे एकमेव अमर्याद सद्‌भावयुक्त, प्रज्ञानी व परिपूर्ण असतो.

अशाप्रकारे 'अस्तित्व म्हणजे संवेदन' हा आपला मूळ सिद्धांत अबाधित व कायम ठेवून त्यातील अडचणी टाळण्यासाठी बर्कले आपल्या तत्त्वज्ञानात ईश्वराची योजना करतो. वस्तुमात्रांचे किंवा जगाचे अस्तित्व विचारात घेत असताना तो ईश्वरी संवेदनाचा विचार करतो. त्याच्यामते संपूर्ण जगाचे अस्तित्व हे ईश्वराच्या सर्व व्यापक, नित्य, शाश्वत, नियमित व सुव्यवस्थित अशा संवेदनावर अवलंबून असते. यावरून बर्कलेचे तत्त्वज्ञान मानवकेंद्री न राहता ईश्वरकेंद्री बनले आहे.

अशा ईश्वराने ज्ञान आपणास कसे होते याबाबत बर्कले असे स्पष्ट करतो की, ईश्वराच्या अस्तित्वाचे आपणास संवेदन होत नाही. तो आपल्या जाणीवेच्या कक्षेत येत नाही. ईश्वराविषयी मर्यादित मानवाच्या मनात कल्पना निर्माण होऊ शकत नाही. तर विश्वव्यापक चैतन्य किंवा सर्वज्ञ अशा ईश्वराविषयी आपण परिपूर्ण

कल्पना (Notion) करू शकतो. आपल्या बुद्धीस ईश्वराचे आकलन होत नाही. म्हणून बर्कलेच्या मते ईश्वर म्हणजे एक प्रकारचे अध्यात्मिक द्रव्य (Spiritual Substance) होय.

### १०.२.६ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न :-

**१) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१) बर्कले हा लॉकचा अनुयायी होता.

२) बर्कलेने अमूर्त कल्पनांचे अस्तित्व मान्य केले आहे.

३) अमूर्त कल्पना म्हणजेच सामान्य कल्पना होत.

४) अमूर्त कल्पना म्हणजे केवळ एक शब्द होय.

५) जडद्रव्यास स्वतंत्र अस्तित्व असते असे बर्कलेचे मत आहे.

६) बर्कले याने अभौतिकवादाचे समर्थन केले आहे.

७) बर्कले ईश्वराचे अस्तित्व नाकारतो.

८) बर्कले हा व्यक्तिनिष्ठ चिद्वादी होय.

९) ईश्वराच्या अस्तित्वाचे आपणास संवेदन होते असे बर्कले म्हणतो.

१०) ईश्वर म्हणजे अध्यात्मिक द्रव्य होय.

**२) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) --------- च्या अमूर्त कल्पना सिद्धांतावर बर्कले याने टीका केली आहे.

अ) देकार्त ब) ह्यूम क) लॉक

२) बर्कलेच्या मते --------- कल्पना रचण्याची क्षमता मनामध्ये नसते.

अ) अमूर्त ब) विशिष्ट क) जन्मजात

३) असंवेदनीय व अज्ञात द्रव्याची कल्पना --------- असते.

अ) शक्य ब) अशक्य क) उपयुक्त

४) 'अस्तित्व म्हणजे संवेदन' हा सिद्धांत --------- यांनी मांडला आहे.

अ) लॉक ब) बर्कले क) ह्यूम

५) बर्कलेच्या तत्त्वज्ञानाला --------- असे म्हटले जाते.

अ) जडवाद ब) चिद्वाद क) व्यक्तिनिष्ठ चिद्वाद

६) बर्कलेच्या मते जड द्रव्याला जाणीव निरपेक्ष व स्वतंत्र अस्तित्व ---------

अ) असते ब) नसते क) सांगता येत नाही

७) बर्कलेच्या मते --------- म्हणजे अध्यात्मिक द्रव्य होय.

अ) भौतिक जग ब) ईश्वर क) आत्मा

## १०.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ, इत्यादी :-

| | | |
|---|---|---|
| अनुभवनिष्ठ चिद्वाद | – | Empirical Idealism |
| अमूर्त कल्पना | – | Abstract Ideas |
| भौतिक द्रव्य | – | Matter |
| अभौतिकवाद | – | Immaterialism |
| चिद्वाद | – | Idealism |
| व्यक्तिनिष्ठ चिद्वाद | – | Subjective Idealism |

## १०.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे :-

१) १) चूक २) बरोबर ३) चूक ४) बरोबर

५) चूक ६) बरोबर ७) चूक ८) बरोबर

९) चूक १०) बरोबर

२) १) क) लॉक २) अ) अमूर्त ३) ब) अशक्य

४) ब) बर्कले ५) क) व्यक्तिनिष्ठ चिद्वाद

६) अ) असते ७) ब) ईश्वर

## १०.५ सारांश :-

लॉक आणि बर्कले यांच्या तत्त्वज्ञानात बरेच साम्य असून बर्कलेने लॉकची अनुभववादी ज्ञानमीमांसा मान्य केली आहे. तथापि लॉकच्या अमूर्त कल्पना सिद्धांताचे त्याने खंडण केले आहे. त्याच्या मते अमूर्त कल्पना रचण्याची क्षमता मनामध्ये नसते. अमूर्त कल्पना म्हणजे केवळ 'शब्द' असतात. वास्तवात त्या काहीही नसतात.बर्कलेच्या तत्त्वज्ञानातील मध्यवर्ती सिद्धांत 'अस्तित्व म्हणजे संवेदन' हा असून त्यानुसार वस्तूचे अस्तित्वात असणे म्हणजे तिचे संवेदन होणे होय.बर्कलेने भौतिक द्रव्याच्या जाणीव निरपेक्ष व स्वतंत्र अस्तित्वाचे खंडण करून अभौतिकवादाचा स्वीकार केला आहे. त्यासाठी त्याने युक्तीवाद केले आहेत.बर्कलेच्या तत्त्वज्ञानातील ईश्वराचे स्थान महत्त्वपूर्ण असून त्याने 'अस्तित्व म्हणजे संवेदन' या सिद्धांतास अनुसरूनच ईश्वराचे अस्तित्व मान्य केले आहे. त्याच्या मते ईश्वर म्हणजे एकमेवाद्वितीय सर्वज्ञ, सर्वव्यापी व नित्य स्वरूपाचे चिद्तत्त्व असून तो सर्व निर्मितीचे मूळ व परिपूर्ण अस्तित्व होय. बर्कलेच्या अनुभववादास व्यक्तिनिष्ठ चिद्वाद असे म्हटले जाते.

## १०.६ सरावासाठी स्वाध्याय :-

१) लॉक व बर्कले यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

२) बर्कलेने अमूर्त कल्पनांचे खंडण कसे केले आहे ते स्पष्ट करा.

३) 'अस्तित्व म्हणजे संवेदन' या बर्कलेच्या सिद्धांताचे सविस्तर स्पष्टीकरण करा.

४) जड द्रव्याच्या स्वतंत्र अस्तित्वासंबंधी बर्कलेने केलेली टीका स्पष्ट करा.

५) बर्कलेच्या तत्त्वज्ञानातील ईश्वराचे स्थान व स्वरूप स्पष्ट करा.

६)   **टीपा लिहा :-**

अ) लॉक - बर्कले संबंध

ब) अभौतिकवाद

क) ईश्वराचे स्थान

**१०.७  अधिक वाचनासाठी पुस्तके :-**

टीप : पुस्तकाच्या शेवटी यादी दिली आहे.

▼ ▼ ▼

## संदर्भ ग्रंथ


१.  श्री. ह. दीक्षित : भारतीय तत्त्वज्ञान

२.  केतकर भा. ग. (अनुवाद) : भारतीय तत्त्वज्ञानाची रूपरेषा (पुणे विद्यापीठ)

३.  पी. डी. चौधरी : भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास


## अधिक वाचनासाठी पुस्तके


१.  M. Hirryanna : Outlines of Indian Philosophy (Allen and Unwin)

२.  S.Radhakrishnan : Indian Philosophy Vols. I and II

३.  जोग व. वा.  : भारतीय दर्शन संग्रह

४.  F. Copleston : A History of Philosophy

५.  D.J.O'Connor : A critical History of western philosophy

६.  ग. ना. जोशी : पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास खंड १ व २

७.  Datta and Chatterjee : Introduction to Indian Philosophy

८.  Stace, Wright : A critical History of Greek Philosophy

९.  W. K. Wright : A History of modern Philosophy

१०. वि. य. देशपांडे : अर्वाचीन पाश्चात्य तत्त्वज्ञान भाग १ व २

११. दे. द. वाडेकर : मराठी तत्त्वज्ञान महाकोश खंड १ ते ३

१२. ग. वि. तुळपुळे : ग्रीक तत्त्वज्ञान

१३. ग. ना. जोशी : भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास


▼ ▼ ▼